

दलित मित्र स्व.कदम गुरुजी

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार"

# शिक्षण प्रसारक मंडळ, मंगळवेढा

ता.मंगळवेढा, जि.सोलापूर.

अध्यक्ष



ॲड.सुजित सुभाष कदम

उपाध्यक्ष



डॉ.सुभाष ज्ञानदेव कदम

सचिवा



डॉ.सौ.प्रियदर्शनी कदम-महाडीक

संचालिका



डॉ.सौ.मिनाताई सुभाष कदम

संचालिका



सौ.तेजस्विनी सुजित कदम

## शिक्षण प्रसारक मंडळाच्या विविध शाखा

१) दलित मित्र कदम गुरुजी सायन्स कॉलेज, मंगळवेढा

२) दलित मित्र कदम गुरुजी फार्मसी कॉलेज, मंगळवेढा

३) इंग्लिश स्कूल ज्यूनिअर कॉलेज, मंगळवेढा

(• आर्टस् • कॉमर्स • सायन्स • व्यवसाय शिक्षण)

४) इंग्लिश स्कूल, मंगळवेढा

५) शिवतेज प्राथमिक शाळा, मंगळवेढा

६) इंग्लिश स्कूल ज्यूनिअर कॉलेज, बेगमपूर, ता.मोहोळ (आर्टस्)

७) शिवतेज प्राथमिक शाळा, बेगमपूर, ता.मोहोळ

८) इंग्लिश स्कूल ज्यूनिअर कॉलेज, भोसे, ता.मंगळवेढा (आर्टस्)

९) शिवतेज प्राथमिक शाळा, भोसे, ता.मंगळवेढा

१०) इंग्लिश स्कूल माध्यमिक शाळा, नरखेड, ता.मोहोळ

११) शिवतेज प्राथमिक शाळा, नरखेड, ता.मोहोळ

१२) इंग्लिश स्कूल ज्यूनिअर कॉलेज, वेळापूर, ता.माळशिरस (सायन्स)

१३) शिवतेज प्राथमिक शाळा, वेळापूर, ता.माळशिरस

१४) इंग्लिश स्कूल माध्यमिक शाळा, आंबेचिंचोली, ता.पंढरपूर

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे
शतकमहोत्सवी
विभागीय
नाट्य संमेलन
२०२४


■ **प्रकाशक**
अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद ,
उपनगरीय शाखा सोलापूर

■ **संपादक**
शोभा बोल्ली
भ्रमणध्वनी क्र. ९९२३७५६३९०

■ **विशेष संपादन साहाय्य** - शिरीष देखणे

■ **संपादन साहाय्य** - जयप्रकाश कुलकर्णी

■ **सदस्य** - सुभाष माने, बालाजी शिंदे, जोतिबा काटे, शरदकुमार एकबोटे

■ **मुखपृष्ठ**
पोरे ब्रदर्स

■ **मुद्रितशोधन** - प्रा. नानासाहेब गव्हाणे, शिरीष देखणे

■ **जाहिरात संकलन** - आर्यन क्रिएशन, भ्रमणध्वनी क्र. ८८८८६३९३३३

■ **अक्षरजुळणी**
अथर्व ग्राफिक्स, दत्त चौक, सोलापूर
भ्रमणध्वनी क्र. ९५४५१११११०

■ **मुद्रक**
एस.के.कॉम्प्युटर्स ॲन्ड प्रिंटर्स प्रा.लि.
दत्त चौक, सोलापूर. भ्रमणध्वनी क्र. ९५४५१११११०


(स्मरणिकेतील लेखांत व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# नट-रंग

# अंतरंग


पृष्ठ क्र.

■ **कलावंत सोलापुरी**

जब्बार पटेल : नाट्यप्रवास एका मनस्वी कलावंताचा – **डॉ. विलास सलगरकर** १
मी फैयाज बोलतेय– **शिरीष देखणे** ३
अभियन संपन्न नृत्यांगना : सरला येवलेकर– **रजनीश जोशी** ८
रंगभूमीवरचं पहिलं पाऊल – **अतुल कुलकर्णी** ९
**गुरुराज अवधानी** १२
**किशोर महाबोले** १३
**प्रशांत चौडप्पा** १४
**अमीर तडवळकर** १५

■ **रंगभूमीचे पैलू**

नाटक म्हणजे प्रयोग... ! – **किरण येले** १८
स्पर्धेच्या नाटकांचं होतं काय? – **अभिजीत झुंजारराव** २०
मराठी नाटक आशयकेंद्रित होतं आहे की तंत्रकेंद्रित? – **विद्यासागर अध्यापक** २४
नाटक आणि पार्श्वसंगीत – **प्रशांत देशपांडे** २७
समृद्ध नाट्यनिर्मितीची गरज : नाट्य प्रशिक्षण – **तुषार भद्रे** ३०
नाट्यशास्त्र विभागाचे उपयोजन व त्याचे मराठी रंगभूमीला योगदान – **संपदा कुलकर्णी** ३३
सर्वसमावेशक समीक्षण – **प्रा. अमोल देशमुख** ३५
दोड्डाटा ते संगीत नाटक : सीमा भागातील नाट्यपरंपरा –**जगन्नाथ हुक्केरी** ३७
विदर्भातील नाट्यसंस्कृती : झाडीपट्टी रंगभूमी – **रोशन नंदवंश** ४०
जनजागृतीचे प्रभावी माध्यम : पथनाट्य – **आशुतोष नाटकर** ४३
बाल व शालेय रंगभूमी – **डॉ. मीरा शेंडगे** ४४

■ **नटरंग सोलापुरी**

सोलापूरची कामगार रंगभूमी – **शरदकुमार एकबोटे** ४७
सोलापूरची संगीत रंगभूमी – **प्रा. विद्या काळे** ४९
सोलापूरची प्रायोगिक रंगभूमी – **रजनीश जोशी** ५१
सोलापूरचे रंगमंच – **डॉ. सीमंतीनी चाफळकर** ५४
सोलापुरी नाटककार – **श्रीपाद येरमाळकर** ५८
सोलापूरची उर्दू–हिंदी रंगभूमी – **राजा बागवान** ६२
सोलापूरातील नाट्यचळवळ – **शशिकांत लावणीस** ६४
सोलापूरातील अमराठी भाषिकांची रंगभूमी – **नागेंद्र माणेकरी** ६७
सोलापूर शाखेची जडणघडण – **ॲड. जे. जे. कुलकर्णी** ७०

■ **रंगमंच– सोलापूर जिल्हा**

पंढरपूरचे मेळे, नाटके आणि चित्रपट – **श्याम सावजी** ७३
बार्शीशी स्नेह जुळलेले नटसम्राट बालगंधर्व! – **सचिन वायकुळे** ७५
धांडोळा एका नाट्यचळवळीचा –**दिलीप हातवळणे** ७७
शतकमहोत्सवी नाट्यसंमेलन अकलूज – **औदुंबर भिसे** ७८



**शरद पवार**
संसद सदस्य
(राज्य सभा)

## शुभसंदेश

सिध्देश्वराच्या पावन नगरीत होत असलेल्या अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे शतक महोत्सवी 'अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन' सोलापूर येथे आयोजित करण्यात येत असल्याचे समजून आनंद झाला, या दिमाखदार वाटचालीसाठी मराठी रंगभूमीवर प्रेम करणाऱ्या सर्वांचे मनापासून अभिनंदन.

आपण जाणतो कि, मराठी रंगभूमी अनेक वादळे झेल, अनेक आव्हाने पेलत आहे. रंगभूमीवर प्रेम रसिकांच्या बळावर नाट्यकला नेटाने पुढे चालली आहे. नाट्य संमेलनाच्या आयोजनाने ह्या वाटचालीत आवश्यकतेची भर पडते, अशा सोहळ्याच्या माध्यमातून विविध नाट्यप्रकारांचा कलाविष्कार एकत्रीत पाहावयास मिळतो. कल्पक विचारांचे आदान–प्रदान होते, नवकलाकारांना शिकण्याची प्रेरणा मिळते, नाट्यरसिकांसाठी ही मोठी पर्वणी असते. मी ह्या भव्य कला सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी सहभागी कलावंत, आयोजक, संघटक, परिषदेचे पदाधिकारी आणि नाट्यरसिकांना मनःपूर्वक शुभेच्छा देतो आणि हे संमेलन संस्मरणीय राहील असा विश्वास व्यक्त करतो. धन्यवाद !

(शरद पवार)




**एकनाथ संभाजी शिंदे**
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

मंत्रालय
मुंबई ४०००३२


## शुभेच्छा

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद मुंबई शतक महोत्सवी विभागीय मराठी नाट्य संमेलन' सोलापूर येथे आयोजित करण्यात येत असल्याचे समजून आनंद झाला, या दिमाखदार वाटचालीसाठी मराठी रंगभूमीवर प्रेम करणाऱ्या सर्वांचे मनापासून अभिनंदन.

भारताला मोठा गौरवशाली इतिहास लाभला आहे. येथील हजारो वर्ष जूनी संस्कृती, प्रथा-परंपरा आपल्यासाठी अनमोल ठेवा आहे. या ठेव्यातील सुवर्ण पान म्हणजे नाट्य कला होय. दोन हजार वर्षाची परंपरा असलेली ही कला अतिशय समृद्ध आहे. मराठी रंगभूमी या परंपरेचा महत्वाचा घटक आहे. नाट्याचार्य विष्णुदास भावे यांच्या पासून सुरु झालेला मराठी रंगभूमीचा प्रवास हा अलीकडच्या पिढीतील नाटककारांनी ताकदीने पुढे नेला आहे.

लेखन, दिग्दर्शन, सादरीकरण अशा सर्व पातळीवर मराठी कलावंतांनी आपलं वेगळेपण जपलेले आहे. नाट्य परिषदेच्या माध्यमातून साजरे होणारे नाट्य संमेलन हे मराठी नाट्यसृष्टीचे आणखी एक वेगळेपण आहे. अवघ्या नाट्यसृष्टीला एकत्र आणणारा हा सोहळा मराठी मनाचा मानबिंदू ठरला आहे.

मराठी रंगभूमीला दिशा देणारा हा शतक महोत्सवी आनंद सोहळा ज्येष्ठ निर्माता, दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांच्या अध्यक्षतेखाली साजरा होत आहे. याबद्दल सर्व कलावंतांसह रसिक प्रेक्षकांचेही अभिनंदन ! प्रेक्षकांच्या पाठिंब्यामुळेच आपली नाट्यसृष्टी हा पल्ला गाठू शकली आहे, येणाऱ्या काळात प्रेक्षकांप्रमाणेच शासन म्हणून आपणास भक्कम पाठिंबा राहिल, असा विश्वास देतो.

शतक महोत्सवी अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनास आणि यानिमित्त आयोजित विविध उपक्रमांना मन:पूर्वक शुभेच्छा!

(एकनाथ संभाजी शिंदे)




**देवेंद्र फडणवीस**
उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

मंत्रालय
मुंबई ४०००३२


## शुभेच्छा

शतक महोत्सवी अखिल भारतीय नाट्य संमेलनानिमित्त अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद सोलापूर तर्फे प्रकाशित करण्यात येत असलेली 'नटरंग' ही स्मरणिका नाट्य कर्मीसाठी कायमचा ठेवा होईल, यात शंका नाही.

मराठी माणूस नाट्यरसिक म्हणून ओळखला जातो. आपल्या लेखकांनी आणि रंगभूमीची सेवा करणाऱ्या सर्व नाट्यकर्मींनी नाटक ही जीवंत अनुभव देणारी कला केवळ जोपासली नाही तर तिच्या विकासात अमूल्य असे योगदान दिले. महाराष्ट्राच्या सामाजिक सुधारणापासून महाराष्ट्राची सांस्कृतिक जडण-घडण करण्यात मराठी नाटकांनी महत्त्वाचे योगदान दिले आहे. संगीत नाटकांनी अवीट असे संगीत मराठी भाषेला दिले आहे, मराठी भाषेच्या विकासात, तिच्या प्रसारातही आज जगभर मराठी नाटक आपली भूमिका अतिशय जबाबदारीने पेलत आहे.

नाट्यकर्मी आणि नाट्यरसिकांसाठी मराठी नाट्य संमेलन एक पर्वणी असते. नाट्य संमेलनानिमित्त होणारी चर्चासत्रे, नाट्यप्रवेश आणि नाटकांविषयीचा विचारविनिमय या क्षेत्राच्या विकासाला चालना देणारा ठरला आहे. यंदाच्या शतक महोत्सवी नाट्य संमेलनाला डॉ. जब्बार पटेल यांच्यासारखा संवेदनशील संमेलनाध्यक्ष लाभला आहे. न. चिं. केळकर, स्वातंत्र्यवीर सावरकर, बालगंधर्व, आचार्य अत्रे अशा महान विभूतींनी नाट्यसंमेलनाचे अध्यक्षपद भूषवून या पदाला एक उंची दिली आहे. नाट्यसंमेलनानिमित्त प्रकाशित होत असलेली 'नटरंग' ही स्मरणिका भविष्यातील नाटकांच्या उत्कर्षाचीही नांदी ठरो, असा विश्वास यानिमित्ताने व्यक्त करतो.

'नटरंग' या स्मरणिकेच्या प्रकाशनास आणि नाट्य परिषदेच्या सर्व लोकोपयोगी उपक्रमांना मनःपूर्वक शुभेच्छा !

(देवेंद्र फडणवीस)




**अजित पवार**
उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

मंत्रालय
मुंबई ४०००३२


## शुभेच्छा


अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेतर्फे शतकमहोत्सवी 'अखिल भारतीय मराठी विभागीय नाट्य संमेलन' दि. २७ व २८ जानेवारी २०२४ रोजी सोलापूर येथे प्रसिद्ध दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आल्याचे तसेच या निमित्ताने विशेष स्मरणिका प्रकाशित करण्यात येणार असल्याचे समजून आनंद झाला.

मराठी माणसाचे नाटकवेड सर्वश्रुत आहे. मराठी नाटकांनी महाराष्ट्राचे कला, साहित्य, सांस्कृतिक विश्व समृद्ध केले. मनोरंजनाबरोबरच समाजातील ज्वलंत विषयावर भाष्य करुन प्रबोधनाची चळवळ पुढे नेली. पुरोगामी, सत्यशोधक, विज्ञानवादी विचार महाराष्ट्रात खोलवर रुजविला. मराठी नाटक हे खऱ्या अर्थाने समाजमनाचा आरसा ठरले आहे. मराठी नाटकांना मोठा इतिहास आहे. तंजावर संस्थानात इ.स. १६५० च्या कालखंडात स्वराज्य संकल्पक शहाजीराजेंच्या दरबारात 'लक्ष्मी नारायण कल्याणम्' सारख्या मराठी नाटकांच्या नोंदी सापडतात. विष्णुदास भावे यांनी 'सीता स्वयंवर' हे पहिलं मराठी नाटक रंगभूमीवर आणलं. तेव्हापासून सुरु झालेल्या मराठी नाट्य चळवळीने आज वेगळी उंची गाठली आहे. कलाविश्वात मानाचं स्थान प्राप्त केले आहे.

मराठी नाट्य संमेलनांनाही गौरवशाली इतिहास आहे. वर्ष १९०५ मध्ये मुंबईत पहिले मराठी नाट्य संमेलन सन्माननीय ग.श्री. खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली झाले. वर्ष १९३० मध्ये श्री. आनंद हरी गद्रे यांच्या अध्यक्षतेखाली रौप्यमहोत्सवी नाट्यसंमेलन मुंबईत झाले. वर्ष १९६९ मध्ये ग. दि.माडगूळकर यांच्या अध्यक्षतेखाली सुवर्ण महोत्सवी नाट्य संमेलन ग्वाल्हेरला झाले. वर्ष १९८० मध्ये छोटा गंधर्वांच्या अध्यक्षतेखाली हीरकमहोत्सवी नाट्य संमेलन मुंबईत झाले. वर्ष १९९५ मध्ये नटवर्य राजा गोसावी यांच्या अध्यक्षतेखाली अमृतमहोत्सवी नाट्य संमेलन बारामतीत झाले. मधल्या काही वर्षांचा अपवाद सोडला तर नाट्य संमेलनाचा हा प्रवाह अविरत सुरु असून सोलापूर येथे दि. २७ व २८ जानेवारी २०२४ ला शतकमहोत्सवी नाट्यसंमेलन होत आहे. ही निश्चितच अभिमानाची बाब आहे.

सोलापूर शहराने अभिनेते रमेश देव यांच्या अध्यक्षतेखाली वर्ष २००८ मध्ये ८८ वे नाट्य संमेलन यशस्वी केले होते. कामगारांचे शहर ही ओळख असलेल्या सोलापूर शहरात आयोजित साहित्य, नाट्यसंमेलनामुळे सोलापूर शहराला सांस्कृतिक शहर ही नवीन ओळख मिळेल आणि ती अधिक ठळक होईल. हे संमेलन मराठी कलावंत आणि मराठी नाट्यचळवळीला नवी ऊर्जा देणारे ठरेल. असा विश्वास वाटतो. संमेलनाच्या निमित्ताने प्रकाशित होत असलेल्या स्मरणिकेत मराठी नाट्यचळवळीच्या गौरवशाली इतिहासाचे, नाट्यसंमेलनाच्या शतकमहोत्सवी वाटचालीचे समग्र, सचित्र दर्शन घडेल. ही स्मरणिका संदर्भ, संग्राह्यमूल्य असलेली ठरेल. अशा विश्वास वाटतो. संमेलनाध्यक्ष डॉ. जब्बार पटेल यांचे अभिनंदन शतकमहोत्सवी अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाला स्मरणिका प्रकाशन उपक्रमास शुभेच्छा...!

(अजित पवार)



**उदय सामंत**
मंत्री, उद्योग, महाराष्ट्र राज्य

मंत्रालय
मुंबई ४०००३२

## शुभेच्छा

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद मुंबई शतक महोत्सवी विभागीय मराठी नाट्य संमेलन' सोलापूर येथे डॉ. जब्बार पटेल यांच्या अध्यक्षतेखाली होत असलेल्या अखिल भारतीय नाट्य संमेलनाला मनःपूर्वक शुभेच्छा! या संमेलनाच्या निमित्ताने नाट्यक्षेत्रातील घडमोडींची नोंद घेणारी 'नटरंग' ही स्मरणिका नाट्यरसिकांसाठी नव्या उपक्रमांची नांदी ठरेल, याची खात्री आहे.

महाराष्ट्राच्या सामाजिक सुधारणांपासून महाराष्ट्राची सांस्कृतिक जडण-घडण करण्यात मराठी नाटकांनी महत्त्वाचे योगदान दिले आहे.

नाट्याचार्य विष्णुदास भावे यांच्यापासून सुरु झालेला मराठी रंगभूमीचा प्रवास हा अलीकडच्या पिढीतील नाटककारांनी अतिशय ताकदीने पुढे गेला आहे. महाराष्ट्रात नाट्यचळवळ बाळसे धरू लागली तेव्हा राज्यातील तमाम नाट्यसंस्था आणि कलापथके यांना एकत्र आणण्याची कल्पना अमरावतीच्या दादासाहेब खापर्डे यांनी मांडली आणि यशस्वी केली. त्यातूनच नाट्यसंमेलनाची संकल्पना पुढे आली. नाट्यसंस्थातील दिग्गजांच्या बहुमताने १९०५ मध्ये पहिल्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाच्या अध्यक्षपदाची माळ दादासाहेब खापर्डे यांच्या गळ्यात पडली. तेव्हापासून अनेक नामवंत अध्यक्षांनी नाटय संमेलनाला एका उंचीवर नेऊन ठेवले.

लेखन, दिग्दर्शन, सादरीकरण अशा सर्व पातळीवर मराठी कलावंतांनी आपले वेगळेपण जपलेले आहे. नाट्य परिषदेच्या माध्यमातून साजरे होणारे नाट्य संमेलन हे मराठी नाट्यसृष्टीचे आणखी एक वेगळेपण आहे. अवघ्या नाट्यसृष्टीला एकत्र आणणारा हा सोहळा मराठी मनाचा मानबिंदू ठरला आहे.

नाट्यकर्मी आणि नाट्यरसिकांसाठी मराठी नाट्य संमेलन एक पर्वणी असते. नाट्य संमेलनानिमित्त होणारी चर्चासत्रे, नाट्यप्रवेश आणि नाटकांविषयीचा विचारविनिमय या क्षेत्राच्या विकासाला चालना देणारा ठरला आहे.

नाट्यसंमेलनानिमित्त प्रकाशित होत असलेल्या 'नटरंग' या स्मरणिकेच्या प्रकाशनास आणि नाटय परिषदेच्या सर्व लोकोपयोगी उपक्रमांना मनःपूर्वक शुभेच्छा !

(उदय सामंत)



**सुधीर मुनगंटीवार**
मंत्री, वने, सांस्कृतिक कार्य,
मत्स्य व्यवसाय, महाराष्ट्र राज्य,

मंत्रालय,
मुंबई ४०००३२

## शुभेच्छा

मराठी रंगभूमी ही सांस्कृतिक क्षेत्रात देशभर महाराष्ट्राला आगळी वेगळी ओळख देणारी आणि कित्येक वर्षापासून निरंतर चालत आलेली एक महत्वाची परंपरा आहे. मराठी रंगभूमीने चित्रपटांच्या युगातही आपले स्थान अबाधित राखून स्वतःचा असा प्रेक्षकवर्ग टिकविलेला आहे. या रंगभूमीला आपला स्वतःचा एक उज्ज्वल इतिहास व गौरवशाली परंपरा आहे आणि या रंगभूमीने देशाला दिग्गज कलाकार, दिग्दर्शक, संगीतकार, गायक दिलेले आहेत.

ही परंपरा टिकविणे आणि तिचे संवर्धन करणे यात नियमितपणे होत असणाऱ्या अखिल भारतीय नाट्य संमेलनांचा सिंहाचा वाटा आहे. या वर्षी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे शतक महोत्सवी 'अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन' सोलापूर येथे ज्येष्ठ निर्माता-दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांच्या अध्यक्षतेखाली साजरे होत आहे.

आमचे स्नेही, ज्येष्ठ रंगकर्मी आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष श्री प्रशांत दामले यांच्या अध्यक्षपदाच्या कारकिर्दीत शतक महोत्सवी नाट्य संमेलन होत आहे ही आनंदाची बाब आहे. शासन म्हणून मराठी रंगभूमीच्या विकासात सर्व प्रकारचे योगदान देण्याचा आमचा नेहमीच प्रामाणिक प्रयत्न राहिलेला आहे व इथून पुढेही राहणार आहे. त्याचाच एक भाग म्हणून राज्यभरात महत्वाच्या ठिकाणी नाट्यगृह उभारण्याचे आमचे नियोजन आहे व त्यात श्री दामले यांचे सहकार्य लाभेल असा मला विश्वास आहे.

या नाट्य संमेलनाचे आयोजन करणाऱ्या सर्व नाट्यप्रेमींचे, कलाकारांचे व उपस्थित राहणाऱ्या सर्व रसिक प्रेक्षकांचे मी शतक महोत्सवी नाट्य संमेलनाच्या निमित्ताने मनःपूर्वक अभिनंदन करतो.

शतक महोत्सवी अखिल भारतीय नाट्य संमेलनास माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा!

सुधीर मुनगंटीवार

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद मुंबई
शतक महोत्सवी विभागीय नाट्य संमेलन सोलापूर-२०२४

# * स्वागताध्यक्ष *



## मा. ना. चंद्रकांतदादा पाटील

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री, वस्त्रोद्योग आणि संसदीय कार्य मंत्री,
महाराष्ट्र राज्य (पालकमंत्री सोलापूर)

# अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद,मुंबई
## विश्वस्त मंडळ

### तहहयात विश्वस्त


श्री. शरद पवार



श्री. शशी प्रभु


डॉ. रवि बापट

### विश्वस्त



श्री. उदय सामंत


श्री. मोहन जोशी


श्री. गिरीष गांधी


श्री. अशोक हांडे


### पदसिध्द विश्वस्त


श्री.प्रशांत दामले
(अध्यक्ष)


श्री. अजित भुरे
(प्रमुख कार्यवाह)

# अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मुंबई

## नियामक मंडळ २०२३-२८ पदाधिकारी




श्री. प्रशांत दामले
अध्यक्ष



श्री. नरेश गडेकर
उपाध्यक्ष



श्री. भाऊसाहेब भोईर
उपाध्यक्ष



श्री. अजित भुरे
प्रमुख कार्यवाहक



श्री. सतीश लोटके
कोषाध्यक्ष



श्री. समीर इंदुलकर
सहकार्यवाहक



श्री. दिलीप कोरके
सहकार्यवाहक



श्री. सुनील ढगे
सहकार्यवाहक

# अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मुंबई

## कार्यकारी सदस्य



श्री. विजय चौगुले



सौ. सविता मालपेकर




श्री. सुशांत शेलार



श्री. संजय देसाई




सौ. दिपा क्षीरसागर



श्री. शंकर (दीपक) रेगे



श्री. गिरीश महाजन



श्री. विजयकुमार साळुंके



श्री. संजय रहाटे



श्री. विशाल शिंगाडे




श्री. संदीप पाटील

# अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मुंबई


## नियामक मंडळ सदस्य



श्रीमती वैजयंती आपटे



श्री. विजय केंकरे




श्री. विजय गोखले



श्री. सयाजी शिंदे



श्री. संदीप जंगम



श्री. शिवाजी शिंदे




श्री. शामनाथ पुंडे




श्री. उदय राजेशिर्के



श्री. राजन मुठाणे



श्री. आनंद कुलकर्णी



श्री. चंद्रकांत धामणीकर



श्री. मुकुंद पटवर्धन

# अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मुंबई

## नियामक मंडळ सदस्य




श्री. राजेश कुंभादरे



प्रा.डॉ. श्री. विश्वनाथ आवड



प्रा. सौ. तेजस्विनी कदम



श्री. समद फुलमामडी



श्री. सुरेश धोत्रे



श्री. सुहास जोशी



श्री. समीर हंपी




श्री. सत्यजीत धांडेकर




श्री. मेघराज राजेभोसले



श्री. राजेंद्र जाधव



श्री. रविंद्र कदम




श्री. क्षितीज झावरे

# अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मुंबई

## नियामक मंडळ सदस्य



श्री. संजयकुमार दळवी


श्री. प्रफुल्ल फरकसे


श्री. प्रशांत देशपांडे


श्री. नंदकिशोर कव्हळकर


श्री. उज्वल देशमुख


श्री. संजय पाटील देवळाणकर



श्री. चंद्रशेखर पाटील


सौ. सुकन्या कुलकर्णी-मोने


श्री. नवनाथ(प्रसाद) कांबळी


श्री. अजय दासरी


सौ. ऐश्वर्या नारकर


श्री. अविनाश नारकर

# अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मुंबई

## नियामक मंडळ सदस्य



श्री. शैलेश गोजमगुंडे



सौ. गीताबाली उनवणे



श्रीमती गीतांजली ठाकरे



श्री. जगन्नाथ (नाथा) चितळे



सौ. निलम शिर्के सामंत




श्री. विजय सूर्यवंशी



श्री. रत्नकांत जगताप

## अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद मुंबई
## शतक महोत्सवी विभागीय नाट्य संमेलन सोलापूर–२०२४



✲ संमेलनाध्यक्ष ✲
डॉ. जब्बार पटेल
चित्रपट व नाट्य दिग्दर्शक



✲ स्वागताध्यक्ष ✲
मा. ना. चंद्रकांतदादा पाटील
उच्च व तंत्रशिक्षण मंत्री, वस्त्रोद्योग आणि संसदीय कार्य मंत्री, महाराष्ट्र राज्य, पालकमंत्री सोलापूर



✲ प्रमुख निमंत्रक ✲
मा. ना. उदय सामंत
उद्योग मंत्री– महाराष्ट्र राज्य



श्री. प्रकाश यलगुलवार
(कार्यध्यक्ष)



श्री. विजयकुमार साळुंके
(प्रमुख कार्यावह)



श्री.दिलीप कोरके
(कोषाध्यक्ष)



श्री. प्रशांत बडवे
(स्वागत सचिव)




श्री. अविनाश महागावकर
(सह कोषाध्यक्ष)



श्री. मोहन डांगरे
(समन्वयक)

## अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद मुंबई
## शतक महोत्सवी विभागीय नाट्य संमेलन सोलापूर-२०२४



श्री. राजा माने
(सह कार्याध्यक्ष)



प्रा. श्री. अजय दासरी
(सह कोषाध्यक्ष)



प्रा. डॉ. श्री. विश्वनाथ आवड
(सह कार्यावह)



प्रा. सौ. तेजस्वनी कदम
(सह कार्यावह)



श्री. सुमित फुलमामडी
(सह कोषाध्यक्ष)



प्रा. डॉ. नरेंद्र काटीकर
(सह कार्यावह)



श्री. कृष्णा हिरेमठ
(समन्वयक)



प्रा. डॉ. रणजित गायकवाड
(समन्वयक)

# अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद
## सोलापूर जिल्हा-शाखा
### अध्यक्ष व प्रमुख कार्यवाह



श्री. प्रकाश यलगुलवार
(अध्यक्ष-सोलापूर शाखा)



श्री. विजयकुमार साळुंके
(अध्यक्ष-उपनगरीय शाखा,सो.)


डॉ. श्री. सुभाष कदम
(अध्यक्ष- मंगळवेढा शाखा)


डॉ. श्री.मंदार सोनवणे
(अध्यक्ष- पंढरपूर शाखा)


श्री. धैर्यशील मोहिते पाटिल
(अध्यक्ष-अकलूज शाखा)


श्री.चेतनसिंह केदार
(अध्यक्ष-सांगोला शाखा)


श्री. सोमेश्वर घाणेगावकर
(अध्यक्ष-बार्शी शाखा)


प्रा. श्री.अजय दासरी
(अध्यक्ष-महानगर शाखा, सो.)


श्री. जोतिबा काटे
(प्र.कार्यवाह-सोलापूर शाखा)


श्री. प्रशांत शिंगे
(प्र.कार्यवाह-उपनगरीय शाखा,सो.)


श्री. यतिराज वाकळे
(प्र.कार्यवाह- मंगळवेढा शाखा)


श्री. दिलीप कोरके
(प्र.कार्यवाह- पंढरपूर शाखा)


प्रा. डॉ श्री.विश्वनाथ आवड
(प्र.कार्यवाह-अकलूज शाखा)


श्री. अफजल शेख
(प्र.कार्यवाह-सांगोला शाखा)


सौ. विजयश्री पाटील
(प्र.कार्यवाह-बार्शी शाखा)


श्री. वेंकटेश सादुल
(प्र.कार्यवाह-महानगर शाखा, सो)

## अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मध्यवर्ती मुंबई

### कार्यालयीन कर्मचारी -अधिकारी



श्री. मनोज डाफळे
(मुख्य कार्य.अधिकारी)



श्री. सचिन गुंजोटीकर
(लेखापाल)



राहुल पवार
(लिपिक)



श्री. विशाल सदाफुले
(लिपिक)



सुश्मिता सुगदरे
(लिपिक)



दीपक सावंत
(व्यवस्थापक, यशवंत नाट्य मंदिर)



श्री. नागेश खोरजुवेकर
(सेवक)



श्री. साहिल मोहिते
(सेवक)

## अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद
## सोलापूर शाखा, सोलापूर
### कार्यकारणी

**अध्यक्ष** : प्रकाश यलगुलवार

**उपाध्यक्ष** : विठ्ठल बडगंची

**उपाध्यक्ष** : अशोक किल्लेदार

**प्रमुख कार्यवाह** : प्रा. जोतिबा काटे

**सह कार्यावाह** : सुमित फुलमामडी, सुहास मार्डीकर

**कोषाध्यक्ष** : विद्या काळे

**कार्यकारणी सदस्य** : आनंद खरबस, ॲड. आर. एस. पाटील, पद्माकर कुलकर्णी, शांता येळंबकर, अपर्णा जोशी, अमोल देशमुख, ॲड. अरविंद अंदोरे, व्यंकटेश रंगम, ॲड. सारिका अग्निहोत्री

**निमंत्रित सदस्य** : प्रशांत देशपांडे, सुभाष माने, उमेश बटाणे, मिलिंद पटवर्धन संतोष उदगीरी, ॲड. रवि गजधाने

**सल्लागार** : मल्लिकार्जून कावळे, शशीकांत लावणीस, शरदकुमार एकबोटे आझम सैफन

---

## अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद
## उपनगरीय शाखा, सोलापूर
### कार्यकारणी

**अध्यक्ष** : विजयकुमार साळुंके

**उपाध्यक्ष (प्रशासन)**: शशिकांत पाटील

**उपाध्यक्ष (उपक्रम)** : डॉ. मीरा शेंडगे

**कार्याध्यक्ष** : दिनेश शिंदे

**प्रमुख कार्यवाह** : प्रशांत शिंगे

**कोषाध्यक्ष** : कृष्णा हिरेमठ

**सहकार्यवाह (प्रशासन)**: सुशांत कुलकर्णी

**सहकार्यवाह (उपक्रम)** : अनुजा मोडक,

**सहकार्यवाह (स्पर्धा)** : किरण लोंढे

**समन्वयक** : राजासाहेब बागवान

**कार्यकारणी सदस्य** : शोभा बोल्ली, जयप्रकाश कुलकर्णी, नरेंद्र गंभिरे, आशुतोष नाटकर मनिषा जोशी, अमोल राजमाने, अपर्णा गव्हाणे, जितेश कुलकर्णी, वर्षा मुसळे

**स्विकृत सदस्य** : शिवाजी उपरे, महेश निकंबे, राजेश जाधव, श्रुती मोहोळकर

## अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद
## पंढरपूर शाखा, पंढरपूर
### कार्यकारणी

अध्यक्ष : मंदार सोनवणे

उपाध्यक्ष (प्रशासन): सुनिल मोहिते

उपाध्यक्ष (उपक्रम) : दत्तात्रय जगताप

प्रमुख कार्यवाह : दिलीप कोरके

सह कार्यावाह : विठ्ठल नागटिळक, धनंजय उराडे, डॉ. रेखाताई मोहिते

कोषाध्यक्ष : विक्रम बिस्किटे

कार्यकारणी सदस्य : नवनाथ पोरे, विनोद शेंडगे, रविंद्र शेवडे, सोमनाथ गायकवाड,
सुनिल पुरंदरे, ज्ञानेश्वर दुधाणे सुधीर घोडके, सौ. ललिता कोळवले,
सौ. निकिता पवार, सौ. संगिता पाटील, सौ. रेखा चंद्रराव,
सौ. प्रतिभा कारंडे कु. पल्लवी दशरथ

सल्लागार : दिलीप टोमके, दत्तात्रय कवठेकर, सागर यादव, श्रीराम परदेशी

## अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद
## मंगळवेढा शाखा, मंगळवेढा
### कार्यकारणी

अध्यक्ष : डॉ. सुभाष कदम

उपाध्यक्ष : प्रा. सौ. तेजस्विनी कदम, राजाभाऊ चेळेकर

प्रमुख कार्यवाह : यतिराज वाकळे

सह कार्यावाह : अशपाक काझी, प्रा. उज्वला भोसले, डॉ. शरद शिर्के

कोषाध्यक्ष : दयासागर देशमाने

कार्यकारणी सदस्य : सतिश सावंत, राजेन्द्रकुमार जाधव, गणेश यादव,
हरिप्रसाद देवकर, लहु ढगे, बालाजी शिंदे, अजित शिंदे,
नारायण घुले, सुहास माने, दिगंबर भगरे, सचिन ढगे,
युवराज जगताप, राकेश गायकवाड

## अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद
## सांगोला शाखा, सांगोला
### कार्यकारणी

**अध्यक्ष :** चेतनसिंह केदार
**उपाध्यक्ष :** वैभव आंधळगावकर
**प्रमुख कार्यवाह :** अफजल शेख
**कोषाध्यक्ष :** बबन सावंत
**सहकार्यवाह :** आण्णासाहेब काशिद, विनायक शिंदे
**कार्यकारणी सदस्य :** संजय पारणे, अनिल केदार, हेमंतकुमार शिंदे, रुपाली शेजाळ, जयश्री वाघमोडे, निलावती साळुंखे, रमेश गोडसे.
**सल्लागार :** तात्यासाहेब केदार–सावंत, मोहन साळुंखे, सुजाता केदार सावंत, शंकर केदार

---

## अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद
## बार्शी शाखा, बार्शी
### कार्यकारणी

**अध्यक्ष :** सोमेश्वर घाणेगांवकर
**उपाध्यक्ष :** राजेंद्र माने
**प्रमुख कार्यवाह :** सौ. विजयश्री पाटील
**सह कार्यावाह :** श्रीमती भारती पाटील
**कोषाध्यक्ष :** प्रशांत ढोले
**कार्यकारणी सदस्य :** डॉ. विशाल लिंगायत, सुर्यकांत वायकर, अनिल जोशी, सतिश होनराव, राहुल दोषी–माढेकर, गणेश सावंत, आकाश पाटील, नागेश गाभणे, प्रा. माधुरी शिंदे, ममता चोप्रा, उल्का डोंबे, वंदना देवणे, मधुरा पाटील, गिरीश सोनार

## अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद
## अकलूज शाखा, अकलूज
### कार्यकारणी

अध्यक्ष : धैर्यशिल मोहिते–पाटील

उपाध्यक्ष : रामचंद्र चव्हाण, अजय तपकिरे

प्रमुख कार्यवाह : प्रा. डॉ. विश्वनाथ आवड

कोषाध्यक्ष : अमोल खरात

सह कार्यावाह : सुनिल कांबळे, औदुंबर भिसे

कार्यकारणी सदस्य : सौ. शितलदेवी मोहिते–पाटील, शिवदत्त नारायणकर, नितीन बनकर
श्रीकांत राऊत, अनिल जाधव, धर्मराज दगडे, धनंजय जामदार,
मनोज वर्दम, रविंद्र नागटिळक, वैभव आंबेकर, योगीराज भिसे

---

## अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद
## महानगर शाखा, सोलापूर
### कार्यकारणी

अध्यक्ष : प्रा. अजय दासरी

उपाध्यक्ष : एम. आर. कांबळे

प्रमुख कार्यवाह : डॉ. वेंकटेश सादूल

कोषाध्यक्ष : विजय बादगुडे

सह कार्यावाह : संजय सावंत, प्रा. डॉ. रजनी दळवी, अमित रोडगे

सचिव : प्रा. डॉ. हनुमंत मते

कार्यालय प्रमुख : अमृता गोसावी


प्रसिध्दी प्रमुख : राजेश राऊळ

कार्यकारणी सदस्य : प्रा. डॉ. नरेंद्र काटीकर, नागेंद्र माणेकरी, आसिफ इक्बाल,
दयानंद मामड्याल, बाळकृष्ण पोगुल, दत्तात्रय पवार,
दत्तात्रय श्रीराम, रेणुका बुधाराम, वसुंधरा शर्मा.

# अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे
# शतक महोत्सवी विभागीय नाट्य सम्मेलन, सोलापूर

## विशेष आभार


मा. खासदार डॉ.श्री.जयसिध्देश्वर महास्वामीजी


मा. खासदार श्री. रणजितसिंह नाईक- निंबाळकर


मा. खासदार श्री. ओमराजे निंबाळकर


मा.आ.श्री. बबन (दादा) शिंदे


मा.आ.श्री. सुभाष देशमुख



मा.आ.श्री. विजयकुमार देशमुख


मा.आ.श्री. राजाभाऊ राऊत


मा.आ.प्रणितीताई शिंदे


मा.आ.श्री. संजय (मामा) शिंदे


मा.आ.श्री. रणजितसिंह मोहिते पाटील


मा.आ.श्री. राम सातपुते


मा.आ.श्री. सचिन कल्याणशेट्टी


मा.आ.श्री. समाधान आवताडे


मा.आ.श्री. यशवंत माने


मा.आ.श्री. शहाजीबापू पाटील

## अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे शतक महोत्सवी विभागीय नाट्य सम्मेलन, सोलापूर

### विशेष सहकार्य



प्रा. शिवाजीराव सावंत



ॲड. सुजितबापू कदम



प्रा.डॉ. बी.पी. रोंगे



श्री. यतिन शहा
उद्योजक, प्रिसिजन कॅमशाफ्ट



डॉ. सुहासिनी शहा
अध्यक्षा, प्रिसिजन फाउंडेशन



श्री. राम रेड्डी
उद्योजक, बालाजी अमाईन्स



श्री. अमोलराजे भोसले
प्रमुख कार्यकारी विश्वत
श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ, अक्कलकोट



श्री. चेतनसिंह केदार
जिल्हाध्यक्ष भाजपा



श्री. शहाजी पवार

## अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे
## शतक महोत्सवी विभागीय नाट्य सम्मेलन,
## सोलापूर

### विशेष सहकार्य



**मा.डॉ. प्रकाश महानवर**
कुलगुरु
पु.अ.हो.सोलापूर विद्यापीठ



**मा. श्री. बिभीषण चवरे**
संचालक सांस्कृतिक कार्य
महाराष्ट्र राज्य, मुंबई



**मा.श्री. कुमार आशिर्वाद**
जिल्हाधिकारी
सोलापूर



**मा.श्री. राजेंद्र माने**
पोलीस आयुक्त, सोलापूर



**मा.श्री. शिरिष सरदेशपांडे**
पोलीस अधिक्षक, सोलापूर



**मा.श्रीमती शितल तेली-उगले**
आयुक्त, सोलापूर महानगरपालिका



**मा.श्रीमती मनिषा आव्हाळे**
मुख्य कार्य. अधिकारी, जि. प. सोलापूर

# अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे शतक महोत्सवी विभागीय नाट्य सम्मेलन, सोलापूर

संपादक



शोभा बोल्ली (रंगकर्मी)

विशेष संपादन सहाय्य



शिरीष देखणे (रंगकर्मी)

## स्मरणिका प्रकाशन सोहळा



१०० वे विभागीय नाट्य संमेलन सोलापूर स्मरणिका प्रकाशन करताना संमलेनाचे अध्यक्ष डॉ. जब्बार पटेल, स्वागतध्यक्ष, नामदार चंद्रकांत (दादा) पाटील, मार्गदर्शक प्रा. शिवाजीराव सावंत, उपाध्यक्ष गडेकर, डॉ. दामा, संपादिका शोभा बोल्ली व अन्य मान्यवर

# दि पंढरपूर मर्चंटस् को-ऑप बँक लि., पंढरपूर

लक्ष्मी पथ, महावीर नगर पंढरपूर, जि. सोलापूर ४१३३०४

फोन नं. ०२१८६-२२३१०६
२२७६८२

ई मेल :-www.pmcblppr@pandharpurmerchants.com
वेब साईट :-www.pandharpurmerchantsco-op.in

ठेवी - २१६२२.०० | नफा - १९९.५१ | कर्जे - १३०१०.२२ | एन.पी.ए.२.०७% | निधी - ३१८८.८३ | ऑडीट वर्ग - 'अ' | भाग भांडवल ४२०.७६

बँकेची दिनांक ३१.०३.२०२३ रोजीची आर्थिक स्थिती (आकडे लाखात)

दामदुप्पट ठेव -१२० महिने (१० वर्षे) जेष्ठ नागरिक, सहकारी पतसंस्था, सोसायट्या आणि पब्लिक ट्रस्ट यांचे ठेवीवर प्रचलित व्याज दरापेक्षा 0.५0% जादा व्याजदर देण्यात येईल.

| ठेवीवरील व्याज दर | | कर्जावरील व्याज दर (द.सा.द.शे.) | |
|---|---|---|---|
| ३० दिवस ते ९० दिवस | ५.००% | डॉक्टर, हॉस्पिटल बांधकाम, हॉस्पिटल मशिनरी, हॉस्पिटल टर्म लोन महिलांसाठी वाहन तारण सोनेतारण, गव्हर्मेंट बॉड तारण, बेदाणा रिसीट, वेअर हाऊस रिसीट तारण | ११.००% |
| ९१ दिवस ते १८० दिवस | ६.००% | | |
| १८१ दिवस ते ३६४ दिवस | ६.५०% | | |
| १ वर्ष पूर्ण | ७.५०% | नविन घर बांधणी | १२.००% |
| १ वर्षाच्या पुढे | ७.००% | हायपोथीकेशन कॅश क्रेडीट मशिनरी तारण (महिला सोडून) व्यापारी टर्म लोन | १३.००% |
| सेव्हिंग ठेव | ३.००% | | |
| | | घर दुरुस्ती रु. २.०० लाखापर्यंत | १३.५०% |
| | | पगार तारण | १५.००% |

हाय कॅश क्रेडिट, व्यापारी टर्म लोन, मशिनरी इ. कर्जावर आर्थिक कागदपत्रे निकषाचे आधारे व्याजदर लागू

आणणासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ कर्ज योजना लागू. - बँकिंग सेवा - १. जलद फंड ट्रान्सफर करिता आरटीजीएस व एनईएफटी ची सोय २. एनपीसीआय नेटवर्कद्वारा देशातील १,८०,००० पेक्षा जास्त एटीएम मधून भारतातून कोठूनही पैसे काढण्याची सुविधा. तसेच आपल्या बँकेच्या एटीएम मधून इतर बँकांच्या ग्राहकांना पैसे काढण्याची सुविधा ३. सर्व शाखा संगणकीकृत ४. लॉकर सुविधा उपलब्ध ५. जलद व तत्पर सेवा

मा. श्री.विजयकुमार कां. कोठारी
व्हा. चेअरमन

श्री. अतुल म. म्हमाने
व्यवस्थापक

श्री. सोमनाथ स. डोंबे
चेअरमन

सर्व मा. संचालक मंडळ
सभासद वर्ग व कर्मचारी वृंद

स्थापना : १९६२



# ६१ वर्षांपासून विश्वासार्हता जपणारी बँक

# रतनचंद शहा सहकारी बँक लि.



**हेड ऑफिस : बाजार चौक, मंगळवेढा, जि. सोलापूर. फोन : ०२१८८-२२०३५५, २२१४५५**

**आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध**

| |
|---|
| RTGS / NEFT |
| CBS प्रणाली |
| SMS बँकींग |
| E-Mail वर Account Statement |
| IFSC - UTIBORSS61 |
| ECS CLEARING<br>DEBIT CARD<br>MOBILE VIEW APP |

**कर्जाचे व्याजदर**

| | |
|---|---|
| सोने तारण | : १०.५०% |
| हायपब्लिकेशन | : ११ व १३.५०% |
| घरबांधणी कर्ज | : १३ ते १६% |
| घर तारण (हप्तेबंदी) | : १५% |
| व्यवसाय टर्म कर्ज | : १३.५० ते १५% |
| वाहन तारण/ खरेदी कर्ज | : १३ ते १४% |
| टर्म लोन | : १६% |

**कर्जाचे व्याजदर**

| | |
|---|---|
| ३१ दिवस ते १७१ दिवस | ४.५०% |
| १८० दिवस ते २१० दिवस | ५.२५% |
| २११ दिवस ते २६४ दिवस | ५.७५% |
| १ वर्ष ७२९ दिवस | ६.८७% |
| २ वर्ष ते ३ वर्ष | ७.५०% |
| ३ वर्षापुढे | ६.५०% |
| विशेष ठेव योजना (४०० दिवस) | ७.१०% |

**दाम दुप्पट**

१० वर्षे ५ महिने

ज्येष्ठ नागरिक ९ वर्षे ८ महिने

पिग्मी व रिकरिंग ठेव सुविधा उपलब्ध

श्री. राहुल सुभाष शहा
चेअरमन

श्री. रामचंद्र एकनाथ जगताप
व्हा. चेअरमन
समस्त संचालक मंडळ

श्री. कैलास गाडे
सरव्यवस्थापक

शाखा

मंगळवेढा: (०२१८८)२२१४५५
टेंभुर्णी: (०२१८३) २२१४०३
महुद: (०२१८७) २४६२३५
सांगोला : (०२१८७) २२०७१८
जवळा: (०२१८७) २४२२८५
नातेपुते: (०२१८५) २६२३७६
करकंब : (०२१८६)२४२६८५
पंढरपूर (०२१८६) २२७५५१
सोलापुर: (०२१७) २३४६८८८
मोडनिंब: (०२१८३) २३०३५५
शाखेशी संपर्क साधा..
फलटण: (०२१६६) २२४११०

# संवाद

**शोभा बोल्ली**

सोलापुरात १०० व्या नाट्यसंमेलनाच्या निमित्ताने विभागीय नाट्यसंमेलन होतंय, याचा सगळ्या सोलापूरच्या नाट्यप्रेमी, रंगकर्मींना मनस्वी आनंद होतोय. आणि याच १०० व्या संमेलनाची स्मरणिका तुम्हा रसिकांच्या हाती देताना समाधान वाटतंय. नाट्यप्रयोगाच्या तालमी या नित्यनूतन असतात तसाच काहीसा अनुभव ही स्मरणिका करताना येत होता. आज ती तालीम प्रयोगात उतरली आहे. आणि तो प्रयोग तुमच्या समोर सादर करताना मनात एक धाकधुक आहे की, हा प्रयोग कसा झाला असेल ! पण प्रामाणिक आणि कष्टपूर्वक केलेले प्रयत्न यशस्वी होतात हा आजवरचा अनुभव आहे.

नाटक विविधांगांनी फुलणारा, रंगणारा प्रयोग असतो. आणि हा प्रयोग प्रत्यक्ष रंगमंचावर रंगवतो तो नट. नटाच्या मागे अर्थात सर्वप्रथम असतो तो लेखक मग दिग्दर्शक मग नेपथ्य, प्रकाश, पार्श्वसंगीत आणि रंगमंच व्यवस्था बघणारे कलावंत. या सगळ्यांचं टीमवर्क म्हणजे नाटक. म्हणूनच नाटकाला समूहकला म्हटलं जातं. अशा या समूहातले सगळेच नट असतात म्हणूनच ही स्मरणिका 'नट-रंग'

भिन्न भिन्न रूची असणाऱ्या प्रेक्षकांना एकाच वेळी समाधान देणारी कला म्हणजे नाट्यकला! असं भरतमुनींनी नाट्य शास्त्र या ग्रंथात म्हटलं आहे. या कलेची ही ताकत दुसऱ्या कोणत्याच कलेत असेल, असं वाटत नाही. अशी ही कला मानवी मन, जग व्यापून टाकणारी आहे. समाजाचं मनोरंजन आणि उद्बोधन करणाऱ्या या कलेला महाराष्ट्रात सव्वाशे वर्षांहून जास्त काळाचा इतिहास आहे. काळ बदलत गेला तसा नाट्यकलेनेही आपल्यात बदल केला. बोलपट, चित्रपटाच्या क्रांतीनंतरही या कलेनं आपलं अस्तित्व जपलं. एवढेच नव्हे तर ते विकसितही केलं. यासाठी अनेक प्रतिभासंपन्न, नाटककार, दिग्दर्शक, कलावंतांनी आपलं योगदान दिलंय, समर्पित भावनेनं नाट्यसेवा केली आणि समाजमन घडविण्यात मोलाचा वाटा उचलला.

सोलापूरच्या रंगभुमीचा विचार करताना या रंगभूमीनेही नाट्यक्षेत्रात मोलाचं कार्य केलंय. ही रंगभूमी फुलली ती गणेशोत्सवातून. दरवर्षी होणाऱ्या गणेशोत्सवात अनेक संस्था आपले नाट्यप्रयोग सादर करत. मनोरंजनाबरोबर सामाजिक प्रश्नही नाटकाच्या माध्यमातून चर्चिले जात. त्यानंतर आली स्पर्धेतील रंगभूमी. सुरुवातीला कामगार आणि नंतर राज्यनाट्य स्पर्धा, त्यानंतर महाराष्ट्रभर होणाऱ्या एकांकिका स्पर्धातून सहभाग. गणेशोत्सवातील नाटके आज बंद झाली. त्यामुळे उरली फक्त स्पर्धेपुरती नाटकं. तीस-बत्तीस नाट्यप्रयोगांची ही स्पर्धा आज कशीबशी दहा-बारा नाटकांवर येऊन थांबली आहे. त्यामुळे कलावंत, नाटककारांना व्यक्त व्हायला स्पर्धेशिवाय तरणोपाय नाही. पण रोडावलेले नाट्यप्रयोग आणि प्रेक्षक, नाट्यप्रयोगात 'प्रयोग' नाही, नाट्यलेखनात बदलणाऱ्या समाजाचं भान नाही अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

आज एखाददुसरी संस्था काही छोटे मोठे नाट्यविषयक स्पर्धा घेते आहे. त्याबद्दल त्यांचं अभिनंदन करायला हवं, पण याला नाट्यचळवळ म्हणता येणार नाही. 'यू ट्यूब' सारखं चॅनल नवनवीन प्रवाह, प्रयोग दाखवते पण त्यातून काही नवनिर्मितीला चालना मिळणाऱ्या बाबी शिकण्यापेक्षा यूट्यूबवरच्या एकांकिका कॉपी पेस्ट करून सादर केल्या जातात, हे घातक आहे. नवनिर्मितीचा आनंद या निर्मितीमुळे गमावतोय, हे भान कलावंतांना आले पाहिजे. यातून घडण्यापेक्षा, नक्कल करण्याकडे कल निर्माण होतोय, हे नक्कीच चांगलं नाही.

मानवी मन, जग बदलतंय, त्याचे पडसाद रंगमंचावर झाले, होणार, होत आहेत ! कारण हे एकमेव जिवंत व सशक्त माध्यम आहे. एक पिढी होती ज्यांच्यात नाटक ही 'अर्ज urge' होती. सोलापूरातील ज्येष्ठ व महाराष्ट्रात ज्यांना मानाचं स्थान होते ते नाट्य दिग्दर्शक डॉ. वामनराव देगांवकर म्हणायचे की, 'मी जर नाटकाच्या तालमीला नाही आलो तर समजा मी मेलोय' ही अर्ज आज कोणाकडे आहे. नाटक हे केवळ करमणुकीचे किंवा स्पर्धेचं होऊ शकत नाही पण ते आज दुर्दैवानं झालंय. नाटक हे विचार मांडण्याचं, वैचारिक घुसळणीचं, मानवी मन घडवण्याचं, समृद्ध करण्याचं माध्यम आहे.

विविध कलांचा विकास होण्यासाठी इतरही कलांचा आस्वाद सगळ्याच क्षेत्रातील कलावंतांना घेता आला पाहिजे. या कला परस्परपूरक आहेत यादृष्टीने विचार झाला पाहिजे. आज गाणारे नाटकाला येत नाहीत, चित्रकार गाण्याच्या कार्यक्रमाला येत नाहीत. नर्तक इतर कलांचा आस्वाद घेत नाहीत तर साहित्यिक नाटक पाहायला जात नाहीत व कलावंत साहित्यिक कार्यक्रमाला उपस्थित रहात नाहीत, अशी परिस्थिती आहे. रसिक म्हणूनही कलावंत घडले पाहिजेत. रसिकत्व त्यांच्यात भिनलं पाहिजे. तरच चांगलं-वाईट कळेल आणि मग आत्मसात करायला मन उत्सुक राहील.

अजून एक मुद्दा त्या निमित्तानं सांगावासा वाटतो की गाणं, नृत्य, वादन, सूत्रसंचालन यातून चार पैसे आजही त्या त्या क्षेत्रातल्या कलावंताला मिळतात. गणेशोत्सव वा तत्सम उत्सवाच्या नाटकातून काम करणाऱ्या कलावंताला आर्थिक प्राप्ती होत असल्याने छोटी मोठी नोकरी करत नाट्यकला फुलविली जायची. पण आज परिस्थिती बदलली आहे. गल्ली चौकातून होणारे हे नाट्यप्रयोग थांबले. लहान वयातच चार पैसे मिळवून शिक्षण घेणारी ही तरुण पिढी म्हणूनच आज या क्षेत्राकडे गांभीर्याने पहात नाही. परंतु स्वतःला समृद्ध करण्यासाठी या कलेइतकी दुसरी कला नाही. व्यक्तिमत्त्व विकासात ही कला तुम्हाला सर्वतोपरी सहाय्य करते हे ओळखून तरुणपिढीनं नाट्यकलेकडे गांभीर्याने पाहिलं पाहिजे आणि या कलेच्या विकसनात मोलाचा वाटा उचलला पाहिजे.

यानिमित्ताने अजून एक सांगावसं वाटतं की, व्यावसायिक रंगभूमीचं केंद्र आहे मुंबई ! जर या केंद्राचं विकेंद्रीकरण झालं तर? हा प्रयोग करून पहायला हरकत नाही. यासाठी मध्यवर्ती नाट्य परिषदेने एक उत्तम दिग्दर्शक छोट्या शहरांमध्ये पाठवून स्थानिक नाट्यपरिषदांच्या सहाय्याने, स्थानिक कलावंतांना घेऊन एखादं व्यावसायिक स्तरावर चालेल असं नाटक बसवले जावे. त्याचे प्रयोग जिल्हा आणि आजूबाजूच्या जिल्ह्यांमध्ये, गावांमध्ये करता आले, त्याला सर्वसामान्यांना परवडेल असे शंभर-दीडशे रु. तिकिट लावले तर अशा शहरांमधून व्यावसायिक रंगभूमीची रूजवण सुरू होईल का? याचा विचार झाला पाहिजे. जेणेकरुन तरुणपिढीचा ओढा नाटकांकडे वाढेल. कारण आज नाटकासाठी भूमिकेला योग्य असे स्त्री-पुरुष कलावंत मिळणे अवघड झालं आहे.

व्यावसायिक रंगभूमीवरील नाटक शहरांपुरतीच मर्यादित असतात. तीही सठीसामाशी येतात. तिकीटाचे वाढलेले दर यामुळे ठराविक वर्गच नाटकाला येतो. पूर्वी एक हजार क्षमतेचं थिएटर भरून जायचं. गॅलरीतला प्रेक्षक हा खरा प्रेक्षक होता. आज तोच मिस झालाय. त्याला पुन्हा थिएटरकडे वळवलं पाहिजे.

नाटकाला 'श्रव्यकाव्य' असा सार्थ शब्द भारतीय साहित्यशास्त्राने दिला आहे, असे डॉ. अरुण प्रभुणे यांनी 'अक्षर' वाङ्मयाच्या नाट्यविशेषांकात म्हंटले आहे. कारण, वाचक आणि प्रेक्षक या दोघांनाही श्रेष्ठ दर्जाचा आनंद देणारा हा कलाप्रकार आणि भारतीय स्तरावर याचा विचार केला गेला तर मराठी भाषेत सर्वाधिक नाटकं लिहिली जातात आणि त्याचे प्रयोग केले जातात म्हणून मराठी प्रेक्षक हा भाग्यवान आहे.

नाटक ही नेहमी बदलणारी कला आहे. नवनिर्मितीचा ध्यास असलेली ही कला. प्रतिभासंपन्न लेखक, दिग्दर्शक नाट्यलेखन व नाट्यप्रयोगात नवनवीन मार्ग, प्रयोग करत असताना दिसतात. हा नाविन्याचा शोध जोपर्यंत सुरु आहे तो पर्यंत नाटक ही कला चैतन्यरुपी रहाणार आहे. या प्रयोगात यश-अपयश येणे हे होणारच पण, जर या कलेत प्रयोगशीलता संपली तर हळू हळू नाट्यकला चैतन्यहीन बनेल म्हणूनच बदललेलं मानवी जीवन व्यवहार, जग याचा धांडोळा घेऊन नाट्यकलेत 'प्रयोग' झाले पाहिजेत. नाटकातलं साचलेपण संपलं पाहिजे. नव्या वाटा शोधल्या पाहिजेत. हा विचार नाटककार किरण येले, मुंबई यांनी मांडलाय.

नाटकाच्या प्रयोगाची गुणवत्ता तपासणे हा नाटकांच्या प्रयोगाची समीक्षा करणाऱ्या समीक्षकाचा हेतू असतो. नाटक जेव्हा दृश्यकाव्य आपण म्हणतो तेव्हा नाट्यप्रयोगाच्या प्रत्येक अंगाचा सखोल विचार समीक्षेच्या माध्यमातून मांडला जावा असे अभिप्रेत असते. या संदर्भात मत व्यक्त केलंय प्रा. अमोल देशमुख यांनी.

सोलापूरसारखी जी मध्यम शहरं आहेत, तिथे नाट्यकलावंतांना व्यक्त व्हायला स्पर्धा ही एकमेव हक्काची

जागा आहे, हक्काचा रंगमंच आहे. हौशी रंगभूमीने महाराष्ट्रातल्या अनेक छोट्या मोठ्या गांव-शहरांतून आज आघाडीवर असणारे नाट्य-चित्रपट कलावंत दिले आहेत. अशी ही रंगभूमी राज्यनाट्य व काही एकांकिका स्पर्धेपुरती मर्यादित झाली आहे. स्पर्धेची गणितं आखून नाटकं निवडली व केली जातात. यामध्ये नवीन पिढी बऱ्या प्रमाणात सहभागी असली तरी नाविन्याचा शोध घेणारी आहे का? या नवीन मुलांना चांगले नाटककार आपली नवीन नाटकं विश्वासानं देतात का? हा प्रश्न महत्त्वाचा वाटतोय. कारण नाट्यलेखन, सादरीकरण, अभिनय यामध्ये तोचतोचपणा आलेला आहे. 'प्रयोग'करुन बघायला हे कलावंत धजावत नाहीत. यशाची गणितं डोक्यात असल्याने अपयश मिळालं तर? या भयाने वाटा बदलताना दिसत नाहीत, स्वतःची स्वतंत्र शैली निर्माण करत नाहीत. यातूनच नाट्यप्रयोगांची संख्या राज्यनाट्यस्पर्धेत रोडावली आहे, याचा गांभीर्याने विचार झाला पाहिजे, असं दिग्दर्शक, अभिनेते अभिजीत झुंजारराव, मुंबई यांचं म्हणणं आहे.

भारतभराचा विचार केला तर महाराष्ट्रात मुंबई व सोलापूर या दोन अनुक्रमे महाकाय व छोट्या शहरात कामगार वर्ग विपुलतेने वसलेला दिसतो. सोलापूरात जुनी मिल, वारद मिल, लक्ष्मी विष्णु मिल याबरोबरच पूर्व भागातील तेलुगू भाषिकांचा व्यवसाय असलेल्या चादर मिल्समध्ये मोठ्या प्रमाणात कामगार वर्ग नांदायचा. त्या अनुषंगाने पाहिलं तर कामगार रंगभूमीची वाढ मुंबईनंतर सोलापूरात झाली असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही. आपल्यातल्या सुप्त कलागुणांना आपल्या हक्काच्या रंगमंचावर बिनधास्तपणे, आत्मविश्वासाने सादर करणाऱ्या इथल्या कामगाराने सोलापूरची कामगार नाट्यस्पर्धा खऱ्या अर्थानं गाजवली. यामध्ये पुरुष कलावंतांइतकेच महिला कलावंतांचेही योगदान महत्त्वाचे. १९६०-७० च्या दरम्यान एकंदर सामाजिक परिस्थिती पाहिली तर महिलांचा सहभाग फार मोठ्या प्रमाणात नव्हता परंतु त्याकाळी निर्मला वरवडकर या अशिक्षित महिलेने लिहिता वाचता येत नसताना उत्तम अभिनय करून नाट्यप्रयोग केले आहेत. अशा या रंगभूमीविषयी नाट्यलेखक शरद्कुमार एकबोटे हे लेखनाच्या माध्यमातून व्यक्त झाले आहेत.

बॉर्न ॲक्टर, उपजत दिग्दर्शक असे जरी काहीजण म्हणत असतील तरी प्रशिक्षणाच्या माध्यमातून नट दिग्दर्शक व तंत्रज्ञांना पैलू पाडण्याचं अत्यंत महत्त्वाचं कार्य केलं जातं. महाराष्ट्राच्या रंगभूमीवर अशी अनेक दिग्गज नांव आहेत ज्यांच्या मार्गदर्शनाखाली एक पिढी घडलेली आहे आणि त्यांनी स्वतःबरोबरच प्रेक्षकांच्याही नाट्यजाणिवा समृद्ध केल्या आहेत. हे प्रशिक्षण किती महत्त्वाचं आहे, हे नाट्य प्रशिक्षक तुषार भद्रे, सातारा आणि मराठवाडा विद्यापीठाच्या संपदा कुलकर्णी यांनी मांडलं आहे आणि या विषयाचं महत्त्व अधोरेखित केलं आहे.

नाट्यप्रयोगाच्या विविध अंगामध्ये नाट्यकथा कलावंताच्या अभिनयाच्या माध्यमातून प्रेक्षकांपर्यंत पोहचविण्याची ताकद जशी आहे. तशीच पार्श्वसंगीतातही आहे. हे व्यावसायिक व अनेक प्रायोगिक नाटकातून पहायला मिळतं. 'तू' हे मोहित टाकळकर यांचं नाटक याचं उत्तम उदाहरण आहे असं मला वाटतं. पार्श्वसंगीत, गाण्याचा इतका चपखल वापर क्वचितच पहायला मिळतो. कथा, स्थळ, वेळ, प्रसंग यांचा किती बारकाईने अभ्यास नाटकासाठी संगीत देणाऱ्याला करावा लागतो, हे मांडलय पार्श्वसंगीतकार व गायक प्रशांत देशपांडे यांनी.

नाटकाची मुळात गरज आहे ती उत्तम संहिता, प्रगल्भ दिग्दर्शक आणि जीव ओतून काम करणारे कलावंत आणि हे सगळं असोशीनं पहाणारे प्रेक्षक हा एवढा मंत्र रंगभूमीच्या उत्कर्षासाठी पुरेसा आहे. पण मंत्रापेक्षा तंत्राच्या आहारी जाऊन त्या क्षणापुरता परिणाम साधणारे नाट्यप्रयोग, एकांकिका दीर्घकाळ लक्षात रहात नाहीत. त्या प्रयोगातलं तंत्र काढलं तर तो प्रयोग निरस आणि सामान्य वाटतो. तंत्राचा भरमसाठ वापर नाट्यकलेला तारेल का? या प्रश्नाचं उत्तर शोधण्याचा प्रयत्न लेखक, दिग्दर्शक विद्यासागर अध्यापक, कोल्हापूर यांनी केलाय.

एखादा रंगमंच कलावंतांचा आवडता असतो. त्या रंगमंचावर त्यांची श्रद्धा असते, त्या रंगमंचाने थोरा-मोठ्या कलावंतांचा अभिनय पाहिलेला असतो अनुभवलेला असतो. गावात रंगमंच असणं ही त्या गावांची सांस्कृतिक समृद्धी असते. आणि असे समृद्ध करणारे रंगमंच सोलापुरात कुठं कुठं होते, याचा शोध घेतलाय आर्किटेक्ट डॉ. सिमंतीनी चाफळकर यांनी.

सोलापूर हे पंचभाषिक शहर. कन्नड, तेलुगू, ऊर्दू, मराठी आणि हिंदी या पाच भाषाभगिनी इथं गळ्यात गळा घालून असतात. अर्थातच हे नातं रंगभूमीवरही असणारच. मराठीचे आद्य नाटककार विष्णुपंत भावे यांना प्रेरणा देणारे धारवाडचे गुब्बी इरण्णा हे शेजारच्या कर्नाटकातले. तेव्हा अशा कन्नड रंगभूमीचा पट मांडलाय पत्रकार नाटककार जगन्नाथ हुक्केरी यांनी. सोलापुरात तेलुगू नाटकेही विपुल प्रमाणात व्हायची. एवढेच नव्हे तर 'एकच प्याला' या राम गणेश गडकरी यांच्या नाटकाचा अनुवाद 'सुरावंशहरा' या शीर्षकाने तेलुगुत झाला आणि या नाटकाचे १९३४ साली असंख्य प्रयोग सोलापुरातील तेलुगू कलावंतांनी केले. एकंदरच तेलुगू, ऊर्दू, हिंदी, कन्नड रंगभूमी, त्याचबरोबरच अमराठी भाषिकांची मराठी नाट्यसेवा ही वाखाणण्यासारखी आहे. लेखक दिग्दर्शक राजा बागवान आणि नागेंद्र माणेकरींनी ही ओळख करून दिली आहे.

संगीत नाटक हा मराठी रंगभूमीच्या परंपरेचा ठेवणीतला खास दागिना आहे. तो जपला पाहिजे असं वाटत असताना आज गद्य नाटकांना प्रेक्षक कमी होतोय तर संगीत नाटकाला प्रेक्षक मिळेल का? हा प्रश्न मनात डोकावतोय. जागतिक रंगभूमीला दिलेली देन म्हणजे महाराष्ट्राचं संगीत नाटक असं म्हटलं गेलंय. या अनुषंगाने विचार केला तर प्रा. निशिकांत ठकार म्हणतात की, ''पाश्चात्यांचा ऑपेरा हा कलाप्रकार जर पाश्चात्य कलावंत आजही जपत असतील तर मग आपल्या संगीत रंगभूमीची जपणूक आपण का करायची नाही?'' हे अगदी खरं आहे. या अनुषंगाने आजचे धावपळीचे आणि सोशल मीडियाच्या वेढ्यात अडकलेल्यांच्या जगात संगीत नाटकाचे आशय, विषय, सादरीकरण, गायनशैली यात बदल करणे गरजेचे आहे का? असाच काहीसा विचार केलाय संगीत रंगभूमीवर कार्यरत असलेल्या प्रा. विद्या काळे यांनी.

नाटक हा प्रयोग असतो. आणि हा प्रयोग प्रत्येक नाट्यलेखक दिग्दर्शकाचा स्वतःचा विचार असतो. नाट्य प्रयोग सादर करताना आशय, विषय, सादरीकरण यातला तोचतोचपणा काढून टाकून नवीन काही उत्तम करण्याच्या विचारातून प्रायोगिक रंगभूमीचा उदय झाला. प्रायोगिक नाटके ही केवळ स्पर्धेपुरतीच न राहता व्यावसायिक स्तरावरही व्हायला लागली. सोलापूर सारख्या छोट्या शहरात नाट्य प्रयोगात वेगळेपण आणण्याचा प्रयत्न इथल्या लेखक दिग्दर्शकांनी केला. आणि त्यासाठी कामगार, राज्यनाट्य स्पर्धेचा रंगमंच त्यांनी निवडला. सोलापूरच्या रंगकर्मींनी नाट्य सादरीकरणात कोणते प्रयोग केले याचा धांडोळा घेतलाय नाट्य लेखक रजनीश जोशी यांनी.

महाराष्ट्रातल्या वेगवेगळ्या भागातील रंगभूमीचं आपलं म्हणून एक वैशिष्ट्य आहे. अशीच वेगळी आणि अवघ्या नाट्यसृष्टीला चैतन्य वाटावं अशी झाडीपट्टी रंगभूमी चंद्रपूर, भंडारा, गोंदिया व गडचिरोली या चार जिल्ह्यात आजही खळाळून वहाते आहे. सोलापूरच्या माजी कुलगुरु डॉ. मृणालिनी फडणवीस यांनी म्हटलंय की, 'महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्या करताहेत पण आमच्या झाडीपट्टी रंगभूमीच्या भागातील एकाही शेतकऱ्याने आत्महत्या केली नाही कारण तो आनंद, उत्साह, आर्थिक सक्षमता देणाऱ्या झाडीपट्टी रंगभूमीचा प्रेक्षक, पथिक, कलावंत आहे.' ही ताकद या रंगभूमीची आहे. ही रंगभूमी नेमकी काय, कशी आहे या विषयी झाडीपट्टी रंगभूमीचे अभ्यासक रोशन नंदवंश, नागपूर यांनी लेखन केलं आहे.

हौशी रंगभूमीने व्यावसायिक रंगभूमीला जसे कलावंत दिले तद्वतच पथनाट्याने हौशी रंगभूमीला कलावंत दिले. पथनाट्याची खास वैशिष्ट्यं, त्याची गरज, त्याचे विषय यासंदर्भात पथनाट्याचे लेखक, दिग्दर्शक आशुतोष नाटकर यांनी भाष्य केलंय. बालरंगभूमी ही प्रायोगिक, संगित, व्यावसायिक स्पर्धेच्या रंगभूमीची जननी आहे. केवळ कलावंतच घडतात असं नाही तर सुजाण प्रेक्षक घडायला, सुसंस्कृतता अंगी बाणण्यासाठी, समाजाचा एक घटक म्हणून अभिरूचीसंपन्न नागरिक होण्यासाठी बालरंगभूमीचं योगदान वादातीत आहे. शालेय व बालरंगभूमी पुढची आव्हानं आज वाढताहेत ती कशी? याबद्दल बालरंगभूमीवरील नाट्यलेखिका डॉ. मीरा शेंडगे यांनी भाष्य केलंय. सोलापूरातील नाट्यरंग बहरण्यासाठी अनेक नाट्यलेखकांचं योगदान न विसरता येणारं. त्याविषयी रंगकर्मी श्रीपाद येरमाळकर यांनी लिहिलं आहे .

सोलापूरची रंगभूमी ज्यांच्या कलागुणांनी समृद्ध झाली असे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे दिग्दर्शक १०० व्या

नाट्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. जब्बार पटेल यांच्या कारकिर्दीवर दृष्टीक्षेप टाकणारा डॉ. विलास सलगरकर यांनी लिहिलेला लेख व सोलापूरच्याच सरला येवलेकर या गुणी अभिनेत्रीचा व्यावसायिक नाट्यप्रवास पत्रकार रंगकर्मी रजनीश जोशी यांनी चितारलाय. असे हे दोन्ही लेख ८८ व्या अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलन सोलापूरच्या स्मरणिकेतून साभार घेतले आहेत. तर बेळगांव इथं झालेल्या नाट्यसंमेलनाच्या अध्यक्षा, गायिका अभिनेत्री आघाडीच्या कलावंत फैय्याज शेख यांची लोकमंगल मैत्र २०२३च्या दिवाळी अंकात नाटककार शिरीष देखणे यांनी घेतलेली मुलाखत मैत्रच्या सौजन्याने घेतली आहे. मराठी, हिंदी, कन्नड, तेलुगू, मल्याळम अशा विविध भाषांमधील चित्रपटात ज्यानं आपलं स्थान भक्कम केलंय, असा मूळचा सोलापूरचा प्रतिभासंपन्न नाट्य चित्रपट कलावंत अतुल कुलकर्णी याची मुलाखत शिरीष देखणे यांनी घेतली आहे. ही मुलाखत म्हणजे रंगकर्मींनी नाटकाकडे कसे बघितलं पाहिजे याचा वस्तुपाठ आहे. तसच एखाद्या संस्थेकडून नाटक करताना तिथली नाती आयुष्यभरासाठी कशी जपली पाहिजे, हे ही सांगितलं आहे. त्याचबरोबर दूरचित्रमालिकांमधून झळकणारे अभ्यासू नाट्यकलावंत किशोर महाबोले, गुरुराज अवधानी, प्रशांत चौडप्पा व अमीर तडवळकर यांचा या स्मरणिकेतला लेखन सहभाग वाचकांना बरंच काही शिकवून जाणारा आहे. या सगळ्या कलावंतांनी सोलापूरच्या आठवणी जागवल्या आहेत.

सोलापूरच्या नाट्य चळवळीविषयी दिग्दर्शक , अभिनेते शशिकांत लावणीस यांनी अभ्यासपूर्ण लेखन केले. तसेच ॲडव्होकेट जे. जे. कुलकर्णी यांनी सोलापूर शाखेची जडणघडण यावर प्रकाश टाकला. याशिवाय सोलापूर जिल्ह्यातील नाट्यपरंपरा व चळवळ याविषयीचा एक भाग स्मरणिकेत आहे.

१०० व्या नाट्य संमेलनाच्या निमित्ताने नाट्य कलेच्या जागर व्हावा, यासाठी विचारांची देवाणघेवाण व्हावी, मुंबई-पुण्याबाहेरच्या रंगमंचाची गरज ओळखली जावी यासाठीच ही आठ जिल्ह्यांमध्ये होणारी विभागीय नाट्यसंमेलन होताहेत ही खरंच आनंदाची घटना आहे.

मराठी नाट्य संमेलनाचा शतकोत्सव सोहळा अनुभवताना भारतीय भाषांमध्येच नव्हे तर परकीय भाषांमध्ये ही एवढी दीर्घ परंपरा नाट्यसंमेलनाची नाही हे लक्षात घेतलं तर आपलं वेगळेपण अधोरेखित होतं. आणि आपण सगळेच या शंभराव्या संमेलनाचे साक्षीदार आहोत याचा विलक्षण आनंद होतोय.

'नट-रंग' ही स्मरणिका अतिशय कमी वेळात सिद्ध करण्यासाठी शिरीष देखणे यांनी तत्पर व अनमोल सहकार्य केलं. त्यांचे मनःपूर्वक आभार मानते. शिवाय आमचं संपादक मंडळ, स्वागताध्यक्ष मा. ना. श्री. चंद्रकांतदादा पाटील, कार्याध्यक्ष मा. श्री. प्रकाश यलगुलवार, प्रमुख कार्यवाह मा. श्री. विजयकुमार साळुंके, विविध समित्यांचे पदाधिकारी विशेषतः श्री. जयप्रकाश कुलकर्णी, एस. के. कॉम्प्युटर्सचे उन्मेश शहाणे, मुखपृष्ठकार पोरे ब्रदर्स अशा अनेकांचं सहकार्य लाभलं आहे त्यांना धन्यवाद देते. अनेक रंगकर्मींनी अभ्यासपूर्ण लेख दिले, विस्तारभयास्तव त्यातला काही भाग संपादित केला आहे, त्याबद्दल संपादक मंडळ दिलगीर आहे. अत्यंत कमी वेळात ही स्मरणिका तयार करावी लागली त्यामुळे त्यात काही त्रुटी, चुका राहिल्या असण्याची शक्यता आहे, त्याकडे रसिकांनी उदार दृष्टीने पहावे, ही नम्र विनंती!

५ वा वेद असलेल्या या नाट्यकलेला पुराणाचा संदर्भ आहे. अशी ही कला आज तरुण रंगकर्मींच्या हातात आहे. तरुण रंगकर्मी निश्चितच या नाट्यकलेचं भविष्य उज्वल, अर्थवाही, प्रयोगवाही, आशयसंपन्न, विचारसंपन्न करतील आणि 'सोशल मिडीया'त अडकलेल्या प्रेक्षकांना पुन्हा रंगमंचाकडे खेचून आणण्याची शक्ती, क्षमता कमावतील ही आशा आहे. तुम्हा सगळ्या रंगकर्मींना पुढच्या वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा. तुमचा कलाप्रवास निरंतर होत राहो, शुभास्ते पंथानःसंतु.।अस्तु.।

shobhabolli11@gmail.com.

■

## १०० व्या अखिल भारतीय मराठी विभागीय नाट्यसंमेलनाच्या उद्‌घाटन प्रसंगी स्वागताध्यक्ष तथा सोलापूरचे पालकमंत्री ना. चंद्रकांतदादा पाटील यांचे मनोगत



मा.ना. चंद्रकांत दादा पाटील
पालकमंत्री, सोलापूर

भारताच्या सांस्कृतिक इतिहासात मराठी भाषेतलं होणारं हे १०० वं नाट्यसंमेलन ही एकमेव घटना असणार आहे. महाराष्ट्रीय संस्कृतीचं एक देखणं लेणं म्हणजे नाटक, आणि जगभरातल्या नाट्यकलेला एवढी प्रदीर्घ परंपरा असणारं महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे. याचा आपल्या सगळ्यांना अभिमान वाटतो. अशा या १०० व्या नाट्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष डॉ. जब्बार पटेल, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मुंबईचे अध्यक्ष श्री. प्रशांत दामले, त्यांचे सर्व सहकारी, सोलापूर जिल्हातील सर्व नाट्य परिषद शाखांचे अध्यक्ष व त्यांचे सर्व सहकारी, उपस्थित सर्व रसिक बंधू भगिनी.........

सोलापूरात होणाऱ्या १०० व्या नाट्यसंमेलनाच्या विभागीय संमेलनाचा स्वागताध्यक्ष म्हणून आपल्या सगळ्यांचं स्वागत करताना खूप आनंद होतोय, माझी स्वागताध्यक्ष म्हणून निवड करुन सोलापूरकरांनी माझा सन्मान केला, याबद्दल मी समस्त सोलापूरकरांचे आभार मानतो. सोलापूरचा मी पालकमंत्री असल्याने या संमेलनाचं पालकत्व स्विकारणं हे मी माझं कर्तव्य मानतो, आणि हक्कही समजतो. तसं पहायला गेलं तर मी नाटकवाला नाही, पण नाटकाचं जे महत्वाचं अंग असतं. तो म्हणजे अभिनेता. या अभिनेत्यातला मी नेता आहे. राजकीय रंगमंच्यावर अनेक नाटकांचे खेळ आम्हाला खेळावे लागतात. कधी मनापासून तर कधी मनाविरुध्द, या खेळात कधी आवडणारी भूमिका मिळते तर कधी नावडणारी भूमिकाही पार पाडावी लागते. राजकारण असो की एखादे नाटक दोघांनाही लोकांचा भरघोस पाठिंबा आवश्यक असतो. अभिनेत्यांना असो की राजकीय नेत्यांना, आपला रोजचा परफॉर्मन्स उत्तमच करावा लागतो. अभिनेत्यांची एक सोय आहे. त्यांना लिहून दिलेले संवाद, स्क्रीप्ट सादर करायची असते. आम्हाला मात्र रोज नवी स्क्रीप्ट, नवे संवाद. खरे पाहिले तर नाट्यकलेशी या अर्थाने माझा संबंध आहे. म्हणून स्वागताध्यक्ष होताना मला परकं वाटलं नाहीं.

प्रामुख्याने मनोरंजन आणि प्रबोधनाची अनेक शतकांची परंपरा लाभलेल्या मराठी नाट्यसृष्टीच्या इतिहासातील एक महत्त्वाची घटना आज सोलापूरमध्ये नोंदवली जात आहे. नाटक हा कलाविश्वातला अत्यंत चैतन्यदायी आविष्कार. भरतमुनींच्या नाट्यशास्त्राला तर संस्कृत वाङ्मयामध्ये 'पाचवा वेद' असे संबोधून महत्त्वाचे स्थान देण्यात आले आहे. व्यास, कालिदास यांच्यासह शेकडो वर्षांचे कलासंचित आपल्या देशाला लाभले आहे, त्यात मराठी नाट्यसृष्टीने, मराठी रंगभूमीने आपले वैशिष्ट्यपूर्ण स्थान टिकवून ठेवले आहे.

मराठी नाट्यसृष्टी हे महाराष्ट्राचं वैभव आहे. ते फक्त मनोरंजनाचं साधन कधीच नव्हतं. स्वातंत्र्यपूर्व काळापासून मराठी रंगभूमीनं अनेक सामाजिक व्यथा-वेदनांवर बोट ठेवणारी नाटकं सादर केली आहेत. एवढंच नाही तर या वेदनांवर उपाय शोधण्यासाठी प्रवृत्त करणारं एक प्रभावी माध्यम म्हणून नाटकांचा उपयोग केला असल्याचे दिसते.

संवाद, अभिनय, काव्य, नृत्य, पार्श्वसंगीत, वाद्यसंगीत, नेपथ्य, वेशभूषा, प्रकाशयोजना अशा विविधांगी, जिवंत साधनांचा रंगमंचावरील आविष्कार आपल्याला, रसिक प्रेक्षकांना एका वेगळ्याच अवस्थेत घेऊन जातो. पौराणिक आणि ऐतिहासिक नाटके, संगीत नाटके, प्रादेशिक नाटके, एकांकिका, एकपात्री प्रयोग अशा काळानुसार बदलत जाणाऱ्या विविध प्रकारांना सामावून घेत मराठी नाट्यसृष्टी अधिक बहरत राहिली, सशक्त होत राहिली.

मराठी संगीत नाटकांनी तर अनेक पिढ्यांना वेड लावले आहे. त्यातील नाट्यपदे आणि हिंदुस्थानी संगीतावर आधारित त्या नाट्यपदांना देण्यात आलेल्या अप्रतिम चाली, यामुळे ती अजरामर झाली आहेत. त्यातल्या विस्मृतीत चाललेल्या काही संगीत नाटकांचे पुनरुज्जीवन करुन नव्या दमाचे दिग्दर्शक आणि अभिनेत्यांनी ही नाटके नव्या पिढीसमोर आणण्याचे महत्त्वपूर्ण काम केले आहे, त्याबद्दल त्यांचे आपण सर्वांनी मनापासून कौतुक केले पाहिजे, अशा प्रयत्नांना प्रोत्साहन दिले पाहिजे.

मराठी विनोदी नाटकांनीही आपली स्वतंत्र ओळख ठेवलेली दिसते. समाजातील अनेक अनिष्ठ रुढी, परंपरा, वैगुण्ये यावर विनोदाच्या माध्यमातून नेमके बोट ठेवून त्याद्वारे होणारे प्रबोधनही महत्त्वाचेच मानले पाहिजे.

आता सोलापूरच्या रंगभूमीविषयी बोलायचं तर सोलापूरची नाट्यपरंपरा वैभवशाली आहे. साहित्यिक, सांस्कृतिक क्षेत्रात सोलापूरचं नाव आघाडीवर आहे. कर्नाटक, आंध्रच्या सीमेवर वसलेलं हे बहुभाषिक शहर दक्षिण भारताचं प्रवेशद्वार समजलं जातं. त्यामुळे पंचभाषिक असलेल्या सोलापुरवर तेलुगू, कन्नड, उर्दू, हिंदी, या भाषा भगिनींचा प्रभाव पडणं साहिजिक आहे.

सोलापूर ही संताची भूमी आहे. अवघ्या महाराष्ट्रालाच नव्हे तर आंध्र, कर्नाटकला भूरळ घालणारं सावळ रुप श्री विठ्ठलाच्या वास्तव्यानं ही भूमी पावन झाली आहे. संत दामाजी, संत सावतामाळी, संत चोखामेळा, कान्होपात्रा, नामदेव, नरहरी सोनार, अक्कलकोटचे स्वामी समर्थ, बार्शीचा भगवंत यांचं वास्तव्य या पवित्र जिल्ह्यातंलंच, सद्विचार, आचार, भक्ती, याचा संगम या पावन भूमीत पहायला मिळातो. तर ग्रामदैवत श्री सिध्दरामेश्वरांच्या वचनांनी या 'भूमीला पावित्र्य प्राप्त झालं.

भारताला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी सोलापूरने तीन दिवस स्वातंत्र्य मिळविलं होतं. इथल्या मल्लप्पा धनशेट्टी, कुर्बान हुसेन, किसनलाल सारडा, आणि जगन्नाथ शिंदे यांच्या हौतात्म्यांनी स्वातंत्र्य लढ्याला धार प्राप्त झाली होती.

साहित्याच्या नभांगणांत शाहिर राम जोशींनी आपला डंका महाराष्ट्र भर घुमवला.

पाय धरील कवीराय दूजा अशी, काय लावणी करी
माय कुणाची व्याली गगनाखाली कविता सोलापुरी।।

असं म्हणून त्यांनी जगालाच आव्हान दिलं, तर संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत बार्शीच्या अमर शेख या शाहिरानं शड्डू ठोकला होता. भेटेनं नऊ महिन्यांनी हे क्रांतीगीत लिहिणारे कवी कुंज विहारी, कवी संजीव, कवी रा. ना. पवार, ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त कवी द.रा. बेंद्रे, डॉ. निर्मलकुमार फडकुले, य.दी. व भा.दी. फडके, कवी वि.म. कुलकर्णी, डॉ. गो. मा. पवार, प्रा. चंद्रभूषण कुलश्रेष्ठ, पांडूरंग काळे आणि लक्ष्मीनारायण बोल्ली यांनी साहित्य, नाट्यक्षेत्रात मुद्रा उमटविली आहे. हिंदी, मराठी, तेलुगू, तमिळ या भाषेतील चित्रपटात सोलापूरचा नाट्यकलावंत अतूल कुलकर्णीनं सोलापूरचं नाव भारताबाहेर नेलं. गुरुराज अवधानी, किशोर महाबोले, प्रशांत चौडप्पा, अक्षर कोठारी, अमीर तडवळकर, यांनी रंगभूमी आणि दूरचित्रवाणीवर स्वतःला सिध्द केलंय. सोलापूर जिल्ह्याच्या प्रेक्षकांनी नाटकावर इतकं भरभरुन प्रेम केलंय की, त्या काळातील दिग्गज नाट्यकलावंतानी अनेक प्रयोग येथे सादर केले. केशवराव भोसले, दिनानाथ मंगेशकर, गणपतराव जोशी, बालगंधर्व, यांनी सोलापूरच्या रंगभूमीवर कला सादर करून इथल्या प्रेक्षाकांना समृध्द केलं आहे. असं सांगतात की, बालगंधर्वांना कर्ज झालं की, ते सोलापुरात महिना दोन महिना मुक्काम करून त्यांच्या संगीत नाटकांचे प्रयोग इथं लावायचे आणि कर्ज मुक्त व्हायचे. सोलापूरचं भाग्य असं की, जगप्रसिध्द गायिका भारतरत्न लता मंगेशकर यांच्या गण्याचं पहिलं ध्वनिमुद्रण सोलापुरात झालं होतं. आणि त्यांनी संगित नाटकात पहिली भूमिका केलेलं शहरही सोलापूर आहे.

सोलापूरच्या रंगभूमीवरील कलावंताविषयी बोलताना ऊर अभिमानानं फुलतो. ज्या काळात स्त्रिया नाटकात काम करत नव्हत्या त्या काळात सोलापुरातील लक्ष्मण काटे, राजा सलगर, नंदलाल भैय्या, महमद इसाक मनियार, अरुणकुमार यादव, जगू प्रधान, बाबुराव काळे, यांनी स्त्रियांना लाजवेल अशा स्त्री भूमिका केल्या होत्या. एवढंच नव्हे तर सोलापूरचे सुपूत्र माजी केंद्रीयमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनीही सुरुवातीला स्त्री भूमिका आणि

नंतर अनेक नाटकांतून उत्तम भुमिका साकारल्या. या शिवाय सोलापुरात होणाऱ्या लहान मोठ्या मेळ्यातुन शशिकला, फैय्याज, सरला येवलेकर यांनी कामं केली. आणि व्यावसायिक नाटक आणि चित्रपटसृष्टी गाजवली. या सगळ्या मांदियाळीत हिंदी मराठी चित्रपटसृष्टीच्या संगीत क्षेत्रात ज्यांना मानाचं स्थान दिलं जातं ते आण्णा जोशी यांना अनेक वाद्य वाजविता येत होती. गाण्याच्या रेकॉर्डिंगच्या वेळेस लता मंगेशकर अण्णा जोशींना विचारायच्या की माझा सूर बरोबर लागतोय ना. अशी संगीताची जाण असणारे अण्णा जोशींची पण आज आठवण येणं साहजिक आहे.

सोलापूर एकेकाळी गिरणगांव म्हणून प्रसिध्द होतं. १८७६ साली पहिली सूतमिल सोलापुरात सुरु झाली आणि इथं कामगार संख्या वाढायला लागली. सोलापुरात यानंतर १९१० पर्यंत सात गिरण्या सुरु झाल्या. ज्यामध्ये २५,००० च्या जवळपास कामगार वस्ती वाढली. या कामगारांच्या करमणुकीसाठी बाहेर गावाहून विविध खेळ प्रकार, तमाशा, नाटक, सर्कस, गाण्यांचे कार्यक्रम, कुस्तीचे फड असे विविध प्रकार यायला लागले.

सर्वात पहिला नाट्यप्रयोग सोलापुरातल्या थोबडे यांच्या वाड्यात झाल्याची नोंद आहे. १८७८ च्या सुमारास इथे नाटक कंपन्या मुक्कामाला येत आणि रोज संध्याकाळी त्यांचे प्रयोग होत. या मध्ये मिरजकर, कोल्हापूरकर, बेळगावकर, पुणेकर, विजापूरकर, मुंबईकर अशा आपल्या गावांच्या नावाने ओळखणारी मंडळी नाटक घेऊन येत. पुढे १८९९ मध्ये सोलापूरच्या स्वदेश हितचिंतक मंडळीने सोलापुरातील पहिले संस्कृत नाटक 'अभिज्ञान शांकुतल' सादर केलं. त्याचा प्रयोग उत्तम झाला. पुढे किर्लोस्कर, देवल, खाडिलकर, आदींची नाटके सोलापुरात व्हायला लागली. १९३४ मध्ये सोलापूरतल्या नाट्यप्रेमींनी वसुंधरा संगीत मंडळी हा नाट्यक्लब सुरु केला.

स्वातंत्र्यानंतर सोलापूरातील कामगार रंगभूमी हळूहळू उदयाला यायला लागली होती. गिरण्यांमधील कामगार एकत्र येऊन गणेशोत्सवात नाटकं सादर करत. १९४३ साली मराठी नाटकाची शताब्दी साजरी करण्यासाठी नाट्य महोत्सव झाला. त्यात कलाविलास व नाट्य निकेतन या कंपन्यांची नाटके झाली. शिवाय स्थानिक मंडळींनी बसविलेला 'मीठ भाकर' या नाटकाचा प्रयोग सोलापुरच्या शेडजाळे यांनी केला. प्रख्यात नट पृथ्वीराज कपूर यांनीही सोलापुरात हिंदी नाट्यप्रयोग सादर केले होते. सोलापूरच्या कामगार रंगभूमीला बहर आला तो कामगार नाट्यस्पर्धा सुरु झाल्यावर, त्याकाळी ३०-३२ प्रयोग कामगार नाट्यस्पर्धेत व्हायचे. दत्त क्लब, शारदोपासक मंडळ, फाटे पार्टी, नवयुग नाट्य मंडळ, कलानिकेतन, नवीदिशा नाट्य मंडळ, प्रोग्रेसिव्ह ड्रामेटिक क्लब, सारस्वत क्लब, अशा अनेक संस्थांनी स्पर्धा गाजवली. भा.दी. व य.दी. फडके, श्रीराम पुजारी अशी तरुण गुणवंत मंडळी नाटकात कार्यरत होती. जब्बार पटेल आणि फैय्याज यांनी ललित कला मंदिर, ज्या संस्थेत रेल्वेचे कर्मचारी बहुसंख्येने होते. यामध्ये नामदेव वठारे, राम साठे आदींच्या बरोबर अनेक नाट्यप्रयोग केले. ललित कला मंदिरनं महाराष्ट्राच्या कलेच्या दरबाराला ही माणकं सुपूर्द केली.

सोलापूरच्या संगीत रंगभूमीला विसरता येणार नाही, असं अजोड काम कै. पद्माकर देव यांनी करुन ठेवलं आहे. अगदी दिल्लीपर्यंत सोलापूरचा डंका त्यांनी दूमदूमवला. सोलापूरच्या तेलुगू कन्नड रंगभूमीचंही वैशिष्ट्य नजरेआड करता येणार नाही. मराठी नाटकाचे आद्य नाटककार विष्णुपंत भावे यांना प्रेरणा देणारे धारवाडचे गुब्बी ईरण्णा हे शेजारच्या कर्नाटक प्रांतातले. त्यांचे प्रयोग सोलापूरला झाले. नादर्गी बंधू, तिप्पण्णा संगा यांची नाटकं प्रेक्षक मोठ्या आनंदाने पहात. त्यांची कन्नड नाटकं पाहण्यासाठी वळसंग, वागदरी, करजगी, मैंदर्गी, अक्कलकोट येथून बैलगाड्या जुंपून प्रेक्षक येत. सोलापुरातील तेलुगू लोकांच नाटकवेड लक्षात घेऊन तेलुगू नाट्यचित्रपट कलावंत सोलापुरात येऊन प्रयोग करत. तिप्पण्णा दासरी या तेलुगू भाषिक नाट्यकलावंताने राम गणेश गडकरी यांचे 'एकच प्याला' हे नाटक तेलुगू 'सुरा वंशहरा' या शिर्षकाने अनुवादित करुन १९३४ साली या नाटकाचे असंख्य प्रयोग केले. खुद्द बालगंधर्वाच्या समोरही या नाटकाचा प्रयोग केला गेला होता. या शिवाय तेलुगू कन्नड भाषिकांनी मराठी भाषेतल्या अनेक नाटकात भूमिका दिग्दर्शन करुन ही रंगभूमी समृध्द केली आहे. कै. नागेश कन्ना, कै. विश्वंभर कन्ना, कै. लक्ष्मीनारायण आकेन, कै. लक्ष्मीनारायण बोल्ली यांनी सोलापूरच्या रंगभूमीवर मोहर उमटवली आहे.

स्पर्धेच्या नाटकातून अनेक पारितोषिके मिळविली आहेत तर उर्दू हिंदी रंगभूमीवरील अनेकांनी सोलापूरच्या नाट्य समृध्दीत मोलाचा वाटा उचललला आहे. सोलापूरच्या नाट्य आराधना, ललित कला मंदिर, निशिगंध नाट्यमंडळ, अश्विनी नाट्य मंदिर, अशा अनेक संस्थांनी वेगवेगळे प्रयोग करुन प्रायोगिक रंगभूमी जागती ठेवली. सोलापुरातील अनेक संस्थांनी राज्य नाट्यस्पर्धेच्या अंतिम फेरित घवघवीत यश मिळवून सोलापूरचा दबदबा ठेवला होता.

अलीकडे आपल्या सगळ्याच्यांच जगण्यावर सोशल मिडिया हावी होतो आहे. स्पर्धेतील नाटकांची व प्रेक्षकांची संख्या कमी होत आहे. ही चिंतनीय बाब आहे. नाट्यकला ही जिवंत अनुभव देणारी एकमेव कला आहे. नाटकाचा प्रयोग खऱ्या रसिकाला भरभरुन आनंद देतो. पण हा आनंद घेण्याची वृत्ती मंदावली आहे. लोक करमणुकीला आणि सहज प्राप्त होणाऱ्या गोष्टींकडे आकर्षित होत आहेत. नाटकाची जी बलस्थाने आहेत, त्याकडे दुर्लक्ष होत आहे. रतन थिय्यम या जगप्रसिध्द दिग्दर्शकाला एकानं विचारलं होतं की, 'तुम्ही सिनेमापेक्षा नाटकाला इतकं का महत्व देता. नाटकच का करता' त्यावर थिय्यम म्हणाले, चित्रपटातला हिरो जेव्हा हिरोईनला म्हणतो, तो बघ चंद्र कसा सुंदर दिसतोय. त्यावेळी चित्रपटात लगेच तो पूर्ण गोलचंद्र तुम्हाला स्क्रिनवर दाखवावा लागतो. आणि मग प्रेक्षक त्याचा आनंद घेतात. पण नाटकातला नायक जेव्हा नायिकेला म्हणतो की, तो बघ चंद्र कसा सुंदर दिसतोय. तर त्यावेळी रंगमंच्यावर कुठेही तो चंद्र नसतो. पण प्रेक्षकांच्या डोळ्यासमोर तो सुंदर चंद्र उभा राहतो, अनुभवता येतो. ही ताकद नाटकाची आहे, म्हणून मी नाटक करतो. रसिकहो, मला वाटतं. या एका उदहारणावरुन नाटकाची शक्ती काय आहे, हे लक्षात येईल.

रसिकहो, मी सोलापूरचा पालक आहे. म्हणजेच हे सोलापूर माझं आहे. आणि माझ्या या सोलापुरात तिसरं आणि तेही १०० वं नाट्यसंमेलन होतंय, याचा मला विलक्षण आनंद होतोय. १९५७ साली पहिलं नाट्यसंमेलन डॉ. दिवाडकर यांच्या अभिनय साधना नाट्य मंदिराच्या सहयोगानं झालं होतं. दुसरं ८८ वं नाट्यसंमेलन झालं. अ.भा.म. नाट्य परिषद शाखा सोलापूरच्या सहकार्यानं रमेश देव यांच्या अध्यक्षतेखाली आणि आज हे तिसरं नाट्य संमेलन होत आहे. या संमेलनाची विशेष आनंदाची बाब म्हणजे ऐतिहासिक १०० वं नाट्य संमेलन आपल्या सोलापूरचे सुपूत्र आंतरराष्ट्रीय किर्तीचे दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल ह्यांच्या अध्यक्षतेखाली होत आहे. सोलापूरची नाट्य परंपरा किती उज्वल आणि प्रगल्भ आहे बघा. आपल्या सोलापूरच्या सुकन्या फैय्याज शेख या बेळगावला झालेल्या ९५ व्या संमेलनाच्या अध्यक्षा होत्या. जगभरात एकामेवाद्वितीय असलेल्या नाट्यसंमेलनात सोलापूरातल्या दोन रंगकर्मी, रंगधर्मीची अध्यक्ष म्हणून निवड व्हावी याचा सोलापूरचा पालकमंत्री म्हणून मला अभिमान वाटतो.

अशा या नाट्यकलेच्या जागरणासाठी, त्याच्या उत्कर्षासाठी जे जे करावं लागेल ते आम्ही करु. जुळे सोलापूरात एका उत्तम नाट्यगृहाची गरज आहे. ती या संमेलनानंतर निश्चित पूर्ण करु. आम्ही जे वचन देतो ते पूर्ण करतो असा आमचा लौकीक आहे. या शिवाय नाट्यशिबिरं, वेगवेगळ्या भाषेतील उत्तम नाट्यकृती सोलापूरकरांना अनुभवायला मिळाव्यात इथं राष्ट्रीय दर्जाचे नाट्यप्रयोग, नाट्य महोत्सव कसे होतील, हे पण आम्ही पाहू.

रसिको हो, एखादं, शहर किती समृध्द आहे. हे पाहण्यासाठी तिथला कलावंत कोणत्या प्रकारची कला सादर करतो, नाट्यप्रयोग करतो, हे पाहिल्यास त्या गावाची संस्कृती कळते असे म्हणतात. आपल्या या सोलापूरची ओळख अभिजात नाटक निर्मितीचा गांव म्हणून व्हावी यासाठी आपण सगळेच प्रयत्न करु. मी तुमच्या सोबत नेहमीच असेन, अशी ग्वाही देतो. आपणा सगळ्यांचे पुन्हा एकदा स्वागत करतो. आपल्या सगळ्यानां धन्यवाद देतो आणि थांबतो.

सोलापूर दि. २७-१-२०२४

■ ■

# कलावंत सोलापुरी

- डॉ. जब्बार पटेल
- फैयाज
- सरला येवलेकर

# रंगभूमीवरचं पहिलं पाऊल

- अतुल कुलकर्णी
- गुरुराज अवधानी
- किशोर महाबोले
- प्रशांत चौडप्पा
- अमीर तडवळकर

# विद्यानंद को-ऑप. बँक लि., सोलापूर

१३, जैन बोर्डिंग कॉम्प्लेक्स, बुधवार पेठ, बाळीवेस, सोलापूर-४१३००२

**बँकेचे दि. ०१ नोव्हेंबर २०२३ पासून ठेवीचे आकर्षक दर**

| अ.क्र. | मुदत | व्याज दर | ज्येष्ठ नागरीक, सहकारी संस्था व रजि. ट्रस्ट |
|---|---|---|---|
| १. | ८ दिवस ते २९ दिवस | ४.००% | ४.२५% |
| २. | ३० दिवस ते १०० दिवस | ५.००% | ५.२५% |
| ३. | १०१ दिवस ते २५० दिवस | ५.५०% | ५.७५% |
| ४. | २५१ दिवस ते ४०० दिवस | ६.२५% | ६.५०% |
| ५. | ४०१ दिवस व पुढे ७२९ दिवस पर्यंत | ८.००% | ८.२५% |
| | | चक्रवाढ व्याज पद्धतीने | |
| ६. | १३ महिने ते २४ महिने | ८.२५% | ८.५०% |
| | | सरळ व्याज पद्धतीने | |
| ७. | दाम दुप्पट १२० महिने | ७.००% | |

श्री. सुधीर शरदचंद्र गांधी
चेअरमन

श्री. दिनकर पुरुषोत्तम देशमुख
सरव्यवस्थापक

श्री. अमृतलाल हसानंद पमनानी
व्हा. चेअरमन





अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद मुंबई
शतक महोत्सवी विभागीय मराठी नाट्य संमेलनास हार्दिक शुभेच्छा !

# व्हीपी शुगर्स लि.

माऊली नगर, तडवळ, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर

अद्यावत तंत्रज्ञान वापरुन उभारेला साखर कारखाना व सहविजनिर्मिती प्रकल्प । ऊस गाळप क्षमता ६००० मे. टन प्रति दिन । सहविजनिर्मिती प्रकल्प २० मेगावॅट । सल्फर मुक्त साखरेचे उत्पादन

* शुभेच्छुक *
सीए व्ही.पी. पाटील
चेअरमन
व संचालक मंडळ



# रुक्मिणी सहकारी बँक लि. पंढरपूर



मुख्य कार्यालय : गाताडे प्लॉट जुना कराड नाका पंढरपूर जि. सोलापूर.
फोन नं.: ०२१८६, २२६२११, २२७७११, ९४०५८८०२११
आपल्याला आपलीच वाटणारी आपली रुक्मिणी बँक

संस्थापक - चेअरमन
मा.सौ.सुनेत्राबाई विजयसिंह पवार

- सेफ डिपॉझिट लॉकर्स
- नियमीत कर्जदाराना व्याजात सवलत
- जेष्ठ नागरीक ०.५% ज्यादा व्याजदर
- सोनेतारण कर्ज ११% व्याज
- RTGS And NEET ची सोय
- क्यु आर कोड ची सोय

| मुदत ठेव | व्याजदर |
|---|---|
| १ ते ६ महिने | ५ % |
| ७ ते १२ महिने | ५.५% |
| १३ ते २३ महिने | ७% |
| २४ महिने व पुढे | ८% |
| दामदुप्पट सर्वसाधारण | १११ महिने |
| जेष्ठ नागरीक दामदुप्पट ठेव | १०५ महिने |
| बचत ठेव | ३% |
| पिग्मी ठेव | २% |
| आवर्तक ठेव | ७.५% |

**ठेवीवर सर्वाधिक व्याजदर
जेष्ठ नागरीक ०.५%
ज्यादा व्याज**

आपल्या बँकेत (रु.५०००००/-) रु पाच लाखापर्यंतची ठेव विमा संरक्षण योजनेअंतर्गत सुरक्षित आहे

संस्थापक चेअरमन मा. सौ. सुनेत्राबाई विजयसिंह पवार
चेअरमन - मा. श्रीमती सविता अनंतराज तोंबडे
तज्ञ संचालक - मा.सौ. मिनल अजिंक्य पाटील
संचालक मंडळ - मा. श्री. रविंद्र नामदेव साळुंखे
मा. श्री. दिलीप पुरुषोत्तम चव्हाण
मा. श्री. संजय शरद निंबाळकर
मा. श्री. प्रदिप दामोदर जाधव
मा. सौ. वर्षा मुकुंद पाटील

संस्थापक अध्यक्ष - मा. विजयसिंह पवार
व्हा. चेअरमन - मा.डॉ. पिंगराव रावसाहेब पाटील
तज्ञ संचालक - मा.श्री. सुदाम शंकरराव अवसुळ
मा. श्री. नवनाथ जगन्नाथ तांबवे
मा. श्री. दत्तात्रय भालचंद्र निंबाळकर
मा. श्री अनिल रावसाहेब निंबाळकर
मा. सौ. जयश्री जयसिंग खडतरे
मा. सौ. सुधा बाबुराव इंगळे

श्री बाळासाहेब बंडा चौगुले - प्रभारी व्यवस्थापक



रजि.नं.: एस.यु.आर/बी.एन.के./(ओ) ११६ सन १९६-९७

# कविता अर्बन को-ऑपरेटीव्ह बँक लि., सोलापूर

माणिक चौक, शुक्रवार पेठ, सोलापूर.

संपर्क : 8668400655,8788423400, 9423325407

| मुदत | व्याजदर |
|---|---|
| १३ महिने ते ३ वर्ष | 8% |
| महिला १३ महिने ते ३ वर्ष | 8.25% |
| जेष्ठ नागरीक १३ महिने ते ३ वर्ष | 8.50% |

**✲ मासिक व्याज ✲**

| मुदत | व्याजदर |
|---|---|
| १३ महिने ते ३ वर्ष | 8.50% |
| महिला १३ महिने ते ३ वर्ष | 8.75% |
| जेष्ठ नागरीक १३ महिने ते ३ वर्ष | 9.00% |



**पाच लाख
पर्यंत ठेवीवर विमा संरक्षण
(ऑफर केवल मर्यादित कालावधीसाठी)**



# दि सोलापूर सोशल अर्बन को-ऑप.बँक लि. सोलापूर

मुख्य कार्यालय: ६१५१/१, सिद्धेश्वर शॉपिंग सेंटर, सिद्धेश्वर पेठ, सोलापूर.
फोन : २६२६२११ , २७२३६४१
शाखा : मार्केट यार्ड, हैद्राबाद रोड, सोलापूर २३७३६११

माहे मार्च २०२३ अखेरची बँकेची सांपत्तीक स्थिती

| तपशील | रु. लाखात |
|---|---|
| १. वसुल भाग भांडवल | २८५.०८ |
| २. राखीव निधी | ६१६.४० |
| ३. ठेवी | ४४४२.९२ |
| ४. कर्जे | २३९३.६५ |
| ५. गुंतवणुक | २५२०.०१ |
| ६. खेळते भांडवल | ५७६२.५१ |

मुदत ठेवी वरील आकर्षक व्याजदर

| | |
|---|---|
| ३० दिवस ते ९० दिवस | ४.५०% |
| ९१ दिवस ते १८० दिवस | ५.५०% |
| १८१ दिवस ते १ वर्ष | ६.००% |
| ३६६ दिवस ते ३६ महिने | ८.००% |
| ३ वर्ष पुढे | ८.००% |

टिप : जेष्ठ नागरिकास १२ महिन्यापेक्षा जास्त ठेवी वर ०.५०% जादा व्याजदर
मर्यादित कालावधीसाठी लखपती ठेव योजना

* एकदा रुपये ५० हजार भरा १०५ महिन्यात लखपती व्हा.
दामदुप्पट योजना ११० महिने (जेष्ठ नागरीकांसाठी १०० महिने)

**ॲड. हाजी यु.एन.बेरिया**
चेअरमन

**हाजी नसीरअहमद महिबुबसाब खलिफा**
व्हा. चेअरमन

* संचालक मंडळ *

१) हाजी मैनोद्दिन जैनुलाबुद्दीन शेख
२) हाजी अ. रजाक म. हनीफ नाडेवाले
३) हाजी तौफिक बाबुमियाँ हत्तुरे
४) तौफिक इस्माईल शेख
५) म. शफी इब्राहिम शेख
६) मुबीन हाजी छोटुभाई बागवान
७) बाबु यल्लप्पा मेंगेरी
८) शंकर हुसेन गोडलोलू
९) डॉ.सौ. नाझीया समीर मुलाणी
१०) ॲड. सरफाज मैनोद्दीन पिरजादे
११) ॲड. रियाज अ. हमीद मनगुळी

विमाकृत बँक - ऑडीट वर्ग ''अ''
RTGS & NEET सुविधा - कोअर बँकींग कार्यालयीत.
एस.एम.एस.अलर्ट (SMS Alert)

# मोहोळ अर्बन को-ऑप.बँक लि. मोहोळ

## बँकेच्या ग्राहकांसाठी परिपुर्ण सेवा



* ११० महिन्यात दाम दुप्पट ठेव योजना
* ३७५०/- रु. दरमहा भरा...२४ महिन्यात लखपती व्हा.
* UPI QR सुविधा उपलब्ध
* सोने तारण कर्ज ९% उपलब्ध
* घर बांधणी कर्ज, वाहन तारण कर्ज, व्यवसाय कर्ज, पगार तारण कर्ज, C.C. लोन, मोटार सायकल तारण कर्ज अत्यल्प कमी व्याजदर मध्ये उपलब्ध.

* व्याजदर *
१ वर्ष ते २ वर्षाकरिता - ८.००%
२ वर्ष ते ३ वर्षाकरिता - ८.२५%
३ वर्ष ते ५ वर्षाकरिता - ८.५०%
५ वर्ष ते १० वर्षाकरिता - ९.००%

* ज्येष्ठ नागरीकाकरीता ०.५०% जास्त व्याजदर


-: अधिक माहितीसाठी संपर्क :-
मॅनेजर - सुदर्शन शिंदे - मो. ७७२००६६८१९    नितिन शिंदे - मो. ७७२००६६८३९

# अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मुंबई शतक महोत्सवी विभागीय मराठी नाट्य संमेलनास

## * हार्दिक शुभेच्छा *



मा. श्री. कल्याणराव काळे
संचालक



मा. श्री. राजेंद्र जाधव
चेअरमन



मा. श्री. सतिश प्रभाकर लाड
व्हा. चेअरमन

**निशिगंधा बँक....आपली बँक**

* महिला व जेष्ठ नागरीकांना १ ते २ वर्षासाठी ८.५०% व्याजदर
* रु.५ लाखपर्यंतच्या ठेवींसाठी विमा संरक्षण
* ठेवीवरील व्याज दरमहा, मिळण्याची सोय
* सोनेतारण कर्जाचा व्याजदर १० %
* मध्यवर्ती, संगणकीयकृत कार्यालय
* विनम्र व तत्पर सेवा
* आण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ योजनेसाठी पात्र बँक

संचालक :- * श्री. कल्याणराव वसंतराव काळे * श्री. भानुदास बलभिम सावंत
* श्री. भागवत वासुदेव चवरे * डॉ. श्री. मंदार सुभाष सोनवणे
* ॲड. सौ. क्रांती रविकिरण कदम * सौ. शोभा दत्तात्रय येडगे
* श्री. महेश प्रकाश पटवर्धन * श्री. अनिल नारायण निकते
* श्री. वैभव विलास साळुंखे(सर) * श्री. कैलास ज्ञा. शिर्के (मुख्य कार्यकारी अधिकारी)

**शुभेच्छुक - निशिगंधा परिवार, पंढरपूर.**

# कमला को-ऑप. बँक लि., सोलापूर

Web.: www.kamalabank.com E-mail : mrkamalabank@rediffmail.com Ph. (0217) 2991435

बँकेच्या रौप्य महोत्सवानिमित्त ''कमला''
महिला सन्मान योजना दि. ३१/०३/२०२४ पर्यंत

* ५५ वर्षावरील महिलांसाठी-मुदतठेवीवर ०.५०% अधिक व्याजदर
* सर्व वयोगटातील महिलांसाठी-सोने तारण कर्जावर ०.५०% कमी व्याजदर
* दसरा दिवाळी सणाकरिता महिलांना लॉकर - मोफत सेवा
* **तसेच सर्व ग्राहकांसाठी खास ऑफर** *
* सोनेतारण कर्ज रु. ४ लाखापर्यंत-कमी व्याजदरात
* सर्व साईजमध्ये लॉकर उपलब्ध
* ज्येष्ठ नागरीक, सहकारी संस्था / सामाजिक संस्था यांना ठेवीवर ०.५० % अधिक व्याजदर
* आर.टी.जी.एस., एन.ई.एफ.टी, क्यूआरकोड, सर्व प्रकारचे टॅक्स भरण्याची सुविधा-अगदी मोफत.

• प्रॉपर्टी मॉर्गेज कर्ज • दुचाकी, चारचाकी कर्ज • गृह कर्ज
• नजर गहाण सी / सी कर्ज • गोडावून कर्ज
• मशिनरी मॉर्गेज कर्ज • वैयक्तिक कर्ज

बँकेचा प्रगतीचा तक्ता (रक्कम रु. लाखात)

| अ.क्र. | तपशील | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | वसुल भाग भांडवल | ५१.६२ | ५२.३६ | ५३.८९ | ५८.२७ | ६९.८२ |
| २. | राखीव व इतर निधी | ११४.९१ | ११३.०८ | ११४.३१ | १३१.३३ | १३६.३६ |
| ३. | ठेवी | १६०१.४८ | १५२५.११ | १६५२.६० | १६११.४३ | १७१४.०५ |
| ४. | कर्जे व ॲडव्हान्सेस | १०१०.७२ | ११०५.७५ | ९८४.९३ | ८६७.८१ | ८८१.४३ |
| ५. | गुंतवणूक | ५१७.८९ | ५३४.६९ | ७८२.९७ | ८७२.५१ | ९१३.८६ |
| ६. | खेळते भांडवल | १८३२.२८ | १७५६.३६ | १८८६.३९ | १८६१.४७ | १९८०.१९ |
| ७. | निव्वळ नफा | (+)६.९९ | (+)९.२७ | (+)९.०७ | (+)७.२७ | (+)१७.७१ |

वरील कर्जाव्यतिरिक्त सर्व प्रकारचे कर्ज अत्यंत वाजवी दरात मिळेल.
अधिक माहितीसाठी बँकेत संपर्क साधावा.

**सर्व संचालक व कर्मचारी**

# जब्बार पटेल : नाट्यप्रवास एका मनस्वी कलावंताचा

– प्रा.डॉ.विलास सलगरकर, सोलापूर



डॉ. जब्बार पटेल (सिने दिग्दर्शक)
स्वागताध्यक्ष १०० वे नाट्य संमेलन

डॉ. जब्बार पटेल आपल्या सोलापूरचे ! आज राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावर नाट्यदिग्दर्शक म्हणून त्यांना ओळख आहे. यंदाच्या १०० व्या नाट्यसंमलेनाचे अध्यक्ष आहेत. त्यांच्या नाट्यप्रवाहाचा हा छोटा ओळख त्यांचे सोलापूरातील मित्र डॉ. विलास सलगरकर यांनी चितारलाय

सोलापूर शहर तसे गिरणगाव म्हणूनच प्रसिद्ध तसेच दुष्काळी गाव म्हणूनही नावलौकिक पाण्याच्या दुर्भिक्ष्यासारखाच सांस्कृतिक क्षेत्रामध्येही दुष्काळच, अशा ह्या खडकाळ जमिनीवर एखादे मोगऱ्याचे झाड फुलावे आणि त्याच्या फुलांचा सुगंध महाराष्ट्रातच नाही तर देशभरात दरवळावा, असेच काहीसे जब्बार पटेलच्या बाबतीत घडले. सोलापूरच्या ह्या कलावंताने आपल्या नाट्य आणि चित्रपट सृष्टीतल्या विलक्षण भरारीमुळे स्वतःचेच नाही तर सोलापूरचेही नाव उज्वल केले आहे.

कलावंत हा जन्मावा लागतो. ती एक दैवी देणगीच असते. लहानपणापासून जब्बारचे कलागुण जाणवायला लागले. हरिभाई देवकरण प्रशालेमध्ये वक्तृत्व स्पर्धांमधून जब्बारने भाग घेतला की, प्रथम क्रमांक मिळणारच हे नक्की असायचे, सभाधीटपणा आणि पल्लेदार आवाजाची देणगी यामुळे अनेक नाटकांतून जब्बारने भूमिका सजीव केल्या. 'बिन बियाचे झाड' हे वगनाट्य शाळेतच दिग्दर्शित करून दिग्दर्शनाचा पायाही घातला. श्री. पद्माकर देव, श्रीराम पुजारी सरांच्या मार्गदर्शनाखाली कला क्षेत्रात जब्बारची जडण घडण झाली. जब्बारचे वडील रेल्वेमध्ये कामाला होते. आणि रेल्वेतील कलावंत मंडळी त्यावेळेस नियमित नाटके सादर करीत. 'तुझे आहे तुजपाशी', 'वेड्याचे घर उन्हात' 'माणूस नावाचं बेट' यांसारख्या नाटकांतून जब्बारने रेल्वेचे स्टेजही काबीज केले. त्याच सुमारास १९६० मध्ये दयानंद महाविद्यालयातूनही 'तुझे आहे तुजपाशी' मध्ये शाम तर 'वेड्याचे घर उन्हात' मध्ये दादासाहेब त्याने विलक्षण ताकदीने उभा केला होता. गानवेड्या बापूची भूमिका मी केली होती. दयानंद महाविद्यालयात त्यावेळी स्त्री भूमिकाही पुरुषच करायचे. त्यावेळी मुलांना बायकासारखे कसे उभे राहायचे, कसे बोलायचे, चालायचे हेही जब्बारच करून दाखवायचा. नाटकातल्या प्रत्येक प्रसंगाची आखीव फ्रेम त्याच्या वहीत काढलेली असायची. बॅक स्टेज प्रॉपर्टी, सेट, लाईटस्, मेकअप, पोशाख, सगळं काही जब्बारच पाहायचा. संगीतसुद्धा त्याचंच असायचं, स्वतःच्या भूमिके- बरोबर इतरांच्या भूमिकाही त्याला तयार करायला लागायच्या. सगळ्या गोष्टींचा त्याला पुढच्या प्रवासात खूपच फायदा झाला.

इतकी मेहनत घेतल्यानंतर नाटक चांगल व्हायचं, आमचं नशीब चांगल की, नाटकासाठी एवढा वेळ खर्च करूनसुद्धा दोघांनाही पुण्याच्या बी. जे. मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश मिळाला.

बी. जे. मेडिकल कॉलेज हे तिथे होणाऱ्या गॅदरिंगच्या नाटकासाठी प्रसिद्ध हाते. श्रीराम लागू, डॉ प्रभाकर ऊर्फ बाबा देशपांडे यांनी तिथले स्टेज गाजवले होते. आम्ही पहिल्या वर्षी 'प्रेमा तुझा रंग कसा' हे वसंत कानेटकरांचे हलके फुलके नाटक घेतले पीडीए ह्या नामवंत संस्थेचे वासुदेव पाळंदे यांनी दिग्दर्शन केले जब्बारकडे प्रा. बल्लाळच्या तर माझ्याकडे निळूभाऊची भूमिका होती प्रा. बल्लाळच्या मिश्किल भूमिकेत जब्बारने विलक्षण रंग भरले. रसिकांनी हे नाटक अक्षरशः डोक्यावर घेतले. दुसऱ्या वर्षी विजय तेंडलकराचे 'श्रीमंत' हे नाटक घेतले. दिग्दर्शन आणि श्रीधरची प्रमुख भूमिका जब्बारने केली. नाटकाची प्रकृती गंभीर असल्याने प्रेक्षकांना ते फारसे रुचले नाही. पुरुषोत्तम करंडकसाठी प्रथम वर्षी बी. जे. कॉलेज तर्फे तेंडुलकरांची 'बळी' ही एकांकिका सादर केली होती. उत्कृष्ट नाटक, दिग्दर्शक, भूमिका सगळी बक्षिसे जब्बार पटेलकडे. पुढच्या वर्षी तेंडुलकरांची 'जनावर' एकांकिका. पुन्हा सगळी बक्षिसे जब्बार पटेलकडे. राज्य नाट्य-स्पर्धेमध्ये बी.जे. तर्फे 'लोभ नसावा ही विनंती' हे

तेंडुलकरांचे नाटक सादर केले होते पण नाटकाचा बाजू गंभीर असल्याने परीक्षकांना रुचले नाही.

मेडिकल कॉलेजमधून नाटके करताना पी. डी. ए. ह्या पुण्याच्या नामवंत नाट्य संस्थेमध्ये १९६५ मध्ये जब्बारचा शिरकाव झाला. डॉ. श्रीराम लागू त्यावेळेस सरिता पतकी यांचे 'खून पहावा करून' हे नाटक बसवत होते. लेखकाची भूमिका जब्बारकडे आली होती. त्यातले काही प्रसंग डॉ. लागूंच्या बरोबर होते. ते इतके सुरेख झाले की, वृत्तपत्रांमध्ये डॉ. श्रीराम लागू आणि जब्बार पटेल यांच्या अभिनयाची जुगलबंदी' असे मथळे आले होते. डॉ. लागू सारख्या नटश्रेष्ठासमोर जब्बार तितक्याच ताकदीने उभा राहात असे. ही लहान गोष्ट नव्हती. त्यानंतर 'तू वेडा कुंभार' ह्या नाटकामध्ये भालबा केळकरांच्या दिग्दर्शनाखाली जब्बारने प्रमुख भूमिका केली. त्या भूमिकेचा आवाकाही मोठाच होता. तीही भूमिका जब्बार अप्रतिमच करायचा. अभिनयाचे राज्य नाट्य स्पर्धेचे प्रथम पारितोषिक जब्बारकडे आले. त्याच्यानंतर १९७०च्या सुमारास विजय तेंडुलकरांचे, 'अशी पाखरे येती हे नाटक जब्बारने राज्य नाट्य स्पर्धेसाठी बसवले. दिग्दर्शन आणि प्रमुख भूमिका जब्बार पटेल. ह्या हलक्या फुलक्या प्रसन्न नाटकातले सगळेच प्रसंग रंगतदार असत. उत्कृष्ट नाटक, दिग्दर्शक, अभिनय, नेपथ्य अशी सारी बक्षिसे ह्या नाटकाने पटकावली, एक श्रेष्ठ दिग्दर्शक म्हणून जब्बारचे नाव सर्वत्र झाले. ह्या नाटकातला त्याचा अभिनय सर्वोत्कृष्ट होता पण अभिनेता म्हणून त्यानंतर कधीच स्टेजवर पाय ठेवला नाही कारण, दिग्दर्शक म्हणूनच पुढचा प्रवास करायचे त्याने १९७१ च्या सुमारास पी डी ए तर्फे 'घाशीराम कोतवाल' हे नाटक जब्बारने दिग्दर्शित केले आणि ह्या नाटकाने एक इतिहास घडविला. 'मैलाचा दगड' म्हणून ह्या नाटकाचा गौरव झाला. चाळीस कलावंतांना घेऊन हे नाटक सादर केले गेले. हे कलावंत नृत्य गायन करीत. नानाविध प्रसंगांमधून एक कथा साकार करतात. नाना फडणवीस यांची शब्दफेक, त्याचे सादरीकरण, नृत्य, संगीत अफलातून व विलक्षण सुंदर होते 'जब्बार घाशीराम पटेल' असा मथळा महाराष्ट्र टाईम्सने दिला होता, देशातच नाही तर परदेशातही ह्या नाटकाचे अनेक प्रयोग झाले. एक श्रेष्ठ दिग्दर्शक म्हणून रसिकांची मान्यता जब्बारला मिळाली पण ह्या नाटकाचे प्रयोग बंद करण्याच्या मुद्यावरुन जब्बार पटेल, श्रीधर राजगुरू आणि सर्व कलावंत पी.डी.ए.मधून बाहेर पडले आणि 'थिएटर अकॅडमी'ची स्थापना झाली.

'घाशीराम' चे प्रयोग थिएटर ॲकडमी तर्फे सुरू ठेवण्यात आले. आणि पुढचे नाटक पु.ल. देशपांडे यांचे 'तीन पैशाचा तमाशा'. ह्या नाटकामध्ये पाश्चात्य आणि भारतीय संगीताचा सुरेख मेळ साधला होता प्रत्यक्ष स्टेजवर एक बाजूला सर्व पाश्चात्य वाद्ये आणि तर दुसऱ्या बाजूला भारतीय वाद्ये आणि त्यांच्या तालावर जवळजवळ चाळीस कलावंत नाचत गात एक कथानक सादर करताहेत. असा तो अभिनव प्रयोग होता. पॉप म्युझिक, शास्त्रीय संगीत आणि लोकसंगीताचा अत्यंत सुंदर मेळ साधला होता. हा प्रयोगही जब्बारच्या यशात मानाचा आणखी एक तुरा खोवून गेला.

अकॅडमीचे पुढचे नाटक होते अरुण साधू यांचे 'पडघम'. ह्या नाटकात जब्बारने एक वेगळा प्रयोग केला होता. नाटकाचे सगळे संगीत आधी रेकॉर्ड करून ठेवले होते आणि त्याच्या तालावर जवळ जवळ चाळीस एक स्त्री-पुरुष कलावंत नृत्य करीत गात नाटक सादर करतात. अशा प्रकारे प्री. रेकॉर्डेड संगीतावर नाटक सादर करण्याचा हा वेगळाच प्रयोग यशस्वीपणे जब्बारने हाताळला होता. घाशीराम पासून, अशा समूहकला प्रकाराची एक वेगळीच वाट जब्बारने दाखवून दिली होती. जी आधी फारशी कुणी वापरलेली नव्हती.

अशी समूहाची नाटके सादर करताना 'खेळिया' हे एक फक्त दोनच पात्रे असलेले नाटक जब्बारने सादर केले. विद्याधर वाटवे आणि मोहन आगाशे यांनी हे रहस्यपूर्ण नाटक पेलले होते. हा पण रंगभूमीवरचा एक वेगळाच प्रयोग होता थिएटर ॲकॅडमीची नाटके सादर करीत असताना, 'सामना' हा चित्रपट जब्बारकडे आला. आणि एकाहून एक सरस चित्रपट सादर करताना मग नाटक बाजूला पडले गेले. मराठी स्टेजवरील एक उत्तम अभिनेता आणि प्रयोगशील दिग्दर्शक असा लौकिक मिळवून जब्बारने आपली चित्रपट क्षेत्रामध्ये घोडदौड सुरू केली. पण अजूनही असे वाटते की, जब्बारची मराठी रंगभूमीला आजही प्रतीक्षा आहे. त्याच्याकडून उत्तम नाटके रंगभूमीवर सादर व्हावीत, अशी माझी नाही तर अनेक रसिक प्रेक्षकांची इच्छा आहे.

■■

# मी फैयाज बोलतेय....

– शिरीष देखणे, सोलापूर

फैयाजताई या मूळच्या सोलापूरच्या ! फैयाज या शब्दाचा अर्थ दाता, दानी, उदार असा आहे, आपल्या कलागुणांचं दान मराठी रसिकांच्या पदरात भरभरून घालणाऱ्या फैयाजताईंनी आपलं नाव पुरेपूर सार्थ केलं आहे. खूप प्रदीर्घ अशी त्यांची कारकीर्द आहे, असंख्य कलाकारांसोबत त्यांनी काम केलं आहे, अनेक नामवंत लोकांचा त्यांना सहवास लाभला आहे, ज्यांच्या नुसत्या नामोल्लेखाने मराठी माणसाचा ऊर भरून येतो, अशा दिग्गजांचं मार्गदर्शन त्यांना मिळालं आहे. त्याबद्दल त्या बोलत आहेत।

नमस्कार रसिकहो, शंभराव्या नाट्य संमेलनाच्या निमित्ताने तुम्हा रसिकांशी संवाद साधताना मला अतिशय आनंद होत आहे. माझा जन्म पुण्याचा, पण मी साधारण वर्षाची असताना आम्ही सोलापुरात आलो. माझं मूळ नाव रझिया। लहानपणी मी खूप रडत असे, आईला त्रास देत असे, म्हणून आजीने मला अहमद अली बाबा यांच्याकडे नेलं. तिने त्यांचा अनुग्रह घेतला होता. ते आलमेल, जिल्हा विजापूर येथे रहायचे. माझी तक्रार त्यांच्यापाशी केल्यावर ते म्हणाले, आपण हिचं नाव बदलू या. त्या वेळी बडोदा संस्थानचे राजगायक फैयाजखांसाहेब यांचं निधन झालं होतं. बाबांना काय वाटलं कुणास ठाऊक, पण ते अचानक म्हणाले, आपण हिचं नाव फैयाज ठेवू, हीसुद्धा संगीत क्षेत्रात चमकेल. मला पहिल्यापासूनच गाण्याची नृत्याची आवड होती. रेडिओवर गाणं लागलं, की इकडे माझा नाच सुरू व्हायचा. माझी आई पण छान गायची. ती बसवराज राजगुरू यांच्याकडे गाणं शिकली होती. घरातून साथ न मिळाल्याने ती फारशी पुढे जाऊ शकली नाही. मला मात्र आजीचं प्रोत्साहन होतं, त्यामुळे मी मा. हसन यांच्याकडे कथ्थक नृत्य शिकायला जायचे, तर कट्टी मास्तर होते, त्यांच्याकडे भरतनाट्यम शिकायचे. रामभाऊ जालिहाळ हे शास्त्रीय संगीत शिकवायचे तर मनोहर कुलकर्णी यांच्याकडे सुगम संगीत धडे घ्यायचे. सात आठ वर्षांची असतानाच मी हसन साहेबांच्या मेळ्यात गाणं गाऊन नृत्य करू लागले. मग मला डफरीन चौकात असलेल्या न्यू प्रायमरी स्कूलमध्ये घातलं गेलं. तिथे जोशी नावाच्या मॅडम होत्या. त्यांना माझं गाणं खूप आवडायचं, त्यामुळे कुठलाही कार्यक्रम असला, की त्या मला गाणं म्हणायला लावायच्या. माया मल्लापूर ही देखील याच शाळेत होती, जिने पुढे जाऊन एकपात्री संगीत सौभद्र' सादर करून खूप नाव कमावलं. शाळेच्या गॅदरिंगमध्ये आम्ही गाणी म्हणायचो, मी नाच करायची. अभ्यासातही मला चांगली गती होती, भाषा विषय चांगले होते. दहावी अकरावीला मी हरिभाई देवकरण प्रशालेत गेले, तिथे पद्माकर देव सरांचं उत्तम मार्गदर्शन मिळालं. आठवी नववीपासूनच मी नाटकात काम करायला लागले. रेल्वेच्या लोकांचा ड्रॅमेटिक क्लब होता, तिथे नामदेव वठारे, राम साठे, मधू पाठक, उत्तम कसबे अशी मंडळी होती. त्यांनी मला नाटकासाठी बोलावलं.

आणि माझं पहिलं नाटक होतं पु.लं.चं 'तुझे आहे तुजपाशी'! तेव्हा मला एवढं मोठं पाठांतर जमेल की नाही, याची खात्री नसल्याने मी त्यांना म्हटलं, की मला एखादा छोटासाच रोल द्या, म्हणून त्यांनी मला 'अतिविशाल महिला मंडळा'च्या प्रवेशात मिसेस नाडकर्णींचा रोल दिला. या नाटकात जब्बार पटेल शामची भूमिका करत होते तर माया मल्लापूर गीता झाली होती. पु.लं.च्या नाटकाने माझा नाट्यप्रवास सुरू झाला, ही किती भाग्याची गोष्ट आहे ! आणि तेव्हा स्वप्नातही कधी आलं नाही, की अशा श्रेष्ठ लेखकासमवेत काम करण्याची संधी मला भविष्यात कधीतरी मिळेल! या नाटकाचे बरेच प्रयोग झाले.

एकदा मायाला काही कारणांमुळे दौऱ्यावर येणं शक्य नव्हतं, म्हणून मला गीताची भूमिका करायला सांगितलं. सगळं नाटक तोंडपाठ असल्याने मला ते शक्य झालं. मग पुढच्या प्रयोगांत मीच गीताची भूमिका करत राहिले. नंतरही रेल्वेच्या काही नाटकांमधून मी कामं केली, अशीच एक रात्र येते', ' वेगळं व्हायचंय मला ' वगैरे !

पण मग अचानक मुंबईला जावं लागलं. त्याचं असं झालं, आमच्या परिचयाच्या रोशन नावाच्या एकजण होत्या. त्यांची शेती गाणगापूरला होती. ती शेती विकायची म्हणून त्या त्यांच्या आईबरोबर आल्या होत्या. माझ्या आजीने त्या दोघींना घरी जेवायला बोलावलं. रोशन माझ्या आईला म्हणाल्या, तू तर गाणं सोडूनच दिलंस, पण तुझ्या लेकीपैकी कुणी गातं का ? आईने मला गायला सांगितलं. मी 'यूं हसरतों के दाग मुहोब्बत में धो लिये' हे गाणं गायले. माझं गाणं ऐकून त्या थक्क झाल्या. आईला त्या म्हणाल्या, ही मुलगी सोलापुरात राहून सडेल, मी तिला माझ्याबरोबर मुंबईला नेते, मदनमोहन, सी. रामचंद्र यांच्याशी माझी चांगली ओळख आहे, आचार्य अत्रे माझ्या शेजारीच राहतात, त्यांच्या नाटकांत काम मिळवून देते. पण मी 'नाही'

म्हटलं, कारण मला अजून शिकायचं होतं. आठवीत तर होते, अभ्यासात चांगली होते.

या रोशन यांच्याबद्दल थोडं सांगते. सोलापुरात असताना त्या घोडके यांच्या कलापथकात गायच्या. त्यांचे वडील रेल्वेत नोकरी करत होते. पुढे त्यांनी मुंबई गाठली आणि कशा कुणास ठाऊक, त्या थेट सोहराब मोदी यांच्यासमवेत काम करू लागल्या. तिथे त्यांनी 'झांसी की रानी', 'वसीयतनामा', 'जेलर' वगैरे सिनेमांत त्यांनी भूमिका केल्या. त्याच वेळी हिमांशू रॉय यांच्या 'बॉम्बे टॉकीज'च्या एका सिनेमात काम केलं, त्यात त्यांचा हिरो होता अशोककुमार आणि व्हिलन होते रमाशंकर शुक्ल ! या शुक्ल यांच्याशी नंतर त्यांचं लग्न झालं आणि त्यांचं नाव बदलून शीला शुक्ल असं झालं.

पुढे आमची परिस्थिती बिघडली. तोवर मी मॅट्रिक झाले होते. आपणही काहीतरी हालचाल करून पैसे मिळवले पाहिजेत, असं मला वाटू लागलं. तेव्हा मला शीला शुक्ल यांची आठवण झाली. माझ्याकडे गाणं , नृत्य या कला होत्या, त्यांचा उपयोग करता येईल, असं वाटून मी त्यांना पत्र लिहिलं. त्यांचं लगेचच उत्तर आलं, की सुमतीबाई धनवटे नावाच्या लेखिका आहेत, (या' शामची आई 'मधल्या वनमालाबाई यांची बहीण), त्यांनी एक संगीत नाटक लिहिलं आहे आणि त्यात काम करायला एक गाणारी मुलगी हवी आहे, तेव्हा तू ताबडतोब इकडे ये ! त्यानुसार मी त्यांच्याच वडिलांबरोबर मुंबईत पाऊल टाकलं, तो दिवस होता सहा मे, १९६५ !

सुमतीबाईंनी मला मुलाखतीसाठी म्हणून बोलावलं, अनेक नामवंत कलाकार त्यावेळी उपस्थित होते. त्यांनी मला गायला लावलं, एक प्रवेश वाचून घेतला आणि माझं सिलेक्शन झालं. तालमी सुरू झाल्या. आधी हे नाटक मुंबई मराठी साहित्य संघातर्फे होणार होतं. एव्हाना नाट्यवर्तुळात चर्चा सुरू झाली होती, की सोलापूरहून एक मुलगी आली आहे, चांगलं गाते, छान काम करते. त्यामुळे एकदा प्रभाकर पणशीकर आणि मोहन वाघ तालीम पहायला आले. त्यांनाही नाटक आवडलं. पण पुढे काहीतरी बिनसलं आणि संघातर्फे नाटक होणार नाही, अशी स्थिती निर्माण झाली. तेव्हा पणशीकरांनी ठरवलं, की आपण हे नाटक प्रोड्यूस करायचं ! त्यांची आणखी एक संस्था होती, विजयश्री प्रॉडक्शन्स, त्या बॅनरखाली हे नाटक सादर झालं. गीत गायले आसवांनी'!' पहिला प्रयोग झाला आणि ती आली, तिने पाहिलं आणि तिने जिंकलं !' असं म्हणतात, तसं माझ्या बाबतीत झालं. सुमतीबाईंनी पोलिस वेल्फेअरच्या मदतीसाठी विदर्भात या नाटकाचे बरेच प्रयोग घडवून आणले. नागपूरच्या प्रयोगाला पुरुषोत्तम दारव्हेकर उपस्थित होते. त्यांना माझं काम अतिशय आवडलं. नंतर एकदा मला त्यांनी सांगितलं, की त्या वेळी त्यांच्या डोक्यात एका नाटकाचा विषय घोळत होता, आणि मला पाहून त्यांना वाटलं, की त्यांच्या नजरेसमोर जे एक पात्र आहे, त्यासाठी मीच योग्य आहे, किंबहुना मला डोळ्यांसमोर ठेवूनच त्यांनी ते पात्र रंगवलं, 'कट्यार' मधली झरीना ! हे नाटक पणशीकरांनीच केलं होतं, पण आधी ते गेलं होतं भालचंद्र पेंढारकर यांच्याकडे त्यांना ते आवडलं, पण त्यांना असा शोकात्म शेवट नको होता, पण दारव्हेकर मास्तरांनी एक शब्दही बदलणार नाही' असं सांगितल्यामुळे तो विषय बारगळला. मग त्या दरम्यान आम्ही नाटकाच्या दौऱ्यावर गेलेलो असताना दारव्हेकर मास्तरांनी पणशीकरांना नाटक वाचून दाखवलं आणि ते करण्याची विनंती केली. पणशीकरांनी लगेचच होकार दिला. दौऱ्यावरून परत आल्यावर गोकुळाष्टमीच्या दिवशी नाटकाचा मुहूर्त झाला. मोहन वाघ हे तेव्हा' नाट्य संपदा'त पार्टनर होते. ते म्हणाले, झरीनासाठी फैयाज योग्य नाही, हवं तर तिला उमाची भूमिका द्या. पण दारव्हेकरांनी ठामपणे सांगितलं, की लिखाणाच्या वेळेपासूनच मी याच मुलीला नजरेसमोर ठेवून ही भूमिका लिहिली आहे, त्यामुळे झरीनासाठी हीच हवी, वाटल्यास उमेचा रोल लहान वाटत असेल, तर मी तो वाढवून देईन, पण झरीना हीच असेल. मोहन वाघ त्यामुळे थोडे नाराज झाले आणि हळूहळू त्यांनी काढता पाय घेतला अन् मग ते संपदेतून बाहेरच पडले. पणशीकरांनी एकट्यानेच नाटक प्रोड्यूस केलं.

मी आणि कविराजाच्या भूमिकेसाठी शंकर घाणेकर ही नावं आधी ठरलेली होती, खाँ साहेबांच्या रोलसाठी काहीजणांची नावं पुढे आली होती, पण मास्तरांना नुसते गवई नको होते, गायकनट हवे होते, म्हणजे गाणं तर उत्तम हवंच, पण अभिनयदेखील चांगला करता यायला हवा. मग कुणीतरी पणशीकरांना वसंतरावांचं नाव सुचवलं, म्हणाले, की ते दीनानाथ मंगेशकरांचे शिष्य आहेत, शिवाय तेंडुलकरांच्या 'मी जिंकलो मी हारलो 'नाटकात कामसुद्धा केलं आहे, बेगम अख्तर यांच्याशी मैत्री असल्याने उर्दू जबानही छान आहे. मग एकदा पणशीकरांनी वसंतरावांना गाठलं आणि संहिता वाचायला दिली. वसंतराव म्हणाले , मला नाटक आवडलं तरच करणार! आणि दुसरे दिवशी तालमीच्या ठिकाणी येऊन म्हणाले, मी हे नाटक केलं ! त्या वेळी अभिषेकीबुवा माझं गाणं बसवत होते, कारण पात्रांची जमवाजमव करेपर्यंत आपण गाणी तरी बसवू, असं बुवांचं म्हणणं होतं. माझं गाणं ऐकून वसंतराव म्हणाले, वा, छान गाते ही मुलगी ! मग माझी कोण, कुठली अशी चौकशी केली. मी सोलापूरची म्हटल्यावर म्हणाले, अरे, म्हणजे आमच्या रामभाऊंच्या (पुजारी) गावची की तू!

दारव्हेकर मास्तरच दिग्दर्शन करणार असल्याने सर्व पात्रं त्यांच्याच पसंतीने घेतली गेली. म्हणजे मोठा सदाशिव - प्रसाद सावकार, छोटा सदाशिव शेखर सावकार (प्रसादजींचा मुलगा), पंडितजी - भार्गवराम आचरेकर, उमा शुभांगी (सुधा) चैसास ! सगळेचजण प्रचंड मेहनत घेत होते. सकाळी साडेनऊला तालमी सुरू व्हायच्या, ते थेट दोन अडीच पर्यन्त ! २५ डिसेंबर १९६७ ला पहिला प्रयोग झाला. तो इतका रंगला, की तब्बल सहा तास चालला. जाहिरातीत आम्ही म्हटलं होतं, की शेवटची लोकल मिळू शकेल. (पुढे पु.लं. दोनशेव्या प्रयोगाच्या वेळी म्हणाले, की सकाळची पहिली लोकल नक्की मिळेल, अशी ओळ टाकायला हवी होती!) पण त्यामुळे लोकांची अडचण होऊ लागली, शिवाय थिएटरवाले म्हणू लागले, की दोन वेळचं भाडं भरावं लागेल. पु.लं.नी वेळ कमी करायला सांगितलं. मास्तर तेव्हा नागपूरला गेले होते. त्यांच्याशी या विषयावर बोलणं झालं आणि त्यांच्या परवानगीनेच पु.ल. आणि वसंतरावांनी मिळून एडिटिंग केलं आणि नाटक साडेचार तासांवर आणलं. या नाटकामुळे मला वसंतरावांचा सहवास मिळाला , त्यांच्याकडून खूप काही शिकता आलं. प्रत्येक प्रयोगातलं त्यांचं गाणं वेगळं असायचं. पाचशेच्यावर प्रयोग झाले. पणशीकर म्हणायचे त्याप्रमाणे हे नाटक कौतुकाची थाप घेऊनच जन्माला आलं !

त्यानंतर मी 'तो मी नव्हेच' हे नाटक केलं. ते पण एक विक्रमी नाटक होतं. काही प्रयोगांमध्ये मी चन्नक्काची भूमिका केली. मूळची कर्नाटकातली असल्याने आणि नंतर सोलापुरात राहिल्याने मला कानडी भाषा छान येत होती, त्यामुळे चन्नक्काचं कानडी हेल काढून बोलणं मला सहज शक्य झालं. नंतर काही वेळा सुनंदा दातारची भूमिकाही केली. एकदा प्रमिला परांजपेचा रोल करणाऱ्या कलाकाराची काही अडचण निर्माण झाली, तेव्हा खुद्द आचार्य अत्रेंनी शीला शुक्ल यांच्याकडून निरोप पाठवला, की फैयाज सध्या रिकामीच असेल, तर तिला प्रमिला परांजपेचा रोल करायला सांग. मग मी ती भूमिका उत्तम पार पाडली. या नाटकाचे मी हजारच्यावर प्रयोग केले असतील !

'कट्यार 'पूर्वी मी' 'अश्रूंची झाली फुले' या नाट्य संपदाच्या नाटकात सुमित्रा ही भूमिका केली. वसंत कानेटकरांचं अत्यंत गाजलेलं नाटक! डॉक्टर काशीनाथ घाणेकरांचा 'लाल्या' तुफान लोकप्रिय झाला होता.

'तो मी नव्हेच' नंतर आम्ही अंधार माझा सोबती' हे नाटक केलं. 'वेट अन्टिल डार्क' या सिनेमावर आधारित होतं. आधी ते गुजराती भाषेत सादर झालं. रत्नाकर मतकरींनी ते मराठीत आणलं. त्यातला आंधळ्या स्त्रीचा रोल मी करत होते, मोठा चॅलेंजिंग रोल होता. काहीजणांनी हरकत घेतली, की ही तर संगीत नाटकातली नटी, तिला असा रोल कसा जमणार? पण मी ते चॅलेंज स्वीकारलं आणि उत्तम रीतीने रोल सादर केला. अनेकांना ते नाटक आणि माझी त्यातली भूमिका अजूनही आठवते.

त्यानंतरचं माझं महत्वाचं नाटक म्हणजे ' वीज म्हणाली धरतीला!' हे शिरवाडकरांचं नाटक होतं, जे त्यांना स्वतःला अतिशय आवडायचं. त्यातली जुलेखाची भूमिका मी साकारली, जी अनेक मान्यवरांना खूप आवडली.

नंतर मला पु.लं.नी ' वटवट' या नाटकासाठी विचारलं, तेव्हा पणशीकरांनी मला सांगितलं, की खुशाल जा, भाईंच्या नाटकात काम करण्याची संधी मिळतीय, तर ती अजिबात सोडू नकोस! तेव्हापासून मी ' नाट्य संपदा' तून बाहेर पडून फ्री लान्सिंग सुरू केलं.

पुढे 'मत्स्यगंधा' नाटकात सत्यवतीची भूमिका केली. जवळपास नव्वद प्रयोग केले मी त्या नाटकाचे ! अभिषेकीबुवांनी माझ्यासाठी पुन्हा गाण्याच्या तालमी घेतल्या. म्हणाले, तू छान गातेस, तर रेकॉर्डप्रमाणे तीन मिनिटांत गाणं उरकू नकोस, चांगल्या ताना, हरकती घे. नृत्याचं अंग असल्याने ' गर्द सभोती' गाण्याच्या वेळी मी मस्तपैकी डान्स करायचे. यानंतर भालचंद्र पेंढारकरांच्या संस्थेत 'बावनखणी' हे नाटक केलं. संगीत यशवंत देव यांचं होतं.' पेईंग गेस्ट' हे कॉमेडी नाटक केलं, त्यात विक्रम गोखले, मधु कांबीकर, अरुण जोगळेकर असे कलाकार होते. माझ्यापेक्षा लोकांनाच शंका होती, की मला विनोदी भूमिका करता येईल की नाही याची, पण मी अगदी झकास रोल केला तो !

अशोकजी परांजपे यांनी लिहिलेल्या संत गोरा कुंभार' नाटकासाठी मला विचारणा झाली. मी स्क्रिप्ट वाचली, पण मला ती बाळबोध वाटली, म्हणून मी ते करायला नाखूशच होते. शिवाय त्याचवेळी विजया मेहता बसवणार असलेल्या हमीदाबाईची कोठी' या नाटकासाठी निवडलं गेलं होतं. बाईंच्या दिग्दर्शनाखाली काम करण्याची माझी खूप इच्छा होती. त्यांच्या तालमी सकाळपासूनच सुरू व्हायच्या. तिथून मी दुपारी संत गोरा कुंभार 'च्या तालमींना जायचे. दिग्दर्शक होते दिलीप कोल्हटकर, जे बाईंचेच शिष्य होते. त्यांची दिग्दर्शनाची पद्धत निराळीच होती. पणशीकरांच्या नाटकांमध्ये स्टेजवर प्रॉपर्टी ठेवलेली असायची, पण त्याचा वापर नसायचा, पण कोल्हटकर नेपथ्यातील प्रत्येक वस्तूचा वापर करायचे, म्हणजे गाडगी, मडकी, घागर, वगैरे ! गोरा कुंभारचा रोल करत होते प्रकाश घांग्रेकर आणि संगीत होतं अभिषेकीबुवांचं. मी त्यात गावरान संताबाईची भूमिका करत होते. माझ्या वाट्यालाही काही गाणी होती. तिकडची तालीम करून आल्यावर गोरा कुंभाराच्या तालमीला मी पुरेसा

न्याय देऊ शकत नव्हते. बुवांच्या ते लक्षात आल्यावर त्यांनी माझ्यापाशी चौकशी केली आणि विचारलं, की त्या नाटकात तुम्हाला गाणी आहेत का ? मी म्हटलं, नाही, फक्त एकदा गुणगुणायचं आहे. मग बुवांनी मला समजावून सांगितलं, की या नाटकात मी तुम्हाला चार गाणी देणार आहे, जी तुम्हाला आयुष्यभर उपयोगी पडतील, तेव्हा विजयाबाईंचं नाटक सोडून द्या ! काय करणार, सोडून दिलं ते नाटक ! आणि खरंच बुवांनी बसवलेले अभंग पुढे अनेकदा गायले, थेट घुमानच्या साहित्य संमेलनातदेखील ते गाण्याची संधी मिळाली.

आणखी एक गंमत सांगते. 'संत तुकाराम' आणि ' होनाजी बाळा' ह्या नाटकांत मी काम केलं, त्या दोन्ही नाटकांना वसंत देसाई यांचं संगीत होतं. त्यात मला नृत्य करायचं होतं. वसंतरावांचा माझ्यावर फार जीव ! ते म्हणाले, तुला नाच शिकवायला गोपीकृष्ण यांना घेऊन येतो! आणि एके दिवशी गोपीकृष्णजी आले आणि माझ्याकडून नाच बसवून घेतला. प्रॅक्टिस संपल्यावर ते वसंत देसाईंना म्हणाले, ही मुलगी गाणी काय गाते ? ही किती ग्रेसफुल डान्स करते आहे, हिने डान्समध्येच करियर करायला पाहिजे ! कौतुकाचा भाग सोडा, पण माझ्यात निसर्गतःच नाचण्याचं अंग होतं.

मी केलेलं शेवटचं नाटक म्हणजे 'मित्र' ! डॉ. श्रीराम लागूंसारख्या दिग्गज अभिनेत्यासमवेत काम करण्याची संधी मिळाली, हे माझं भाग्यच ! दिग्दर्शक होते विजय केंकरे आणि लेखन होतं शिरीष आठवले यांचं ! लागू म्हणजे अगदी शिस्तबद्ध नट! तालमीत आणि प्रयोगातही मी त्यांच्या कामाचं बारकाईने निरीक्षण करायचे ! एका अपंग झालेल्या माणसाची ते भूमिका करायचे, बोलणं, चालणं यांतून ते आतली अस्वस्थता विलक्षण ताकदीने दाखवायचे. एक गोष्ट आठवतेय, सोलापूरच्या प्रयोगाला पद्माकर देव सर आणि श्रीराम पुजारी सर आले होते. प्रयोगानंतर आत भेटायला आले होते. मी आतल्या खोलीत कपडे बदलत होते. बाहेर त्यांच्या गप्पा चालू होत्या. बोलता बोलता पुजारी सर लागूंना म्हणाले, तुमच्या अभिनयाबद्दल काय बोलणार ? त्या क्षेत्रातले तर तुम्ही सूर्यच आहात, पण आमच्या गावच्या फैयाजमध्येही चंद्राची शीतलता आहे ! तीही तितकीच तुल्यबळ आहे ! त्यांना माहीत नव्हतं, की मी आत आहे ! पण ते ऐकून मला अगदी धन्य धन्य वाटलं !

याचबरोबर माझं भाग्य असं की, अनेक दिग्गज संगीतकारांबरोबर काम करण्याची संधी मला मिळाली, त्यांच्याकडे गाणी गायला मिळाली. माझा आवाज थोडा ढाला म्हणता येईल असा आहे, त्यामुळे सर्व नायिकांना माझा आवाज सूट होऊ शकत नाही, याची मला जाणीव आहे. एकदा प्यारेलालजींनी तसं सांगितलं होतं. इथे लताबाईंसारखा पातळ, धारदार आवाज हवा असतो. तेव्हा आपल्याला गाणी मिळतील, ती थेट नायिकेच्या तोंडी नसणारी, पार्श्वभूमीवर वाजवली जाणारी असणार, हे मला ठाऊक होतं. त्यामुळे मला मिळालेल्या गाण्यांची संख्या तशी फारच कमी आहे !

सी. रामचंद्र यांनी 'गीत गोपाळ' हा कार्यक्रम बसवला, तेव्हा त्यात त्यांनी मला काही गाणी दिली होती. सोलापूरचे सुप्रसिद्ध तबलावादक अण्णा जोशी गाणी बसवताना ताल धरायला हजर असायचे. पुढे सी. रामचंद्र यांनी 'घरकुल' या चित्रपटाची निर्मिती केली, तेव्हा त्यांनी या सिनेमासाठी म्हणून ग. दि. माडगूळकरांची 'जोगिया' ही अत्यंत गाजलेली कविता माझ्याकडून गाऊन घेतली. ते गाणं खूप गाजलं.

जयदेवजी, मदन मोहनजी, आर. डी. बर्मन, वसंत देसाई या साऱ्यांनी माझा 'कट्यार'चा प्रयोग पाहिला होता आणि मला काही गाण्यांसाठी आवर्जून बोलावलं.' आलाप' (सं. जयदेवजी), 'बावर्ची' (सं. मदन मोहनजी), 'रंगबिरंगी' (सं. आर. डी. बर्मन) 'शक' (सं. वसंत देसाई) अशा काही सिनेमांसाठी मी गायले आहे. मी गायलेल्या गुलजार साहेबांच्या दोन गजलांची एक रेकॉर्ड निघाली आहे, तिलाही संगीत वसंत देसाई यांचं होतं.

एन.सी.पी.ए. ला पु. ल. अध्यक्ष होते आणि संगीतविभाग प्रमुख होते अशोक रानडे ! या दोघांच्या संकल्पनेतून ' बैठकीची लावणी' या कार्यक्रमाची निर्मिती झाली. रानडेंचा या विषयातला प्रचंड अभ्यास होता आणि पु.लं. तर वसंतराव देशपांडेंबरोबर पंढरपूरला ज्ञानोबा उत्पातांच्या लावण्या ऐकायला जायचे. दोघांनी उत्तमोत्तम लावण्या निवडल्या आणि काही गायक गायिकांना घेऊन तो कार्यक्रम बसवला होता. अतिशय दर्जेदार असा तो कार्यक्रम होता, पण त्याचे फारसे प्रयोग झाले नाहीत.

पुढे राम कदमांनी 'पाठराखीण' या सिनेमासाठी माझ्याकडून एक लावणी गाऊन घेतली होती. आणि आणखी एक मोठी गोष्ट, जी अलीकडे फारशा लोकांना ठाऊक नाही, ती म्हणजे दादा कोंडके यांच्या ' विच्छा माझी पुरी करा' या लोकनाट्यात मी काही लावण्या गात असे, 'विच्छा' चे जवळपास साडेचारशे प्रयोग मी केले, अर्थात मी पडद्यामागून गात असे. आशा भोसले तब्बल चौदा वेळा 'विच्छा' पहायला आल्या होत्या. त्यांना माझं गाणं खूप आवडायचं. त्यांनी दादांना एकदा सांगितलं होतं, की फैयाज इतर नाटकांतूनही कामं करते, तेव्हा तिच्या तारखा ॲडजस्ट करून तुमचे शो लावत जा, कारण ती असायलाच पाहिजे या शोमध्ये !

आणखी एक क्षेत्र म्हणजे सिनेमा, टीव्ही मालिकांचं ! मी सिनेमे फारसे केले नाहीत. ८२-८३ मध्ये ' महानंदा केला.'

खरं म्हणजे मी मानूच्या रोलसाठी योग्य नव्हते, पण दिग्दर्शक महेश सातोस्कर यांनी खूपच आग्रह धरला, म्हणून तयार झाले. त्या रोलसाठी मुद्दाम वजन कमी केलं. सिनेमात माझ्याबरोबर विक्रम गोखले होता. नंतर 'एक उनाड दिवस 'मध्ये अशोक सराफबरोबर एक छोटी भूमिका केली.

मालिका मात्र बऱ्याच केल्या. 'पैलतीर', 'फक्त तुझ्यासाठी', 'झुंज', 'लढा'' 'ही रात्र वणव्याची' 'हे सार संचिताचे' अशा काही मराठी आणि शिवमहापुराण', ' ये सच है', 'हम हिंदुस्थानी','रिश्तेदारियां' वगैरे हिंदीतल्याही मालिका केल्या. पण खऱ्या अर्थानं मी रमले ती रंगभूमीवरच !

माझी आणखी एक ओळख रसिकांना आहे ती बेगम अख्तर यांची शिष्या म्हणून! तो माझ्या नशीबातला खूप मोठा भाग्ययोग आहे! मी सातवी आठवीत होते. गाण्याची आवड तर होतीच. तर १९६१ मध्ये सोलापूरच्या पानगल हायस्कूलमध्ये बेगमसाहिबांचं गाणं होतं. मी बरीच खटपट करून प्रवेश मिळवला. त्यांचं ' 'दीवाना बनाना है तो दीवाना बना दे' ऐकून मीच दीवानी झाले त्यांनी मला झपाटूनच टाकलं. पुढे मुंबईत आले, नाटकांत कामं करू लागले. १९६७ मध्ये अभिषेकीबुवांकडे बसले होते, तेव्हा त्यांच्याकडे सत्येंद्रभाई त्रिवेदी नावाचे गृहस्थ आले. त्यांच्याकडे रेकॉर्डसचं प्रचंड कलेक्शन होतं आणि अनेक नामवंत गायक गायिकांशी जवळचे संबंध होते. त्यांना बुवा म्हणाले,· सिद्धेश्वरीबाई, बेगम अख्तर यांच्याबरोबर तुमचे घनिष्ठ संबंध आहेत, ही मुलगी बेगमसाहिबांची प्रचंड फॅन आहे, एकदा हिची आणि त्यांची गाठ घालून द्या ना ! त्रिवेदी म्हणाले, जरूर ! पुढच्या वेळी बेगमसाहिबा इथे आल्या, की मी नक्की घेऊन जाईन ! आणि मग दोनएक महिन्यांनी त्यांचा फोन आला, बेगमसाहिबा आल्या आहेत आणि आपल्याला जायचं आहे. मरीन लाईन्सला एका लॉजमध्ये त्या नेहमी उतरायच्या, तिथे आम्ही गेलो. त्यांनी आत्मीयतेने माझी चौकशी केली आणि एखादं गाणं गाऊन दाखव, असं म्हटल्यावर मी 'लागी करेजवां कटार' गायले, त्या खूश झाल्या. मग मी नाटकात ही चीज गाते आणि त्यात वसंतराव काम करतात, म्हटल्यावर त्या म्हणाल्या, मी नाटक बघायला नक्की येणार ! (तीन वेळा त्यांनी नाटक पाहिलं.) पुढे म्हणाल्या, मी मुंबईत आले, की माझ्याबरोबर तानपुऱ्याची साथ करायला येशील का? तेव्हापासून मी अनेकदा त्यांच्याबरोबर मैफिलींना गेले आणि साथ करताकरताच गाणं शिकत राहिले. मी कधीच त्यांची तंतोतंत नक्कल केली नाही, मला त्यांचं गाणं जसं समजलं, ते माझ्या ढंगात सादर करत राहिले. त्यांच्यासमवेत घालवलेला काळ हा मला खूप काही देऊन गेला, समृद्ध करून गेला.

अशा कितीतरी सुंदर, अविस्मरणीय गोष्टी वाट्याला आल्या! पण काही गोष्टींची खंत वाटतेय! कित्येक वर्ष मी 'गायिका अभिनेत्री म्हणून या क्षेत्रात वावरले, त्यामुळे 'संगीत नाटक अकादमी' चा पुरस्कार मिळावा, अशी इच्छा आहे, तीन चारवेळा कुणी कुणी तसे प्रयत्न पण केले माझ्यासाठी, पण अद्याप तरी तो योग आला नाही ! काही गोष्टी नशीबात असाव्या लागतात, यावर माझा विश्वास आहे. मागे घरकुल' सिनेमासाठी 'जोगिया' ही कविता सी. रामचंद्र यांच्याकडे गायले. खूप छान जमून आलं होतं ते गाणं ! लोकांना ते खूपच आवडलं. पुढे ते राष्ट्रीय पुरस्कारासाठी नॉमिनेट झालं, विजय तेंडुलकर आणि ऋषिकेश मुखर्जी यांनी जोरदार शिफारस केली होती. ते अंतिम निवड समितीवर होते. नेमकं त्याच वर्षी 'दस्तक' सिनेमाला, मदन मोहनजींना संगीतासाठी, संजीवकुमार आणि रेहाना सुलतान यांना अभिनयासाठी, तर राजिंदरसिंग बेदी यांना दिग्दर्शनासाठी राष्ट्रीय पुरस्कार मिळाले, तेव्हा निवड

समितीतले बाकीचे सदस्य म्हणाले, की इतके सारे पुरस्कार मुंबईला मिळाले आहेत, निदान गाण्याचा पुरस्कार तरी दुसऱ्या कुणालातरी देऊ या ! असं म्हणून त्यांनी त्या वर्षीचा उत्कृष्ट गाण्याचा पुरस्कार बंगालच्या आरती मुखर्जीला दिला ! नंतर एकदा आम्ही विदर्भ मराठवाड्याच्या दौऱ्यावर गेलो होतो, त्याच दरम्यान जयदेवजींना माझ्याकडून एक गाणं गाऊन घ्यायचं होतं. त्यांनी दोनतीनदा नाट्य संपदाच्या ऑफिसमध्ये फोन केले, पण तिथल्या माणसाने फारसा उत्साह दाखवला नाही आणि आमचा संपर्क होऊ शकला नाही. नाईलाजाने त्यांनी ते गाणं दुसऱ्या एका गायिकेकडून गाऊन घेतलं आणि त्या गाण्यासाठी त्या गायिकेला राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. सिनेमाचं नाव 'गमन', गायिका होती छाया गांगुली आणि गाणं होतं' आप की याद आती रही रातभर !' माझं दुर्दैव, दुसरं काय !

आणखी एक किस्सा ! आर. डी. बर्मन यांचा एक सहाय्यक एकदा माझ्याकडे आला आणि म्हणाला, की साहेबांना एक गाणं करायचं आहे, मी तुमचं नाटक पाहिलं आहे, मला त्या गाण्यासाठी तुमचा आवाज योग्य वाटतोय, पण साहेबांनी कधी तुमचं गाणं ऐकलं नाही, तर तुमची एखादी कॅसेट असेल, तर द्या, म्हणजे मग ते ऐकतील, त्यांना सुटेबल वाटला, तर मी फोन करेन. मग ठरल्याप्रमाणे त्यांचा फोन आला आणि कारने मला आर. डी. बर्मन यांच्याकडे नेलं. बर्मनसाहेबांनी मला आधी साधारण स्टोरी सांगितली : पद्मिनी कोल्हापुरे एका जिप्सी मुलीचा रोल करतेय, तिच्यासमोरच तिच्या प्रियकराचा खून होतो, तेव्हापासून ती सैरभैर होऊन भटकत असते, गात असते, त्यासाठी मला

रेश्मा या गायिकेसारखा आवाज हवाय, तुमचा आवाज तसाच, हस्की आहे, तेव्हा तुमच्या आवाजात ते गाणं करू या. मग त्यांनी मला चाल शिकवली. दोन दिवसांनी ऋषिकेश मुखर्जी यांचा फोन आला, की बर्मनसाहेबांचं गाणं आहे, घरी नीट रिहर्सल करून जा. नंतर एके दिवशी त्यांचा निरोप आला, संध्याकाळी रेकॉर्डिंग आहे. त्यानुसार मी गेले. वादकांना बर्मनसाहेबांनी सांगितलं, की ही मुलगी नाटकांत काम करते, तिथे वादक त्यांचं गाणं फॉलो करतात, इथेही मला तसंच हवंय. रेकॉर्डिंग छान झालं, सर्वांनाच गाणं खूप आवडलं. निघताना बर्मनसाहेबांनी माझ्या हातात एक पाकीट दिलं आणि म्हणाले, ही रक्कम कमी वाटत असेल, तर तसं सांगा , निर्मात्याला सांगून मी दुसरा चेक देईन. मी म्हटलं, दादा, तुमचं गाणं करायला मिळालं, हीच माझ्यासाठी खूप मोठी गोष्ट आहे, तुम्ही द्याल ती रक्कम मला मान्य आहे. घरी येऊन बघते तर चक्क पंधरा हजारांचा चेक होता तो, १९८९ साली ही रक्कम खूपच मोठी होती. पण पुढे दुर्दैवाने तो सिनेमा डब्यात गेला आणि माझं ते गाणं कधीच प्रकाशात आलं नाही !

असो, पण या फारच छोट्या गोष्टी झाल्या. मला इतक्या विविध प्रकारच्या भूमिका रंगवता आल्या, अनेक सन्मान पुरस्कार मिळाले, रसिकांचं उदंड प्रेम लाभलं, लोक अजूनही वेगवेगळ्या कार्यक्रमांसाठी मला बोलावतात, बेळगावला झालेल्या ८८ व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचं अध्यक्षपद मिळालं सोलापूरसारख्या छोट्या गावातून आलेल्या एका मुलीला याहून अधिक काय हवं ?

■■

# अभिनयसंपन्न नृत्यांगना : सरला येवलेकर

– रजनीश जोशी, सोलापूर

अनेक मराठी चित्रपटांमधून सरला येवलेकर यांच्या अभिनयाचे विविधांगी पैलू आपण पाहिले आहेत. मात्र, त्यांच्या अभिनयाची कारकीर्द सुरू झाली ती रंगभूमीवरून. सोलापुरात दरवर्षी होणाऱ्या कामगार कल्याण मंडळाच्या नाटकांमधून त्या भूमिका करीत होत्या. सरलाताईंना अभिनयाबरोबरच नृत्याचीही चांगली जाण आहे. त्यामुळे सोलापुरापेक्षा मुंबईत मोठ्या दिग्दर्शकाकडे त्यांनी 'अशी वस्ती, अशी माणसे' हे नाटक केले. ते त्यांचे पहिले व्यावसायिक नाटक. तिथून मग त्यांनी मागे वळून पाहिलेच नाही. लालन सारंग यांच्या 'जंगली कबूतर' या नाटकात त्यांनी मुख्य भूमिका केली. या नाटकाचे राज्याच्या बहुतेक सर्व जिल्ह्यात प्रयोग झाले. त्यामुळे त्यांचे नाव सर्वतोमुखी झाले. निळू फुले आणि शरद तळवलकर यांच्या बरोबर त्यांनी 'सूनबाई घर तुझेच आहे' मध्येही उत्तम भूमिका केली. या दिग्गज कलावंतांबरोबर सरलाताई अभिनयात कुठेही उण्या पडल्या नाहीत. या भूमिकेचेही कौतुक झाले. त्यानंतर आचार्य अत्र्यांचे 'लग्नाची बेडी' हे नाटक त्यांनी केले. त्यातही त्यांच्या कामाची वाखाणणी झाली. वसंत कानेटकरांच्या 'हिमालयाची सावली' या नाटकातील भूमिकेमुळे त्यांच्या अभिनय कौशल्याचा पुन्हा एकदा प्रयत्य आला. एकाच प्रकारच्या भूमिका न करता वेगळ्या आणि वैशिष्ट्यपूर्ण भूमिका आपण समर्थपणे करू शकतो हे त्यांनी दाखवून दिले. आचार्य अत्र्यांच्याच 'बुवा तेथे बाया' या नाटकात त्यांना त्यांच्या कलेला मोठी संधी मिळाली. फैय्याज, शशिकला या अभिनेत्रींच्या बरोबरीने सोलापूरच्या या गुणवान अभिनेत्रीने नाटक व चित्रपटात आपले अभिनय कौशल्य दाखविले सरलाताईंचे मोठे बंधू जॉन येवलेकर यांच्या ऑर्केस्ट्रात प्रारंभीच्या काळात त्या नृत्य करीत असत. मग व्यावसायिक रंगभूमीवर त्यांनी पदार्पण केले.पुढे चित्तरंजन कोल्हटकर यांच्याकडे काम मिळाले. त्या संधीचेही त्यांनी सोने केले. 'प्रमोशन' नावाचे त्यांचे नाटकही गाजले.

नाटकाप्रमाणेच मराठी चित्रपटसृष्टीही त्यांनी गाजवली. आजही अनेक चित्रपटांच्या चित्रीकरणात त्या व्यस्त आहेत. रूपेरी पडद्यावर त्यांचे पदार्पण झाले ते व्ही. शांताराम यांच्या 'पिंजरा' या गाजलेल्या चित्रपटातून. पहिलाच चित्रपट सुवर्ण- महोत्सवी ठरला. त्यातील त्यांच्या नृत्यकौशल्य आणि अभिनयाने त्यांना अनेक मराठी चित्रपटाची दारे खुली झाली.

सरलाताईंच्या अभिनयाचे कौतुक झाले ते 'सुगंधी कट्टा' या चित्रपटात. त्यांच्या त्यातील भूमिकेबद्दल त्यांना 'फिल्म फेअर' पुरस्कार मिळाला. केवळ मराठीच नाही तर गुजराती, हिंदी चित्रपटांमध्येही त्यांनी सहनायिकेचे काम करून लौकिक प्रस्थापित केला आहे. सोलापूरच्या कामगार रंगभूमीवरून रूपेरी पडद्यावर यशस्वी ठरलेली ही गुणी अभिनेत्री आपल्या शहराचे वैभवच आहे. ■■

# रंगभूमीवरचं पहिलं पाऊल

## नाट्य ही गांभीर्यानं करण्याची गोष्ट आहे.

-अतुल कुलकर्णी

शालेय जीवनात नाटक या प्रकाराशी फारसा संबंध आला नाही. मी हरिभाई देवकरण शाळेत शिकलो. शाळेतल्या बाईंनी बळेबळे फॅन्सी ड्रेस स्पर्धेत भाग घ्यायला लावला, तेवढाच माझा स्टेजवर जाण्याचा संबंध ! बाकी नाटकात कामं वगैरे कधी केली नाहीत. १९७५ च्या आसपास लता कुलकर्णी मॅडम आणि तपस्वी सरांनी मिळून दोन नाटकं बसवली होती 'इथे ओशाळला मृत्यू' आणि तुझे आहे तुजपाशी'! त्यांच्या तालमीला मी अगदी नियमितपणे जाऊन बसायचो, त्यांना लागेल ती मदत करायचो, बस एवढंच ! बाकी काही सहभाग नव्हता. पुढे अकरावी बारावीला मी सोलापुरातच नव्हतो. नंतर इंजिनीअरिंगला गेलो. हुशार विद्यार्थी नसणाऱ्याने नाटकबिटक करायचं नाही, अशी एक समजूत होती. त्यामुळे मी नाटकापासून लांबच होतो. पुण्यात असल्याने 'पुरुषोत्तम करंडक' स्पर्धा बघायला जायचो, पण प्रत्यक्ष सहभाग नव्हता. त्याच वेळेला मला जाणवलं, की मला इंजिनीअरिंगमध्ये काहीच मजा येत नव्हती, म्हणून पुन्हा सोलापूरला आलो आणि दयानंद कॉलेजमध्ये प्रवेश घेतला, फर्स्ट इयरला असतानाच एक चांगली गोष्ट घडली. चारपाच वर्षं बंद पडलेली गॅदरिंगची ॲक्टिव्हिटी नेमकी त्याच वर्षी पुन्हा सुरू झाली. त्याच्या ऑडिशनला मी गेलो आणि देशपांडे सरांनी माझी निवड केली. 'कथा दिनूच्या मृत्यूपत्राची ' ही एकांकिका आणि 'कॉम्प्युटर मॅरेज' नावाचं स्किट या दोन्हीतही मी होतो. दोन्ही प्रकार मुलांना प्रचंड आवडले आणि एका रात्रीत मी ( कॉलेजच्या हिशोबात) 'स्टार' झालो. नाटक हा प्रकार गांभीर्याने करायची माझी ही पहिलीच वेळ होती. मग मला चांगलाच इंटरेस्ट निर्माण झाला. सोलापुरात कार्यरत असलेल्या नाट्यसंस्थांबद्दल माहिती मिळत गेली. आनंद किरपेकर त्यावेळी काणे सरांनी लिहिलेलं'चाणक्य' नाटक बसवत होते. हरिभाई शाळेच्या पोर्चमध्ये त्यांची तालीम चालायची, तिथे एकदा गेल्याचं आठवतंय. दुसऱ्या वर्षीच्या गॅदरिंगमध्ये' मद्रासीने केला मराठी भ्रतार' ही एकांकिका केली, जिच्यात माझ्यासमवेत संगीता अंबरकर होती. ती तेव्हा नाट्य आराधनाच्या' पाहिजे जातीचे' या नाटकात काम करत होती. तिच्याकडूनच पहिल्यांदा आराधनाचं नाव ऐकलं होतं. सेवासदन शाळेत तालमी चालतात, सध्या स्पर्धेत 'पाहिजे जातीचे ' नाटकाचे प्रयोग चालू आहेत, वगैरे गोष्टी समजत होत्या. मग तीच एकदा मला शाळेत घेऊन गेली आणि मला इंट्रोड्यूस केलं. तुम्ही सारी मंडळी भेटलात आणि' येत जा शाळेत' असं म्हणालात. डॉ. वामन देगांवकर त्यावेळी'ढोल वाजतोय' ही एकांकिका बसवत होते. मला त्यात काही भूमिका वगैरे नव्हती, पण मी नियमितपणे येऊ लागलो. शाळेच्या हॉलमध्ये तालमी चालायच्या. मी आपला वेळेवर हजर राहायचो, हॉलची साफसफाई करायचो, लागेल ती मदत करायचो. माझं सातत्य पाहूनच बहुधा मला डॉक्टरांनी'

'नाटक' नावाच्या नाटकात घेतलं. हे माझं पूर्ण लांबीचं पहिलं नाटक ! तिथे खऱ्या अर्थाने माझं नाट्यशिक्षण सुरू झालं. दयानन्द कॉलेजमध्ये जे केलं, ते के.जी.च्या लेव्हलचं असेल, तर आराधनात हायस्कूल लेव्हलचं ट्रेनिंग मिळालं. इथून पुढे नाटकाकडे सीरियसली बघण्याचा प्रवास सुरू झाला. त्यात तुम्हा सर्वांचं खूप मोठं योगदान होतं. नाटकाच्या प्रत्येक अंगांची ओळख होत गेली, प्रकाशयोजना करणारे बटाणे असतील, तुम्ही पार्श्वसंगीताची बाजू सांभाळायचात, दीपक देशपांडे आणि अर्थात डॉ. वामन देगांवकर यांच्याकडून नेपथ्याबद्दल खूप काही शिकता आलं.

आपल्याकडे नाटक म्हणजे शब्द ही धारणा पक्की होती. डॉ. देगांवकरांची तीच व्याख्या होती. पूर्वीच्या काळी लेखकच नाटकं बसवायचे, त्यामुळे हे घडलं असेल, पण मराठी नाटकं ही शब्दप्रधान असायची, अजूनही असतात. ही एका अर्थाने मराठी नाटकांची मर्यादा होती, पण तेच त्यांचं सामर्थ्य होतं. पण पुढे एन.एस.डी.त गेलो आणि नाटकाच्या विविध व्याख्या समजत गेल्या. तिथे शिकत असताना आम्ही मणिपूरला रतन थिय्यम यांच्याकडे गेलो होतो. त्यांच्या नाट्यप्रकाराला 'फिजिकल थिएटर' म्हणतात, त्यात मणिपुरी मार्शल आर्टस्‌चा समावेश असतो. ते एकदा म्हणाले, नाटक क्या होता है ? नाचना गाना वहीं तो नाटक होता है ! म्हणजे त्यांची व्याख्या वेगळीच होती. म्हणजे या दोन अगदी टोकाच्या व्याख्या झाल्या, याच्या अधेमधे बसणाऱ्याही काही व्याख्या असतीलच !

पण आराधनात एक झालं, की शब्द म्हणजेच नाटक! ही व्याख्या पक्की घोटली गेली. एक शिस्त बाणली गेली. डॉक्टरांचं एक वैशिष्ट्य म्हणजे नाटकाकडे पाहण्याचा सीरियस ॲप्रोच! असा ॲप्रोच हौशी नाट्यसंस्थांमध्ये फार कमी प्रमाणात सापडतो. अर्थात फक्त डॉक्टरच तसे होते, असं नाही, तर त्यांनी जमवलेली सगळी माणसं देखील

तितकीच सीरियस होती. त्यामुळे माझ्यातही ही बाब पक्की रूजली, की नाटक ही एक अतिशय गांभीर्याने करण्याची गोष्ट आहे.

नंतर डॉक्टरांनी 'शहाण्याचं घर शेणाचं' ही विजय मोंडकर यांनी लिहिलेली एकांकिका बसवायला घेतली. एका मानसोपचारतज्ज्ञ डॉक्टरकडे एक वेडा आलेला आहे, त्याच्याशी बोलत असतानाच हळूहळू लक्षात येतं, की हा डॉक्टर स्वतःच वेडा आहे, अशी काहीतरी कथा होती. मी आणि दीपक त्यात काम करत होतो. शाळेतच त्या एकांकिकेचे दोनचार प्रयोग झाले असतील. 'चाफा' नाटकाच्या तालमी सुरू झाल्यावर ती मागेच पडली.'चाफा' अनेक अर्थानी माझ्या दृष्टीने महत्वाचं नाटक ठरलं. कुठल्याही कलेत ॲप्रिसिएशन ही फार मोलाची गोष्ट असते, तुम्हाला पुढे जायला उमेद देणारी गोष्ट! व्यावसायिक नाटकवाल्यांना ते पैशाच्या स्वरूपात, प्रेक्षकांच्या भरभरून मिळालेल्या प्रतिसादाच्या स्वरूपात मिळतं, हौशी लोकांच्या बाबतीत ते स्पर्धेतील बक्षीसांच्या स्वरूपात, पेपरमध्ये उत्तम परीक्षण छापून येण्याच्या स्वरूपात किंवा नामवंत व्यक्तींनी तुमचं नाटक पहायला येण्याच्या स्वरूपात मिळतं. 'चाफा 'च्या बाबतीत हे ॲप्रिसिएशन आत्ता म्हटल्याप्रमाणे चहू अंगांनी मिळालं. या नाटकाचे पंचवीसहून जास्त प्रयोग आपण केले. थेट दिल्लीपासून हुबळी, धारवाड, पुणे मुंबईपर्यन्त ! आणखी एक गोष्ट या निमित्ताने घडली, की नट म्हणून काम करत असतानाच तुम्ही जर मॅनेजमेंटची बाजू सांभाळायला लागलात तर खूप काही शिकायला मिळतं. मला आठवतंय, की प्रयोग ठरवण्यासाठी मी नाटकाच्या परीक्षणांच्या कात्रणांची फाईल घेऊन गावोगावी, लोकांच्या गाठीभेटी घेत फिरलो होतो. तसंही मला तांत्रिक बाजू, मॅनेजमेंट यात इंटरेस्ट होता, शिवाय अभिनय तर करत होतोच. 'चाफा 'च्या दौऱ्यांचा अनुभव मला समृद्ध करून गेला. या नाटकाला अनेक पारितोषिकं तर मिळालीच, पण अंतिम फेरीत प्रथम आल्याने आणि माधव मनोहरांसारख्या ज्येष्ठ समीक्षकाने त्याचं चौफेर कौतुक केल्यामुळे मराठीतले बरेच नामवंत लेखक, दिग्दर्शक, अभिनेते यांनी ते आवर्जून पाहिलं आणि भरभरून दाद दिली. त्यामुळे मला बरेचजण ओळखू लागले, थोडंफार ग्लॅमर प्राप्त झालं. चाफा' हे माझ्या दृष्टीने अत्यंत महत्वाचं पाऊल ठरलं ! पाठोपाठ आपण 'माणूस नावाचे बेट' आणि आपण सारेच घोडेगांवकर' ही नाटकं केली. चक्क एस.टी. करून आपण कोरेगांव (सातारा) आणि नांदेड इथे या तिन्ही नाटकांचे प्रयोग केले होते. 'माणूस नावाचे बेट' विजय (कुलकर्णी) यांनी बसवलं होतं. त्यांची दिग्दर्शनाची स्टाईल वेगळीच होती. त्यांनी थोड्या प्रमाणात का होईना, फिजिकल मुव्हमेंट्सचा सुंदर वापर केला होता, नेहमीचा लेव्हल्सचा वापर न करता छान सेट लावला होता. या नाटकामुळे समजू लागलं, की आपण ज्या पद्धतीचं नाटक करत होतो, तेच काही अल्टिमेट नाही, त्यापेक्षा पण वेगळं नाटक असू शकतं! बाहेरगावी झालेल्या प्रयोगांमुळे एक वेगळं एक्स्पोजर मिळालं आणि हळूहळू ध्यानात येऊ लागलं, की शब्द हेच नाटक ही व्याख्या अंतिम नाही आणि याच पद्धतीचं नाटक हेच खरं नाटक हा आग्रहीपणा चुकीचा आहे. कलेच्या क्षेत्रात, विशेषतः नाटकाच्या क्षेत्रात असा आग्रहीपणा उपयोगी नाही! ही जाणीव होण्याची सुरुवात सोलापुरातच झाली होती , इतरांची नाटकं पाहून ती अधिकच दृढ होत गेली.

याचा मला पुढे खूप उपयोग झाला, जेव्हा मी पुढाकार घेऊन 'घोडेगांवकर' नव्याने बसवलं तेव्हा ! त्याआधी जोधपूरला झालेल्या या नाटकाच्या प्रयोगावर खूप टीका झाली होती. परतीच्या प्रवासातच आपण ठरवलं, की हे नाटक आपण नव्या पद्धतीने बसवू या ! नेपथ्यापासून आपण सगळ्या गोष्टी बदलल्या आणि मी अगदी ज्युनिअर असूनदेखील तुम्ही सर्वांनी मला पाठिंबा दिलात, डॉक्टरांनी नाखुशीने का होईना, मला हवे तसे बदल करू दिले आणि आपल्या संस्थेच्या बॅनरखाली ते सादर करण्याची परवानगी दिली. आणि चक्क ते नाटक राज्य नाट्य स्पर्धेच्या अंतिम फेरीत पहिलं आलं ! त्यामुळे मला आत्मविश्वास आला. त्याचबरोबर हेही वाटायला लागलं, की केवळ हौस म्हणून नाटक करण्यापेक्षा मला चोवीस तास नाटक करायला आवडेल. साहजिकच त्यासाठी सोलापूर सोडावं लागणार होतं. त्या दृष्टीने माझी मानसिक तयारी झाली होती. कमलाकर सोनटक्केंपासून अनेकजण 'तू मुंबईत ये' असं सांगत होते. पण माझ्यापुढे प्रश्न असा होता, जे काही आत्मसात केलं आहे, तेवढ्या शिदोरीवर मुंबईच्या व्यावसायिक रंगभूमीची वाट धरायच का, नाटकाविषयी अधिक शास्त्रशुद्ध शिक्षण घ्यायचं ? त्या बाबतीत दिशा दाखवण्यात तुमचा खूप मोठा सहभाग होता, कारण मला वाटतं, की एन.एस.डी.ची पेपरमध्ये आलेली जाहिरात तुम्हीच आणून दिली होती, मी अर्ज केला. फिल्म इन्स्टिटयूट मध्येही जाऊन आलो होतो.

एक महत्वाची गोष्ट इथे आवर्जून नमूद करायला हवी. आपल्या संस्थेतर्फे आपण इतरही बरेच उपक्रम राबवत होतो, जसं शालेय बालनाट्य स्पर्धा, सरकारी नाट्य-नृत्य महोत्सव, व्याख्यानमाला, वगैरे ! या आयोजनात पाहुण्यांचं येणंजाणं, निवासव्यवस्था, प्रत्यक्ष तो कार्यक्रम अशा अनेक गोष्टी कराव्या लागायच्या. यामुळे मला स्वतःला खूप शिकता आलं. आणि माझं व्यक्तिमत्व घडण्यासाठी ते फार उपयोगी पडलं. पुढे जाऊन जेव्हा अभिनय हाच मी व्यवसाय

म्हणून स्वीकारला, तेव्हा मला या गोष्टीचं मोल लक्षात आलं. म्हणजे नाटक, अभिनय, दिग्दर्शन या गोष्टींसोबत ऑर्गनायझेशनल स्किल्स नकळत अंगी बाणली गेली. ही आपल्या संस्थेची खूप मोठी देणगी मला मिळाली, जिचा उपयोग मला पुढे आम्ही क्रेस्ट नावाची संस्था काढली, तेव्हा झाला. या संस्थेची अक्षरशः शून्यातून उभारणी आम्ही केली आणि ती आता जवळपास पाच लाख मुलांशी जोडली गेली आहे. चौदा वर्षं मी या संस्थेचा अध्यक्ष होतो. इथे काम करताना मला आराधनातल्या अनुभवांचा खूप फायदा झाला.

मी नेहमी म्हणतो, की अभिनयाची आवड असणे, अभिनय करता येणे आणि अभिनयाचा व्यवसाय करणे या तीन वेगवेगळ्या गोष्टी आहेत आणि त्यांचा एकमेकांशी संबंध असेलच असं नाही, म्हणजे तुम्हाला अभिनयाची आवड असली तरी अभिनय करता येईल असं नाही आणि अभिनय करता येत असेल तरी व्यवसाय म्हणून अभिनय करणं शक्य होईल असं नाही. पण सुदैवाने या तीनही गोष्टी मला साध्य झाल्या. त्यामागे आराधनात चारपाच वर्षांत नाटकाव्यतिरिक्त ज्या गोष्टी केल्या, त्यातून खूप काही शिकता आलं.

शिरीष : मघाचा एन.एस.डी.च्या प्रवेशाचा मुद्दा अर्धवट राहिला, त्याविषयी बोलू या ! अतुल : हो ! एन.एस.डी. ला जाण्यापूर्वी आपण तीन नाटकं करत होतो, याचा उल्लेख झालाच आहे. कोणतीही गोष्ट शिकताना पुढे जाऊन ती अनलर्न करणे (म्हणजे आधीची पाटी पुसून टाकणे) आणि रिलर्न करणे ही अत्यंत महत्त्वाची बाब असते. म्हणजे 'माणूस'च्या वेळी पहिल्यांदाच मी डॉक्टरांव्यतिरिक्त दुसऱ्याच्या दिग्दर्शनाखाली काम केलं. तो एक ठळक फरक होता, वेगळा दृष्टिकोन होता. शिवाय मी स्वतः 'घोडेगांवकर'चं दिग्दर्शन केलं. त्यावेळी तरी तो एक बंडखोरपणा होता, म्हणजे आधीच्या परंपरा झुगारून नवं काहीतरी करणं हा ! कसं असतं, की एका कम्फर्ट झोनमध्ये राहून काम करत राहणं सोपं असतं, पण त्याबाहेर पडून नव्याचा शोध घेणं, आपल्यातल्या शक्यता आजमावून पाहणं, आपल्याला जे काही वाटतं आहे ते करून पाहणं, यासाठी कम्फर्ट झोन सोडूनच काम करावं लागतं. ते या दोन नाटकांच्या निमित्ताने करता आलं. त्यामुळेच एन.एस.डी. ला जाण्याचा निर्णय पक्का होत गेला. तुम्हा सर्व लोकांनी खूप प्रोत्साहन दिलंत, तिकडच्या इंटरव्यूसाठी तयारी करण्यासाठी मदत केलीत, त्यामुळेच एन.एस.डी.त प्रवेश मिळाला आणि पुढचा प्रवास सुरू झाला.

मला आणखी एक गोष्ट नमूद करायची आहे, की त्या काळात आपण एकत्र आलो, एकत्र कामं केली, दिवसाचे आठआठ तास सहवासात राहिलो, त्यातून आपण खूपच जवळ आलो, नातं अगदी घट्ट झालं. हे भावनिक पाठबळ मला अतिशय मोलाचं ठरलं. वैयक्तिक अडचणी बऱ्याच आल्या. मी दिल्लीत असताना आईवडिलांना दोनतीनवेळा घरं बदलावी लागली, ते तुम्ही सर्वांनी हसतखेळत केलंत. ही नाती अशी घट्ट झाली, कारण आपल्या एकमेकांकडून काही अपेक्षा नव्हत्या, ना आपण एकमेकांना गृहीत धरत होतो. सोलापूर सोडून आता तीसएक वर्षं झाली असतील, आता तिथे माझं घरदेखील नाही, पण ती ओढ दोन्ही बाजूंनी आहे. म्हणजे मध्यंतरी दीपकची मुलगी समृद्धी शिकायला म्हणून मुंबईला येणार होती, तेव्हा त्याने मला सांगितलं, की ती तुझ्याकडे राहील, मी 'हो' म्हटलं, इतकं सहजसोपं होतं ते ! बिझी झाल्यामुळे तीनतीन वर्षं आपल्या प्रत्यक्ष गाठीभेटी होत नाहीत, पण जेव्हा भेटतो, तेव्हा लगेचच मागच्या पानावरून सहजपणे आपण पुढे जातो. कुणीही असं म्हटलं नाही, की हा आता भेटतच नाही, फार बिझी झाला, वगैरे. जो तो आपआपल्या मार्गाने जात असतो, त्यात नियमित भेटी होणं दुरापास्त होतं, पण म्हणून कुणीच त्याबद्दल मनात राग बाळगला नाही. ही निर्मळ मैत्री हे माझं फार मोठं संचित आहे. एन.एस.डी.त शिकत असताना स्कॉलरशिप मिळायची, पण तेवढे पैसे पुरेसे नसायचे. त्या वेळी आपल्या संस्थेतल्या प्रा. खटावकर यांच्या ओळखीने डॉ. नंदकुमार रघोजी यांच्या ट्रस्टतर्फे मला स्कॉलरशिप मिळाली. दरमहा मला एक ठरावीक रक्कम मिळत होती, जी माझ्या दृष्टीने अत्यंत मोलाची होती, कारण तेव्हा माझ्या घरची परिस्थिती बिघडली होती. केवळ खटावकर सरांचा शब्द आणि आराधनात काम करत असल्याने वाटणारी खात्री यामुळे हे शक्य झालं. याबद्दल त्या दोघांविषयी माझ्या मनात कायमच कृतज्ञतेची भावना असते ! एखादा मुलगा शिकतो, नोकरी करायला लागतो, संसारात स्थिरस्थावर होतो, या सर्व प्रवासात त्याचं कुटुंब जसं त्याच्या पाठीशी उभं रहातं, तसं पाठबळ, मग ते कौटुंबिक असो, व्यावसायिक असो किंवा आर्थिक असो, मला आराधनामधल्या लोकांकडून बराच काळ मिळत राहिलं. दिल्ली सोडून मी मुंबईत परत आलो, तेव्हासुद्धा गुरुकाकांच्या (अवधानी) ओळखीने मला त्यांच्या खंडकर या मित्राचं घर दोनतीन वर्षं मिळालं, हेसुद्धा आराधनातल्या मैत्रभावामुळेच ! त्याच घरात तुम्ही सगळे 'गोष्टीच्या गोष्टीची गोष्ट' या आपल्या नाटकाच्या प्रयोगांसाठी मुंबईत आल्यावर हक्काने रहात होतात. आता येणंजाणं कमी झालं असलं तरी मैत्रीचा गोडवा अद्याप टिकून आहे. अतिशय रिअॅलिस्टिक अपेक्षा एकमेकांकडून ठेवल्यामुळेच हे बाँडिंग निर्माण झालं, टिकून राहिलं. अर्ध्या रात्री जरी बोलावलं, तरी हे लोक आपल्यासाठी धावून येतील, हा विश्वास सर्वांच्याच मनात आहे. खरं म्हणजे तर फार थोडा काळ मी सोलापुरात होतो, पाचसहा वर्षंच, पण तो अतिशय क्वालिटी टाईम होता, ज्याचा माझ्या संपूर्ण आयुष्यावर प्रचंड प्रभाव राहिला. त्याबद्दल 'नाट्य आराधना' या संस्थेच्या आणि तिथल्या मित्रांच्या कायमच्या ऋणात रहायला मला आवडेल ! धन्यवाद ! सोलापूरकर रसिकांना विनम्र अभिवादन !

मुलाखत– शिरीष देखणे, सोलापूर

■■

# नाट्य आराधनाने घडवलं

-गुरुराज अवधानी

सिद्धेश्वर एक्सप्रेस सोलापूर स्टेशन मध्ये शिरते. उजव्या बाजूला जुन्या मिलचे कंपाउंड दिसायला लागते. एकेकाळी धुराडंही दिसायचं. ते बघितलं की, सोलापूरच्या मातीचा वास नाकात येतोच. आणि आठवणी अशा एकमेकांना मागे-पुढे मागे-पुढे ढकलत अशा पुढे येत राहतात. कुठली आधी मांडावी, कुठली नंतर मांडावी, असा भ्रम पडतो. त्यामुळे थोडासा विस्कळीतपणा असेल तर क्षमा करा. पण आठवणी मोलाच्या आहेत. सोलापुरात मी पहिली पावलं... पहिली पावलं म्हणजे नाटकातली पहिली पावलं, रंगभूमीवरची पहिली पावलं ही कुठून पडली? त्यासाठी शाळेपर्यंत जावं लागेल. हरीभाई शाळेतलं माझं शिक्षण दरवर्षी स्नेहसंमेलनामध्ये एकांकिका व्हायच्या. त्या काळात मी काम कधीही केलेलं नव्हतं. पण आमच्या शाळेचे दोन अध्वर्यू-अजित शहा आणि अरविंद पटवर्धन ! हे दोघं दरवर्षी एकांकिकात काम करायचे. माझ्या आठवणी प्रमाणे ती सदू, बंडू, नानू, गुलाबी हत्ती या बंडू सीरियल मध्ये काम करायचे. तिथं मला ती आवड निर्माण झाली की आपणही करावं म्हणून. महाविद्यालयात केलं आणि मग व्यवसाय-नोकरी निमित्त परत सोलापुरात आलो. तेव्हा खरी सुरुवात झाली, ती म्हणजे डॉ.वामन देगावकर यांनी 'द्रष्टा' म्हणून नाट्यराधनाचं बळ वाढावं, म्हणून एकांकिका स्पर्धा सुरू केली. त्यामध्ये आंतर बँक एकांकिका स्पर्धा होती त्यामध्ये आम्ही काम करायला सुरुवात केली. शशिकांत लावणीस यांच्याबरोबर आम्ही एकांकिका करत असू. त्या एकांकिकामध्ये आम्हाला बक्षीसं मिळाली आणि डॉक्टर वामन देगावकर यांनी बोट धरून आम्हाला आराधनामध्ये नेलं. तिथून माझी वाटचाल सुरू झाली. त्यापूर्वी खरं सांगायचं तर, माझ्यावरती वाचनाचे संस्कार केलेले, तीही नाव मला घ्यावी लागतील. त्यामध्ये माझ्या शाळेचे शिक्षक दि. प्र. मंगळवेढेकर, आमचे मुख्याध्यापक गो. रा. कामतकर मराठीचे प्राध्यापक, मराठीचे शिक्षक, आणि कॉलेजमधले श्रीराम पुजारी आणि निर्मलकुमार फडकुले या मंडळींनी वाचनाची आवड निर्माण केली. मला आठवतं, मंगळवेढेकर सरांनी ही कादंबरी आमच्या वर्गामध्ये काही महिने टप्प्याटप्प्याने टप्प्याटप्प्याने वाचून दाखवली. तर आर. डी. देशपांडे म्हणून आम्हाला एक शिक्षक होते. ते क्रिकेटचे मुख्य होते. पण त्यांना नाटकाची आवड होती. त्यांनी 'एकच प्याला' हे नाटक माझ्या वर्गामध्ये संपूर्ण वाचून दाखवलं होतं. त्या सगळ्या आठवणी माझ्या हृदयामध्ये अजून आहे तशाच आहेत. मग वामनराव देगावकर यांच्यासोबत नाट्य आराधनामध्ये आल्यानंतर माझी खरी सुरुवात झाली. ती उणीपुरी दहा-बारा वर्षे त्या संस्थेमध्ये मी वेगवेगळ्या भूमिका केल्या. वामनरावांनी आम्हाला बोलावं कसं, उभं राहावं कसं, थांबावं कसं, खुर्चीवर बसावं कसं इथपासून सगळ्या गोष्टी शिकवल्या. आणि मग राज्य नाट्य स्पर्धा सुरू झाल्या आणि मग जी वाटचाल सुरू झाली ती होत होत होत माझी संस्था खूप मोठी झाली. माझ्या संस्थेमध्ये खूप लोक होते म्हणजे ३५- ४० लोकांचा मोठा समूह तयार झाला होता. सगळे वेगवेगळ्या क्षेत्रातले होते. त्यामुळे लेखकही आमच्यातलेच होते. शिरीष देखणे सारखा लेखक ! नाटककार म्हणून त्याचा प्रवास सुरू झाला. 'चाफा' एकांकिका त्यांनी केलेली ती अजून माझ्या लक्षात आहे. खूपच गाजली होती ती एकांकिका. तिचं पुढे नाटक ही झालं होतं. या सगळ्या वाटचालीमध्ये नाट्य आराधनामध्ये राजपुत्रापासून ते फकीरापर्यंत अशा वेगवेगळ्या भूमिका मला रोज करायला मिळाल्या. तिथून थोडीशी जाणीव संपन्न होत गेली. याचं सगळं श्रेय माझ्या नाट्य आराधनातल्या सहकारी मित्रांना त्यांच्या प्रोत्साहनाला, प्रोत्साहनकर्त्यांना आहे. त्यामुळेच मी हे सगळं करू शकलो.नंतर मग सुरुवात झाली ती व्यावसायिक रंगभूमी वरती. ही पहिली पावलं पुढे पुढे मग मुंबईला पडली. पहिलं नाटक केलं व्यावसायिक रंगभूमीचे १९८५ साली. त्यानंतरची सगळी वाटचाल तुमच्या समोरच आहे. त्यानंतर मालिका सुरू झाल्या. अधिकारी बंधू, राकेश सारंग, कमलाकर सारंग, मधुकर तोरडमल या सगळ्या मोठ्या मोठ्या लोकांच्याबरोबर काम करायला मिळालं. कामाची पद्धत पाहायला मिळाली. आणि मग हे सगळं बघून मी त्यातून घडत गेलो आणि टप्प्याटप्प्याने आत्तापर्यंत इथे आलेलो आहे. नाट्य आराधनातला काळ मोठ्या उत्कर्षाचा काळ होता आमचा. अनेक वर्ष आम्ही पहिली पारितोषिक मिळवली राज्य नाट्य महोत्सवामध्ये. वामन देगावकर यांचे प्रयत्न असे होते की, त्यांनी वेगवेगळे लोक घडवले. लेखक घडवले, नट घडवले, संगीत देणारे संगीत दिग्दर्शक घडवले, प्रकाशयोजनाकार घडवले, नेपथ्यकार घडवले, आणि त्या सगळ्या लोकांनी शिष्यत्वाचं देणं फेडलं, म्हणून ही एवढी मोठमोठाली बक्षीस मिळाली. नावारूपाला आलेले लोक सगळे. आणि अशी ही वाटचाल होत होत मी मुंबईला

आलो. मुंबईची वाटचाल म्हणजे काय, हे सगळं तुमच्यासमोर आहेच. पुन्हा पुन्हा काही सांगण्यात अर्थ नाही. सध्या मी 'गालिब' म्हणून चिन्मय मांडलेकर यां नाटक करतोय. या स्टेजला चिन्मयने मला हे नाटक दिले, ही भूमिका दिली, याबद्दल मला चिन्मयचं खूप कौतुक वाटतं. मोठा लेखक आहे, दिग्दर्शक आहे आणि सध्या त्याचे प्रयोग जोरात सुरू आहेत. या प्रयोगांच्या तारखांमुळेच मला प्रत्यक्षात इथे हजर राहता येत नाही. म्हणूनच या लेखातून मी या सगळ्या गोष्टी तुम्हाला इथे सांगत आहे. दूरदर्शनच्या मालिका सुरू होत्या त्या काळामध्ये. गौतम अधिकारी बंधुंनी मला त्या काळामध्ये पहिल्यांदा ब्रेक दिला. त्यांचा मी आवडता नट होतो. त्यानंतर पुढे अनेक दिग्दर्शकांसोबत काम केलं मी. त्यामध्ये सारंग होते, मधुकर तोरडमल होते, आणि महत्त्वाचं म्हणजे मला खरा ब्रेक मिळाला तो वीरेंद्र प्रधान या दिग्दर्शकामुळे. फार हुशार दिग्दर्शक. त्यानं मला वेगवेगळ्या भूमिका करण्याची संधी दिली. त्यामुळे त्या भूमिकांना वेगवेगळी पारितोषिकेही मिळाली. माझ्या भूमिका, मालिका इतक्या गाजल्या की, प्रत्येक मालिकेमध्ये माझ्यासाठी भूमिका असायची आणि ती भूमिका वेगळीच असायची आणि ती गाजायची. अशी माझी वाटचाल सुरू होती.

■■

# माझ्यात नाट्यबीज रुजलं सोलापूरात

-किशोर महाबोले

सध्या मराठी रंगभूमीवर म्हणण्यापेक्षा दूरदर्शन सृष्टीमध्ये व्यस्त आहे. तर सोलापूर माझं आजोळ सुट्टीच्या निमित्ताने सोलापूरमध्ये जाण व्हायचं, पुढे शिक्षण आणि नोकरीच्या निमित्ताने मी सोलापूर मध्ये बरीच वर्षे राहीलो नोकरी करत असताना नाटकात छोट्या, छोट्या भूमिका करायचो. 'अशी पाखरे येती' मध्ये अतिशय शेवटच्या पाच मिनिटांत येणार एक पात्र म्हणजे विश्वास ते मी केलं होतं ते पात्र बघून माझ्या ऑफिसरना जाणवलं की याच्यामध्ये काहीतरी स्पार्क आहे आणि म्हणून मग त्यांनी मला पुढचं नाटक करायला दिले आणि म्हणाले की तुम्ही करणार असाल तरच आपण या स्पर्धेमध्ये भाग घेणार आहोत. तिथून तो प्रवास सुरू झाला ही साधारण गोष्ट आहे १९९७ ची आणि एक प्रवास सुरु झाला. मग नाटकांमध्ये असताना शशिकांत लावणीस आमच्याकडे दिग्दर्शन करायला यायचे नाटकात त्यांचा मुलगा अभि त्यामध्ये काम करत होता. त्यानंतर तेंडुलकर यांची एकांकिका केली त्याचे साधारण ३२- ३३ प्रयोग केले आता नक्की आठवत नाही पण त्यामध्ये पारितोषिकही मिळाली तिथे एक आत्मविश्वास निर्माण झाला आणि तो एका वेगळ्या उंचीवर घेऊन गेला तिथून पुढे राज्य नाट्य स्पर्धा सुरू झाल्या आणि त्यामध्ये माझा चंचुप्रवेश झाला. मी, 'रात्र उद्याची' म्हणून मोहन वाघांचं एक नाटक केलं त्याला यश मिळाल. शिरीष देखणेच एक नाटक होतं 'कृष्णपक्ष' त्यात भूमिका करायला कोणी तयार नव्हतं त्यांच्या ग्रुपमध्ये, कदाचित असं मला वाटलं मी त्यांना म्हणालो मी करतो, आणि मग मी ते नाटक केलं. पटेल म्हणून एक निर्माते होते आम्ही मिळून नाटक केलं त्याला बरीच पारितोषिकं मिळाली प्राथमिक आणि अंतिम मध्ये सुद्धा आणि मग पुढे माझी आई गेल्यानंतर मी पुण्याला ट्रान्सफर घेतली पुण्यामध्ये आलो आणि इथे मला पहिले नाटक मिळाले ते आशा काळे यांच्या बरोबर त्याकाळच्या त्या सुप्रसिद्ध मराठी चित्रपट अभिनेत्री होत्या. आशा काळे यांच्याबरोबर 'घर श्रीमंताच' आणि तिथून मग' मी माझ्या मुलांचा'हे नाटक केलं चंद्रलेखाचे मोहन वाघ यांनी त्याची निर्मिती केली होती. तर अशा पद्धतीने हा व्यवसायिक हा प्रवास सुरू झाला, त्या नाटकाच्या पुण्यामध्ये बऱ्याच सीडी वगैरे केल्या. त्यानंतर सुरकर आणि स्मिता तळवळकर यांच्याकडे बऱ्याचशा सिरियलसमधे मी होतो. आणि मुळात सांगायचं मला हे महत्त्वाच आहे की माझी पावले जी होती ती सोलापूरमध्ये रुजली गेली होती. हुतात्मा स्मृती मंदिर असो की दमाणी सभागृह तिथे सुद्धा मी नाटक करायचो पण नाट्य बीजं जी रोवली गेली ती सोलापूरमध्ये. सोलापूरमधून माझा नाट्यप्रवास सुरू झाला म्हणून मी सोलापूरचा ऋणी आहे आणि कायम राहीन, हे मात्र नक्की.

■■

# सोलापूरात नाटकाचा पाया पक्का झाला

– प्रशांत चौडप्पा

सोलापूर सुटलं तरी सोलापूरचे नाट्य वलय काही सुटल नव्हतं काही खाजगी कामासाठी म्हणून १-२ दिवस सोलापूरला आलं की, नाट्य आराधनाच्या तालमींना सेवासदन प्रशालेत हजर! मग त्या २दिवसाचे १०-१५ दिवस व्हायचे,विजय कुलकर्णी, सुनील गुरव, दीपक देशपांडे, शिरीष देखणे, सुधीर इंगळे, प्रदीप कुलकर्णी, अनिरुद्ध जोशी, अशी एकसे एक बढकर एक मंडळी....

एकदा सोलापूरचे दिग्गज आणि वरिष्ठ रंगकर्मी रेवण उपारे काकानी जयप्रकाश कुलकर्णी लिखित 'तथागत सिद्धार्थ गौतम' हे नाटक बसवायला घेतले. बॅले स्वरूपातील नाटक होते.मला सिद्धार्थ गौतमाच्या भूमिके साठी विचारले,तत्काळ होकार दिला. कारण सोलापूरला नाटक करायला मिळणार होते...खूप चांगला अनुभव होता नाटकाचा..या नाटकामुळे सोलापूरातील बरेच रंगकर्मी मित्र झाले सतीश वैद्य, रणधिर अभ्यंकर, अशोक किल्लेदार, विजय कटके, रवि मालपुरी, मनोज अंकुश, मिलिंद पटवर्धन....अजून एक महत्वाची गोष्ट म्हणजे याला योगायोग म्हणावा की चमत्कार कळत नाही,तो म्हणजे ज्यांना बघत मोठा झालो ते म्हणजे गुरुराज अवधानी, किशोर महाबोले, पुढे जाऊन त्यांच्याबरोबर काम करायला मिळाले ते आता घनिष्ठ मित्र झाले आहेत.आणि आता मी जे नाटक. करतोय 'नाटककाराच्या शोधात सहा पात्र', त्यातही जी भूमिका गुरुराज यांनी केली होती..तीच मी करतोय.

यावर्षी मराठी नाट्यसंमेलनाचं हे शंभरावं वर्ष आहे त्यासाठी सर्व रंगकर्मींना मनःपूर्वक शुभेच्छा ! मला खूप खूप आनंद वाटतोय अभिमान वाटतोय आणि कृतज्ञता वाटते की, मी मराठी रंगभूमीचा, नाट्य वर्तुळाचा एक छोटासा भाग आहे आणि या नाट्यसंमेलनामध्ये मला सहभागी व्हायची संधी मिळते आहे योगायोगाने यावर्षी मी माझं रंगभूमीवर २५ व नाटक करतोय. गेली सत्तावीस वर्ष मी हौशी रंगभूमी, राज्य नाट्य स्पर्धा, प्रायोगिक रंगभूमी ,व्यावसायिक रंगभूमी या माध्यमातून कार्यरत आहे या नाट्य प्रवासाची सुरुवात सोलापूरला हुतात्मा स्मृति मंदिरातून झाली. मुळात नाटकाची आवड असल्यामुळे ,कॉलेजचे तिसरे वर्ष संपल्या संपल्या मी अरुण मेहता यांच्या निशिगंध नाट्यमंदिरमध्ये माझी सुरुवात झाली. अरुण मेहता सर नाट्य प्रशिक्षण शिबिर घ्यायचे. शिबिर झाल्यानंतर मला त्यांच्या पहिल्या नाटकात प्रमुख भूमिका मिळाली ते नाटक होतं डॉ. चंद्रशेखर कंबार लिखित आणि प्रा.निशिकांत ठकार अनुवादित 'कहाणी वाघाच्या सावलीची' ते नाटक सोलापूर प्रादेशिक केंद्रात प्रथम आलं शिवाय अंतिम फेरीतही संपूर्ण महाराष्ट्र राज्यातून पहिलं आल, मला अभिनयाचे रौप्य पदक मिळाले. दुसर नाटक होतं डॉ. गिरीश कर्नाड लिखित 'अग्निवर्षा' यात मला अरवसू ही प्रमुख भूमिका साकारण्याची संधी मिळाली. हे नाटक सुद्धा प्रादेशिक आणि अंतिम फेऱ्यांमध्ये यशस्वी ठरलं पुन्हा मला अभिनयाचे रौप्य पदक मिळाले. तिसरं नाटक होतं गिरीश घोष लिखित 'नटी विनोदिनी'. सुरुवातीलाच निशिगंध नाट्यमंदिर सारख्या संस्थेत काम करायला मिळणं माझ्यासाठी खूप महत्त्वाचं आणि उपयुक्त ठरलं.कारण, अरुण मेहता सरांच्या हाताखाली अगदी कोऱ्या पाटीवर अक्षर गिरवावित तसे अभिनयाचे धडे गिरवतच होतो पण, त्यांच्या चार चार महिने चालणाऱ्या तालमीमुळे शिस्त आणि हरएक प्रकारची काम करण्याची सवय लागल्यामुळे पाया पक्का झाला त्यांच्याकडे काम करत असताना प्रमुख नट आणि बॅकस्टेज असा फरक नव्हता. त्यामुळे सगळ्यांना सगळी कामं करावी लागत. त्यामुळे मी प्रमुख भूमिका जरी करत असलो तरी तालमीच्या वेळेआधी येऊन हॉल झाडणे, रोज नाटकाचा सेट, लेवल्स लावणे, नाटकांमध्ये लाईव्ह म्युझिक असल्यामुळे हार्मोनियम तबला संगीत वाद्यं ही सगळी व्यवस्थित लावून घेणे, तालीम संपल्यानंतर हे सगळं परत व्यवस्थित ठेवणे. जेव्हा स्पर्धेचे प्रयोग मुंबईला असतील तेव्हा पहाटे लवकर येऊन बसवरती हे सगळं सामान भरणं, बारा-पंधरा तासाचा प्रवास करून मुंबईला पोहोचल्यावर रात्रभर जागून ८०, ९० स्पॉटलाईट तयार करण्यात बल्ब लावणे, नंतर सेट उभा करणे ते दुसऱ्या दिवशी एक तालीम करून दणदणीत प्रयोग करणे, परत बस भरून सोलापूरला आल्यावर बस रिकामी करून सगळ्या गोष्टी जागच्या जागी लावून मग घरी जाणे. जबाबदारी, शिस्त आणि मेहनत या गोष्टीमुळे नाटकाचा पाया खूप पक्का झाला! त्यासाठी मी अरुण मेहता सरांचा ऋणी राहीन !

त्यानंतर मी मुंबईला मला या क्षेत्रात काम करायचे असं, माझ्या घरच्यांना सांगितलं तर वडील म्हणाले की, तू कुठे राहशील एकटा त्यापेक्षा आपण सगळेच मुंबईला शिफ्ट होऊया ! तर माझं अक्खं कुटुंब मुंबईला शिफ्ट झालं, मुंबईला कोणीच ओळखीचं नव्हतं. मग हळूहळू धडपड करत एकेकाला भेटत काम सुरू झालं. एक संस्था मिळाली ती

हिंदी नाटक करायची. त्यांच्याबरोबर मी मन्नू भंडारी लिखित 'महाभोज'आणि शंकर शेष लिखित 'घरोंदा' ही दोन हिंदी नाटक केली. काही महिन्यानंतर मी एक दिवस माहीमच्या अविष्कार या संस्थेच्या संपर्कात आलो. इथे आल्यावर जाणवलं की आपण जे नाटक केलं, ती फक्त प्राथमिक शाळा होती, अजून माध्यमिक शाळा मग उच्च शिक्षण! रंगभूमी, नाटक एक अथांग समुद्र आहे, त्याला घाबरायच नाही.. त्यातून आपल्या कुवतीप्रमाणे एक एक ओंजळ गोळा करत राहायचं, शिकत राहयचं ,नाटक करत राहायचं..

मी प्रा. जयदेव हट्टंगडी यांच्या शिबिरात प्रवेश घेतला.. नंतर इथेच मला माझे गुरु भेटले, चेतन दातार.... त्यांच्याबरोबर मी पहिलं उर्दू नाटक केलं याचं नाव होतं 'मंटो'. त्यानंतर मला नाटक आणि नृत्य यांचा संगम म्हणजेच रंग नृत्य ह्या प्रकारात काम करायला मिळालं. त्या नाटकाचं नाव होतं 'माता हिडिंबा'. मला दिल्लीच्या NSD मध्ये जाऊन नाटक शिकायची खूप इच्छा होती पण, मला तर मुंबईच्या एनएसडी मध्ये म्हणजे नॅशनल स्कूल ऑफ दातार किंवा नॅशनल स्कूल ऑफ दुबे यामध्ये ऍडमिशन ऑलरेडी मिळाली होती आणि तिथे मी नाटक करतही होतो, शिकतही होतो. त्यामुळे प्रॅक्टिकली याच्यापेक्षा सुंदर फॉर्मल ट्रेनिंग मला कुठे मिळालं असतं? सोलापूर सोडून मुंबईला आल्यावर सुरवातीला मी सहा वर्षे प्रायोगिक नाटक केलं. गुरू शिष्य परंपरेप्रमाणे घडत गेलो. चेतन दातार यांचे गुरू पं.सत्यदेव दुबे यांच्या परंपरे नुसार त्या acting school मध्ये मला शिकायला मिळालं आविष्कार संस्थेमधून भारतातल्या सगळ्या प्रमुख नाटयोत्सवात नाटक सादर करण्याची मला संधी मिळाली.

आपण त्या पिढी बद्दल कौतुकाने बोलतो. ज्यांनी कॅसेट टेपरेकॉर्डर पासून सिडी आणि मेमरी कार्ड पाहिलं....टेलिफोन पासून ते स्मार्टफोन पाहिले....तस रंगभूमी च्या बाबतीत असं म्हणेनकी मीमराठी रंगभूमीवर प्रभाकर पणशीकर, डॉ. लागू, भक्ती बर्वे ,यांच्यापासून तेप्रशांत दामले, डॉ. गिरीश ओक, भरत जाधव आणि आताचे कलाकार.

तसचं सोलापूर च्या रंगभूमीवर शुकुर सय्यद, अपर्णा रामतीर्थकर, शशिकांत लावणीस,शोभा बोल्ली,सुनील गुरव, किशोर महाबोले यांच्या पासून आजच्या पिढीतील आसावरी नारकर, अश्विनी अमीर तडवलकर,अमोल जाधव, प्रशांत शिंगे यांना काम करताना पाहू शकलो

सोलापूर ची रंगभूमी खूपच विशाल आणि समृद्ध आहे.इथून ज्या कलाकारांनीडॉ. जब्बार पटेल, फैय्याज, गुरुराज अवधनी, अतुल कुलकर्णी, किशोर महाबोलेयांनी अख्खा महाराष्ट्र गाजवलात्यांचा मला खूप अभिमान आहे.

सोलापूरच्या रंगभूमी चा मी आजन्म ऋणी राहीन.तिने दिलेल्या शिदोरी वर आणि रंगकर्मी मित्रांच्या प्रेमाशीर्वादच्याजोरावर.माझा सारखा छोटा रंगकर्मी आज मुंबईत एक एक पाऊल पुढे चालतो आहे. पण मुळं मात्र घट्ट रोवली आहेत ती सोलापूर मधेच!

■■

# माझे वडील माझे प्रेरणास्थान

-अमीर तडवळकर

सगळ्यांना जय नटेश्वर !

सर्वप्रथम माझ्या कारकिर्दीचा प्रवास आपल्यासमोर मांडण्याची संधी दिली याबद्दल मी नाट्य परिषदेचे मनापासून आभार मानतो रंगभूमी, नाट्य, चित्रपट, वेब सिरीज, दैनंदिन मालिका हा प्रवास मांडताना खरोखर खूप आनंद होतोय. माझं शिक्षण सोलापुरातील सिद्धेश्वर प्रशाला येथे झालं, प्राथमिक वर्गात असताना इयत्ता चौथीमध्ये मी एखादी व्यस्त गृहिणी सकाळी उठल्यापासून दैनंदिन कामकाज करीत मेकअप करून ऑफिसला कशी जाते, तिची कशी त्रेधा तिरपिट उडते याचं सादरीकरण पीटीच्या तासाला करून दाखवलं. त्यावेळेस मला प्रचंड टाळ्या मिळाल्या होत्या आणि बक्षीस म्हणून लाकडाची पट्टी मिळाली होती. माझ्या आयुष्यातला सगळ्यात पहिला परफॉर्मन्स! मग शाळेत असतानाच वक्तृत्व स्पर्धेमध्ये 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' याची तयारी माझी आई कै. आशालता अरुण तडवळकर, जी सोलापुरातील विद्यानिकेतन प्रशालेची मुख्याध्यापिका होती, तिने करून घेतली. गणेशोत्सवाच्या दरम्यान माझे बाबा कै. अरुण दिनकरराव तडवळकर, पोवाडा म्हणायचे. हे माझे प्रथम प्रेरणास्थान! शाळेत असतानाच वेगवेगळे आवाज आणि मिमिक्री करायला आवडू लागलं! शाळेच्या कार्यक्रमांमध्ये रोशन कुमार यांच्या नकला हा कार्यक्रम पाहण्याचा योग आला आणि माझे गुरु नारायणराव होनप यांनी मला या कार्यक्रमात निवेदन करण्याची संधी दिली. निवेदनाबरोबरच मी मिमिक्री आणि

नकला ही त्यांच्यासोबत करू लागलो. कार्टून फिल्म मधल्या 'डोनाल्ड डक' च्या आवाजात मी 'बालगीत' म्हणून बालचमूना आपलंसं करून घेत होतो.

कॉलेजमध्ये आल्यानंतर माझे मित्र बंधू श्री अमोल देशमुख यांनी दिग्दर्शित केलेल्या 'इथं नाव ठेवायला जागाच नाही' या एकांकिकेने सर्वत्र धुमाकूळ घातला होता ह्या एकांकिकेत मी दिग्दर्शकाची भूमिका साकारली होती माझ्या पथनाट्याच्या प्रवासात मला श्री आशुतोष नाटकर आणि कै अपर्णा रामतीर्थकर यांचेबरोबर पथनाट्य सादर करण्याची संधी मिळाली हा प्रवास सुरू असतानाच अनेक नाट्य शिबिरांमध्ये सहभाग नोंदवता आला त्यावेळी माझी भेट माझे गुरु अरुण मेहता सर यांच्याबरोबर झाली. राज्य नाट्य स्पर्धेच्या निमित्ताने मला माझे गुरु श्री. अजय दासरी, सर भेटले,कै.महेश जोशी सर भेटले आणि त्यांनी 'पडघम' हे महानाटय बसवलं होतं. ज्या एका नाटकात आम्ही जवळजवळ ४० कलावंत होतो आणि माझ्या सहा भूमिका होत्या नाट्यप्रवास सुरू होता. सोलापुरातली दिग्गज लोकं भेटत होते सोलापुरातल्या सर्व नामवंत दिग्दर्शक, अभिनेते यांच्याबरोबर अभिनय करण्याची संधी मला मिळू लागली नंतर एका नाट्य शिबिराच्या दरम्यान मला अतुल पेठे सर भेटले आणि त्यामुळे मला 'नाटय आराधना' या संस्थेतून काम करण्याची संधी मिळाली. दिग्गज नाट्य कलावंत शिरीष देखणे, प्राध्यापक दीपक देशपांडे,रोहिणी उपळाईकर, बटाणे काका,अमोल राजमाने, अक्षर कोठारी, साईप्रसाद गोडबोले, अनंत केसकर यांच्याबरोबरही काम करण्याची संधी मिळाली हा प्रवास सुरू असताना रंगभूमीशी निगडित वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवता आला एका वाचिक अभिनयाच्या स्पर्धेमध्ये विरहिणी वासवदत्ता ही एकांकिका आम्ही सादर केली त्यावेळेस कै कविवर्य लक्ष्मीनारायण बोल्ली सर, सौ. शोभाताई बोल्ली, ममता बोल्ली यांच्याबरोबरही काम करण्याची संधी मिळाली. ज्यांनी माझ्या वाचिक अभिनयात मोलाची, वास्तववादी अभिनय शिकण्यात भर घातली, असे माझे गुरु सुनील गुरव यांची भेट झाली आणि मी राज्य नाट्य स्पर्धेमध्ये दर्द ए डिस्को नावाचे नाटक केलं त्याच्यात मला अभिनयाचे रौप्य पदक मिळालं. प्रवास असाच सुरू असताना सोलापुरात व्यावसायिक नाटक सुरू करणारे राजू मोडक काका यांची भेट झाली आणि त्या निमित्ताने आम्ही दोन बालनाट्य बसवली 'सळो की पळो', 'मिशी हरवली आहे'! राज्य नाट्य स्पर्धा अनेक स्पर्धांमध्ये ज्यांना रंगमंचावर बघून आम्ही मोठे होत गेलो अशा दिग्गज कलावंतांसोबत या व्यावसायिक नाटकात अभिनय करण्याची मला संधी मिळाली ज्यामध्ये मंदार काळे, जानकी काळे, अमोल धाबळे, चैतन्य उत्पात, विष्णू संगमवार, लक्ष्मीकांत कांबळे, मिलिंद पटवर्धन, रणधीर अभ्यंकर, मिलिंद ताकपेरे अशा दिग्गज कलावंतांबरोबर अभिनय करायला मिळाला. कॉलेजमध्ये असतानाच वेगवेगळी पथनाट्य करण्याची संधी मला मिळाली. त्यामुळे मी पथनाट्याचे लेखन दिग्दर्शन सुध्दा करू लागलो. शिवाजी विद्यापीठ अंतर्गत होणाऱ्या युवा महोत्सवात एकांकिका पथनाट्य, लघुनाटिका, मूकनाट्य, यांचं दिग्दर्शनही करू लागलो आणि त्यादरम्यान बुर्ला महिला महाविद्यालयाची एकांकिका बसवत असताना माझी, अश्विनी आगाशे हिची भेट झाली अल्फा करंडक एकांकिका स्पर्धा स्त्री अभिनेत्री विजेती अश्विनी आगाशे ही माझ्या नाट्य रंगभूमी चित्रपट क्षेत्रातील याच्या माझ्या कारकिर्दीतली आजवरची साक्षीदार तेव्हा माझी अर्धांगिनी झाली. नाट्य प्रवास सुरू असताना मी विवाहबद्ध झालो. त्यादरम्यान सोलापुरातील सगळ्या रंगकर्मींनी आम्हाला प्रचंड मदत केली, दिग्दर्शक, प्रकाशयोजनाकार रवी मालपुरी, आनंद खरबस सर, डॉ. राजीव मोहोळकर असंख्य जणांची साथ लाभली, जी आजवर लाभत आहे. सोलापुरात राहून रंगमंचाची सेवा करत असतानाच एके दिवशी श्री गुरु बठारे यांनी 'सही रे सही' या नाटकाचे दिग्दर्शक श्री केदार शिंदे यांच्याबरोबर हुतात्मा स्मृती मंदिरच्या मागील आवारात मुक्त चर्चेचा कार्यक्रम आयोजित केला होता. त्यादरम्यान मी मनात ठरवत होतो की, आपण पूर्णवेळ अभिनय करण्यासाठी मुंबईला जावं पण अभिनयाचे काम मिळेल का ? आपलं कोणीच ओळखीचं नाही, असे अनेक प्रश्न मला पडत होते आणि नटेश्वराच्या कृपेने अभिनयाच्या कारकीर्दीतली माझी एक छोटीशी फाईल म्हणजे पेपर कटिंग बातम्या अशी तयार केली होती. माननीय दिग्दर्शक श्री केदार शिंदे यांच्याबरोबर चर्चा करीत असताना मी माझी फाईल त्यांना दाखवली आणि त्यांना प्रश्न विचारला की मी मुंबईला अभिनय करण्यासाठी येऊ शकतो का ? आणि मी त्यांना एक प्रामाणिकपणे प्रश्न विचारला मी म्हणालो मी असा उंच जाड. मला अभिनयाचे काम मिळेल का ? श्री केदार शिंदे यांनी जे उत्तर दिलं ते माझ्या मनात कोरून राहिलं. केदार सर म्हणाले ''हे तू कोण ठरवणार ?'' हे रसिक मायबाप ठरवतील, 'तू ये. तू' अभिनय करून दाखव, तो आवडला की, रसिक प्रेक्षक तुला डोक्यावर घेतील. मग मी मुंबईला स्थायिक होण्याचा निर्णय घेतला. मुंबईत आल्यानंतर पहिले तीन महिने मी फक्त शिवाजी मंदिरच्या दारात उभे राहायचो. कोणीतरी म्हणेल की, तू नाटकात काम कर. तोस का ? चल आमच्या नाटकात काम कर पण असं झालं नाही. केदार शिंदे सर यांनी मला त्यांचा मोबाईल नंबर दिला होता आणि म्हणाले होते की, तीन महिन्यानंतर मला फोन कर. तसा तगादा मी त्यांच्याजवळ लावला कारण, मुंबईत माझं असं परिचयाचं कुणीच नव्हतं

म्हणतात ना, एक गॉड फादर लागतो. तसा गॉडफादर मला श्री केदार शिंदे यांच्या स्वरूपात आजवर मिळाला. मला त्यांनी सुयोगच्या ऑफिस वर बोलवलं. मी आत मध्ये गेलो आणि थक्क झालो. कारण माझ्यासमोर सुपरस्टार अंकुश चौधरी आणि सुपरस्टार भरत जाधव होते. त्यावेळी श्री केदार शिंदे यांनी सांगितलं कसं आहे माझं कास्टिंग सूट होतंय का हा ? मला काहीच समजेना. अंकुश चौधरी आणि भरत जाधव यांनी माना डोलवत मला खालीवर न्याहाळलं आणि मला म्हणाले करशील ना रे अभिनय? यावर मी अगदी ठामपणे हो, का नाही ? असं उत्तर दिलं अशा प्रकारे मला माझ्या आयुष्यातला पहिला मेन व्हिलनच्या भूमिकेचा चित्रपट 'जत्रा' 'याला गाड त्याला गाड' मिळाला. ज्याच्यामध्ये मी राजू व्हिलन ही भूमिका साकारली.

त्यावेळी मी लग्न बंधनात अडकलेलो होतो. अश्विनी आणि मी आम्ही दोघेही मुंबईत स्ट्रगल करायचो. पथनाट्यात काम करायचो, त्यावेळेस अश्विनी 'शंभूराजे' या व्यावसायिक नाटकामध्ये 'सईबाई' ची भूमिका करत होती. मुंबईत आल्यानंतर एक गोष्ट मात्र नक्की शिकलो. जोवर आपण आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवत नाही तोवर तुम्हाला एका कामातून दुसरे काम मिळत नाही. माझी आई, बाबा, सासू, सासरे, आणि सोलापुरातील तमाम रंगकर्मी यांच्या सहवासातून यांच्या अनुभवातून ही पोतडी माझ्याकडे भरलेली होती आणि त्यामुळेच मी हळूहळू हिंदी मालिका आणि चित्रपट क्षेत्राकडे वळालो त्यावेळेस 'येस बॉस' 'चुपके चुपके' 'आज के श्रीमान' 'श्रीमती' 'मनी बेन डॉट कॉम' 'तारक मेहता का उल्टा चश्मा' पासून आज च्या 'भाभी जी घर पर है', चाचा जी छत पर है, 'वागले कि दुनिया' अशा अनेक नामवंत हिंदी मालिकेतून मला छान छान भूमिका करायला मिळाल्या, त्याचबरोबर राम गोपाल वर्मा यांचा डिपार्टमेंट चित्रपट, आशुतोष गोवारीकर यांचा 'पानिपत' चित्रपट ! ज्यात मला अभिनय करायला मिळाला अल्फा टिव्ही, मराठी झी, मराठी ई टीव्ही, साम टिव्ही,स्टार प्रवाह, कलर्स मराठी अश्या अनेक चॅनल वर वेगवेगळ्या मालिकेत अनेक भूमिका साकारायला मिळाल्या. त्याचबरोबर अनेक हिंदी मराठी चित्रपटात सुद्धा भूमिका साकारायला मिळाल्या. हे सुरु असताना नाटक रंगभूमी सोडली नाही. 'गेला उडत' हे पहिले व्यावसायिक नाटक 'दहा बाय दहा, वाकडी तिकडी', 'सफरचंद' अशी व्यावसायिक नाटकं केली. करत आहे. 'मराठी बाणा' फेम श्री अशोक हांडे सरांच्या चौरंग संस्थेच्या कार्यक्रमात सहभाग असतोच !

सध्या सुरु असलेली मालिका कलर्स मराठी वरील जय जय स्वामी समर्थ.

■■

## स्मृतिचित्र



नाट्य परिषदेच्या निमित्ताने सोलापुरात अभिनेत्री दुर्गा खोटे आल्या होत्या तेव्हाचे दुर्मिळ छायाचित्र
डावीकडून बसलेले- मिनाक्षी (ब्रह्मचारी फेम), श्रीमती दुर्गा खोटे, तत्कालिन कलेक्टर श्री. सप्रे, बाळासाहेब भागवत, श्री. रतिलाल गांधी, शंकरराव भागवत, भाषण करणारे, - पार्श्वनाथ आळतेकर
भागवत चित्र मंदिर- स्टेजवर घेतलेले छायचित्र

**सौजन्य - सिध्दरंग ८८ वे नाट्यसंमेलन**

# रंगभूमीचे पैलू

- किरण येले
- अभिजीत झुंजारराव
- विद्यासागर अध्यापक
- प्रशांत देशपांडे
- तुषार भद्रे
- संपदा कुलकर्णी
- प्रा. अमोल देशमुख
- जगन्नाथ हुक्केरी
- रोशन नंदवंश
- आशुतोष नाटकर
- डॉ. मीरा शेंडगे

# नाटक म्हणजे प्रयोग...!

– किरण येले

कोणत्याही संस्थेची वा कार्यक्रमाची शंभर वर्षे पूर्ण होणं, ही निश्चितच अभिमानास्पद बाब आहे. आणि मराठी रंगभूमीच्या नाट्यसंमेलनाचे हे शंभरावे वर्ष आहे ही आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे. शंभर वर्षे म्हणजे दहा दशकं. दहा दशकांत किती रंगकर्मींनी आपले संसार या रंगभूमीसाठी पणाला लावले, हा विचार मला या शतकपूर्तीसमयी येतो आणि माझी मान आदरानं खाली झुकते. मला प्रचंड लाजिरवाणेही वाटतं. या रंगभूमीसाठी किती जणांनी सिनेमा नाकारला, कितीतरी जणांनी व्यवसाय नाकारला आणि एखाद्या व्रतस्थ ऋषिप्रमाणे एकांतात ध्यानधारणा करत रहावी, तसे अनेकजण फक्त रंगसाधना करीत राहिले. अशा रंगऋषींची आज आठवण करण्याचा हा दिवस आहे. त्या प्रत्येकासाठी एक पणती उजळण्याचा आज दिवस आहे. त्यांनी वाहून घेतले म्हणून मराठी रंगभूमीची नावं इतकी वर्षे लाटांवर प्रवास करीत राहिली. त्यांनी जर योगदान दिले नसते तर आज इतर भाषिक रंगभूमीसारखी आज मराठी रंगभूमीची स्थिती झाली असती.

भरतमुनींच्या 'नाट्यशास्त्र' ग्रंथात नाट्य हा 'पाचवा वेद' असल्याचे मानले आहे. नाट्यशास्त्रात नाट्यवेदाच्या रचनेबाबत एक कथा सापडते, की, सत्ययुगानंतर सगळं जग अनियंत्रित झालं होतं आणि ब्रह्मांड नियंत्रित कसं करावं, हा प्रश्न सगळ्या देवांना पडला होता. त्यावेळी भगवान इंद्र आदी इतर देवता ब्रह्माकडे पोहोचले आणि पाचवा वेद बनविण्याची विनंती त्यांना केली. ते म्हणाले, तो वेद फक्त लिखित नसावा तर लोकांना तो वेद पाहता यावा, ऐकता यावा विनासायास. आणि त्यानंतर भगवान ब्रह्माने पाचवा वेद म्हणून नाट्याशास्त्राची रचना केली. त्यांनी या पाचव्या वेदात यजुर्वेदातील अभिनय घेतला. ऋग्वेदातील लिपी म्हणजे कथानक घेतले, सामवेदातील संगीत घेतले आणि अथर्ववेदातील भाव आणि भावना घेतल्या. यजुर्वेद, ऋग्वेद, सामवेद आणि अथर्ववेदाचा अर्थ मुळात युजर म्हणजे स्थिती, ऋग म्हणजे रुपांतरण, साम म्हणजे वेग, आणि अथर्व म्हणजे अर्थ असा आहे. त्यामुळे या चार वेदांतील स्थिती, रुपांतरण, वेग आणि अर्थ या चारही तत्वांचे मिश्रण नाट्यवेदात आहे. भगवान ब्रम्हा यांनी भरमुनींना नाट्यवेदाचे प्रशिक्षण दिले. त्यांनी हा वेद ७०० विद्यार्थ्यांना शिकवला आणि भगवान ब्रह्माच्या उपस्थितीत नाट्य प्रस्तूत केले. ब्रम्हानो भरतमुनीना कौशिकी वृत्ती (अभिव्यक्ती, स्वर, भावना, कोमलता यांचा परिचय देण्यास सांगितल्यावर भरतमुनींनी हे शास्त्र अप्सरांना शिकविले. या रचनेचा उद्देश्य जनतेला मनोरंजनाच्या माध्यमातून नैतिकता शिकविणे आणि समकालीन प्रश्नांवर भाष्य करणे हा होता.

आता या कथेतील काही बाबींची आपण लक्षपूर्वक नोंद करायला हवी आणि त्यावर विचार करायला हवा. या वेदाची निर्मिती झाली ते सत्ययुग सरल्यावर जो गोंधळ आणि अराजक माजले होते, त्यावर उपाय म्हणून.

आज नाटकाकडे आपण काय म्हणून पाहतो, प्रेक्षक काय पाहतो ? आज मराठी नाटक कोणते विषय सादर करीत आहे. तो विषय कोणता आणि कोणत्या पद्धतीने सादर केला जात आहे. काही गंभीर विषय तर लोकांना डोक्याला ताप नको, म्हणून विनोदी पद्धतीने सादर केले जातात. नशिब म्हणजे ऐतिहासिक नाटके, विनोदी पद्धतीने सादर केली जात नाहीत. यावर काहीजण म्हणतील की, गंभीर नाटकांना प्रेक्षक मिळत नाही तर यावर उत्तर म्हणजे चंद्रमोहन कुलकर्णीनी महेश एलकुंचवारांची सादर केलेली नाट्यत्रयी आहे. देवबाभळी हे आणखी एक उदाहरण! विनोदी नाटक करण्यास काहीच हरकत नाही, नसावी परंतु लोकानुनयासाठी गंभीर विषय विनोदी पद्धतीने सादर करताना त्यात ८० टक्के विनोद आणि २० टक्के विषय असे परिमाण येते ते घातक आहे. आज नाट्यसंमेलनाची शंभर वर्षे पूर्ण होत असताना काही बाबींवर आपण गंभीरपणे विचार केला नाही तर मराठी नाटकाची शंभरी भरेल, हे निश्चित! नाटकाला प्रोत्साहन आणि गती मिळावी म्हणून गेली अनेक वर्षे महाराष्ट्र राज्य, दरवर्षी नाट्यस्पर्धा भरवते ही स्पर्धा दोन पातळीवर असते. १. हौशी नाट्य स्पर्धा आणि २. व्यावसायिक नाट्य स्पर्धा. मला पहिल्यांदा या स्पर्धेसाठी 'तुझे नाटक करायचे' म्हणून कुणीतरी विचारलं तेव्हा मनात आलं की, मी हौशी नाटककार आहे का? मी जे पहिलं नाटक लिहिलं ते हौस म्हणून लिहिलं का? (त्या नाटकाला राज्य स्पर्धेत उत्कृष्ट संहिताचा पुरस्कार मिळाला. परिक्षक होते कमलाकर नाडकर्णी.) नाटक सआदत हसन मंटोच्या खोल दो आणि टेबा टेकसिंह या दोन कथांवर आधारित होतं. मुळात मंटो हा गंभीरहून अधिक गंभीर कथाकार. त्याची टोबा टेकसिंह कथा वाचून मी वेडा झालो होतो. ती कथा वेड्यांच्या इस्पितळात घडते. म्हणून मी वेड्यांच्या इस्पितळात जाऊन बसत होतो. त्यातून ते नाटक आलं होतं. (मी वेड्यांच्या इस्पितळात हौस

म्हणून जात होतो का?) मुळात मला या रंगभूमीला, स्पर्धेला हौशी नाट्यस्पर्धा म्हणणे म्हणजे अपमान वाटतो. कारण, इथे काम करणारे ८० टक्के रंगकर्मी निष्ठेने आणि गंभीरपणे काम करत असतात. रात्रंदिवस एक करुन मेहनत करत असतात. या हौशीरंगभूमीनेच व्यावसायिक रंगभूमीला अनेक व्यावसायिक कलाकार दिलेले आहेत. अनेक सिनेकलाकार दिले आहेत. अनेक दिग्दर्शक, कॅमेरामन आणि इतर विभागातले कलाकार दिले आहेत.

आज महाराष्ट्र राज्य हौशी नाट्य स्पर्धेतील नाटकांचा स्तर खालावला आहे, अशी चर्चा चालू आहे. हे जर खरं असेल तर याची कारणे आपण शोधायला हवीत, असे मला वाटते. मराठी रंगभूमी टिकून आहे ती राज्य हौशी नाट्य स्पर्धेमुळे आणि अविष्कार, मिनिचार सारख्या अनेक संस्थांमुळे. अनेक कच्चे आणि नवे कलाकार त्यांची कोरी पाटी घेऊन या ठिकाणी येतात आणि स्वतःची वाट चोखाळू लागतात. आज फक्त मराठी व्यावसायिक रंगभूमीच नाही तर हिंदी मराठी मालिका, चित्रपटाला या रंगभूमीने घडवलेले कलाकार दिले आहेत. आज हौशी नाट्य स्पर्धेतील नाटकेच रटाळ झाली असतील तर ही मराठी रंगभूमीसाठी धोक्याची तिसरी घंटा आहे. ही नाटके रटाळ होण्यामागे एक कारण असेही आहे की, वर्षानुवर्षे या स्पर्धेचा फॉर्मेट तोच आहे. भाकरी परतली नाही तर ती करपते, घोडा फिरवला नाही तर तो अडतो त्याप्रमाणे वर्षोनवर्षे या स्पर्धेची रचना न बदलल्याने ही स्थिती झाली आहे का यावर विचार व्हायला हवा.

आज शंभराव्या नाट्य संमेलनाच्या निमित्ताने नाटकाला नवी गती मिळावी, यासाठी विचार व्हायला हवा. आज महाराष्ट्रात आठ जिल्ह्यात नाट्यसमेलन होत आहे, याचा आनंद साजरा करताना हा विचार येतो की, महाराष्ट्रात २३ जिल्हे असताना फक्त आठच जिल्ह्यात नाट्य संमेलनाचे शतक का साजरे केले जात आहे? त्या जिल्ह्यात समर्थ नाट्यसंस्था नाहीत, असा घ्यावा का? त्या जिल्ह्यात नाट्यकलाकार नाहीत, असा घ्यावा की, नाट्यरसिक नाहीत, रंगमंच नाहीत, असा घ्यावा? यातील एक वा सगळी कारणे असली तर याला जबाबदार कोण आहे? आपण गेली १०० वर्षे या जिल्ह्यात नाटक पोहोचविण्यासाठी काय केलं याचा विचार होणे गरजेचे आहे. आणि इतकी वर्षे काहीच केले नसेल तर आता तरी आपल्या विचारात वर्षभर नाटक रुजवण्याची एखादी योजना आहे का? ज्या जिल्ह्यात नाटक नाही तिथेच नाटक पोहोचविणे, तिथली जमीन हिरवीगार करणे हे आपले लक्ष्य आहे का? त्यासाठी काही योजना आहेत का? जो प्रदेश दुष्काळी आहे तो हिरवागार करण्याचे आपले प्रयत्न असतात. हे जिल्हे जिथे नाटक रुजले नाही तिथे रुजवण्यासाठी आपण या शंभराव्या नाट्य संमेलनाच्या निमित्ताने प्रयत्न करायला हवेत आणि हे प्रयत्न म्हणजे नुसतं एकांकिका स्पर्धा, दोन अंकी स्पर्धा आयोजन नसावे. वृक्षारोपण ही सर्वात सोपी गोष्ट आहे. कठीण आहे ते, रोपण केल्यानंतर ते झाड जगवण्याची आणि वाढविण्याची जबाबदारी घेणे. लावलेल्या रोपाला वेळोवेळी खतपाणी घालण्याची योजना असेल तरच ते झाड जगेल आणि वाढेल.

नाटक म्हणजे तुमच्या जगण्याचा एक अंश. त्यात तुमच्या जगण्याचे प्रतिबिंब पडलेल असते. समाजाच्या चांगल्या वाईट बाबींचे त्यात प्रतिबिंब असते. त्यावर भाष्य असते. नाटक समाज सुधारणेचे काम करते म्हणून भरतमुनींनी त्याला पाचवा वेद म्हटले आहे. पण अनेकांना चार वेद माहित असले तरी, त्यात नेमके काय लिहिले आहे, हे फारसे कुणाला माहित नाही मात्र नाटक काय आहे ? हे मराठी मातीत सगळ्यांना माहित आहे. मात्र ते अनेक गावात पोहोचले नाही. आणि ते पोहोचणे गरजेचे आहे कारण ते समाजसुधारणेचे एक महत्त्वाचे कारण आहे. चित्रपट आणि नाटक यात फरक काय असेल तर नाटक हे तुमच्या जगण्याचे जवळून चित्रण करते. नाटक हे वास्तव असते. आणि चित्रपट हे अधिकांश स्वप्न असते. जे तुम्ही वास्तवात जगू शकत नाही ते तुम्ही चित्रपट पाहताना जगू शकता. मात्र, नाटक हे तुम्हाला स्वप्नातून बाहेर आणून वास्तवाच्या ऐरणीवर उभे करते आणि डोळस बनवते. नाटक समोर जिवंत चालू असते त्यामुळे त्यातले विचार तुम्हाला जिवंत वाटतात. म्हणून नाटक जास्त पोहोचते. जास्त पोहोचते म्हणजे थेट हृदयाला भिडते. म्हणूनच मराठी रंगभूमीवरील अनेक नाटके पाहणारे अमराठी जन आपण पाहतो. पण मग इतके जास्त पोहोचणारे नाटक आपण गावात का पोहोचवू शकलो नाही? याचा विचार व्हायला हवा.

गावात थिएटर नाहीत, असे आपण म्हणू शकतो पण त्याला पर्याय म्हणून आपण काही विचार केला आहे का? आज अनेक भागात नाट्यगृह नाहीत पण नाट्यगृह नसतील तर खुल्या रंगमंचचा प्रयोग आपण करू शकतो का? आज अनेक शोध विज्ञानात लागत आहे. फोल्डिंगचे घर आज असू शकते तर फोल्डिंगचे बंदिस्त नाट्यगृह असू शकणार नाही का? किंवा आज ईंटिमेट थिएटर जर शहरात असू शकते तर ते गावात असू शकणार नाही का? ग्रामीण भागात प्रेक्षक कलेचा भुकेला आहे, ही बाब मी अनेक वेळा अनुभवली आहे. कवितेसारख्या कार्यक्रमाला गावागावातून जिल्ह्याच्या ठिकाणी हजारोंच्या संख्येने लोक येतात आणि रात्रभर कविता ऐकत बसतात, हे मी स्वतः अनुभवलेले आहे. पण त्या लोकांच्या मोकळ्या वेळेचा आणि सोयीच्या ठिकाणांचा अभ्यास करून आपण एखाद्या जिल्ह्याच्या ठिकाणी नाट्यमहोत्सवी आखणीचा प्रयोग करून पाहायला

काय हरकत आहे? आज झाडीपट्टीत जे प्रयोग होत असतात. त्याचा अभ्यास करून त्या धर्तीवर इतर जिल्ह्यात असे प्रयोग करू शकतो का, याची पडताळणी आपण का करत नाही? तिथे प्रयोग का करत नाही? शेतीची कामे कधी संपतात, शेतकऱ्यांच्या हातात पीक विकून कधी पैसे येतात त्यांच्या लग्नसराई, व इतर समारंभाचा कालावधी काय असतो याचा अभ्यास करून गावात नाट्यमहोत्सव भरवण्याचा प्रयोग आपण करून पाहायला हवा.

मुळात नाटक म्हणजे प्रयोग पण आपण तेच विसरलो आहोत. आपण प्रयोग करून पाहत नाही असे मला वाटते. यामागे आर्थिक गणिते आहेत आणि त्याला आक्षेप नाही परंतु, जिल्ह्याच्या ठिकाणी सक्षम नाट्य संस्था उभारणे आणि त्या संस्थेमार्फत वर्षभर अनेक प्रशिक्षण शिबिरे, चर्चासत्र, नाट्यपरिचय असे आर्थिक बोजा न देणारे पण ठोस कार्यक्रम राबवणे हे आपण करू शकतो, असे मला वाटते.

नाट्य संमेलनानंतर आपण काय करणार आहोत? याचा विचार आपण करायला हवा. आता आपण शतकी खेळी केली आहे. आता या खेळीनंतर आपण अधिक धुवांधार काम करायला हवे. अखिल भारतीय नाट्य परिषदेवर आता मोठी जबाबदारी आहे. आणि ती जबाबदारी ते पूर्ण पाडतील, याबाबत मला खात्री वाटते.

महाराष्ट्रात जितके जिल्हे आहेत त्यांना वर्षभर त्या जिल्हयातून  नाट्यकर्मी तयार करण्याचा, नाट्यरसिक तयार करण्याचा ठोस कार्यक्रम आखल्यास पुढील काही वर्षात ग्रामीण भागातला हा नाट्यदुष्काळ सरेल याविषयी माझी खात्री आहे.

नाट्यपरिषदेने सरकारलाही काही विनंत्या करणे गरजेचे आहे. आज काळा घोडा फेस्टिवल शहरात होत असतो. हा फेस्टिवल म्हणजे श्रीमंतांनी श्रीमंत वस्तीत श्रीमंतसाठी केलेला श्रीमंत खेळ असे मी मानतो. या फेस्टिवल मध्ये तुम्ही गेलात तर तिथे साधी रस्त्यावर पाणीपुरी एंशी ते शंभर रुपये मोजावे लागतील. पण या फेस्टिवलमध्ये सादर झालेली कला निश्चितच उच्च दर्जाची असते. माझे दुःख हे आहे की असे फेस्टिवल जिल्ह्याच्या जत्रेच्या दिवसात आपण का भरवत नाही. त्यातून आर्थिक मिळकत होणार नाही हे कारण यामागे असू शकेल पण ज्यांना कला गावात पोहोचावी असे वाटत असेल असे चित्रकार, शिल्पकार, नाट्यकर्मी, कवि, लेखक, असे सगळे मिळून असा फेस्टिवल आखू शकतात. आणि तसे झाले तर गावागावातून तो पाहायला रसिक येतील. त्यातून पुढे अनेक कलाकार घडतील.

आज नाट्यप्रशिक्षण देणाऱ्या संस्था शहरातच कमी आहेत तिथे ग्रामीण भागात काय अपेक्षा करणार. तर महाराष्ट्रभर या प्रशिक्षण देणाऱ्या संस्था व्हाव्यात अशी योजना आपण आखायला हवी.

तुम्ही सारे विचारवंत आहात. आणि माझी खात्री आहे की सर्वांनी एकत्र येऊन विचार केल्यास या शतकपूर्ती सोहळ्यानंतर अपाण पुढील किमान दहा वर्षाची आखणी अशी करता येईल की आपले मराठी नाटक अनेक योजने पुढे गेलेले असेल.

पुन्हा एकदा मराठी रंगभूमिस आणि रंगकलाकारास शुभेच्छा.

■■

# स्पर्धेच्या नाटकांचं होतं काय ?

– अभिजित झुंजारराव

मोठ्या दिमाखात गेली ६२ वर्ष महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जडणघडणीत मोलाचा वाटा असणाऱ्या, अनेक नामवंत रंगकर्मी व्यावसायिक रंगभूमी आणि सिनेसृष्टीला देणाऱ्या या स्पर्धेला सर्व प्रथम कुर्निसात! ६२ व्या महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेचं बिगुल वाजून प्राथमिक फेरीचे निकाल हाती यायला सुरवात झालीये.

आकडेवारीचा विचार करता महाराष्ट्रातल्या २७ जिल्ह्यांमधून आणि मध्य प्रदेशातून सरासरी अशा एकूण २००-३०० संस्था यात सहभागी होत असतात. साधारणपणे साडेचार ते पाच हजार रंगकर्मी या निमित्ताने या नोव्हेंबर पासून ते अंतिम फेरी संपेपर्यंत, म्हणजे येत्या मार्च पर्यंत यानं त्या नात्यानं नं चुकता राज्य नाट्य स्पर्धेशी जोडले जातात. सांस्कृतिक घुसळण या निमित्ताने रसिक प्रेक्षकांना अनुभवता येते हे निश्चित. मागील कित्येक वर्षांचा इतिहास पाहता या दरवर्षी वारी प्रमाणे आपलं वेगळेपण, आपला ठसा ही स्पर्धा उमटवत असते हे निश्चित. गावोगावचे रंगकर्मी जोडले जाणं, विचारांचं आदानप्रदान होणं, वेगळे विषय-आशय हाताळले जाणं, चर्चा वादविवाद झडणं, नाट्यगृहाच्या कट्ट्यावर वाफाळत्या चहा सोबत सादर झालेल्या नाटकाची चिरफाड होऊन समीक्षा केली जाणं. निकालानंतर स्वयंघोषित समीक्षकांनी आपलाच निकाल कसा बरोबर होता याकरता

आपलीच पाठ थोपटऊन घेणं तर ज्यांचा निकाल चुकला ते पुढील वर्षी होणाऱ्या राज्य नाट्य स्पर्धेची वाट पाहणं. गावोगावी हे चित्र दर नोव्हेंबर महिन्यात पाहायला अनुभवयला मिळत असतं.

असं काय गरुड आहे या स्पर्धेचं? खरतरं कोणत्याही स्पर्धेसारखीच ही स्पर्धा पण तरीही इतकी वर्ष स्वतःचं अढळ स्थान निर्माण करण्यात ती यशस्वी ठरली. गल्लोगल्ली एकांकिका स्पर्धांचं,मोठमोठ्याल्या संस्थांचे प्रायोजकत्व असलेल्या नाट्य स्पर्धांच्या भाऊगर्दीत राज्य नाट्य स्पर्धा मात्र नेहमीच रंगकर्मींच्या आस्थेचा विषय ठरलीये आणि हेच या स्पर्धेचं अधोरेखित करणारं वेगळेपण आहे. ज्या मंडळींचा तसा थेट संबंध या सांस्कृतिक उहापोहाशी नाही ती मंडळी देखील राज्य नाट्य स्पर्धेचा निकाल काय लागला, कोणत्या नाटकांनी बाजी मारली, यात रस घेताना दिसतात. कोणत्याही नाट्य स्पर्धांबद्दल बोलायचं झालं की, सर्व प्रथम नजरेसमोर येतो तो तरुण वर्ग, त्यांचा उत्साह, त्यांची सळसळती एनर्जी. पण, राज्य नाट्य स्पर्धांमध्ये हे चित्र नेमकं वेगळं दिसतं यात तरुणांबरोबर किंबहुना त्या पेक्षा अधिक उत्साहात प्रौढांचा सहभाग असतो त्यामुळे राज्य नाट्य स्पर्धा ही समष्टीची होते. तसं पाहायला गेलं तर नाट्यक्षेत्र हे पुण्या मुंबईतल्या लोकांचं खूळ किंवा नाटक तिथेच खेळलं जातं अशी सर्वसाधारण भावना मनात असते पण या सगळ्याचे मापदंड राज्य नाट्य स्पर्धेने मोडून टाकले. गावोगावी नाटकाची बीजं रुजवण्यात राज्य नाट्य स्पर्धेचा मोलाचा वाटा आहे. त्या शिवाय मालवण, चिपळूण, वेंगुर्ला अशी स्पर्धेची केंद्र वाढली नसती. मुंबई, ठाणे, पुण्यानंतर जळगाव सारख्या जिल्ह्याचा प्रवेश अर्जात चौथा क्रमांक लागतो हे कौतुकास्पद आहे. पण महाराष्ट्रातील सगळेच जिल्हे या यादीत तितकेसे सक्रिय दिसत नाहीत, हेही विचारात घ्यायला हवंय. उदाहरणचं द्यायचं झालं तर गडचिरोली, गोंदिया आणि भंडारा या पूर्व विदर्भातील जिल्ह्यांमधून प्रवेश अर्ज दाखल झालेले कमी वेळा पहायला मिळतात. नंदूरबार, धुळे, जालना, परभणी इथूनसुद्धा सहभाग कमी आहे आणि ही देखील तितकीच खेदाची आणि चिंतेची बाब आहे आणि याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. अर्थात सांस्कृतिक कार्य संचालनालय यावर योग्य तो मार्ग काढेलच पण रंगकर्मींनी देखील उत्स्फूर्त असा प्रतिसाद नोंदवला पाहिजे.

अश्या काही गोष्टी ज्या या स्पर्धेला मारक ठरतायत, पुन्हा मागे घेऊन जातायत त्या या निमित्तानं चर्चेत याव्यात, म्हणून हा उहापोह. सर्वसाधारणपणे स्पर्धा म्हटलं की, हार जीत आलीच. बरं स्पर्धा हेल्दी असावी, कोणताही आकस नं राहता दुसऱ्याच्या चांगल्या कामाचं कौतुक व्हावं त्याला दाद मिळावी आणि केलेल्या कामाचं चीज पारितोषिकाच्या रुपानं व्हावं हीच इच्छा कोणत्याही रंगकर्मीची असते आणि ती असणं काही चूक नाही. पण एक गोष्ट तितकीच महत्वाची आहे की निव्वळ स्पर्धेत यश मिळवण्याकरता नाटक सादर करण हे टाळलं तर, मराठी रंगभूमी आणखी पुढे जाईल. Result oriented नं रहाता काम करत राहावला हवं, सृजनाची प्रक्रिया यातूनच जन्माला येते. रंगकर्मी मित्रांनी यावर जरूर विचार करायला हवा.

आज मितीला राज्य नाट्य स्पर्धेला थोडी मरगळ आलीये, अनेक नावाजलेल्या संस्थांचा, कलाकारांचा, तंत्रज्ञानांचा स्पर्धेतला सहभाग कमी व्हायला लागलाय. अर्थात तो कमी का आहे ? यावर अनेक मत मतांतरं आहेत. मात्र, सद्य परिस्थिती ही अशी आहे, आणि ती बदलणं गरजेचं आहे तरंच गुणात्मक आणि सृजनात्मकदृष्ट्या स्पर्धा मोठी होईल. पर्यायानं, मराठी नाटक आपल्या शक्यता ओलांडून नवीन मापदंड निर्माण करण्यात यशस्वी होईल. एवढंच काय, तर पारितोषिक वितरण समारंभाला देखील पारितोषिक प्राप्त व्यावसायिक कलाकारांची अनुपस्थिती हा देखील चर्चेचा विषय ठरतोय. मान्य की, ते त्यांच्या व्यस्त शेड्यूल मधून वेळ काढू शकत नाहीत पण थोडावेळ त्यांनी अश्या उपक्रमांना दिल्यास स्पर्धेत नवा उत्साह संचारेल नवे कलाकार रंगभूमीला मिळतील. मिळत आलेत हे नक्कीच! राज्य नाट्य स्पर्धेला व्यावसायिक रंगभूमीची प्रयोगशाळा म्हंटलं गेलंय ते काही खोटं नाही.

महाराष्ट्रातल्या कानाकोपऱ्यातून एवढ्या मोठ्या प्रमाणात नाटकं सादर होतात. आपण ज्या भूमीचं, ज्या विभागाचं प्रतिनिधित्व करतोय त्या मातीतलं नाटकं लोकांपर्यंत जावं. मातीतून साकार झालेल्या कलाकृतीत एक सच्चेपणा अस्सलपणा असतोच असतो आणि तो पाहणाऱ्यालाही भुरळ घालून जातो. मुंबई पुण्याच्या नाटकांच्या अनुकरणाचा मार्ग बऱ्याचदा अवलंबला जातो मग तीच ती स्पर्धेची गणितं आणि हमखास बक्षिसाची हमी या चक्रात आपण भरडले जातो आणि या सगळ्यात व्यक्त व्हायचं राहूनच जातं. जोवर व्यक्त होण्याची गरज भासतीये तोवर नाटक किंवा कोणत्याही कलाप्रकाराला मरण नाही.

देश विदेशातले नाट्य प्रयोग या रंगकर्मींना पहाता यावेत तिथल्या हवे तंगभूमीवर सध्या नवं काय चाललंय ते आपल्या रंगकर्मींना पहाता यावेत या करता शासकीय यंत्रणेने पुढाकार घेऊन योग्य ती कृती करायला हवी जेणेकरून अधिकाधिक सक्षम नाट्य प्रयोग आपल्याला या स्पर्धेच्या निमित्ताने पहाता येतील. जुनी पारंपरिक नाटकं तोच जुना फॉर्म जुनी हाताळणी या पलीकडे नवी रंगभाषा जन्माला आली पाहिजे. अर्थात स्पर्धेची गणितं सोडून पारितोषिकाची आस नं धरता असे वेगळे प्रयोग करणं तसं धाडसाचं आहे पण असं धाडस दाखवण्याची वेळ आलीये. तरच राज्य नाट्य स्पर्धेनं कात टाकली, असं आपण म्हणू शकतो. आणि त्याकरता जाणकार परीक्षकांनी देखील अश्या वेगळ्या प्रयोगांना प्रोत्साहन देण्याची गरज आहे त्याकरता आपापसातील हेवेदावे विसरून, जुने नवे विचार एकत्र यायला हवेत संक्रमणाची गरज वेळोवेळी भासतच असते, आपल्या सगळ्यांनी जर पुढाकार घेतला तर हे सहज शक्य आहे. शासन यंत्रणेनं परीक्षक निवडीकडे गांभीर्यानं लक्ष दिलं पाहिजे. २८८ नाटकं या स्पर्धेत सादर होतात. त्यातली २२ – २३ अंतिम फेरी करता निवडली जातात. स्पर्धेच्या दोन ते तीन महिन्यांच्या कालावधीपुरती ही नाटकं चर्चेत राहतात. पुढे या नाटकांचं काय होतं? इतकी अल्पजीवी का राहतात ही नाटकं? या वर देखील विचार करायला हवा. त्यांना व्यासपीठ कसं उपलब्ध होईल याची काळजी राज्य शासना बरोबर गावागावातल्या रंगकर्मी मित्रांनी घ्यायला हवी, तरच राज्य नाट्य ही चळवळ म्हणून अधिक सक्षम ठरेल. नाही तर इतर स्पर्धां सारखी एक स्पर्धा एवढंच तिचं अस्तित्व! रंगकर्मी मित्रांमध्ये एकमेकांशी संवादाचा अभाव आढळतो तो संवाद व्हायला हवा, विचारांचं आदानप्रदान व्हायला हवं. बुजुर्गांनी नव्यांना समजून घेऊन वेळप्रसंगी कडक शब्दात तंबी द्यायला हवी. हौसेला मोल नसतं, हे खरंय पण पण लाख मोलाची महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धा ही परंपरा आपल्यालाच जपायला हवी. नाट्यगृहांची दुरावस्था, उपलब्ध तुटपुंजी साधनसामुग्री, तंत्रज्ञानाच्या बाबतीत असलेलं मागासलेपण, तालमीच्या जागेकरता करावी लागणारी मारामारी, प्रेक्षकांचा कमी होणारा सहभाग, मार्केटिंगचा अभाव, टीव्ही सिनेमाचा वाढता प्रभाव आणि सगळ्यात महत्वाचं म्हणजे खर्चाची आर्थिक गणितं या सगळ्यातून नाटक टिकून ठेवण्याची खूप मोठी जबाबदारी! या स्पर्धेच्या पर्यायानं तुम्हा आम्हा रंगकर्मींच्या शिरावर आहे. अनेक स्थित्यंतरं अनुभवलेली ही स्पर्धा टिकून राहिलंच. पण गुणात्मक आणि सृजनात्मक पातळीवर ती अधिकाधिक मोठी कशी होईल, हे मात्र आणि मात्र तुमच्या आमच्या हातात आहे रंगकर्मी मित्रांनो.

६२ वर्षांच्या या परंपरेतून आपल्याला नेमकं साध्य काय करायचं आहे? स्पर्धेत सादर होणारी ही सगळी नाटकं त्यांचं पुढे काय होतं? हा सर्वसाधारण प्रश्न आपण विचारातही घेत नाही आणि प्रथेप्रमाणे दरवर्षी या स्पर्धेमध्ये आपण भाग घेत असतो. नाटकाच्या आशयाबद्दल, विषय निवडीबद्दल आणि सादरीकरणाच्या शैली बद्दल आपण काही भरीव विचार करतोय का. जागतिक रंगभूमीवर, राष्ट्रीय रंगभूमीवर काय प्रकारची नाटकं सुरू आहेत याचा विचार आपण नाटक बसवत असताना कुठेही केलेला दिसत नाही. राज्य नाट्य स्पर्धेतली नाटकं बघत असताना आपल्याला तसं जाणवतही नाही. अर्थात हे पूर्णपणे वैयक्तिक मत आहे की कोणी काय करावं हा ज्याच्या त्याच्या व्यक्ती स्वातंत्र्याचा विषय आहे. ज्याने त्याने या गोष्टी ठरवायला हव्यात. पण एकूणच आशयाच्या बाबतीत आपण कमी पडतोय हे मात्र आपण लक्षात घेणे इष्ट आहे. बक्षीसं मिळतायत म्हणून आपण स्वतःभोवती काही कुंपणं आखून घेतली आहेत. चौकटी आखून घेतल्यात आणि वर्षानुवर्ष आपण त्या चौकटींमध्ये तल्लीन होऊन काम करतोय. बक्षिसांचा वर्षाव आपल्यावरती होत राहतो आणि त्यामुळे आपण करतोय तेच उत्तम नाटक आहे आणि बक्षीस मिळवणच त्याचा मापदंड असेल तर मग आपल्याला जे प्रयोग करून बघायचे आहेत त्यात आपण कमी पडतो आणि आपण त्याच त्याच प्रकारची नाटकं करतोय कारण त्याला बक्षीसं मिळतायत. गेल्यावर्षी एखादया केंद्रावरती नंबरात आलेलं नाटक आपण निवडतो आणि एकदम सेफ गेम खेळत राहतो आणि तशाच पद्धतीची नाटकं होत राहतात. यात एकूणच राज्य नाट्य स्पर्धेचा जो हेतू होता त्या हेतूपासून फारकत घेतल्यासारख आहे. आणि रंगकर्मी म्हणून आपण याच्यावर विचार करणं गरजेचं आहे. जो विचार होत असताना दिसत नाही आणि त्याच त्याच पद्धतीची साचेबद्ध सादरीकरण होत असतात आणि हे अत्यंत दुर्दैवी आहे. बरं आपण केलेले प्रयोग परीक्षण करण्याची कुवत असलेले परीक्षक समोर आहेत का? रंगकर्मी म्हणून ते किती update, सक्षम आहेत हाही मुद्दा फार महत्त्वाचा आहे. महिनोनमहिने चालू असणारी राज्य नाट्य स्पर्धा अशाच परीक्षकांचा विचार परीक्षक म्हणून करू शकते जे या स्पर्धेला वेळ देऊ शकतील. मग अशा वेळेला ज्यांच्याकडे

वेळ आहे अशीच मंडळी तिथे परीक्षक म्हणून बसतात आणि अभ्यासू आणि आत्ताच्या काळात क्रियाशील असलेले रंगकर्मी परीक्षक म्हणून उपलब्ध होऊ शकत नाहीत. असं माझं कुठेही म्हणणं नाहीये की महिनाभर वेळ देणारे रंगकर्मी किंवा परीक्षक हे त्या स्पर्धेला न्याय देऊ शकत नाहीत पण अपडेट राहण्याच्या विषयी मात्र ही मंडळी थोडीशी बॅकफुटला जाताना आपल्याला दिसतात. आणि त्या वेळेला आपल्याला लक्षात येतं की आपण केलेले जे प्रयोग आहेत ते प्रयोग पचवण्याची ताकद ह्या रंगकर्मींमध्ये नाहीय. मुळात इतरांच काही पाहिलेलंच नसल्यामुळे आणि जे काही पाहिलेलं असतं ते आपापल्या गावांमध्ये घडणारे राज्य नाट्य स्पर्धा एकांकिका स्पर्धा या परिपेक्षातलच असल्याने सगळाच गोंधळ उडतो आणि त्यामुळे आपल्याला चांगल्या परीक्षाकांपासून मुकावं लागतं. यावर उपाय म्हणून असा प्रयोग करून बघायला खरंतर सांस्कृतिक कार्य संचालनालयाला हरकत नसावी की एखाद वर्षी ही स्पर्धा पूर्व प्राथमिक फेरी, प्राथमिक फेरी आणि अंतिम फेरी अशा तीन टप्प्यांमध्ये जर घेऊन बघितली तर कदाचित चांगले परीक्षक जे वेळ देऊ शकतात जे अपडेटेड रंगकर्मी आहेत जे आता सध्याच्या घडीला अत्यंत तडफेने काहीतरी काम करू पाहतायत असे रंगकर्मी या स्पर्धेला परीक्षक म्हणून लाभतील आणि यातून सतत सकस नाट्यनिर्मितीच लोकांच्या पुढे जाईल आणि राज्य नाट्य स्पर्धेच्या निमित्ताने एक चांगला प्रेक्षक घडवण्याचं काम सुद्धा या निमित्ताने होईल. आज जो काही प्रेक्षकवर्ग या स्पर्धेला येतोय तो प्रेक्षकवर्ग केवळ आपल्या गावातील आपल्याच लोकांनी सादर केलेलं नाटक पहायला येतोय, त्यांचं कौतुक करण्याकरता येतोय ही निश्चितच आनंदाची गोष्ट आहे. त्याच्याबद्दल अजिबात दुमत नाहीये. पण आपल्या ओळखीच्या रंगकर्मी व्यतिरिक्त सुद्धा आपल्याला जर खऱ्या अर्थाने प्रेक्षक घडवायचा असेल तर आपल्याला जास्तीत जास्त प्रेक्षकांना या स्पर्धेच्या निमित्ताने जोडून घ्यावं लागेल अन्यथा ही स्पर्धा फक्त स्पर्धेच्या स्वरूपामध्ये मर्यादित राहील आणि अर्थात ज्यांना या स्पर्धेचे स्वरूप हे स्पर्धेपुरतंच ठेवायचे त्यांच्या करता काहीही म्हणणं नाहीये पण ज्यांना खरंच जेन्युनली काहीतरी स्वतःच म्हणणं मांडायचे त्यांच्याकरता हा सगळा उहापोह आहे. शासना कडून मिळणाऱ्या सगळ्या सोयी सुविधा, अनामत रक्कम, प्रवास खर्च, तिकीट विक्रीतील अर्धी रक्कम, आणि सगळ्यात महत्त्वाच म्हणजे अवाढव्य पारितोषिक रक्कम जर मिळणार नसेल तर किती रंगकर्मी यात सहभाग घेतील? एकदा हा प्रश्न स्वताला विचारून पाहू.

■■

# मराठी नाटक आशयकेंद्रीत होत आहे की तंत्रकेंद्रीत ?

– विद्यासागर आध्यपक

नाटक हा कलाप्रकार गेली अनेक शतके सुरु आहे. ह्या कलाप्रकाराने काळाच्या ओघात अनेक स्थित्यंतरे पाहिली आहेत. असेच नाटकाचा इतिहास वाचताना लक्षात येते. मराठी नाट्यसंमेलनाचे शंभरावे वर्ष साजरे करतानाच त्याबद्दलचा अभिमान आहेच पण त्याचबरोबर काही चिंतन करता येण्याजोगे विचार इथे मांडत आहे.

सध्या आपण तंत्रयुगात जगत आहोत. तंत्राचा आपल्या एकूणच मानवी जीवनावर प्रचंड मोठ्या प्रमाणात परिणाम होतांना दिसतो आहे. मोबाईल, टी.व्ही. इंटरनेट अशा निरनिराळ्या गॅझेट्सवर आता आपले जगणे अवलंबूनच झाल्यासारखे आहे. तंत्रज्ञानाचा जीवनातल्या सर्वच क्षेत्रात प्रभाव दिसायला सुरवात झाली आहे, तसाच तो नाटकांवरही दिसायला लागला आहे. तंत्रज्ञानाचा मानवी जीवनावर होणारा परिणाम हा विषय तसा मोठा आणि गुंतागुंतीचा आहे. मी फक्त त्यातला तंत्रज्ञान आणि नाटक अशा छोट्या घटकापुरेतच बोलतो.

तंत्राचा नेमका काय परिणाम आपल्यावर परिणाम होतो आहे ही गोष्ट मला नुकतीच एका नाटकाचे दिग्दर्शन करतांना आली. एक तरुण रंगकर्मी माझ्याबरोबर काम करत होता. एका प्रवेशात त्याला खूप भावनिक होऊन काही संवाद म्हणायचे होते. त्याला ते म्हणता येत नव्हते. पुरेसा परिणाम होत नसल्यामुळे मी परत परत त्याला समजावून सांगत होतो पण उपयोग होत नव्हता. शेवटी तो तरुण मला म्हणाला, ''सर माझ्या संवादांना जर पार्श्वसंगीत असेल तर मी भावनिक होऊन बोलू शकतो.'' त्यानं एक पार्श्वसंगीतही निवडून ठेवलं होतं. ते लावून त्यानं मला तो प्रवेश करुनही दाखवला. पार्श्वसंगीतामुळं त्यानं तो बऱ्यापैकी केला. मला मात्र तिथं पार्श्वसंगीत खटकत होते. मला प्रश्न पडला की, नटांना भावना व्यक्त करण्यासाठी पार्श्वसंगीतावर अवलंबून का रहावं लागतं आहे? तरुण रंगकर्मीमध्ये असे अनेकजण दिसतात. ज्यांना पार्श्वसंगीताशिवाय त्यांच्या भावना व्यक्तच करता येत नाहीत. एकांकिका स्पर्धांमध्ये तर हल्ली तीस मिनिटांच्या एकांकिकेला जवळ जवळ तीस मिनिटांचे म्युझिक असा प्रकार सुरु आहे. मला वाटते की, हा तंत्रज्ञानाचा आपल्या जगण्यावर होत असलेला परिणाम आहे. त्याच्यातून येतंय हे. विशिष्ट प्रकारे चेहऱ्यावर स्पॉट, विशिष्ट प्रकारचे पार्श्वसंगीत अशा बाह्य घटकांची गरज जर नटाला पडत असेल तर, ही स्थिती नक्कीच गंभीर आहे. अभिनयाच्या बाबतीत बऱ्याच तरुण रंगकर्मीमध्ये बरेच गैरसमज होतांना दिसत आहेत. नैसर्गिक अभिनय हा एक त्यामधलाच गैरसमज. नॅचरल ॲक्टिंग असे, मराठीमध्ये ह्याला म्हटले जाते. बऱ्याचदा हे नॅचरल ॲक्टिंगचे खूळ नटांना इरफान खान किंवा नवाजुद्दीन सिद्दीकी सारख्या उत्तम नटांचे सिनेमे पाहून तयार होत असते. सर मी नवाजुद्दीनसारखे नॅचरल ॲक्टिंग करतो असे, म्हणत मध्यंतरी एका तरुण मित्राची एकांकिका पहायला गेलो. नॅचरल ॲक्टिंग करायचे, त्याने त्याच्या मनाशी ठरवले असल्याने तो अतिशय हळू आवाजात बोलू लागला. प्रेक्षकांच्या पहिल्या रांगेत बसलेल्या मलाही त्याचे बोलणे काही ऐकू येईना. त्याचा प्रयोग झाल्यावर मी त्याला म्हटले की, अरे तुझे संवादच आम्हा प्रेक्षकांना ऐकू आले नाहीत. यावर त्याचे उत्तर होते की नॅचरल ॲक्टिंगमध्ये असेच असते. मग मीही हसण्याचे नॅचरल ॲक्टिंग करत नाट्यगृहाबाहेर पडलो. जर नटाचा आवाजच जर प्रेक्षकांपर्यंत पोहोचणार नसेल तर नटानं केलेल्या त्या नैसर्गिक अभिनयाचा प्रेक्षकांवर काहीही परिणाम होऊ शकत नाही. आता हे इरफान किंवा नवाजुद्दीनसारखा अभिनय करण्याचे वेड त्या नटामध्ये कुठून आले तर ते त्यांचे सिनेमे पाहून. सिनेमा हा तांत्रिक आविष्कार असल्यामुळे तिथे नटाच्या आवाजाचे रेकॉर्डींग करणारी यंत्रणाच वेगळी असते. रंगभूमीवर अभिनय करतांना आपला शब्दन्‌शब्द प्रेक्षकांना नीट ऐकू जाईल, ह्याची किमान काळजी प्रत्येक नटानं घेतलीच पाहिजे. हळू आवाजात बोलणे ह्याचा अर्थ नटाचा अभिनय नैसर्गिक ही कल्पना पूर्णतः चुकीची वाटते. ही नैसर्गिक अभिनयाची भ्रामक समजूत आपल्यावर क्षणोक्षणी आदळत असलेल्या तंत्रज्ञानातून तर होत नाहीय नां? असा मला नेहमी प्रश्न पडतो.

रंगमंचावरील अभिनय ही एक सातत्याने बदल घडवत जाणारी प्रक्रिया आहे. प्रत्येक तालमीगणिक नटाला तो करत असलेल्या भूमिकेचे निरनिराळे कंगोरे सापडत जात असतात. बऱ्याचदा हौशी आणि व्यावसायिक दोनही

ठिकाणी नटांचा ते करत असलेला भूमिकेचा अभ्यास कमी पडतो असे दिसते. मला दिग्दर्शन करतांना खूपदा असा अनुभव आला की नट बऱ्याचदा भूमिकेचा विचार बाह्यांगाने करतात. उदा. मी करत असलेली व्यक्तिरेखा रंगमंचावर अशी उभा राहील. मी असे हावभाव करत माझ्याबरोबरच्या सहकलाकाराकडे पाहीन. मी असे कपडे घालीन. मला अशा पद्धतीने भूमिकेचा केला जाणारा विचार एकांगी वाटतो. दैनंदिन जीवनामध्ये आपण असे ठरवून हावभाव करतो का? नाही. आपल्याला समोरच्या व्यक्तीकडून काय हवं आहे? ह्यावर आपण आपले हावभाव ठरवत असतो. म्हणजेच आपली वर्तनप्रक्रिया ही आंतरिक असते. आपलं मन आपल्या हावभावांचे दिशादिग्दर्शन करत असते. मग हाच नियम आपण रंगमंचावर सादर करत असलेल्या व्यक्तिरेखेला लागू होत नाही का? नटाने भूमिकेचा अभ्यास जर असा बाह्यांगाने केला तर त्याचे सादरीकरण बऱ्याचदा कृत्रिम वाटत राहते. तात्पर्य नटाला तो सादर करत असलेल्या व्यक्तिरेखेच्या मनाची अवस्था नीटपणे समजून घेता यायला हवी. आता दिग्दर्शनाविषयी .....सध्या सुरु असलेल्या अनेक हौशी आणि व्यावसायिक रंगभूमीवर दिग्दर्शन करणाऱ्या अनेक मंडळींना मी मांडत असलेले मुद्दे पटतील असे वाटते. मला वाटते, दिग्दर्शन करणाऱ्या लोकांचे दोन वर्ग आहेत.

१) आशय व्यक्त करणारे (इंटरप्रिटेशन करणारे) आणि २) देखावा सादर करणारे. (डेकोरेशन करणारे). दुर्दैवानं पहिल्या प्रकारात मोडणाऱ्या दिग्दर्शकांची संख्या रोडावत चालली आहे आणि ह्याची मला जाणवणारी दोन मुख्य कारणे. १)तंत्रज्ञानाचा मानवी जीवनावर होत असलेला परिणाम आणि २) दिग्दर्शक ह्या जमातीचा साहित्य ह्या विषयाशी संपत चाललेला संबंध. आशयकेंद्रीत कलाकृती सादर करण्यासाठी जागतिक साहित्य, मराठी साहित्य ह्याचा अभ्यास दिग्दर्शकाचा असणे आवश्यक आहे. जे नाटक किंवा एकांकिका मी बसवतो आहे तेवढेच स्क्रिप्ट फक्त मी वाचतो असा विचार करणारे दिग्दर्शक कधीच त्या संहितेला पुर्ण न्याय देत नाहीत. आता साहित्याशी आपला संबंध का संपला आहे? तर पुन्हा तंत्रज्ञान !

फेसबुक, व्हॉटसअप, इन्स्टावर आपला एवढा वेळ जातोय की पुन्हा साहित्य वाचायला आपल्याकडे वेळच नाही. माझा नाशिकचा कै. प्रशांत हिरे नावाचा एक मित्र होता. अनेक नाटकांचे, एकांकिकांचे दिग्दर्शन करणाऱ्या आमच्या ह्या मित्राने माझी एक एकांकिका सादर करायचे ठरवले. मला फोन करुन माझी सगळी नाटके आणि एकांकिका त्याने मागितल्या. मी त्याला विचारले की, जर तुला माझी एकच एकांकिका सादर करायची आहे तर माझी सगळी नाटके आणि एकांकिका कशाला हव्यात तुला? तर त्याचे उत्तर होते मला लेखक समजून घ्यायचाय. इतक्या बारकाईने लेखकाचे सगळे साहित्य वाचून त्याच्या संहितेला न्याय देण्याचा विचार करणारे दिग्दर्शक विरळच. आता दिग्दर्शकांचा दुसरा प्रकार

डेकोरेशन करणारे दिग्दर्शक! बऱ्याचदा ह्या दिग्दर्शकांनी यशस्वी होण्याचा काहीतरी फॉर्म्युला आखून ठेवलेला असतो. नाटकातील आशयापेक्षा नाटक देखणं कसं दिसेल? यावर ह्या दिग्दर्शकांचा जास्त भर असतो. नटनट्यांच्या भावना सादर करण्यापेक्षा त्यांचे रंगमंचावरील देखणेपण कसे ठाशीव होत जाईल ? यावर हे दिग्दर्शक भर देतांना दिसतात. बऱ्याचवेळा तंत्राचा वापर कसा करायचा यावरच ह्यांचे चिंतन मनन अधिक होतांना दिसते. कित्येकदा असे दिसते की, तंत्राच्या आहारी गेलेले अनेक दिग्दर्शक सिनेमातील काही तंत्रे रंगमंचावर वापरण्याचा प्रयत्न करतात. मला वाटते की, अशा दिग्दर्शकांनी आपण नाटक करायचे आहे की, सिनेमा? हे एकदा ठरवूनच टाकले पाहिजे आयुष्यात. सिनेमा आणि नाटक ही माध्यमे निरनिराळी असल्यामुळे दोन्हीच्या दिग्दर्शनाची मुलतत्वेसुद्धा मुळात भिन्नच आहेत. सिनेमाचे दिग्दर्शन करतांना दिग्दर्शकाला वास्तवाचा आभास निर्माण करावा लागतो त्याशिवाय सिनेमा पुढे जाऊ शकत नाही पण, नाटकात वास्तवाचे सूचन पुरेसे असते. नव्हे तेवढेच गरजेचे असते. उदा: न्यूयॉर्कमधल्या एका चौकात एक प्रवेश घडतो आहे तर सिनेमात न्यूयॉर्कमधला चौक जसाच्या तसा उभा करणे गरजेचे आहे, पण नाटकात तो जसाच्या तसा उभा करणे गरजेचे नाही. काय थंडी पडली आहे ना, आज न्यूयॉर्कमध्ये?असे एखादे वाक्यही हा प्रवेश न्यूयॉर्कमध्ये घडतो आहे हे सांगायला नाटकात पुरेसं असते. रंगमंचावर जे घडते आहे ते खोटे आहे पण, मी ते काही क्षणांसाठी खरे मानायचे आहे suspension of disbelief हे तत्व जर मान्य करुनच नाटक पहायला प्रेक्षक बसलेले आहेत तर वास्तववादी नेपथ्य उभे करण्याचा अट्टाहास का ? एका एकांकिकेत एका दिग्दर्शकाने सोळा वेगवेगळी ठिकाणे दाखवण्यासाठी सोळा सेट तयार केले. ते लावण्यातच त्याची पंचवीस मिनिटे खर्च झाली.

प्रयोग झाल्यावर मी त्याला म्हटले की, जसेच्या तसे मंदिर, बाग, रस्ता, हॉस्पिटल ही दृश्ये तू हुबेहुब दाखवायचा प्रयत्न करतो आहेस पण, जर तुझ्या नाटकात समज, समुद्र असेल तर तो कसा काय उभा करणार बाबा? नाटकात सगळे हुबेहुब दाखवण्याचा प्रयत्न करणे म्हणजेच देखावा सादर करणे झाले. नाटकात गरज आहे ती फक्त सुचन करण्याची. आशय (interpretation) आणि देखावा (decoration) ह्यामधला फरक दिग्दर्शकाला नेमकेपणाने समजणे खूप आवश्यक आहे. समजा रंगमंचावर एक खुर्ची ठेवली तर तो आशय असेल आणि दोन ठेवल्या तर ते डेकोरेशन भासेल. आपण एखाद्या मंदिरात जातो तिथे प्रवेशद्वारावर दोन हत्ती असतात. ते डेकोरेशन असते पण आतमध्ये देवाची मूर्ती मात्र एकच असते. एक वस्तू म्हणजे इंटरप्रिटेशन आणि दोन वस्तू म्हणजे डेकोरेशन हे दिग्दर्शकांना समजणे अत्यंत गरजेचे आहे. हे सगळे विस्ताराने सांगण्याचे कारण म्हणजे अनेकदा भरमसाठ नेपथ्य, लाईटस् आणि पार्श्वसंगीताचा वापर करुन नाटके आणि एकांकिका सादर होऊ लागली आहेत. नाटकाच्या सौंदर्यशास्त्राचा विचार सादरीकरणातून लुप्त होऊ लागला आहे. दिग्दर्शन म्हणजे तांत्रिक गोष्टींचा भडीमार नव्हे तर नाटकाचा आशय नेमकेपणाने व्यक्त करणारी प्रक्रिया आहे हे समजणे गरजेचे. जो विषय नेपथ्याचा तोच विषय प्रकाशयोजनेचा. अनावश्यक भाग अंधारात घालवणे म्हणजे उत्कृष्ट प्रकाशयोजना. एकदा हे तत्व समजले की प्रकाशयोजनेमध्येही नेमकेपणा येतो. पार्श्वसंगीताच्याही बाबतीत असेच तत्व लागू होते. नाटकाच्या प्रवेशामध्ये (सीनमध्ये) दोन गोष्टी प्रामुख्याने असतात. १) त्या प्रवेशामधून काही एक माहिती अथवा विचार मांडला जात असतो २) त्या प्रवेशामधून व्यक्तिरेखेची विशिष्ठ मानसिक स्थिती दर्शवली जात असते. व्यक्तिरेखेची मानसिक अवस्था दर्शवण्यासाठी संगीताचा वापर केल्यास ते त्या प्रवेशाला पूरक ठरू शकते पण काही एक माहिती अथवा विचार मांडले जात असतांना संगीताचा वापर मारक ठरु शकतो. मुळात संगीत हे विशिष्ठ भावना प्रेक्षकांच्या मनात तयार करण्यासाठी जर असले तर त्या पद्धतीचा सीन असेल तरच ते वापरले जाणे आवश्यक आहे.

आता लेखनाकडे वळूया. नाट्यलेखक कमी होत चालले आहेत ही खंत तर आहेच पण, त्यापेक्षा महत्वाची गोष्ट म्हणजे विचार मांडणारे लेखक कमी होत चालले आहेत. लेखनामध्येही तंत्राचाच वापर अधिक होऊ लागला आहे असेच बऱ्याचदा दिसते आहे. आशयापेक्षाही आपण प्रेक्षक-शरण लेखन करत आहोत का? हा विचार करणे महत्वाचे आहे. बऱ्याचदा अतिशय गंभीर विषय मांडतांनाही तो विनोदी पंचेससह लिहिला जातो. लेखनात विनोद असायला हरकत नाही पण तो आशयगर्भ असावा. इंग्रजीमध्ये 'फॉर्म्युला रायटिंग' म्हणतात तसे काहीसे बऱ्याच लेखकांच्या बाबती होतांना दिसते. कदाचित झटपट यश मिळावे, ह्या अपेक्षेपोटी असेल पण, हे होताना सातत्याने दिसते आहे. नाट्यलेखनाचे स्वतंत्र असे तंत्र आहे, ते आत्मसात करणे गरजेचे आहे. पुन्हा हे तंत्र सिनेमाच्या पटकथांपेक्षा वेगळे आहे हेही समजणे महत्वाचे आहे. उदाहरणार्थ 'मोन्टाज' ही संकल्पना. एक लहान मुलगा मोठा माणूस झाला, हे दाखवण्यासाठी सिनेमामध्ये तो लहानाचा मोठा होत असल्याचे निरनिराळ्या शॉट्समधून दाखवण्यात येते. हे तंत्र सिनेमात फारच प्रभावीपणे वापरले जाते पण ते नाटकात मात्र तकलादूच वाटते. असे छोटे छोटे सीन दाखवताना किती वेळा तुम्ही रंगमंचावर अंधार करणार? आणि त्यातून अपेक्षित परिणाम साधला जातो आहे का? की हाही तंत्रज्ञानाचा लेखकांवर होणारा परिणामच आहे? ह्याचा नवोदित नाट्यलेखकांनी विचार करणे गरजेचे आहे. नवे विषय मांडतांना त्या विषयाचे पुरेसे संधोधन लेखकांनी करुन मग तो मांडणे गरजेचे आहे. आत्ता आपण जे नाटक सादर करत आहोत त्या प्रेक्षकांची मानसिकता लेखकांनी लक्षात घ्यायला हवी. जागतिकीकरणानंतर एक नवेच जग उदयास आले आहे. प्रचंड व्यस्तता हा आपल्या सगळ्यांच्या आयुष्याचा भाग बनून गेला आहे. सिनेमा, ओटीटी, टी.व्ही वर अक्षरशः अब्जावधी तासांचा करमणूकीचा डोस तयार आहे. जगभरातील निरनिराळ्या भाषेतील हा ऑडिओ व्हिज्युअल कंटेट आत्ताचा प्रेक्षक बघत आहे सहाजिकच त्यांना आवडेल असे लिखाण करणे हे नक्कीच सोपे काम नाही. येत्या काळात लेखकांसमोर मोठ्ठी आव्हाने असणार आहेत. नाटक हा जिवंत कलाप्रकार आहे. कदाचित ओटीटी, टी.व्ही. इंटरनेट अशा माध्यमांना काही वर्षात कंटाळून पुन्हा नाटकाकडे वळतीलही पण त्याकरिता नाटक ह्या माध्यमात आशय आणि विषयाच्या पातळीवर नवनवे प्रयोग होणे गरजेचे आहे. आता येत असलेले साचलेपण काढून टाकणे गरजेचे आहे. येत्या काही वर्षात असे नवे प्रयोग रंगकर्मीकडून घडतील अशी आशा करतो.

■■

# नाटक आणि पार्श्वसंगीत

–प्रशांत देशपांडे

तुमचे लक्ष व्यावहारिक जगाकडून हटवून आपल्याकडे यावे, यासाठी कुठलीही कला हरतऱ्हेने प्रयत्न करते. त्यात ती जितकी जास्त यशस्वी होते, तितकी लोकप्रिय व उच्च दर्जाची ठरते. एखादे चित्र, नाटक, चित्रपट, गायन,भाषण तुमचे लक्ष गुंतवते व तुमचे मन जिंकून घेते. 'भिन्न भिन्न रुची असलेल्या जनां' च्या पसंतीस पडणाऱ्या नाट्यकलेकडे कथा, दिग्दर्शन, अभिनय, नेपथ्य, प्रकाशयोजना, पार्श्वसंगीत असे अनेक हुकूमी एक्के आहेत जे तुमच्या विचारांची वाट नकळतपणे वळवायला सज्ज आहेत. त्यातील 'पार्श्वसंगीत' या घटकाचा विचार या लेखात केला आहे. नाटकातील विविध प्रसंग अधिक प्रभावी, उठावदार होण्यासाठी तसेच वातावरणनिर्मितीसाठी विविध वाद्यांद्वारे, साधनांद्वारे जी ध्वनींची निर्मिती केली जाते तिला 'पार्श्वसंगीत' म्हणतात. अशी साधारण व्याख्या पुस्तकात आढळते. वास्तवापासून दूर जाण्यासाठी, अवास्तव गोष्टी वास्तव आहेत हे बिंबवण्यासाठी याचा उपयोग होतो. फक्त 'सिच्युएशन्स' ऐकून नाटक/चित्रपटाचा संगीतकार गाणी देऊ शकेल. पण पार्श्वसंगीत तयार करताना कथानकातील, प्रसंगातील क्षण अन् क्षण माहिती असणे आवश्यक आहे. भय, रहस्य, पौराणिक आणि ऐतिहासिकपट' म्यूट' करून पाहिल्यास 'शून्य' परिणाम मिळेल. द्विमितीला आणखी एक मिती देण्यासाठी पार्श्वसंगीताचा उपयोग होतो. 'लाईव्ह' किंवा ध्वनिमुद्रित अशा दोन प्रकारे पार्श्वसंगीत देता येते.

लेखक, दिग्दर्शक यांना महत्वाचे वाटणारे मुद्दे अधोरेखित किंवा 'हायलाईट' करणे पार्श्वसंगीताचे महत्वाचे काम एखाद्या प्रवेशात असे मुद्दे कोणत्या प्रसंग, संवादातून (वा पात्राद्वारे  आपल्या मुद्रा वा हालचालीतून) प्रगट होत आहेत आहे, हे पार्श्वसंगीत अतिशय नाजूक किंवा आक्रमकरीत्या दाखवू शकते. ते नाटकाची गती, टोन, मूड ठरवते. कंटाळवाणे वा अतिप्रमाणात वापरलेले संगीत तर मारकही ठरते. ते दृश्यांचा भावनिक प्रभाव प्रेक्षकांच्या हृदयापर्यंत पोहोचवते. प्रसंगांमधले दुःख, ताणतणाव, उत्सुकता वाढवते. पात्रांच्या भावाविष्कारास, सादरीकरणास मदत करते. कलाकारांवरचा थोडा भारही हलका करते. नाटकाला मिळणारा भावनिक, वैचारिक प्रतिसाद घडवू शकते, बदलवूही शकते. दृश्याचा भावनिक स्तर, परिणामकारकता वाढवते. कथानकाचा प्रेक्षकांच्या मनाशी 'कनेक्ट' जुळवते. काळोख्या प्रेक्षागृहात बाहेरच्या जगातील कोलाहलातून आलेल्या प्रेक्षकांची नाळ समोरच्या दृष्यांशी जोडून घ्यायची असेल तर पार्श्वसंगीताला शरण जावेच लागते! पात्रांच्या मनामधील विचारद्वंद्व दाखवण्यासाठी, हालचालींची परिणामकारकता व नाट्यपूर्णता वाढवण्यासाठी, ती खरीच आहे, हे दाखवण्यासाठी दिग्दर्शकाच्या मदतीला पार्श्वसंगीत धावून येते. त्याच्याद्वारे गारव्याचा वा वणव्याचाही अनुभव दिला जातो. त्यासाठी प्रकाश योजनेचे सहाय्य घेतले जाते. रंगभूषाकार एखाद्या पात्राचे रुप अंतर्बाह्य बदलू शकतो. ती किमया एखाद्या दृश्यात पार्श्वसंगीतकार घडवू शकतो. नाटकाबरोबरच सिनेमा वा मालिकेतही हे तंत्र वापरले जाते. हल्ली टीव्हीवरील बातम्याही पार्श्वसंगीतासह सांगितल्या जातात. रातकिड्यांची किरकिर, समुद्राची गाज, पक्ष्यांचा किलबिलाट, रहदारीचा गोंगाट अशा ध्वनिपरिणामांचाही समावेश पार्श्वसंगीतात होतो. यामुळे स्थलसूचन होते.

एखाद्या चित्रपटातला वा नाटकातला तुम्हाला आवडलेला सीन तुम्ही मनात पुन्हापुन्हा 'रिप्ले' करता तेव्हा तो पार्श्वसंगीतासह असतो. मुका नसतो. अभिनय, दिग्दर्शन, प्रकाश यासह त्यामागील सुरावटीने, तालयोजनेमुळे ते दृश्य मनात ठसवले गेले असते.

अतिशय दुःखद प्रसंग वा संवादावेळी 'कॉमिक्' पार्श्वसंगीत वापरले तर प्रेक्षकांची हसून हसून मुरकुंडी वळते. प्रसंगाची लय पकडू न शकणारा एखादा 'पीस्' प्रेक्षकांना झटक्यात कंटाळा आणतो. पार्श्वसंगीताचा आवाज किती असावा, हे दिग्दर्शकाने ठरवले पाहिजे. अगदी 'लाऊड' वा क्षीण संगीत परिणामकारकता गमावून बसते.

पुढील (काही) प्रसंगात काही धक्कादायक, दुःखदायक घडणार असेल तर संगीताद्वारे त्याचे सूचन आधीच करता येते. मी या संकल्पनेचा उपयोग खूप वेळा केला.

विज्ञान सांगते, त्या उलट रंगमंचावर घडते. आधी ध्वनी येतो आणि नंतर प्रकाश प्रवेशतो.! प्रयोगात  दोघांची लय एक झाली तर दुधात साखर. पार्श्वसंगीत जितके प्रभावी तितकी संधी प्रकाशयोजनाकाराला मिळते. शांत सुरावट

असेल तर दिव्यांचे येणे-जाणे, त्यांची प्रखरता त्या लयीला अनुसरुन होते. प्रकाशयोजनाकार प्रकाश रंगीत करण्यासाठी चित्रकलेच्या शास्त्राप्रमाणे विविध भाव असलेले रंग वापरतो.(उदा.प्रेम-गुलाबी, लाल-क्रूरता इ.) प्रसंग, पात्रांचा 'मूड ' पाहून त्या त्या रंगांचे दिवे प्रकाशतात. त्याचप्रमाणे पार्श्वसंगीत स्वर, ताल, राग, वाद्य यातून उमटणाऱ्या भावसंवेदनांचा विचार करते आणि मग त्यांचा निनाद रंगमंचावर प्रगटतो.

काही 'प्रयोग' (नाटक वा सिनेमामधील)असे आहेत की, ज्यात पार्श्वसंगीताचा तसूभरही वापर केलेला नाही.अशा दिग्दर्शक व अभिनेते यांचे थोरपण मानावेच लागेल.अर्थात यासाठी प्रेक्षकवर्गही खूप संवेदनशील व विचारवंत लागतो.एखादी कलाकृती भावना, विचार मांडणारी असो किंवा करमणूकप्रधान. आपले म्हणणे चट्कन व प्रभावीपणे मांडण्यासाठी पार्श्वसंगीत हवेच. संवादांशिवाय गूढता दाखवण्यासाठी सूर-ताल यांची मदत घ्यावीच लागते. 'Ambi guity is the essence of any art' असे म्हणतात. (संदिग्धता ही कोणत्याही कलेचे मूलतत्त्व असते.) नाटक या लोकप्रिय कलाप्रकारातही ती आहे.ही संदिग्धता वाढवण्यासाठी ( व कमी करण्यासाठी ! ) पार्श्वसंगीताचा कल्पक वापर करता येतो.

'कालसंकोच' प्रेक्षकांच्या पचनी पडावा म्हणून मुख्यत्वेकरून त्याचा उपयोग होतो. समजा 'बालगंधर्व' चित्रपटात या महान अभिनेत्याची जीवनगाथा, आयुष्यातील मुख्य घटनांसहित , तीन तासांत थोडक्यात दाखवली आहे. म्हणजे 'काळाचा संकोच' केला आहे, काळ 'एडिट्' केला आहे. हे काळाचे झरझर सरकणे प्रेक्षकांनी स्विकारावे, यासाठी पार्श्वसंगीताची मदत घेतली आहे. आणखी एक 'पॉप्युलर' उदाहरण सिनेमात नेहमी सापडते. पहिल्या दहाएक मिनिटांत एक शाळकरी मुलगा मैदानावर फुटबॉलला किक मारतो. त्यामुळे तो फुटबॉल जोरात वरती जातो. तो खाली येतो, तेव्हा त्या शाळकरी मुलाचे एका २५ वर्षीय युवकात रुपांतर झालेले असते. याला जबरदस्त, वेगवान पार्श्वसंगीताची जोड नसती तर आपण त्या दिग्दर्शकाला वेड्यात काढले असते..!.'स्थळबदल' दाखवण्यासाठीही संगीताचा उपयोग करतात. तमाशामध्ये याचे उत्तम उदाहरण सापडते. एका गावाकडून दुसऱ्या गावाकडे निघालेली पात्रं रंगमंचाला दोन-तीन फेऱ्या मारतात. आणि एका जागी येऊन थांबून म्हणतात 'हुश्श.. आलु बुवा यकदाचं..' महत्वाचे काय? त्यांच्या फेरीबरोबर ढोलकीचा 'तुकडा' हार्मोनियमबरोबर वाजत असतो म्हणून हा सगळा ' ब्रिझिनेस ' गावरान प्रेक्षक गपगुमान स्विकारतात. आता याचा उपयोग आधुनिक एकांकिकेतही केला जातो!

माझ्या अभ्यासाप्रमाणे नाटक/एकांकिका, चित्रपट यांना व त्यातील प्रत्येक प्रसंगालाही सुरुवात, मध्य, शेवट असतो. पार्श्वसंगीतकाराने संगीत देताना त्यांचा, विशेषत: त्यांच्या लयीचा, बारकाईने विचार करणे आवश्यक आहे. माझ्या मतानुसार पार्श्वसंगीताचे थीम म्युझिक (कथावस्तूसाठी), कॅरेक्टर म्युझिक (पात्रांसाठी), सीन म्युझिक (प्रसंगांसाठी)असे तीन प्रकार होतात. ते तयार करण्यासाठी दिग्दर्शकाशी चर्चा करावी. संहितेचा, पात्रांचा सखोल अभ्यास करावा. या लेखातील सर्व संकल्पनांची सिनेमा-नाटकातील समर्पक उदाहरणे ओठांवर आहेत. पण विस्तारभयास्तव देऊ शकत नाही. रसिकांनी यापुढे प्रेक्षागृहात आपले कानही डोळ्यांप्रमाणेच 'उघडे' ठेवले तर पार्श्वसंगीताचे महत्व समजेल. या लेखात मी पार्श्वसंगीताची 'पार्श्वभूमी' सांगण्याचा प्राथमिक प्रयत्न केला आहे. यापुढचा 'अभ्यास' रसिकांनीच करावयाचा आहे!

आता एक नजर मी 'लाईव्ह' संगीत दिलेल्या नाटकांबद्दल. (आधी टाळलं होतं. पण मा.संपादकांच्या सूचनेवरून हे सगळं लिहिलं आहे...) सोलापूरच्या अरुण मेहतांच्या 'निशिगंध' नाट्य मंदिराकडून सादर झालेल्या भव्य आणि टोलेजंग कलाकृतींना 'लाईव्ह' संगीत देण्याची संधी मला मिळाली. महाराष्ट्रीयन, कर्नाटकी, राजस्थानी, बंगाली लोकसंगीताचा मुक्तहस्ताने प्रयोग केला. प्रा.निशिकांत ठकार यांची नादमधुर, अर्थपूर्ण गीते साथीला होती. वेगवेगळ्या सादरीकरणांमधील पार्श्वसंगीताच्या 'जागा' आणि त्यांचा हुकूमी आविष्कार यांचे शब्दांत वर्णन अशक्यच. आलेला प्रत्यक्ष भन्नाट अनुभव शब्दात पकडणे कठीणच. कानांना गुंगवत ठेवले तर डोळ्यांना फसवता येते, हे पार्श्वसंगीताचे मोठे वैशिष्ट्य या प्रवासात गवसले. यामुळे फँटसीकडे झुकणाऱ्या लोककथा करताना प्रचंड मजा आली..

'नाटक अग्नीचे, पाऊस पाण्याचे' ( गिरिश कर्नाडांचे मूळ कन्नड 'अग्नी मत्तु मळे') मध्ये प्रेम व अहंकार, क्रोध यांचा संघर्ष आहे. त्यासाठी मूळ संहितेत नसतानाही मी पर्जन्यसुक्त व अग्नीसुक्त वापरले. बार्शीला वेदशास्त्रसंपन्न नानासाहेब काळेंच्या गुरुकुलातून ध्वनिमुद्रित करुन आणलेले सूक्त मुखोद्गत करुन मी आठवडाभर तालमीत म्हटले. एक

आठवड्यात आमची ५० ची टीम सुक्तपठण करु लागली. बाहेरच्यांना वाटे की होमहवन सुरू आहे !! अहंकार वाढत जाईल तसा अग्नीसूक्ताचा उच्चार कठोर, विकृत बनत जाई. वनवासी जमातीतील 'नित्तिले' या प्रेमभावनेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या साध्याभोळ्या नायिकेसाठी मी एकतारी वाजवे. तिचे आगमन, संवाद आणि तिचा संदर्भ जरी आला तरी एकतारी प्रेक्षागृहात निनादत राही.

'सखी प्रिय सखी' (मंगेश कुलकर्णी ) मध्ये प्रा. ठकार सरांची नादमधुर गीते मिळाली. राजस्थानी पार्श्वभूमीमुळे राजस्थानी साज चढवला. शब्द मराठी व संगीत राजस्थानी असा मराठी रंगभूमीवरचा पहिलाच प्रयोग असावा. एनएसडीतून आलेल्या एका अभ्यासू अभिनेत्याने सांगितले '९०% राजस्थानी थोडेसे 'डिस्टर्ब' करणारे, तुझे १०% मराठी वळणाचे उच्चार बदल..' कॅसेट्स पुन्हा पुन्हा ऐकल्या. व ज्या मंगनियार संगीताची धाटणी घेतली होती. त्यांचे उच्चारणही अनुसरले. समाजमाध्यमे नसल्याने ऐकण्यासाठी फक्त कॅसेट्स होत्या. यातील कठपुतलीचे नृत्यगीत पाहून नामवंत लेखक दया पवार म्हणाले की, ''मलाही दोन-चार पावलं टाकावीशी वाटली...'' 'विठो-रखुमाई'(रत्नाकर मतकरी) मधील पडदा उघडल्यानंतरचे पहिले लोकगीत कंपोज करुन ऐकवल्यावर अभिनेते विजय चव्हाण म्हणाले ' '' बुवा, चाल फार गोड आहे''. पण प्रेक्षकांनी बाहेरुन आणलेले विचार विसरावेत असा 'दणका' सुरुवातीला पाहिजे'. हा मोलाचा सल्ला पुढील सर्व नाटकांसाठी लक्षात ठेवला. 'महामाई'. (प्रा.कंबार)मधील सटवाईच्या गोष्टीसाठी मी महामृत्युंजय मंत्र निवडला. समूहस्वरात त्याचा धीरगंभीर उच्चार अंगावर काटा आणे. 'द्वैतापल्याड तू अद्वैता'(ज्ञानपीठ विजेते चंद्रशेखर कंबार) मध्ये नाटकात चाललेले वेगळे नाटक एस्टॅब्लिश करण्यासाठी मी (हार्मोनियम व माईक सांभाळून)गजा ढोल वाजवे.

सौ.शैला अरुण मेहता (भाभी) यांची स्वगते व माझा आलाप यांची सांगड मेहता सरांनी काही नाटकात घातली होती. स्वगतातील पॉजेसवेळी माझा आवाज वरती जाई. तो कमी झाला की, त्यांची वाक्ये येत. हे 'अंडरस्टँडिंग' महिनोनमहिने केलेल्या तालमींमुळे येई. कित्येकजण येऊन पाठ थोपटत. ही मजा ध्वनिमुद्रित आलापात नाही. माझे आलाप दरदिवशी वेगळे असत. पण कालावधी तितकाच असे.

ध्वनिमुद्रित असे काहीही न वापरता केवळ माझा आणि समूहस्वर व विविध चर्म व घनवाद्ये, तंतुवाद्ये , गाणी वापरुन 'लाईव्ह' पार्श्वसंगीत देणे, हे आव्हानात्मक होतेच पण इंटरेस्टिंगही! दिग्दर्शन कौशल्याबरोबरच संगीताचा उत्तम कानही लाभलेल्या अरुण मेहतांच्या डोक्यात संगीताची 'जागा' आली की ते दृश्य 'रिपीट ' करीत. 'जागा' सांगत. पुन्हा पाहत असताना मी (कानावर ठेवलेल्या) पेन्सिलीने संहितेवर खुणा करे. तिसऱ्या वेळी सीन होत असताना (ताज्या ताज्या) संगीताच्या तुकड्यासह होई..! (नाटक मूळ कन्नड असेल तर आधीच वडिलांकडून वाचून व समजून घेतलेले असल्यामुळे पार्श्वसंगीतावेळी अडचण येत नसे. संहिता व दिग्दर्शकाने तिची केलेली हाताळणी कळली की संगीत संयोजन सोपे होते.) या तुकड्यांमध्ये समूहस्वरात वा माझ्या स्वरात 'हंमिंग',एखादा श्लोक/गाण्याची ओळ, तराण्याचा छोटा तुकडा,सरगम, आलाप,वाद्यं इ.चा समावेश असे. अचूक 'टायमिंग', कालावधीचा 'सेन्स' महत्वाचा. माझ्याबरोबर प्रा.सुभाष शास्त्री (व्हायोलिन), रवींद्र क्षीरसागर (तबला, ढोलक, ढोलकी), सचिन वाघमारे (बासरी),प्रसाद देशपांडे(तबला), नंदकुमार विजापुरे (तालवाद्ये), सुहास सदाफुले (गायन,तालवाद्ये) असा' ताफा'असे. रंगमंचावर काम नसेल तेव्हा पन्नासपैकी कुणीही कुठलेही तालवाद्य घेऊन अचूक साथ करे. गाणे असेल तर रंगमंचाच्या मागच्या बाजूने, मेकअप रुममधूनही सुरात कोरस देई. प्रसिद्ध अभिनेता प्रमोद पवार मला म्हणाले की, ''तुझ्या सुरेलपणाबद्दल दाद देतोच.पण त्याहून मोठी दाद यासाठी की, तुझा कोरस तू करुन घेतलेल्या तयारीमुळे सुरेल व समजूतदार असतो...'' अर्थात दिग्दर्शक व माझ्या 'ताफ्या' चे मोठे योगदान असे. वेळोवेळी 'अंतिम' ला मिळालेल्या प्रथम, द्वितीय पुरस्कारांनी दरवर्षी नवे काही करायचा उत्साह द्विगुणित होई. मेहता सर मी सांगेन ते वाद्य उपलब्ध करुन देत.त्यांच्याशी जुळलेल्या १००% ट्युनिंगमुळे हा सर्व प्रवास करता आला.

नाटक आणि त्यातले नाट्य रंगमंचावर जन्माला घालावयाचे असेल, घडवायचे असेल तर 'लाईव्ह' संगीताला पर्याय नाही. वाद्यांची 'पुण्याई' या प्रयोगांमुळे कळली. घुंगरु वा एखादा छोटा टाळ वातावरण बदलून टाकतो. घंटेचा 'लाईव्ह' ध्वनी रंगमंचावर काल्पनिक देवस्थानाची 'निर्मिती' करतो. कोल्हापुरी वहाणेची 'करकर' ही वापरली आहे. रंगमंचावरच रंगभूषा व वेशभूषेसह

असल्याने अभिनय, दिग्दर्शन, प्रकाश, नेपथ्य, संगीत यांच्या सहाय्याने घडणाऱ्या आविष्कारात देहभान विसरून सहभागी होता आलं. त्यामुळे तालमीतलं आणि तिथलं गाणं यात फरक असायचा. आधी दादा साळुंखे व नंतर दीपक कसबे यांच्या प्रकाश योजनेची जादू संगीतात मिसळून जाई. प्रा.निशिकांत ठकार यांची मनमोहक गाणी पाहिली की, चाल आपोआप तयार होई. मोहन वाघ, भक्ती बर्वे, चंदू पारखी, कमलाकर भागवत , अविनाश व ऐश्वर्या नारकर आदींचे भरभरुन दाद व आशिर्वाद मिळाले. भरून पावलो तो पं.जितेंद्र अभिषेकी बुवांच्या एका वाक्यामुळे. अर्ध्या तासाचा प्रवेश पाहून व गाणी ऐकून ते म्हणाले ''काळानुसार नाटक आणि पार्श्वसंगीत बदलत जातं. आज मी पुन्हा संगीत दिलं तर या नाटकाप्रमाणे देईन!!''

'लाईव्ह' संगीत म्हणजे 'लाईव्ह वायर'.परिणाम 'इलेक्ट्रीफाईंग' पण चूक झाली तर ४४०चा झटका! प्रचंड प्रमाणात तालिम लागते त्यामुळे घरी आहोत की तालमीत याचे भान राहत नसे.

हा लेख संपवण्यापूर्वी आदरणीय स्व.भास्कर चंदावरकर व कमलाकरजी सोनटक्के यांना अभिवादन करुन त्यांना धन्यवाद देऊ इच्छितो ज्यांनी सुमारे चाळीस वर्षांपूर्वी 'पार्श्वसंगीत' नावाचा किडा डोक्यात सोडला. त्यामुळे सोलापूरात राहूनही माझ्या अल्पमतीप्रमाणे व एकलव्याच्या भूमिकेतून त्या संकल्पनेचा अभ्यास करीत राहिलो. अशीच संधी आताच्या उत्साही पिढीलाही मिळो अशी नटराजाचरणी प्रार्थना करतो आणि थांबतो.

■■

# समृध्द नाट्यनिर्मितीची गरज –नाट्य प्रशिक्षण

– तुषार भद्रे, सातारा

रंगभूमीवर ज्याप्रमाणे रंगकर्मी उच्चारत असलेल्या प्रत्येक शब्दांची नेमकी गरज (नीड) काय ? हे तो जोवर शोधत नाही तोवर त्याचा अभिनय भरत मुनींच्या म्हणण्यानुसार वाचिक अभिनयाकडे जात नाही.तद्वतच आज दर्जेदार आणि नाट्यानुभवाने समृध्द अशी नाट्यनिर्मिती करायची असेल तर हौशी असो वा प्रायोगिक रंगकर्मींना नाट्य प्रशिक्षणाची नितांत गरज आहे.विद्यमान मराठी रंगभूमीचा विचार केला तर सरळ, सरळ दोन वर्ग पडताना आपल्याला दिसतात...एक आम्ही कोणतेही नाट्य प्रशिक्षण घेतले नाही म्हणून आमचे काहीही अडले नाही असे म्हणणारा एक वर्ग तर आम्ही रीतसर नाट्य प्रशिक्षण घेतले असल्यामुळे आमचे रंगकर्म दर्जेदार होते आहे....असे म्हणणारा दुसरा वर्ग. मराठी रंगभूमीवर हे दोन्ही वर्ग आपापली मते उच्चारवत मांडताना दिसतात...विशेषतः पहिला अप्रशिक्षित वर्ग मोठ्या अभिनिवेशी थाटात हे सांगत असतो, पण खरोखर दर्जेदार नाट्य कलाकृती निर्माण करून प्रेक्षकांना समृध्द नाट्यानुभव द्यायचा असेल तर रंगकर्मी प्रशिक्षित असतील तरच ते शक्य होते असा अनुभव आहे.....अगदी राज्य नाट्य स्पर्धेत प्रभावी सादरीकरण करणारे रंगकर्मी हे कोणत्या ना कोणत्या प्रशिक्षण कार्यशाळेत सहभागी झालेले असतात.

प्रशिक्षित कलावंतांच्या कलाकृतीत नाट्य सादरीकरणातून अनेक रंगमंचीय बलस्थाने प्रकट होताना आपल्याला दिसतात...आता नेमके नाट्य प्रशिक्षण म्हणजे काय ? तर रंगकर्मींना संपूर्ण नाट्य व्यवहाराचे आकलन असणे किंवा त्यांच्यात ते निर्माण करणे म्हणजे नाट्य

प्रशिक्षण असे आपण थोडक्यात म्हणू शकतो.

मानवामध्ये उपजतच काही नैसर्गिक गुण, वैशिष्ट्ये असतात,स्थायीभाव,ऊर्जा,दमसास,रंगरूप यांचा त्या वैशिष्ट्यां -मध्ये समावेश होतो.जेव्हा हा मानव रंगमंचीय कलेच्या प्रांगणात प्रवेश करतो तेव्हा हे सारं घेऊनच प्रवेश करीत असतो.परंतु उपजत असणारी वैशिष्ट्ये त्याचे जगणे सुसह्य करीत असली तरी जर त्याला अभिनेता,अभिनेत्री म्हणून नाट्य कलेत पारंगत व्हायचे असेल तर निश्चितच प्रशिक्षित व्हावेच लागते.ज्याप्रमाणे नटा विषयी भाष्य करताना ॲरीस्टॉटल म्हणतात...तूच वाद्य आहेस आणि तूच वादक आहेस; तर भारतीय नाट्यशास्त्राचे जनक भरतमुनी म्हणतात तू एक रिकामे पात्र/भांडे आहेस... या पात्रात तू जे भरशील ते नाव तुला मिळेल,म्हणजेच तुझ्या शरीररुपी पात्रात जेव्हा नाटकातील भूमिका तू भरतोस तेव्हा ते पात्र परिपूर्ण होते आणि त्याचे नामाभिमान होते.या संकल्पनेचा विस्तार करायचा झाल्यास मुळात रंगकर्मी हा अंतर्बाह्य रीता,मोकळा,रिकामा असायला हवा..जेव्हा तो रीता अथवा रिकामा असतो तेव्हाच त्याच्यामध्ये काही तरी भरून घेण्याची शक्यता असते.

ॲरीस्टॉटल यांच्या म्हणण्यानुसार 'तूच वाद्य तूच वादक' या वचनाचा विचार केल्यास रंगकर्मींना आधी स्वतःचे शरीररुपी वाद्य लावता आले पाहिजे,कारण कोणताही वादक, वाद्य वाजविण्यापूर्वी सुरात व तालात लावत असतो.जसे की सतारीच्या तारा खुंट्या आवळून लावाव्या लागतात.तबला वादक हातोडीने ठाक-ठुक करून तर हलगी तापवावी लागते, त्याशिवाय त्या वाद्यातून निर्माण होणारे सुर किंवा ताल हे बेसुरे होत नाहीत...हे एकदा मान्य केले की इथे रंगकर्मींची कसोटी सुरू होते.ती कसोटी म्हणजे माझे शरीररुपी पात्र रिकामे असले पाहिजे म्हणजे काय?आणि माझे शरीर म्हणजेच एक वाद्य असेल तर ते तालात,सुरात लावायचे म्हणजे काय करायचे?या प्रश्नांची उत्तरे म्हणजेच प्रशिक्षण! भरतमुनींनी हाच पायाभूत विचार करून नाट्य शास्त्राचा विस्तार केलेला आहे. वाचिक,अंगिक, आहार्य आणि सात्विक अभिनयाची फोड करून शरीररुपी पात्र कसे भरायचे याचे सिद्धांत आणि परिमाणे निर्माण केली आहेत. अष्टरसांची मांडणी करून रस निष्पत्तीसाठी आवश्यक विभाव, अनुभाव,व्यभिचारीभाव याचे विवेचन केलेले आहे.रंगमंचीय अवकाशात वावरताना रंगकर्मींना कोणकोणत्या घटकांचा अभ्यास अनिवार्य आहे या संदर्भात व्यापक नाट्यशास्त्र ग्रंथात मार्गदर्शन केले आहे.पुढे अभिनव गुप्त यांनी यात नवव्या शांत रसाची भर घालून रस निष्पत्ती मधील सप्तरसविघ्ने कोणती याची सखोल मांडणी केली आहे.हे सारे समजून उमजून नाट्य सादर करणे,अभिनय करणे म्हणजेच प्रशिक्षण! रशियन नाट्य प्रशिक्षक स्तानिस्लावस्की यांनी मेथड अक्टिंग प्रकाराची जी मांडणी केली आहे त्यामध्ये सुध्दा भरताने मांडणी केल्या प्रमाणे अनेक साम्य स्थळे आपल्याला सापडतात ..आज जगभर मेथड एक्टिंग पद्धती जगविख्यात आहे. ग्रॉटॉस्की या पोलिश रंगधर्मींनी कोणत्याही बाह्य आभूषणाशिवाय शरीर,मन, बुध्दी यावर सर्वार्थाने भर देऊन रंगकर्मीनी स्वतःचे रीते शरीररुपी पात्र कसे भरायचे याचा उत्तम विचार दिलेला आहे. जर्मन नाट्य दिग्दर्शक पिटर ब्रुक यांनी रंगमंचीय अवकाशास नवे आयाम देत नट आणि प्रेक्षक यांच्यातील अवकाशनात नेमके काय? याचा नवसिद्धांत मांडला आहे. जर्मन नाट्यधर्मी ब्रेख्त यांनी प्रेक्षकांच्यात अलिप्तभाव, दुरस्तभाव निर्माण करून नाट्यवस्तूच्या आशयाकडे नेण्याचा प्रयत्न रंगकर्मींनी करावा असे आग्रही प्रतिपादन करून एपिक थिएटर या संकल्पनेला जन्म दिलेला आहे....या व अशा अनेक ऋषितुल्य रंगधर्मींनी निर्माण केलेल्या सिद्धांताचा अभ्यास करणे म्हणजेच प्रशिक्षण होय!असे प्रशिक्षण घेतले की,नटाचे शरीर हे वाद्य आणि त्याचा वादकही तूच..म्हणजे काय हे उमगायला लागते... शरीररुपी वाद्य कशा प्रकारे लावायचे याचे आकलन होते..यातील सर्वात महत्वाचे घटक म्हणजे आवाज,मन,शरीर आणि बुद्धी...नटाने व्होकल अथलीट असले पाहिजे तसेच तो अथलीट फिलॉसॉफर असणे गरजेचे असते असा विचार जागतिक पातळीवर मांडला जातो आणि त्याची पाठराखण करणारे अनेक कलावंत जगभर भेटतात... या दोन्ही महत्वाच्या गोष्टीत आवाजाची जोपासना,मनाची,बुध्दीची आणि शरीराची जोपासना व मशागत अंतर्भूत असते.या चारही बाबींची जोपासना म्हणजेच प्रशिक्षण...आवाज, नटाला लावता आला पाहिजे. शरीराची जोपासना म्हणून बलोपासना अंगिकारली पाहिजे, मनाची जोपासना करण्यासाठी मनावर स्वतःचा ताबा,बुध्दीच्या जोपासने करीता वाचन, मनन आणि कल्पनाशक्तीचा विकास या साऱ्या गोष्टींची काळजी घेणे अभिप्रेत असते.अशा प्रकारे प्रशिक्षण घेतले गेले असेल तर रंगधर्म समृध्द होतो...आपण जो अभिनय करतो,जी नाट्य कलाकृती निर्माण करतो ती दर्जेदार,आशयघन होते...म्हणूनच मी म्हणतो नाट्यप्रशिक्षण समृध्द नाट्य निर्मितीची गरज आहे...आता कळीचा मुद्दा म्हणजे असे प्रशिक्षण आम्ही कोणाकडून घेतो..हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा असतो...कारण जर स्कूल योग्य असेल तरच प्रशिक्षण उत्तम व शाश्वत मिळते...हे सांगण्याचे कारण म्हणजे अलीकडे गावोगावी नाट्य प्रशिक्षण वर्ग चालविले जातात...सर्वच ठिकाणी सुयोग्य मार्गदर्शन मिळतेच असे नाही...बऱ्याचदा अर्ध्या हळकुंडाने पिवळे झालेले बरेच कलाकार

भेटतात...आम्ही तीनवर्षे शिकलोय असे तोऱ्यात सांगतात पण प्रत्यक्षात चार वाक्ये धड बोलता येत नाहीत असेही अनुभव येतात....काही मंडळी एकदिवसीय मोफत सेमिनार घेऊन तरुण-तरुणींना मोठ मोठ्या, संधींची आमिषे दाखवून हजारो रुपयांची फी वसूल करून आपली पोटे भरताना दिसतात...प्रत्यक्ष प्रशिक्षणातून अशा ठिकाणी गेलेल्या प्रामाणिक माणसांची वाईट फसवणूक होते...अशा ठिकाणी शिकलेले रंगकर्मी रंगमंचावरील कृतीत नापासच होतात...तर काहींच्यात त्यांच्या समजुतीनुसार आम्ही नामवंत संस्थेत शिकलो याचा अहंगंड मिरवताना आपण पहातो....बऱ्याचदा त्याचे कारण चुकीचे स्कूल असाच असतो...नाट्यकला म्हणजे कृती,कृती आणि फक्त कृती असून त्यातील सातत्य आणि सराव किंवा रियाज महत्वाचा असतो...तेव्हा प्रशिक्षक अथवा प्रशिक्षण संस्था उत्तम असेल तरच रंगकर्मी खऱ्या अर्थाने घडतात....आज मराठी रंगभूमीवर असंख्य हौशी रंगकर्मी कार्यरत आहेत...परंतु त्यातील बरेच रंगकर्मी नाट्यप्रशिक्षणा विषयी उदासीन आहेत असे दिसते..राज्यनाट्य स्पर्धेतून अलीकडे प्रशिक्षित रंगकर्मी कलावंतांचे दर्शन होताना दिसते ही अत्यंत स्वागतार्ह बाब आहे..केवळ नाट्य क्षेत्रात अनेक वर्षे काम करतो आहे तेव्हा आमचा अनुभव हेच शिक्षण असे मानणारे बरेच आहेत.. अनुभवातून शिक्षण नक्की मिळते पण त्यातील वास्तव म्हणजे अशा कलावंतांना प्रचंड मर्यादा पडतात..ठराविक चाकोरी बाहेर ते काही करू शकत नाहीत...आज पुणे विद्यापीठातील ललित कला केंद्रातून शिक्षित होऊन बाहेर पडलेले अनेक रंगकर्मी स्वतः सह मराठी रंगभूमीला प्रचंड योगदान देताना दिसतात...असो मुद्दा असा की,हौशी असो, प्रायोगिक असो कोणत्याही प्रकारचा मनोभाव ठेऊन नाटक करा पण नाट्य प्रशिक्षणाची गरज असते याचे भान अवश्य ठेवा....प्रशिक्षित झाल्यावर नाट्य कलेत टिकून रहायचे असेल तर रियाज,सराव,वाचन या गोष्टी निरंतर सुरू असल्या पाहिजेत...असे असेल तरच आपण उत्तम,दर्जेदार अभिनय व नाट्य निर्मिती करू शकतो.अन्यथा केवळ उरते ती फक्त हौस...हौसेला मोल नाही असे म्हणतात पण हौशी रंगकर्मींनी नाट्य प्रशिक्षणाची त्यांच्या कार्यास जोड दिली तर मराठी रंगभूमी अधिक समृद्ध होईल यात तिळमात्र शंका नाही.लेखाचा शेवट करताना एक युट्यूब वर पाहिलेला अनुभव सांगतो. दोन वर्षांपूर्वी 'अश्रूंची झाली फुले' या नाटकाचा प्रयोग व्यावसायिक रंगभूमीवर सादर झाला... सुबोध भावे,शैलेश दातार आणि उमेश जगताप यांच्या उत्तम भूमिका त्यात होत्या..या नाटकाचे ठराविक संख्येचेच प्रयोग करायचे तसेच.. अमेरिकेचा दौरा झाला की प्रयोग बंद करायचे असेही ठरले होते...ज्यावेळी अमेरिका दौऱ्यातील शेवटचा प्रयोग संपल्यावर सुबोध भावे यांनी उपस्थित प्रेक्षकांना सर्व टीमची रंगमंचावरून ओळख करून दिली त्यामधे सर्वात शेवटी आणि आमच्यातील एकमेव प्रशिक्षण घेऊन आलेला नट म्हणून उमेश जगताप यांची ओळख करून दिली आणि सहकारी कलावंतांसह प्रेक्षकांनी प्रचंड टाळ्यांच्या गजरात उमेश जगताप यांचे स्वागत केले...मला वाटते हा प्रसंग नाट्य प्रशिक्षणा विषयी व्यक्त होणाऱ्या आदरभावा संदर्भात खूपच बोलका आहे.

■■

# नाट्यशास्त्र विभागाचे उपयोजन व त्याचे मराठी रंगभूमीला योगदान

-संपदा कुलकर्णी

नाट्यशास्त्र या विषयाचे मराठी रंगभूमीला योगदान आणि या विषयाचे सामाजिक महत्त्व या विषयावर चिंतन व्यक्त करत असताना अनुभवांची खूप दाटी झाली आहे कारण, नाटकाचे काही शास्त्र असते का? नाटक ही शिकण्याची गोष्ट आहे का? तसेच नाटकं करण्यासाठी शिक्षण, प्रशिक्षण घ्यावे लागते का? असे अनेक प्रश्न सातत्याने विचारले जातात. कधी,कधी तर या प्रश्नांवरून टिंगल टवाळीही केली जाते . एवढेच नव्हे तर नाटक या शब्दावरूनही अनेकदा विरोधाभास निर्माण करून तो शब्दच मुळात खिल्ली उडवण्यासाठी सराईतपणे वापरला जातो. शिक्षण संस्थेत या विषयांच्या प्राध्यापक, शिक्षकांना कधी कलाकार समजतात, तर कधी त्यांना काय काम असते? असे बरेच काही सोयीनुसार समज, टोमणे असतात, थोडक्यात या शिक्षकांची मधली स्थिती होते. त्या विषयाचे शास्त्र, किंबहुना तो विषयच काय आहे हे समजून न घेता त्याचा उपरोधिक वापर केला जातो. मग त्याचे उपयोजन आणि योगदान या विषयाकडे तर समाज गांभीर्याने बघत असेल की नाही याची चिंता वाटते. गाडी दुरुस्त करणारा मेकॅनिक आणि ऑटोमोबाईल इंजिनियर यांच्यामध्ये जो फरक केला जातो तोच फरक प्रशिक्षित कलाकार आणि हौशी कलाकार किंवा अनुभवाने मोठे झालेले कलाकार असा फरक इथे केला जातो पण शिक्षणाच्या संस्कारामुळे प्रगल्भता परिपक्वता येत जाते याचा कुठेतरी विसर पडतो आहे असे वाटते. खरे तर नाटक हा एक अतिशय बहुआयामी आणि सर्वव्यापी विषय आहे. त्याचे शास्त्र किंवा शास्त्र म्हणजे त्यात तत्त्व,नियम,घटक आले आणि मग नाटकाला हे सगळं काही असू शकतं का? त्याची काही परंपरा त्याचे काही नियम त्याच्या शैली त्याच्या पद्धती आणि मुख्य म्हणजे या सगळ्याचा उपयोग करमणुकी पलीकडे काय काय असू शकतो, याचा विचार सामान्य माणूस करताना दिसत नाही. नाटक ही केवळ पहायची आणि मनोरंजनाची गोष्ट नाही. तर नाटक हा एक जीवनव्यापी विषय आहे. म्हणूनच भरत मुनींच्या नाट्यशास्त्रात सुद्धा त्याला, ''लोक वृत्तानुकरण नाट्यमय तन्मया कृतम'', असे म्हटलेले आहे. म्हणजे लोकांच्या वृत्ती, प्रवृत्तींचं अनुकरण तन्मयतेने ज्या कला प्रकारात केलेले असते ते नाटक मानवी जीवनाशी त्याचे पोटनातेच आहे. आणि म्हणूनच नाटकाला शतकांची परंपरा आहे. केवळ मराठी रंगभूमीच नव्हे तर जागतिक रंगभूमीला सुद्धा शतकांची परंपरा आहे. तरीही आपण केवळ मराठी रंगभूमीचाच विचार करू. मराठी रंगभूमीला सर्वसामान्यपणे नाटकाला दीडशे वर्षांची परंपरा आहे. परंपरा म्हणजे नाटक, नाटकाचे प्रकार, नाटकाच्या प्रयोगांची विविधता यांचे वर्षानुवर्ष चालणारे प्रयोग, करणारे आणि पाहणारे यांच्या पिढ्यानपिढ्या या दोन्हीत कालानुसार बदल होत जातो. दाखवण्या, करण्यामध्ये जसा बदल होतो तसाच पाहण्या मध्ये देखील बदल होतो. माणसाची अभिरुची बदलत जाताना दिसते. नाटक हे माणसाच्या जीवनशैलीचे प्रतिबिंब आहे. किंवा असते अशा सर्वसमावेशक असणाऱ्या नाटक या विषयाला शास्त्रोक्त बाजू आहे. नाटक म्हणजे केवळ अभिनय नसून, लेखनापासून बघण्यापर्यंतचे सर्व घटक त्यात समाविष्ट असतात. करणारा आणि पाहणारा हे दोन मूलभूत घटक जरी मानले जात असले तरी लेखन करणारा आणि नाटक पाहणारा असे केवळ दोनच घटक त्यात नसून सर्व पार्श्वरंगकर्मं विशेषतः दिग्दर्शन, संगीत, प्रकाश, रंगभूषा, वेशभूषा, नेपथ्य ई. नाटकाच्या प्रयोगांचे आयोजन, नाटकाच्या प्रयोगांचे समीक्षण, नाट्य लेखनाचे समीक्षण, इत्यादी सर्व पार्श्व घटकांचा समावेश त्यात होतो , या पार्श्व घटकांमध्ये जो काही बदल होत जातो तो समाजावर परिणामकारक असतो. समाजात बदलत गेलेल्या घटकांचा नाटकातल्या प्रत्येक घटकावर परिणाम होतच असतो. असा नाटक आणि समाज यांचा ऋणानुबंध आहे. त्यामुळेच कित्येक नाटकांमुळे सामाजिक परिवर्तन झालेले आहे. तर काही नाटकांमुळे सामाजिक परिस्थिती विपरीतही झाली आहे. माणसाची मनस्थिती बदलण्यास अनुकूल आणि प्रतिकूल परिणाम नाटक या दृकश्राव्य घटकातून होत असतो. आणि म्हणून नाटक हे प्रचार आणि प्रसाराचेही माध्यम आहे योगदानाच्या बाबतीतच बोलावयाचे झाले तर नाटकामुळे अनेक प्रथा प्रतिबंधित झालेल्या आहेत. अनेक जीवनाच्या तऱ्हा बदललेल्या आहेत. अनेक वेळा नाटकांनी मार्गदर्शक म्हणूनही भूमिका केलेली आहे. विशेषतः बालनाट्य संस्कार करते, पथनाट्य प्रचार-प्रसार करते सामाजिक नाटकांमधून प्रबोधन होते विनोदी नाटकांमधून मनोरंजन होऊन ऊर्जा मिळते, शोकांत नाटकांमधून अभिव्यक्ती मिळते, प्रायोगिक नाटकातून माणसाच्या जीवनशैलीला वळण लागते. नाटकामुळे इतिहास समजतो, भौगोलिक स्थिती समजते

सांस्कृतिक दर्जा बदलत जातो. राजकीय, आर्थिक परिस्थिती वैज्ञानिक घडामोडी इत्यादी सर्व घटकांवर नाटक भाष्य करते त्यामुळे नाटकाचे सामाजिक परिस्थिती बदलण्यात फार मोलाचे काम आहे .अनेक चळवळींचा इतिहास नाटकामुळे जिवंत राहिलेला आहे. अगदी स्वातंत्र्यलढा हा सुद्धा नाटक या प्रकारामुळे जिवंत राहिलेला आहे. काही वेळा तर नाटकाने वेगवेगळ्या लढ्यांना आर्थिक योगदान दिलेले आहे. आणि आजही नाटकाची ही परंपरा कायम आहे. वेगवेगळ्या सामाजिक योगदानासाठी नाटकांचे प्रयोग लावले आणि केले जातात. माणसा माणसांमधील संबंध सुधारण्यासाठी,चरित्रांचे आदर्श मिळवण्यासाठी नाटकांचा सकारात्मक उपयोग होतो. हे अनेक वेळा सिद्ध झालेले आहे. अशा या बहुआयामी नाटक या प्रकाराचे प्रशिक्षण शिक्षण महाराष्ट्रात विद्यापीठ स्तरावर आणि अनेक महाविद्यालयांमध्ये दिले जाते. त्याचा मराठी रंगभूमीला नेमका काय उपयोग होतो? प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या उपजत गुणांना वळण देण्याचे काम केले जाते. त्याला अधिकाधिक आयाम देण्याचे प्रयत्न प्रशिक्षण करते. वेगवेगळ्या क्लृप्त्याही प्रशिक्षणातून मिळतात. निर्णय क्षमता,उत्स्फूर्तता मुळात सर्जनशीलता आणि सृजनशीलता ही प्रशिक्षणातूनच मिळते त्याला नाटकाचे शिक्षण, प्रशिक्षण अपवाद नाही. विद्यापीठ स्तरावर महाविद्यालयांमधून वेगवेगळया नाट्यशास्त्र विभागातून नियोजित अभ्यासक्रमामुळे जागतिक रंगभूमीची विद्यार्थ्यांना ओळख होते. त्यातील ऐच्छिक घटकांमुळे विद्यार्थी पारंगत होतात. या विषयामुळे व्यावसायिक रोजगार तर मिळतातच पण सांस्कृतिक जीवनशैलीही मिळते. प्रसिद्धी मिळते, म्हणजेच आर्थिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक प्रगती या विषयामुळे होते. विद्यापीठांमधून किंवा महाविद्यालयांमधून नाट्यशास्त्राचे शिक्षण घेणारे विद्यार्थ्यांना केवळ गुणच मिळतात असे नव्हे तर त्यांच्यातील निर्मितीक्षमता, प्रायोगिकता, समायोजन, समयसूचकता, प्रासंगिकता मुख्य म्हणजे कलात्मकता हे गुण विकसितच होतात. त्यांच्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्व बहराला येते सभाधिटपणा आणि अभिव्यक्ती या गुणांची ही वृद्धी या विषयामुळे होते. मुळात नाटक ही सामूहिक कला आहे नाटक करणारा कधी कधी एकटा असला तरी त्याचा परिणाम मात्र सामुदायिक होतो आणि सामुदायिक गोष्टी या सामाजिक असतात. नेमक्या याच सकारात्मक घटकांमुळे विद्यापीठातून किंवा महाविद्यालयांमधून नाट्यशास्त्र शिकलेले अनेक विद्यार्थी मराठी रंगभूमीवर आपले नाव गाजवत असताना दिसतात. विशेषतः मराठी रंगभूमीवर दिग्दर्शक अभिनय क्षेत्रातील विजया मेहता, सुहास जोशी दिग्दर्शक नात्याने आलेले चंद्रकांत कुलकर्णी यांनी मराठी रंगभूमीवर अनेक विक्रम आपल्या नावावर नोंदवलेले आहेत. प्रशांत दळवी या लेखकाने अनेक सामाजिक नाटके लिहून समाजात नाविण्य आणलेले आहे अतुल कुलकर्णी या अभिनेत्याने आपले बहुआयामित्व सिद्ध करून एका अर्थाने नाट्य शिक्षणाचे संस्कार सिद्ध केले आहेत. अभिराम भडकमकर हा लेखक, चिन्मय मांडलेकर, अमृता सुभाष, गीता कुलकर्णी, मुक्ता बर्वे, वर्षा उसगावकर, प्रतीक्षा लोणकर, मकरंद अनासपुरे संदीप पाठक, मंगेश देसाई, कुमार सोहनी इत्यादी अनेक बिनी चे कलाकार हे नाट्यशिक्षणाच्या संस्काराचे उत्तम उदाहरण आहेत. ज्यांनी मराठी रंगभूमीला नवा आयाम देण्याचे आपल्या कर्तृत्वातून सिद्ध केलेले आहे. तसेच लोक रंगभूमीवरील डॉ.गणेश चंदनशिवे यांनी देखील राज्यासोबतच संपूर्ण देशभर आपल्या लोककलेचे अस्तित्व जागवले आहे.

त्यालाही नाट्य प्रशिक्षणाची उत्तम जोड आहे देशीय स्तरावर देशीय स्तरावर राष्ट्रीय नाट्य विद्यालय अर्थात एनएसडी दिल्ली येथून सातत्याने भारतीयच नव्हे तर जागतिक रंगभूमीला योगदान देताना दिसून येते महाराष्ट्राच्या बाबतीत बोलायचे झाले तर मुंबई येथील लोककला विद्यापीठ, पुणे येथील ललित कला केंद्र, संभाजीनगर मधील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील नाट्यशास्त्र विभाग .आणि याच विद्यापीठाअंतर्गत संभाजीनगर मधील सरस्वती भुवन महाविद्यालयातील नाट्यशास्त्र विभाग ,बीड येथील केशरबाई सोनाजी क्षीरसागर या महाविद्यालयातील नाट्यशास्त्र विभाग, अंबाजोगाईतील योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयातील नाट्यशास्त्र विभाग. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथील नाट्यशास्त्र विभाग आणि अनेक खाजगी महाविद्यालयांमधून शिक्षण संस्थांमधून, स्वायत्त विद्यापीठांमधून चालणारे नाट्यशास्त्र विभाग हे व्यावसायिक रंगभूमीला आणि परिणामी समाजाला सातत्याने नाटकाची उंची वाढविणारे मराठी रंगभूमीमध्ये सकस असे योगदान देताना दिसून येत आहेत. केवळ व्यावसायिकच नव्हे तर नाट्यशिक्षणातून नाट्यशास्त्राच्या अनेक शाखांमध्ये संशोधनही केले जाते आहे. या संशोधनामुळे नाटकाच्या तंत्राची बाजू अधिकाधिक अभ्यासली जाते आहे. नवीन शोध लागत आहेत. तसेच नाटकाच्या इतिहासातील परंपरा ,त्यांचे वेगवेगळे दृष्टिकोन, अनेक अभिनेते अभिनेत्री यांच्या रंगकर्माच्या विविध शैली या निमित्ताने अभ्यासल्या जात आहेत. त्यामुळे समाज कोणत्याही दृष्टीने बघो नाटकाच्या शिक्षणामुळे मराठी रंगभूमीवर अनेक अनेक रंगकर्मी लेखक, दिग्दर्शनक, समीक्षक, अभिनेते, रंगभूषाकार, वेशभूषाकार, प्रकाश योजनाकार, नेपथ्यकार, संगीत संयोजक,

पार्श्वसंगीतकार ,नाटकाचे आयोजक म्हणून आपले अस्तित्व सिद्ध करताना दिसून येतात. नाटकाच्या सामाजिक योगदानाचा अतिशय व्यापक विचार त्याच्या अगदी प्रारंभा - पासूनच आपल्याला सांगता येतो. तो म्हणजे मुळात नाटकाची निर्मिती ब्रह्मदेवाने केली तेव्हा सर्वसमावेशकता असावी म्हणून केलेली आहे. समाजातला कोणताही भेदाभेद इथे मानला जाऊ नये, तळागाळातल्या लोकांनाही कुठल्यातरी कला प्रकाराचा एकत्रित आस्वाद घेता यावा या उद्देशाने नाटक जन्माला आले असे म्हटले जाते .

भारतीय संविधानात जसा स्त्री-पुरुष भेद केला जात नाही, किंवा लिंगभेद केला जात नाही तसाच नाटक या कलाप्रकारात सुद्धा अभिनेता आणि अभिनेत्री असे वर्गीकरण नाही यांच्यासाठी कोणत्याही प्रकारची वेगळी आचारसंहिता नाही. हे सगळ्यात मोठे सामाजिक भान नाटक हा कलाप्रकार राखते. शिक्षण आणि नाटक ही दोन्ही क्षेत्रे समाजाच्या हिताची क्षेत्रे यासाठी आहेत की या दोन्ही क्षेत्रांमधून सामाजिक ऐक्य समता बंधुता यांचे संस्कार दिले घेतले जातात आणि वैश्विक ऐक्य राखण्याचा प्रयत्न केला जातो आणि म्हणून नाटकाचे शिक्षण मिळाले किंवा शिक्षित नाट्यकलावंतांकडून समाजाच्या प्रगतीच्याच गोष्टी घडत गेलेल्या दिसून येतात आणि घडत जातील आणि म्हणूनच नाटकाचे प्रशिक्षण हे अतिशय मोलाचे सामाजिक योगदान आहे.

■■

# सर्वसमावेशक समीक्षण

- प्रा. अमोल देशमुख

कोणत्याही कलेचे समीक्षण हा फार महत्वाचा दस्तऐवज असतो. हल्ली समीक्षण करताना बऱ्याच वेळेस केवळ नाटकाचे कथानक लिहिण्याचा प्रघात आहे. कथानक सांगणे आणि त्या कलाकृतीतील चांगल्या घटना तसेच सुधारणा करण्यायोग्य जागांची त्या टीमला जाणीव करुन देणे, ही खरंतर समीक्षकाची अत्यंत महत्वाची जबाबदारी असते. हल्ली माणूस स्वतःमध्ये इतका गुरफटलेला आहे की, स्वतःमधील सुधारणा करण्यायोग्य जागा त्याला इतरांनी सांगितलेली चालत नाही आणि मग सुरु होतो समीक्षणाच्या नावाखाली फक्त स्तुती पाठक अथवा त्या कलाकृतीचे कथानक वाचकांपर्यंत पोहोचण्याचा प्रवास. अलीकडे प्रसिध्द होणारे चित्रपट, वेब सिरीज आणि सगळ्यात महत्वाचे म्हणजे नाट्यप्रयोग या सगळयाच माध्यमाची समीक्षा पथदर्शक म्हणून काम करतील. नाट्यशास्त्र हा विषय शिकताना नाट्य समीक्षक हा एक अभ्यासाचा आणि महत्वाचा विषय आहे. खरे तर नाट्य समीक्षा दोन प्रकारांनी होते, एक साहित्य समीक्षा आणि एक प्रयोग समीक्षा.म्हणजे काही नाटकाचे साहित्य मूल्य खूप छान असतं. आणि काही नाटकांचे प्रयोग मूल्य खूप छान असंत. आता हे सोप्या भाषेत सांगायचं झालं तर ज्या नाटकांचे साहित्य मूल्य खूप छान असतं. त्याच्यामध्ये घटना खूप कमी घडतात त्यातलं शब्द वैभव अनुभवण्यासारखं असतं बहुतेक वेळेला ही नाटकं चर्चात्मकदृष्ट्या किंवा श्रुतिका या पध्दतीने असतात. अर्थातच यालाही अपवाद आहेत आणि काही नाटक प्रयोग दर्जा घेऊन जन्माला आलेली असतात म्हणजे कधी कधी खूप कमी लिखाण त्यामध्ये असतं आणि दिग्दर्शक अभिनेते आणि तंत्रज्ञ नाट्य संहितेला मूर्त स्वरुप देतात. एक आगळावेगळा प्रयोग प्रेक्षकांसमोर साकार होतो. त्यामुळेच प्रत्येक संहितातेला स्वतःचं एक अस्तित्व असतं आणि यातील समज समीक्षकाला असणं फार गरजेचं असतं.

आत्ताचा काळ खूप बदललेला आहे. यामध्ये सगळ्याच पारंपारिक गोष्टी मागे टाकून पुढे आल्या आहेत. त्यामुळेच पन्नास वर्षांपूर्वी ज्या पध्दतीने नाटकं सादर व्हायची म्हणजे फ्लॅट सीन्स, ठराविक पध्दतीचं संगीत, आणि साधारण

कोणत्याही कलेचे समीक्षण हा फार महत्वाचा दस्तऐवज असतो. हल्ली समीक्षण करताना बऱ्याच वेळेस केवळ नाटकाचे कथानक लिहिण्याचा प्रघात आहे. कथानक सांगणे आणि त्या कलाकृतीतील चांगल्या घटना तसेच सुधारणा करण्यायोग्य जागांची त्या टीमला जाणीव करुन देणे, ही खरंतर समीक्षकाची अत्यंत महत्वाची जबाबदारी असते. हल्ली माणूस स्वतःमध्ये इतका गुरफटलेला आहे की, स्वतःमधील सुधारणा करण्यायोग्य जागा त्याला इतरांनी सांगितलेली चालत नाही आणि मग सुरु होतो समीक्षणाच्या नावाखाली फक्त स्तुती पाठक अथवा त्या कलाकृतीचे कथानक वाचकांपर्यंत पोहोचण्याचा प्रवास. अलीकडे प्रसिध्द होणारे चित्रपट, बेब सिरीज आणि सगळ्यात महत्वाचे म्हणजे नाट्यप्रयोग या सगळयाच माध्यमाची समीक्षा पथदर्शक म्हणून काम करतील. नाट्यशास्त्र हा विषय शिकताना नाट्य समीक्षक हा एक अभ्यासाचा आणि महत्वाचा विषय आहे. खरे तर नाट्य समीक्षा दोन प्रकारांनी होते, एक साहित्य समीक्षा आणि एक प्रयोग समीक्षा.म्हणजे काही नाटकाचे साहित्य मूल्य खूप छान असतं. आणि काही नाटकांचे प्रयोग मूल्य खूप छान असंत. आता हे सोप्या भाषेत सांगायचं झालं तर ज्या नाटकांचे साहित्य मूल्य खूप छान असतं. त्याच्यामध्ये घटना खूप कमी घडतात त्यातलं शब्द वैभव अनुभवण्यासारखं असतं बहुतेक वेळेला ही नाटकं चर्चात्मकदृष्ट्या किंवा श्रुतिका या पध्दतीने असतात. अर्थातच यालाही अपवाद आहेत आणि काही नाटक प्रयोग दर्जा घेऊन जन्माला आलेली असतात म्हणजे कधी कधी खूप कमी लिखाण त्यामध्ये असतं आणि दिग्दर्शक अभिनेते आणि तंत्रज्ञ नाट्य संहितेला मूर्त स्वरुप देतात. एक आगळावेगळा प्रयोग प्रेक्षकांसमोर साकार होतो. त्यामुळेच प्रत्येक संहितातेला स्वतःचं एक अस्तित्व असतं आणि यातील समज समीक्षकाला असणं फार गरजेचं असतं.

आत्ताचा काळ खूप बदललेला आहे. यामध्ये सगळ्याच पारंपारिक गोष्टी मागे टाकून पुढे आल्या आहेत. त्यामुळेच पन्नास वर्षांपूर्वी ज्या पध्दतीने नाटकं सादर व्हायची म्हणजे फ्लॅट सीन्स, ठराविक पध्दतीचं संगीत, आणि साधारण प्रकाश योजना या स्वरुपात ही नाटकं सादर होत असायची. पण गेल्या काही वर्षांमध्ये रंगभूमीने सुध्दा आधुनिकीकरण खूप जोमाने स्वीकारलं आहे. नवनविन प्रयोग इथे घडतात. ते अभिनयाच्या बाबतीतले, दिग्दर्शनाच्या बाबतीतले आणि तंत्रांच्या बाबतीतले सुध्दा.तरी या सगळ्यांची माहिती समीक्षकाला असणं खूप गरजेचं असतं पण आपला अनुभव जो आहे, तोच सर्वश्रेष्ठ आहे असं म्हणण्यापेक्षा समोरची कलाकृती संपूर्ण समजून घेणे नैतिक जाबाबदारी समीक्षकाचा असते आणि असे एकदा झालं की, मग त्या समीक्षकाची शब्द पथदर्शक होऊ शकतो. सगळ्याच कलावंतांसाठी पण त्याचबरोबर समीक्षकाला हेही भान राखता आलं पाहिजे की, सगळे कलावंत काहीतरी विचार घेऊन त्या संहितेवर अभ्यास करुन काही महिने तालमी करतात आणि मग प्रेक्षकांसमोर प्रयोग घेऊन येतात. तर त्यामुळे दोन तासात नाटक पाहून लगेच त्याच्यावर बरी वाईट चर्चा करणं किंवा त्या पध्दतीने लिखाण करणं ही समीक्षकाची खरं तर जबाबदारी नाही. तरी समीक्षकांनी त्या नाटकाची प्रोसेस समजून घेऊन त्यांचे प्रयोग करणाऱ्यांची विचार, प्रयोग सादर करणाऱ्या कलावंतांबरोबर विचार विनियम करुन मग आपलं एखादं मत ठरवावं. यामध्ये सुध्दा बहुतेक बऱ्याच वेळेला आपली स्वतःची एक विचारधारा ठरलेली असते, म्हणजे काही समीक्षकांना साहित्यक मूल्य असलेल्या संहिता आवडतात तर काहींना प्रयोग मूल्य असलेल्या संहिता आवडतात. पण हा तटस्थपणा समीक्षकामध्ये यायल हवा आपल्या स्वतः आवडीनिवडी बाजूला ठेवून सातत्यानेरंगभूमीचा, साहित्याचा आणि प्रयोगांच्या नाविन्याचा समीक्षकाचा अभ्यास असायला हवा. त्यामुळे समोरच्या संघाला योग्य ते मार्गदर्शन समीक्षेच्या माध्यमातून होऊ शकते. खरंतर समीक्षा हा विषय तसा सगळ्यांच्या आवडीचा! कारण, सामान्य प्रेक्षकसुध्दा एखादं नाटक, एखादा चित्रपट पाहून आला की त्यावर आपली बरे वाईट मत प्रदर्शित करत असतोच पण ती खूप सापेक्ष असू शकतात. जाणकार समीक्षकाचे मात्र हे मत कधीही एकतर्फी असू नये. म्हणजे समोर जे दिसतं ते कितीही आपल्याला आवडो किंवा न आवडो पण त्या मागील विचार समजून घेण्यासाठी त्या कलाकृतीला थोडासा वेळ देणे, त्याच्यावर विचार करणे अपेक्षित असते.

आज-काल समीक्षण या नावाने वर्तमानपत्रांमध्ये केवळ नाटकाचा सारांश प्रसिध्द केला जातो. कारण, त्यासाठी जाणकार अभ्यासू समीक्षक उपलब्ध नाहीत किंवा जे समीक्षक उपलब्ध आहेत ते सुध्दा आपण किती जाणकार आहोत, हे सिध्द करण्यासाठी नाटकांवर परखड भाष्य करतात आणि त्यामुळे समोरचा संघ नाराज होतो आणि मग शब्दकलह सुरु होतात. त्यामुळे समीक्षकांनी नाटकातील चांगल्या बाबींचा उल्लेख त्याच्या लेखांमधून करायला हवाच. पण त्याचबरोबर नाटकातील सुधारणांच्या बाबींवर सुध्दा त्याने सौम्य शब्दात प्रकाश टाकणे अपेक्षित असतं. त्यासाठी मला 'थ्री इडियट्स' चित्रपटातील एक किस्सा आठवतो की, विद्यार्थ्यांना कमी मार्क पडले की शिक्षकाने कसे वागावं, हे सांगणारा तो किस्सा... समजा एखादा रुग्ण डॉक्टरांकडे गेला तर डॉक्टर त्याला औषध देऊन त्याला त्याच्या आजाराविषयी सगळी माहिती सांगून बरं करण्याच्या प्रयत्न करतात त्यांच्या आजारपणाविषयी चारचौघांमध्ये

बोलून वर्तमानपत्रांमध्ये तो आजार छापून त्या रुग्णाला बरं करणे शक्य नसतं. असंच काहीसं काम समीक्षकाने करणे अपेक्षित असतं. म्हणजे ज्या बाबी आपल्याला सुधारण्याच्या वाटू शकतात. त्या प्रयोगामध्ये त्याने त्या बाबींविषयी चर्चा समोरच्या संघाबरोबर करणे अपेक्षित असतं आणि त्यांचे मत समजून घेऊन ज्या गोष्टी बऱ्या होऊ शकल्या असत्या त्या वर्तमानपत्रात छापण्यापेक्षा त्या संघाबरोबर चर्चा करुन समजावून सांगाव्यात. पण आजकाल असं होताना दिसत नाही समोरच्याचा रोष का ओढवून घ्यावा, म्हणून साधारण कथानकच वर्तमानपत्रांमधून छापले जातं. पण समीक्षण भविष्यामध्ये पूर्वी झालेल्या प्रयोगांचा दस्तदेवज म्हणून उपयोगात आणलं जातं. ह्यालाच कालांतराने आपण इतिहास असे समजतो. त्यामुळे समीक्षकाची जाबाबदारी अत्यंत महत्वाची ठरते. आज आपण ज्या जुन्या नाटकांचा, संगीत नाटकांचा, पाश्चात्य रंगभूमीवरील अनेक नाट्यप्रयोगांचा अभ्यास करतो, तेही कधीकाळी समीक्षण म्हणूनच नोंदवलं गेलं. त्यातील चांगल्या वाईट गोष्टींचा नोंद योग्य पध्दतीने घेतली गेली म्हणूनच आज आपण आपल्या प्रयोगांमध्ये सुधारणा करु शकू शकतो.

अनेक वेळेला वर्तमानपत्रांमध्ये किंवा मौखिक स्वरुपाची समीक्षा प्रसिध्द होते. त्या समीक्षेवरुन प्रेक्षक आपले मत बनवतात आणि चुकीच्या समीक्षेमुळे एखादे उत्तम नाटक पडू शकते किंवा एखादे साधारण नाटक खूप चढू शकते. पण असं व्हायचं नसेल तर समीक्षकांनी स्वतःला तयार करणे खूप गरजेचे आहे. कारण, बहुतेक वेळेला पहिला प्रयोग प्रेक्षकांकडून पाहणं राहून जातं. आणि वर्तमानपत्रामधून झालेल्या प्रसिध्दीनुसार ते पुढचा प्रयोग पाहायचा की नाही, हे ठरवतात.

स्पर्धेतील प्रयोगांच्या बाबतीत समीक्षकांनी थोडं हळूवार असणं अपेक्षित असतं. कारण नाट्य स्पर्धांमध्ये किंवा महोत्सवांमध्ये जे कलावंत सहभागी होतात, त्यातील प्रत्येकालाच पारितोषिक मिळते असं नाही. काही कलावंत अगदी पहिल्यांदा रंगभूमीवर आलेले असतात. त्यामुळे वर्तमानपत्रात त्यांच्या नाटकाबद्दल जे समीक्षण प्रसिध्द झालंय ते समीक्षण ते त्या प्रयोगाची आठवण म्हणून जपून ठेवतात. तर समीक्षकाची जबाबदारी असते की, ही नवीन पिढी त्याच जोमाने कायमस्वरुपी नाटकात रुजावी. त्यासाठी त्यांनी कधी शिकवणीच्या स्वरुपात तर कधी कौतुकाच्या स्वरुपात, त्यांच्या सोबत असणं खूप गरजेचं असतं, अन्यथा परखड लिखाण शैलीमुळे हे नवीन कलावंत रंगभूमीपासून नाटकांपासून कायमचे दुरावले जाण्याची शक्यता अधिक असते. त्यामुळे यंदाच्या या शंभराव्या नाट्य संमेलनाच्या निमित्ताने अनेक नवनवीन प्रयोग संहितांच्या स्वरुपात सादरीकरणाच्या स्वरुपात अनुभवायला पाहायला मिळतील. त्याचबरोबर हे संमलेन समीक्षकांच्या दृष्टीने ही खूप अभ्यासाचे असावे. येणाऱ्या काळात उत्तम उत्तम समीक्षकांच्या रुपामध्ये नाट्यसृष्टीला नवीन मार्गदर्शक लाभावेत. तरच आपल्या सगळ्या नाट्य प्रवाहाला एक बंदिस्त स्वरुप येईल आणि नाटक उत्तम घडत राहिल.

■■

# दोड्डाटा ते संगीत नाटक : सीमा भागातील नाट्य परंपरा

–जगन्नाथ हुक्केरी

ग्रामदैवतांच्या यात्रेत मनोरंजन आणि रामायण, महाभारताची माहिती व्हावी, या उद्देशाने बैलाट–दोड्डाटा केले जायचे. त्यातून नाट्य परंपरा सुरु झाली. पुढे त्याची जागा संगीत नाटकाने घेतली. आज महाराष्ट्र–कर्नाटक गडीनाड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सीमाभागात मोठ्या प्रमाणात कन्नड हौशी नाटकांचे प्रयोग होतात. यातील काही नाटक कंपन्या पार कर्नाटकातील प्रेक्षकांचे मन जिंकत आहेत. यातून अनेक कलाकार आणि लेखकांचाही जन्म झाला आहे. सीमा भागातील ही नाट्यकला कर्नाटकाला भुरळ घालत आहे.

कन्नड रंगभूमीला 'गोम्बी अटाडवरू'(बाहुल्यांचा खेळ), 'भागवत अटाडवरू'(भागवत खेळ) आणि 'यक्षगान अटाडवरू'(यक्षगानाचा खेळ) यासारख्या आविष्कारांची परंपरा आहे. ते खेळ रामायण–महाभारत यांच्यासारख्या

महाकाव्यावर, भागवत पुराणातील विषयांवर बेतलेले असत. 'श्रीकृष्ण पारिजात' नावाचा लोकनाट्याचा आविष्कारही प्रसिद्ध आहे. ते खेळ फलाटावर होतात. 'गोम्बी अटाडवरू'मध्ये काम करणारे कलाकार वेगवेगळया पात्रांसाठी वेगवेगळे मुखवटे वापरतात. 'भागवत अटाडवरू' आणि 'यक्षगान अटाडवरू' मध्ये काम करणारे कलाकारसुद्धा वेगवेगळया भूमिका करतात. नृत्ये करतात. मोठमोठाले संवाद, भाषणे म्हणतात. मुळची भाषा ही संस्कृतप्रचूर कन्नड म्हणजे (हळीगन्नड म्हणजे जुनी कन्नड) आहे. परंतु त्यात काम करणारे कलाकार प्रामुख्याने ग्रामीण भागातील असल्यामुळे, त्यांच्याकडून ग्रामीण कन्नड भाषा सर्रासपणे वापरली जातात. सीमा भागात मोठ्या प्रमाणात बैलाट (दोड्डाट) ऐतिहासिक नाटकांचे प्रयोग आजही होत आहेत. रामायण, महाभारतावर आधारित असलेली ही नाटके सर्रासपणे दक्षिण सोलापूर तालुक्यातील तीर्थ, दिंडूर, आहेरवाडी, धोत्री, वळसंग, बंकलगी, मंद्रुप तर अक्कलकोट तालुक्यातील हालहळ्ळी (अ), जेऊर, हंजगी, चप्पळगाववाडी, कोन्हाळी, नागणसूर, बॅगेहळ्ळी, चप्पळगाव, किणी, घोळसगाव, वागदरी या गावात होत होत्या. आताही काही गावात याची परंपरा सुरु आहे. मोकळ्या जागेवर भले मोठे स्टेज मारुन विनामाईकने बैलाटचे प्रयोग व्हायचे. आजही होत आहेत. भारदस्त आवाज असलेले पैलवान यात भूमिका साकारतात. पार्श्वगायक, तबला, टाळ यावर गीतंही सादर हातात. हालहळ्ळीसह अन्य भागात ही नाटके शिकविण्यासाठी गुरुनाथ गोविंदे हे परिश्रम घेत आहेत. मोडी लिपीसह जुनी कन्नड आणि आणि देवनागरी लिपीत याच्या संहिता हस्तलिखिताच्या स्वरुपात आहेत. या नाटकासाठी वेगळीच स्टेज व्यवस्था आहे. बैलगाड्यांच्या चाकावर लोखंडी पाईप किंवा बांबू आडवी घालतात. त्यावर फळ्या टाकून स्टेज तयार केला. युद्ध आणि द्वद्वांच्या प्रसंगी 'जिगी तय्यातय्या, कडकडतय्यातय्या... तोमना धरीना तो...' हे गाणं मोठ्या आवाजात गायलं जात. या गाण्यात दोन्ही पात्रांना प्रोत्साहन देण्यासाठी 'उडी मार, वेडेवाकडे घे, सोडू नको' असा त्याचा आशय आहे. त्यावेळी पात्र खोक्कललल शाब्बा, अललल... आहे... सारथी' असे बोल मध्ये म्हणतात. यावेळी समोर सूत्रधार म्हणजे सारथी असतो. तोही याच आवेशात बोल म्हणून त्याला प्रोत्साहन देतात. बैलाटासाठी (दोड्डाट) काही ठिकाणी घंगाळ स्टेज मारतात. स्टेजला समोरच्या बाजूला स्टीलचे ताट बांधतात. यामुळे ऐतिहासिक नाटकातील पात्र स्टेजवर नाचताना खळखळ किंवा घरात भांड्याला भांडी आदळून होतो, तसा आवाज येतो. यातून वेगळ्याच पद्धतीचे झंकार उमटतात. यामुळे पात्रासह प्रेक्षकांचा उत्साह वाढतो. दोड्डाट-बैलाटचे प्रयोग आता प्रेक्षकांअभावी कमी झाले असले तरी सीमा भागात संगीत नाटकांची चलती मात्र जोरात सुरु आहे. मोकळ्या जागेवर स्टेज मारुन या नाटकांचे प्रयोग होत आहेत. जंगल, रस्ता, देवस्थान, श्रीमंताचे घर, गरीबाचे घर, जंगलातील रस्ते, पोलिस, न्यायालय, रेल्वे स्थानक असे पडदे असतात. सीननिहाय असे पडदे सोडले जातात. तीन अंकी कन्नड नाटकात सुख, दुःख, विनोद आणि विनाश असे चार भागात असतात. अलीकडे प्रेक्षकांच्या मूडनुसार विनोदावर भर देऊन नाटके लिहिली जात आहेत आणि त्याचे प्रयोगही सादर केले जात आहेत. सीमा भागात यात्रा, उत्सव काळात मनोरंजन म्हणून हे नाटक चालत आले असतेल तरी सोलापूरच्या लिंगशेट्टी मंगल कार्यालयात अनेक व्यावसयिक नाटकांनी चांगलाच जम बसविला होता. यात कमतगीचा वीरशैव नाट्य संघ, गुडेगरी एन. बसवराज राघवेंद्र नाट्य संघ, सुण्णद कंपनी या कंपन्या बराजच काळ नाट्य प्रयोग केले. शिवयोगी श्री सिध्दारामेश्वर, महात्मा बसवेश्वर, कित्तुर चन्नम्मा, सिंधूर लक्ष्मण, शुरहुली कुंभारी धोंडप्पा (शूरवीर कुंभारी धोंडप्पा) कलीत कळ्ळा (सुशिक्षित चोर) ताईय करळू (आईचे ह्दय) वर नोडी हेण्णु कुडु (वर बघून मुलगी द्या), बंजे तोट्टीलू (वांझ पाळणा), संगम दुड्डीन दर्प(पैशाची दादागिरी), रैतन मक्कळू (शेतकऱ्याची मुल), श्रीमंतन सोक्कू (श्रीमंताची मुजोरी), अशा-लता ही नाटके फार गाजली. याच नाटकातून आणि लेखकांचाही जन्म झाला. यात वागदरीचे स्व. इरण्णा गोगाव, तीर्थचे सुभाष फताटे, कुंभारीचे बसवराज चांगले, हालहळ्ळी (अ) चा मी स्वतः जगन्नाथ हुक्केरी (एच. जगन्नाथ) विजयकुमार धरणे, प्राचार्य सिध्दाराम करजगी यांची कन्नड नाटके कन्नड साहित्य अकादमीने प्रकाशित केली आहेत. ग्रंथालय विभागाने ही नाटके खरेदी केल्यामुळे कर्नाटक सरकारची मान्यता असलेल्या वाचनालयांमध्ये या सीमाभागातील नाट्य लेखकांच्या पुस्तकांना स्थान मिळाले आहे.

महात्मा बसवेश्वर नाटकाचे प्रयोग सोलापुरात झाले. त्यामुळे स्टेजवर हत्ती, घोड्यासह अन्य प्राण्याचा लवाजमा होता. हे प्रसंग पाहून प्रेक्षकांच्या अंगावर शहारे यायचे. कित्तूर चन्नमा नाटकामध्ये पोलीस ठाणे पेटवून देण्याचा प्रसंग तर हुबेहुब साकारण्यात आला होता. सीमा भागात सोलापूर अन्य ठिकाणी नाट्य संघ आहेत. त्यात अक्कलकोटमधील श्री स्वामी समर्थ नाट्य संघ, कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष शंकर म्हेत्रे यांच्या नेतृत्वाखालील दुधनीत बालाजी नाट्य संघ कार्यरत आहे. वडगाव, वळसंग, श्री. सिध्देश्वर नाट्य संघ-सोलापूर, जय हनुमान नूतन नाट्य-हालहळ्ळी (अ) मंद्रुप, बोरी उमरगे, मिरजगी, ईब्राहीमपूर, तोळणूर, सलगर, करजगी, शिरवळ, पानमंगरूळ, तोरणी, भोसगा, नागूर,

बसवन संगोळगी, तडवळ, तर मंगळवेढा तालुक्यात सलगर, बोराळे, हुलजंती, सिध्दापूर, सोड्डी, शिवणगी, या भागात आजही कन्नड संगीत नाटकाचे प्रयोग होत आहेत. या पार्श्वभूमीवर जर आपण कर्नाटकातल्या नाटकाचा इतिहास तपासून पाहिला, तर 'मित्रावींदा गोविंदा' हे तिथलं पाहिलं नाटक असल्याचं दिसून येतं. तथापि, संशोधकांच्या म्हणण्यानुसार या नाटकाच्या आधीसुध्दा नाटकं लिहिली गेली असावीत. पण कन्नड रंगभूमी अनेक अर्थाने समृध्द बनली आहे. म्हैसूर, मंगळूर, कारवार आणि आसपासच्या प्रदेशात होतात. महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवरील विजयपूर, कलबुर्गी जिल्हातील आळंद, अफजलपूर, चडचण, इंडी, माशाळ, सिंदगी, सुरपुर या कर्नाटकातील भागात हौशीबरोबरच कमर्शियल प्रयोग होतात. याच भागातून कन्नड नाटकांचे आगमन अक्कलकोट, दक्षिण सोलापूर, मंगळवेढा, सोलापूर शहरात झाले. या भागात अनेक नाट्य संस्था स्वातंत्र्यपूर्व काळापासून कार्यरत आहेत. मैंदर्गी येथील श्री श्री श्री जगद्गुरु पंचाचार्य नाट्य संघाची स्थापना नाटकांचे प्रयोग होत होते, जुन्या काळातील मंडळीच्या मते ब्रिटिश सरकारच्या काळात बंधने झुगारुन आणि त्यांची परवानगी घेऊन अक्कलकोट तालुक्यातील जेऊर, वागदरी, मैंदर्गी येथे नाटकांचे प्रयोग व्हायचे. हे प्रयोग गावाच्या यात्रेत केले जायचे. मनोरंजनाबरोबरच समाज प्रबोधन हा या नाटकाचा उद्देश होता. त्यातून सीमावर्ती भागामध्ये नाटयचळवळ उभी राहत गेली. महाराष्ट्रातील पण कन्नड भाषिक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अक्कलकोट, दक्षिण सोलापूर, मंगळवेढा तालुक्यातील सीमा भागात अनेक मोठमोठ्या नाट्य संस्था उभ्या राहिल्या. त्या लोकाश्रय तर मिळालाच. शिवाय स्थानिक श्री शिवचलेश्वर आणि काशिलिंग यात्रेत महिनोन् महिने नाटकाचे प्रयोग चालायचं मैंदर्गीतील नाट्यकलेला प्रेक्षकांबरोबरच संत, मंहत, आणि लोकप्रतिनिधी, उद्योजकानी प्रोत्साहन दिले. मल्लिकार्जुन मड्डे, ओंकार बुरुड यांच्यासह सहकारी आजही कन्नड रंगभूमीसाठी धडपडत आहेत. मैंदर्गीची कर्नाटकात मोठ्या प्रमाणात प्रेक्षक वर्ग आहे. बदामी, कलबुर्गी, चिंचणी विजयपूर येथे आहे. इंडी, रायचूर, म्हैसूर येथील प्रेक्षकांच्या पसंतीला उतरली आहे. जेऊर येथे पंचायत समितीचे माजी सभापती कै. काशीरायाकाका पाटील यांची १०० वर्षीपूर्वी श्री शंकरलिंग नूतन नाट्य संघ सुरु केला आहे. आताही ही संस्था कार्यरत आहे. आजही दिवाळी कालावधीत होणाऱ्या यात्रा महोत्सवात नाटकाचे प्रयोग होतात. त्याची धुरा त्यांचे पुतणे महांतेश्वर पाटील, महांतेश पुजारी सांभाळत आहेत. वागदरीत तर कुस्त्यांच्या आखाड्यामध्ये नाटकाचे प्रयोग व्हायचे कन्नड अभिनेते स्व. सुधीर यांच्यासह अनेक दिग्गज अभिनेते अभिनेत्रींनी वागदरी, जेऊर येथील नाटकात येऊन अभिनय केला आहे. आताही कन्नड चित्रपट सृष्टीतील नट-नट्या सीमाभागातील गावातील नाटकात काम करतात.

# विदर्भातील नाट्यसंस्कृती : झाडीपट्टी रंगभूमी

-रोशन नंदवंश

महाराष्ट्राच्या पूर्वेकडील चंद्रपूर-गडचिरोली, भंडारा-गोंदिया या चार जिल्ह्यांचा प्रदेश पूर्व विदर्भ म्हणून गणला जातो. या चारही जिल्ह्यांना वेढून अविरत वाहणाऱ्या वैनगंगेचे खोरे असलेला हा संपूर्ण प्रदेश घनदाट जंगलाने व्यापलेला असून तो 'झाडीमंडळ' नावाने ओळखला जायचा. प्रचंड घनदाट जंगले, विपुल वनसंपदा, छोट्या छोट्या नद्या, नाले मध्येच एखादे गाव, गावालगत तलाव व कसण्यासाठी मोकळी केलेली सुपीक जमीन अशा या झाडीप्रदेशावर निसर्गाची जणू मुक्त उधळण झालेली आहे. प्रामुख्याने धानाचे पीक घेणे आणि वनसंपत्तीवर आधारित व्यवसाय करणे, हे या प्रदेशातील जनजीवनाचे पारंपारिक वैशिष्ट्य आहे.

वर्तमानात हा प्रदेश 'झाडीपट्टी' या नावाने महाराष्ट्रात चर्चेचा विषय ठरला आहे. या पट्ट्यातील लोकजीवन, लोकसंस्कृती, लोककला आणि लोकबोली अर्थात 'झाडीबोलीने' अनेक भाषाप्रेमी रसिक-वाचकांना भूरळ घातली होती. 'झाडीपट्टी' या शब्दाचा शब्दशः अर्थ झाडांनी व्यापलेला असा पट्टा (नेपश), की ज्यात घनदाट जंगले, मध्येच सुपिक जमीन-गवताळी, छोटी मोठी गावे आणि त्यालगत छोटी मोठी झाडे असा भूभाग, या परिसरातील लोकांनी शेकडो वर्षापासून लोकनाट्यकला, गेल्या शंभर वर्षापासून येथील लोककलावंत 'नाटक' या कलाप्रकारात आपल्या हृदयात मानाचे स्थान देत रंगदेवतेची समर्पित भावनेने आराधना करीत आहेत. जून ते ऑक्टोबर या काळात धानाचे पीक घेण्यासाठी रोपांची लावणी ते मळणी; आणि जेव्हा उसंत मिळेल तेव्हा लोकजीवनाशी निगडीत नाटकांच्या संहितांचा शोध घेणे, निवडलेल्या नाटकाचा प्रयोग सादर करण्यासाठी कलावंत, वेशभूषा-रंगभूषा यापासून ते रंगमंचाशी निगडीत सामनाची जुळवाजुळव करणे यात नाट्यप्रेमी मंडळी व्यस्त असतात, शेतीपिकांचा सुगीचा काळ म्हणजे दिवाळी ते होळीपर्यंत. नाटके सादर करणे आणि लोकांना रात्रभर जागून त्या नाटकाचा आस्वाद घेणे....असा आजवरचा झाडीपट्टीतील नाट्यप्रवास. येथील प्रत्येक माणूस जसा नाट्यरसिक आहे. तसाच त्याच्यात एक सर्जनशील नाट्यकलावंतही दडलेला आहे. नाट्यसादरीकरण आणि आस्वाद हा येथील लोकांच्या केवळ रंजनाचा भाग नसून ती त्यांची पारंपारिक अभिरुचीसंपन्न जीवनशैली आहे; रंगदेवतेची आराधना ही त्यांच्या सांस्कृतिक उन्नयनाची सामूहिक प्रक्रिया आहे. या निर्मिती-आस्वाद प्रक्रियेत प्रत्येक गावातील तळागाळातील गरीब-आदिवासी स्त्री-पुरुषांपासून श्रीमंत-पाटील मंडळीतील आबाल-वृद्धांपर्यंत सर्वच लोक तन-मन-धनाने सहभागी होत असल्याने 'झाडीपट्टी रंगभूमी' एक विलक्षण लोकचळवळ झाली आहे.

झाडीपट्टीत दऱ्याखोऱ्यात राहणारा मूळ आदिवासी-बहुजन समाज भौतिक विकासाच्या दृष्टीने अजूनही खूप मागे आहे. गावांपर्यंत बारमाही वाहतूकीचे रस्ते नाहीत. प्रसारमाध्यमांचे जाळे जगभर पसरले. पण त्यांचे नेटवर्क इथे पोचले नाही. टी.व्ही. सारख्या अद्ययावत साधनांपासून येथील लोक वंचित असल्याने आधुनिक ज्ञान-माहिती-मनोरंजनाच्या सुविधांपासून कोसो दूर आहेत. म्हणूनच दिवसभर राबराब राबल्यानंतर विरंगुळा म्हणून, श्रमपरिहार करण्यासाठी कित्येक वर्षापासून आपल्या पारंपारिक लोककलांची जपणूक येथील प्रत्येक माणूस करीत आला आहे. भिंगीसोंग, दंडार, राधा, दंडीगान, खडीगंमत, डाहाका, कथासार, गोंधळ, बैठकीचे पोवाडे ही त्यांची पारंपारिक मनोरंजनाची व त्यांना साजेशा मंचावरील कलाभिव्यक्तीची साधने होती. या अभिव्यक्ती माध्यमांना शेकडोहून अधिक वर्षाची लोकपरंपरा लाभली असून यातूनच आजच्या झाडीपट्टी रंगभूमीवरचे नाटक उत्क्रांत होत गेलेले आहे. या रंगभूमीला लोकनाट्यकलांचा दैदिप्यमान वारसा आहे. तिचे मर्मस्थान, बलस्थान न ओळखताच या रंगभूमीला आदिवासी-बहुजनांची मागासलेली रंगभूमी म्हणून उच्चभ्रू साहित्यिकांनी, नाट्यरसिकांनी हिणविणे गैर आहे. तुलनात्मदृष्ट्या गौण ठरविलेल्या या उपेक्षित झाडीपट्टी रंगभूमीचे अंतरंग उलगडून दाखविण्यापूर्वी तिच्या पूर्वरंगाचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते. झाडीपट्टीतील रंगमंच रचना :

गावातील मोकळ्या पटांगणावर खुर्च्यांसाठी (४००-५००) खड्डा खणूण, ती माती समोर टाकून

रंगमंचाचा उंचवटा तयार केला जातो. मग स्टेजवर सहा मोठे लाकडी खांब उभे करून वर आडवे खांब बांधून व मध्ये बांबूचा उपयोग करून स्टेज तयार केला जातो. प्रेक्षकासाठी मंडप उभारून त्यावर झाडाच्या डहाळ्या टाकल्या जातात. सभोवताली पाल बांधली जाते, अशी ३-४ हजार प्रेक्षक बसण्याची सोय केली जाते. रंगमंचावर मंडळाचे नाव असलेली पट्टी, अंक पडदा, त्यामागे प्रवेश पडदा, बगीचा, महाल, जंगल, गुहा असे वेगवेगळे सीन असलेले पडदे बांधले जातात. झाडीपट्टी रंगभूमीवर पक्क्या रंगमंचाची सोय नाही व एका गावात एका वेळी अनेक नाटके होत असल्याने ही तात्पुरत्या रंगमंचाची उभारणी लोकांनी केली व आपली गरज भागविली. गावागावात निरनिराळी नाट्यमंडळे असतात. स्पर्धात्मक वातावरण असते. पण राजकारण नसतं. राजकीय पक्ष, जातीय समीकरणे यात नसतात. म्हणून 'सर्वधर्मसमभाव' या नाट्यमंडळात दिसतो. कधी कधी एकाच नाटकात गर्दी पेलवणार नाही, म्हणून एक गरज म्हणून अनेक नाटके एकाचवेळी सादर करावी लागतात. रंगमंचाच्या बाबतीत आधुनिक तंत्राचाही वापर व्यंकटेश नाट्यमंडळ नवरगाव यांनी १९८१ मधे फिरता रंगमंच तयार केला. यानंतर विसोरा येथील बालगोपाल संगीत नाट्यमंडळाने सहजगत्या, फिरणारा व फोल्डींगचा रंगमंच १९८५ मध्ये तयार केला. डॉ. हरिश्चंद्र बोरकर यांनी १९७९ मधे जुळा मंच रेंगेपार कोहळी येथे तयार करुन इतिहास घडविला. पुढे त्यांचा दुमजली रंगमंच तयार करण्याचा संकल्प आहे.

संगीत हा या रंगभूमीचा आत्मा आहे. संगीतविरहित नाटक ही कल्पनाच इकडचा प्रेक्षक सहन करीत नाही. त्यामुळे सामाजिक नाटकामध्ये देखील संगीत नाट्यपदे याच रंगभूमीवर आपल्याला दिसतात. हार्मोनियम, तबला, ताल, ढोलकी, डहाका, ढोल, ताशा, व्हायोलिन, बुलबुल, तरंग, बासरी यांचा वापर संगीतासाठी केला जातो. संगीत व नाट्यगीताशिवाय नाटकच नाही ही येथील प्रेक्षकांची ठाम धारण आहे. संगीत आणि नृत्य हा या रंगभूमीचा प्राण आहे. नाट्य संगीतामध्ये पार्श्वसंगीतासाठी आधुनिक वाद्याचा, सिंथेसायझरचा वापर सर्वप्रथम प्रा. श्रीकांत नाकाडे यांनी केला. पुढील काळात हार्मोनियमची जागा सिंथेसायझरने घेतली. आज याच्याच जोडीला ऑक्टोपॅडसुद्धा आलेला आहे. स्त्री आणि पुरुषांसाठी नाट्यगृहात बसण्याची वेगवेगळी स्वतंत्र व्यवस्था असते. स्त्रियांच्या तिकीटांचा दर पुरुषांपेक्षा कमी असतो. गावातील प्रतिष्ठित लोकांना मानपत्र दिले जाते. बैठकीसाठी गादी, दरी यांचा वापर केलेला असतो. ध्वनीप्रकाश योजनेसाठी डेकोरेशनवाले असतात. रात्री १० पासून सकाळपर्यंत नाट्यप्रयोग सुरु असतो. नाटकातील अंकामधे मानपत्रवाले व नातेवाईक मंडळी मंडळाला बक्षीस देतात. ज्या कलाकारांचे काम आवडले त्यांनाही बक्षिस देतात. नातेवाईक मंडळी आपल्या नातेवाईकांना बक्षिस देतात. यामुळे नाटकाचा मध्यंतर लांबत जातो. एका गावात एकाच वेळी १२-१३ नाटके झाल्याचा इतिहास आहे. परंपरेने ठरलेल्या वेळी जर नाटक झाले नाही तर नंतर केलेल्या नाटकांना तेवढा प्रतिसाद मिळत नाही. म्हणून नाटक आणि शंकरपट परंपरेने ठरलेल्या वेळी झाले पाहिजेत, यावर कटाक्ष असतो. या निमित्ताने येणारा प्रेक्षकवर्ग वेगवेगळ्या कारणांनी येतो. सोयरसंबंध, गाठीभेटी व अन्य व्यावहारिक गोष्टी यातच पक्क्या होतात. घरोघरी पाहुण्यांची वर्दळ असते. रात्रभर जागरण करुनही घरातील स्त्रिया मोठ्या उत्साहाने आणि आनंदाने पाहुण्यांचे आदर-आतिथ्य करतात. यानिमित्ताने परस्पर स्नेहसंबंध आणखी दृढ होत जातात. गावात कोंबडी, बकरे कापले जातात. हजारोंची आर्थिक उलाढाल होते. हा सांस्कृतिक व आर्थिक संदर्भसुद्धा नाटकांच्या निमित्ताने लक्षात घेतला पाहिजे.

झाडीपट्टी रंगभूमीचे नामकरण :

विसोरा येथील बांबू पेंटिंगचे सुप्रसिद्ध चित्रकार स्व. धनंजय नाकाडे यांनी एका नाटकातील उद्घाटकीय भाषणात हा 'झाडी प्रदेश' आहे व येथील कलावंत पट्टीचे कलावंत आहेत. आपल्या अभिनयातून या रंगभूमीला गौरव प्राप्त करुन दिला आहे म्हणून या झाडीतील पट्टीचे कलावंत असलेल्या या रंगभूमीला 'झाडीपट्टी रंगभूमी' हे नाव देणे उचित ठरेल असे सांगून आपल्या या विधानाचा अनेकदा उद्घाटकीय भाषणातून उल्लेख केला आणि वर्तमानपत्रात

लेख लिहून 'झाडीपट्टी रंगभूमी' हे नाव नावारुपात आणले. या रंगभूमीची खरी ओळख करुन देण्याचे श्रेय स्व. धनंजय नाकाडे यांनाच जाते.

परंपरेने चालत आलेल्या या नाटकांमध्ये तंत्रविषयक फार करता येत नाही. तरी देखील ट्रिकसीनचा वापर बऱ्याच प्रमाणात दिसतो. जसे महाभारतातील जयद्रथ वध, कृष्णाने सुदर्शन चक्र सोडून सूर्याला झोकाळून टाकणे, अर्जुनाच्या बाणाने जयद्राथाचा शिरच्छेद होणे, त्याचे शीर उंच उडून जमिनीवर पडणे, राणी लक्ष्मीबाईचा महाराणी, पद्‌मिनीचा अग्निप्रवेश, धगधगता अग्निकुंड प्रत्यक्ष रंगमंचावर दाखवणे, रंगमंचावर जळून भस्म होणे, हिरण्यकश्यपू स्वर्गातून खाली उतरणे, तुकाराम सदेह विमानात बसून स्वर्गात जाणे, मुचकुंद ऋषी डोळ्यातून अग्नीवर्षाव करुन कालववनाला भस्म करणे, नरसिंह अवतार, रावणवध, तंट्या भिल्लाची फाशी, जरासंधाला उभा चिरुन त्याचे तुकडे दोन विरूद्ध दिशांना फेकणे, ज्ञानेश्वरांनी भिंत चालवणे अशा अनेक ट्रिक सीन बरोबर नाटकात जिवंतपणा येण्यासाठी सजीव प्राणी, पशू, पक्षी, साप प्रत्यक्षात रंगमंचावर आणणे, जसा यमाचा रेडा, शंकुतलेचे हरिण शावळ, महामृत्युंजय मार्कंडेश्वर नाटकात बालमुनी मार्कंड गळ्यात १५ किलो वजनाचा अजगर अडकवून ध्यानस्थ बसणे. 'जत्रा घडली नागोबाची' मधे जिवंत साप, मरीमाईच्या भुत्यामधील घुबड, बेलभंडारमधे जिवंतपक्षी अर्जुनाच्या रथासाठी घोड्यांची जोडी, राणी लक्ष्मीबाईचा घोड्यावरून प्रवेश व लढाई, महानंदा नाटकातील शंकराच्या नंदीसाठी बैल, कुत्रा अशा अनेक प्राण्यांचा वापर झाडीपट्टी रंगभूमीवर केला गेला आहे.

प्रेक्षक एवढे जाणकार की जुने पौराणिक, ऐतिहासिक संपूर्ण नाटक त्यांना पाठ असते. रंगमंचावरील नट अभिनयात, संवादात काही चूक करत असेल तर प्रेक्षकांकडून त्यांना तिथेच दुरुस्त केले जाते. यासाठी मग अडाणी, निरक्षर लोकांना संवाद पाठ करायला लावणे, त्याचे स्पष्ट, शुद्ध उच्चारण करणे, नाट्यपदे पाठ करून चाली लावणे, यासर्वांची कसून तालीम घेणे आणि आपले नाटक लोकांच्या पसंतीला उतरेल यासाठी कसून मेहनत घेणे हे या कलावंतांना क्रमप्राप्त आहे. झाडीपट्टीत खास स्त्रियांनी सुद्धा संचात धार्मिक, सामाजिक, संगीत नाटके सादर करुन आपणही काही कमी नाही हे दाखवून दिले आहे. आज झाडीपट्टीत प्राचार्य सदानंद बोरकर, डॉ. हरिश्चंद्र बोरकर, चुडाराम बल्हारपुरे, व्ही. दिलीपकुमार यांच्यासाठी सिद्धहस्त नाटककार मंडळी आहेत. यामुळेच झाडीपट्टी रंगभूमीचे भवितव्य उज्वल आहे. यात शंका नाही. सदानंद बोरकर यांच्या 'आत्महत्या' या नाटकाला ४ लाखाचे बुकींग झाले होते. एवढेच नव्हे तर हे नाटक सार्क इंटरनॅशनल महोत्सव, केरळ येथील थ्रीसुर येथेही सादर झाले. यांच्याच 'माझं कुंकू मीच पुसलं' या नाटकाचा एकाच स्टेजवर सतत दहा दिवस प्रयोग चालला होता. प्रेमकुमार यांच्या 'भूक' या नाटकाचे ३५० प्रयोग झालेत. तसेच शेखर पटले या कलावंताने 'लाल चुडा' या चित्रपटात भूमिका केली. झाडीपट्टी रंगभूमीचा हा सुवर्णकाळ आहे.

झाडीपट्टी रंगभूमीची वैशिष्ट्ये :

१. फिरता रंगमंच
२. जुळा रंगमंच
३. विविध चमत्कृतीपूर्ण ट्रिक सीन्सचा उपयोग

झाडीपट्टी रंगभूमीचे वैशिष्टय म्हणजे येथे पुणे मुंबईहून आलेल्या कलावंताना जसे मानधन मिळते तसेच स्थानिक कलावंताना मानधन मिळते. मोहन जोशींपासून मकरंद अनासपुरे सारख्या मोठमोठ्या कलावंतानी या रंगभूमीवर काम केले आहे. नागपुरातील सगळी कलावंत मंडळी इथं काम करतात. विदर्भातील प्रत्येक कलावंत यारंगभूमीवर काम करतो. या चार महिन्यात पूर्ण वर्षाचा उदरनिर्वाह झाडीपट्टी कलावंताना ही रंगभूमी देते. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे उपाध्यक्ष नरेश गाडेकर त्यांचे बाबा आणि त्यांच्या पत्नीनेही या झाडीपट्टीत आपला ठसा उमटवलेला आहे.

अशी ही झाडीपट्टी रंगभूमी कलावंत व प्रेक्षकांसाठी संजिवनी ठरली आहे. हे मात्र नक्की.

■■

# जनजागृतीचे प्रभावी माध्यम : पथनाट्य

–आशुतोष नाटकर

'पथनाट्य' किंवा 'स्ट्रीट प्ले' हा नाटकाचा एक महत्त्वाचा प्रकार आहे. पथनाट्य हे रस्त्यावर किंवा चौकाचौकांत चालत असले तरी, आज रस्त्यावर चालणाऱ्या गारुड्याच्या किंवा डोंबाऱ्याच्या खेळांना कुणी पथनाट्य म्हणत नाही. पथनाट्य हा निव्वळ करमणुकीचा प्रकार नव्हे, पथनाट्य निर्हेतुक नसते. विशिष्ट सामाजिक अथवा राजकीय विचार जनमानसात पोहोचवण्याचे काम ही पथनाट्ये करत असतात. ती एक सामाजिक चळवळ आहे. विशिष्ट विचारसरणी असलेले कलाकार आपल्या अभिनयाद्वारे त्यांचा विचार पसरवण्याचे काम अशा पथनाट्याद्वारे करत असतात. रस्त्यावर निघणारा मोर्चा, घेराव, जाहीर सभा यापेक्षा पथनाट्य वेगळे आहे. आर्थिक-सामाजिक विषमता, स्त्रियांवरील अत्याचार, स्त्री शिक्षण, पोलिसांची दडपशाही, सरकारची अकार्यक्षमता, नोकरशाहीची चालढकल वृत्ती, धार्मिकतेचे स्तोम, भ्रष्टाचार, पर्यावरणाचा प्रश्न, व्यसनाधीनता, सामाजिक प्रबोधन, स्वच्छता, पर्यावरणाचे संरक्षण, आरोग्य विषयक जागृती, शासनाच्या योजनांविषयी जनजागृती आदी अनेक विषयांवर ही पथनाट्ये भाष्य करून रस्त्यावरील प्रेक्षकांमध्ये जागृतीचे काम करीत असतात. पथनाट्याच्या कलावंतांना उंच स्वरात बोलावे लागते. त्यांचा सारा भर अभिनयापेक्षा प्रेक्षकांना प्रश्नाची जाणीव करून देण्यात असतो. आपल्या आकर्षक आणि चटकदार संवादांतून रस्त्यावरील प्रेक्षकांना जखडून कसे ठेवायचे, यातच त्या कलावंतांचा सगळा प्रयत्न असतो. आणि अभिनयाचा हा एक उत्तम मार्गसुद्धा आहे.

दर वर्षी पाच नोव्हेंबरला रंगभूमी दिनाच्या निमित्ताने नाट्यसमर्पित ह्या संस्थेतर्फे अहमदनगरचे डॉ. रवींद्र चव्हाण हे राज्यपातळीवर पथनाट्य स्पर्धा घेतात. यापूर्वी भोपाळमध्ये १९८४ साली तिथल्या रंगमंडल या संस्थेने अखिल भारतीय पथनाट्य शिबिर भरवले होते. मुंबईच्या जागर ह्या संस्थेने अनेक पथनाट्ये सादर केली आहेत. भारताच्या तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी लादलेल्या आणीबाणीच्या निषेधार्थ त्या संस्थेने मुंबईच्या बोरीबंदरजवळ एक पथनाट्य सादर केले होते. पोलिसांनी हातात दंडुके घेऊन तो नाट्यप्रयोग बंद पाडायचा प्रयत्न केला. परंतु जमावाने पोलिसांना अडवले आणि रिंगणाच्या आत पाऊल टाकाल तर खबरदार' असा दम दिला होता, आणि पोलिसांना माघार घेणे भाग पाडले होते. लातूर जिल्ह्यातील किल्लारी येथील भूकंपाच्यावेळी प्रा. दिलीप महालिंगे यांनी 'जादूगार' या पथनाट्याचे जवळपास ५०० प्रयोग करून त्यातून मिळालेली रक्कम भूकंपग्रस्तांना दिली होती. या भूकंपाची तीव्रता इतकी अधिक होती की, प्रत्येकाला बाधितांसाठी काहीतरी करावे वाटत होते. एका भिकारी महिलेने हे पथनाट्य पाहून तिच्या झोळीत असलेले व पैसे या पथनाट्य कलावंताच्या झोळीत टाकले होते. लोकशाहीर बशीर मोमीन (कवठेकर) यांनी

समाजोपयोगी ज्वलंत विषयांवर पथनाटये लिहिली आणि जनजागृतीसाठी ती संपूर्ण महाराष्ट्रात सादर केली. विक्रम फलटणकर यांनी दोनशेहून अधिक पथनाट्यांची कथानके लिहिली आहेत प्रत्येक वर्षी त्यांचे पथनाट्याचे प्रयोग होतात. त्यांची 'पथनाट्य एक रंगमंच' नावाची एक संस्था आहे. २६ नोव्हेंबर २०१७ रोजी मुंबईमध्ये विक्रम फलटणकर यांनी 'विक्रम फलटणकर प्रेझेंट्स एक न संपणारे पर्व पथनाट्य' नावाच्या एका रंगमंचाची स्थापना केली. या माध्यमातून त्यांनी साडेचार हजाराहून अधिक पथनाट्य सादर केली आहेत

पथनाट्य चळवळ ही दलित रंगभूमीच्या माध्यमातून महाराष्ट्रातून सन १९७९ पासून प्रथमच सुरु झाली दलितांचं मागासलेपण हे आजही सर्वदूर पसरलं आहे, हे पथनाट्याद्वारे दाखवण्यात येऊ लागलं भाषावाद, प्रांतवाद, जातीयवाद, धर्मवाद, नामांतर, रिडल्स अशा विविध विषयांवर मुंबई, नागपूर, पुणे, औरंगाबाद, नाशिक, सोलापूर या जिल्ह्यांमधून पथनाट्य, अंगणमंच आजपर्यंत जिवंत ठेवण्याचं कार्य हे अंगद रामटेके, कमलाकर दहाट, दादाकांत धनविजय, संजय जीवने, केवल जीवनतारे, पल्लवी वहाणे, वंदना कौटुंबे, शिल्पा मुंब्रिसकर, अविचल धिवार, प्रा विठ्ठल शिंदे, डॉ विलास कांबळे, प्रमोद लांडगे, प्रा संजय लांडगे, अनुपम नगरकर, तक्षशिला वागधरे, माधुरी चहांदे, आशुतोष नाटकर हे आजही पथनाट्याद्वारे जनजागृती करत आहेत.

महाराष्ट्राखेरीज बंगाल, मणिपूर व केरळ या राज्यांत पथनाट्य चळवळ जोमात आहे. ब्रूनो एकाईट, बॉब अर्न्सट्थल पीटर स्च्यूमन या तिघांनी १९६३ मध्ये अमेरिकेत न्यूयॉर्क येथे स्थापन केलेल्या 'ब्रेड ॲन्ड पपेट थिएटर'तर्फे जगभर पथनाट्ये होतात. व्हिएतनामच्या युद्धाविरुद्ध जनमानस तयार करण्यासाठी या संस्थेने अथेन्स, आयर्लन्ड, इटली, उत्तर आफ्रिका, ऑस्ट्रेलिया, बार्सिलोना आणि लॅटिन

अमेरिकेत अनेक पथनाट्ये सादर केली होती. भारतातील पथनाट्य चळवळीचा इतिहास हा सफदर हाश्मी यांच्या योगदानाच्या उल्लेखाशिवाय पूर्णच होऊ शकत नाही. जवळपास ४००० पथनाट्याचे प्रयोग करणाऱ्या या रंगकर्मीला हल्ला बोल या पथनाट्याचे सादरीकरण करताना मृत्यूने कवटाळले. सफदरला बंदुकीच्या गोळ्या घालून ठार मारले गेले. पथनाट्याला 'सडक नाटक' तसेच नुक्कड नाटक म्हणूनही ओळखले जाते.

तुम्ही कोणत्याही महानगरात रहात असाल तर, गर्दीच्या सार्वजनिक ठिकाणी, विशेषतः सुट्टीच्या दिवशी आणि शनिवार व रविवारच्या दिवशी, विनामूल्य सादर केल्या जाणाऱ्या नाटकाचे साक्षीदार, अगदी उघड्यावर, हे तुमच्यासाठी किरकोळ आहे.

बहुतेक पथनाट्ये त्यांच्या आचरणामागे विशिष्ट उद्देश ठेवून सादर केली जातात. सहसा मानव, पर्यावरण किंवा काही विशिष्ट चालू बाबीवर परिणाम करणाऱ्या समस्यांबद्दल जागरुकता निर्माण करणे हे पथनाट्य सादर करण्यामागील ध्येय असते. पथनाट्य हे एक विशिष्ट पैसे देणाऱ्या प्रेक्षकांशिवाय, सार्वजनिक ठिकाणी नाट्यप्रदर्शन आणि सादरीकरणाचा एक प्रकार आहे. पथनाट्य हे निखळ मनोरंजनाबरोबरच जनजागृतीचे प्रभावी माध्यम आहे.

■■

# बाल व शालेय रंगभूमी

-डॉ. मीरा शेंडगे

बालरंगभूमी व शालेय रंगभूमी ही बालकाच्या सादरीकरणाशी निगडीत असून व्यक्तिमत्व विकास, समज वाढवणे हा या दोहोंचा समान धागा आहे. मनोरंजन. मनोरंजनातून प्रबोधन, समस्या प्रकटीकरण त्याचे निराकरण असे विविध पैलू नाटकाच्या सादरीकरणातून साध्य केले जातात. पण निव्वळ बालरंगभूमी ही रंजन हेतूने प्रेरित आहे. नाचणं, गाणं, ढोंग करणं, सोंग वठवणे (नाट्य अभिनय) ह्या बालकाच्या विकासातील स्वाभाविक प्रक्रीया आहेत. व बालकाच्या शारीरिक व मानसिक वाढीसाठी पोषकही आहेत.

चौसष्ट कलांमध्ये नाट्यकला, ही अभिनय समाविष्ट आहे. मात्र, नाट्यकलेत चित्र-शिल्प-गायन-नृत्य-वेशभूषा-रंग-केशभूषा या भारतीय प्राचीन पंरपरागत कलांचाही अंर्तभाव असतो. या अर्थाने नाट्य-नाटक-अभिनय कलेचा परिप्रेक्ष्य हा विस्तीर्ण आहे. शाळाशाळांतून कार्यानुभव विषयांतर्गत चित्रकला, शिवणकला या बरोबर 'नाटक' शिकवले जाऊ शकते. नवशैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांच्या विकासाचे जे मूल्यमापन केले जाते त्यात प्रकल्प सादरीकरण, गटकार्य, संवाद लेखन, प्रसंग सादरीकरण, पाठांचे नाट्यरुपांतरण ही मापके लावून मूल्यमापन केले जाते. याचा अर्थ असा की, शालेय जीवनात विद्यार्थ्यांसाठी शालेय रंगभूमी अस्तित्वात असणे. त्याच्या कार्यात सातत्य असणे महत्वाचे आहे. या उपक्रमात विद्यार्थ्यांचा भाषा विकास, पर्यायाने आत्मविश्वास, सभाधीटपणा, निवेदन, विवेचन या कौशल्याची गरज असते व ही अपेक्षा शालेय रंगभूमीकडून पूर्ण होते. मात्र अभ्यासाच्या विषयाला अधिक महत्व व कला-क्रीडा या विषयांकडे दुर्लक्ष- असाच अजेंडा सर्व शाळांतून राबवला जातो.

दरवर्षी केंद्र शासनाकडून एनसीईआरटीकडून विविध कौशल्यावर आधारित कार्यशाळा घेतल्या जातात. यात कागदकाम, मातकाम, बाहुली नाट्य, नाटक यावरची वैविध्यपूर्ण सत्रे होतात पण, हा विषय फार कमी शिक्षकांपर्यंत, शाळांपर्यंत पोहचतो याकरिता शहर पातळीवर, तालुका पातळीवर, जिल्हा पातळीवर नाट्यलेखन कार्यशाळा, अभिनय कार्यशाळा, नाट्य प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करुन प्रत्येक शिक्षण संकुलातील ३०% शिक्षकांपर्यंत नाटक हा विषय पाहेचवला पाहिजे. म्हणजे मग शालेय रंगभूमी शाळाशाळातून खऱ्या अर्थाने रुजवली जाईल. इंग्रजी माध्यमांच्या शाळांतून 'ॲक्टिव्हीटी पिरियड' वेळापत्रकात समाविष्ट असतो व

'नाटक' सारख्या आऊट स्टँडिंग विषयाला रोजच्या शालेय उपक्रमात परिपाठात स्थान मिळते. शाळाशाळातून विज्ञान प्रयोगशाळा संगीत विभाग, ग्रंथालय याप्रमाणेच चित्रकला भुवन तसे रंगभुवन असावे. यात मुलांना विविध वाद्ये, गाण्याच्या ध्वनीफिती, नाटक शिकवले जावे. हा आधुनिक जीवनाचा पाया असून आत्मविश्वासपूर्ण वावर, स्वतःला प्रोजेक्ट करणे, आपले विचार, भावना योग्य शब्दांत, पटवता येणे, सांगता येणे, ही काळाची गरज आहे. टीव्ही व मोबाईल यासारख्या माध्यमातून संवाद-विचार-कृती यांची देवघेव होतच नाही ते सारे एकतर्फी असते. बुद्धी व मनाच्या विकासाला संधी नसणारे, सृजनशीलतेला वाव नसणारे हे माध्यम व त्याची मर्यादा लक्षात घेऊन बालरंगभूमीच्या चळवळीला एक सामाजिक अधिष्ठान, महत्व प्राप्त करुन देणे गरजेचे आहे. ही या युगाची गरज आहे. बालरंगभूमी ही बालकांची नसून बालकांसाठी आहे. मात्र बालनाट्याचा विषय हा बालविश्वाशी निगडीत असतो. संवाद, एकपात्री, नाट्यछटा व बालनाट्यातून तो प्रतीत होतो. नॉर्वेमध्ये तीन महिन्याच्या बाळापासून रंगभूमी कार्यरत आहे. नाटक बघणं ही पण एक कला आहे, त्याचा पाया बालनाट्यातून घातला जातो. तरी परंतु प्रौढाच्या रंगभूमीच्या तुलनेत बालरंगभूमी तशी दुर्लक्षित आहे. बालनाट्याचा अनुभव म्हणजे सळसळत्या चैतन्याचा अनुभव होय. पण वरवर वाटतो तसा बालनाट्य हा सोपा विषय नाही. एक अवघड प्रकार आहे. कारण अद्‌भूतता, साहस, संस्कार, रम्यता, विनोद व बालकाचे निरागसत्व जपणारे असे सारे काही त्यात यावे लागते. मात्र, मुले प्रगल्भपणे भाषा ज्ञानाच्या अभावामुळे बोलू शकत नसल्याने बालनाट्य लेखनाद्वारे मर्यादा पडतात व आशय विषयापेक्षा तंत्राला अधिक महत्व दिले जाते. मग लोककथा, परिकथा, साहसकथा, नीतीकथांना नाट्यलेखन तंत्रात बसवून लेखन केले जाते. भारतात १९५० नंतर बालनाट्य चळवळीने जोम धरला. तत्पूर्वी भौगोलिक दृष्टिकोनातून लोककला प्रकारात कठपुतली बाहुल्यांचे खेळ, पपेट शोज चालू होते. १९५० च्या दरम्यान रा.ग.गडकरी, प्र.के.अत्रे, नानासाहेब शिरगोप्पीकर, विद्याधर गोखले पुढे तेंडुलकर, मतकरी, सई परांजपे अशा लेखकांनी बालनाट्ये लिहिली. याच सुमारास पंडित नेहरु यांनी देशभरात १० बालभवनांची निर्मिती करुन बालकांच्या मनोरंजनाकडे लक्ष दिले.

१९५९ मध्ये सुधा करमरकर यांनी 'लिटल थिएटर' स्थापून 'बालरंगभूमी' या संकल्पनेविषयी समाजाला अवगत केले.

१९६२ रत्नाकर मतकरी यांनी 'बालनाट्य' संस्था स्थापून बालनाट्याची निर्मिती करायला प्रारंभ केला. याच दरम्यान सुलभा देशपांडे यांनी बाल नाट्यनिर्मिती, अभिनय प्रशिक्षण शिबिर अशा बालरंगभूमीत प्रेरक बाबी सुरु ठेवल्या. 'दुर्गा झाली गौरी' हे नाटक अजरामर केले. सत्तरच्या दशकात भालबा केळकर, वासुदेव पाळंदे, माधव वझे यांनी बालनाट्याची धुरा चालवली. यातून 'ग्रीप्स' रंगभूमीची ओळख झाली. पण ही चळवळ भारतीय प्रेक्षकांना विशेष रुचली नाही. श्रीधर राजगुरु, जयंत ताटे यांनीही बालरंगभूमीवर कार्यरत राहून विजय गोखले, विनय येडेकर असे कलावंत प्रौढ रंगभूमीला दिले.

एकूणच बालरंगभूमीच्या विकासासाठी चारही बाजूने मोठी मंडळी झटत होती. दुर्गा झाली गौरी, सिंड्रेला, अलिबाबा आणि चाळीसचोर, अलबत्या गलबत्या, ढब्बु, ढोल, रिमोट कंट्रोल, राजा सिंह, शामची आई अशा व्यावसायिक नाटकांनी महाराष्ट्राला बालनाट्याचा परिचय करुन दिला. बालरंगभूमीसाठी योगदान देणाऱ्या व्यक्तींचा वेध घेता, महाराष्ट्राच्या विविध भौगोलिक प्रदेशात अनेक रंगकर्मी कार्यरत आहेत. नागपूर येथे ज्येष्ठ रंगकर्मी संजय पेंडसे, हर्षल सासवे, विरेंद्र गणवीर गेली ४ दशके कार्यरत आहेत. मुंबई येथे राजू तुतलवार, संकेत ओक, अभिजीत झुंजारराव, कविता मोरवणकर आहेत, पुण्यात प्रकाश पारखी, सागर लोधी, नयना डोळस, यतीन माझिरे कामाचे सातत्य टिकवून आहेत. कोल्हापुरात श्री व सौ शिंदे, संजय हळदीकर, सांगलीत उदय व प्राची गोडबोले, मुकुंद पटवर्धन, प्रताप सोनवणे आहेत. कोकणात डॉ. राजेंद्र चव्हाण, सातारा येथे अभिजीत वाईकर, सोलापूर येथे विद्या काळे, मीरा शेंडगे, अमोल देशमुख, अश्विनी तडवळकर आहेत. बार्शीला विजया चव्हाण, बेळगाव येथे वीणा लोकूर नगर येथे श्याम शिंदे, डॉ. श्री व सौ जोशी अशी कितीतरी मंडळी कार्यरत आहे.

देवदत्त पाठक यांनी शाळाशाळातून अभिनयाचे वर्ग गेली २० वर्षे घेण्याच काम हाती घेतलंय. लॉकडाऊन काळातही आभासी नाटके दृश्यमान केली. नाटक आपल्या घरी अभियानांतर्गत गच्चीवर, घरातील हॉलमध्ये, कॉलनीत बालनाटके मंचित करुन स्टेज-लाईट-नेपथ्य या तांत्रिक फौजफाट्याला फाटा देऊन बालनाट्य लहानांसह प्रौढांपर्यंत पोहोचवले. खेड्यापाड्यात, कामगारवस्ती, पाडे , झोपडपट्टी, बालसुधारगृहे यातील लहानग्यांसाठी सातत्याने संजय हळदीकर कार्यशाळा घेतात. पत्रलेखन उपक्रम असेल, तुम्ही का जगता ?, खिडकीतून असे उपक्रम राबवून मुलांच्या मानसिक जडणघडणीसाठी ते काम करतात.

डॉ. सतीश साळुंखे, धनंजय सरदेशपांडे, संध्या कुलकर्णी, आसिफ अन्सारी, मीरा शेंडगे ही या अलीकडच्या काळात सातत्याने प्रगल्भ वास्तववादी बालनाटके लिहितात.

तर प्रमोद काळे, विदुला कुडलकर, विनिता पिंपळखरे, प्रकाश पारखी अशांनी मधल्या काळात सातत्याने मराठी बालनाट्य लेखनातून साहित्यदृष्ट्या बालनाटकांच्या रंगभूमीला भरीव योगदान दिले.

२००३ पासून महाराष्ट्र शासनाने बालराज्य नाट्यस्पर्धा जाहीर करून बालरंगभूमीला शासकीय अधिष्ठान प्राप्त करुन दिले आहे. एकोणीस केंद्रावरुन हजारो बालकलाकार, लेखक, तंत्रज्ञ या चळवळीला जोडले गेले आहेत.

दूरदर्शनवरील मालिकांच्या प्रभावाने प्रेरित होत हजारो पालक मुलांना अभिनय कार्यशाळा प्रशिक्षण शिबिरात आणून सोडतात. त्यांना झटपट यश हवे असते. काही शिकवण्याचा कालावधीही पुरश्या प्रमाणात द्यायला हल्ली पालक तयार नसतात व रंगभूमी पेक्षा त्यांचा ओढा दृकश्राव्य माध्यमाकडे असतो. मुळातच बाल रंगभूमीही पालकांच्या सहभागाशिवाय व सहकार्याशिवाय पूर्ण होत नाही. आजकाल आई-वडील दोघेही नोकरी करतात. अशावेळी मुलांना तालमीला नाट्य कार्यशाळेला आणून सोडण्यापासूनचे अडथळे जाणवतात. तरी परंतु इंग्रजी माध्यमाची मुले व पालक मातृभाषा प्रेमामुळे बालनाट्य चळवळीत, नाटकात सहभागी होतात. या साऱ्याचा साकल्याने विचार करता बालरंगभूमीला शालेय रंगभूमीपेक्षा अधिक स्पष्ट चेहरा आहे.

सर्वसामान्य क्षमता असणाऱ्या बालकांविषयची जशी ही रंगभूमी आहे तशीच अंध-दिव्यांग, यांच्यासाठीचीही वेगळी रंगभूमी अस्तित्वात आहे. कांचन सोनटक्के, स्वागत थोरात, प्रा. प्रमोद कसबे या रंगभूमीवर कार्यरत आहेत. बालनाटक लिहिणं- करणं म्हणूनच आनंददायी प्रक्रिया आहे. म्हणूनच गावोगावी वर्षातून किमान एक वेळा बालनाट्य महोत्सव व्हावेत. एनएसडीच्या धर्तीवर 'बालरंग' महोत्सवाचे आयोजन व्हावे, असे वाटते.

शालेय व हौशी बालरंगभूमीने हातात हात घेऊन प्रवास करावा, घडावा हीच नटेश्वर चरणी प्रार्थना!

■■

# नटरंग सोलापुरी

- शरदकुमार एकबोटे
- प्रा. विद्या काळे
- रजनीश जोशी
- डॉ. सीमंतीनी चाफळकर
- श्रीपाद येरमाळकर
- राजा बागबान
- शशिकांत लावणीस
- नागेंद्र माणेकरी
- ॲड.जे.जे.कुलकर्णी

# सोलापूरची कामगार रंगभूमी

–शरदकुमार एकबोटे

सोलापूरी नाट्यकलेचं कौतुक आलम महाराष्ट्राला आहेच. या रंगभूमी विषयी पुष्कळ लिहून – बोलून झालेलं आहे. मात्र, या उज्वल परंपरेत कामगार रंगभूमीचं योगदान लक्षवेधक आणि तेवढंच महत्त्वाचं ठरलं. ते अशासाठी की, सामान्य कामगार या चळवळीत ओढला गेला. त्यानं ही चळवळ फुलवली. आपल्या मगदूराप्रमाणे त्यात पायाभूत भर टाकली. याचे श्रेय सोलापुरातील महाराष्ट्र कामगार कल्याण केंद्रांना आहे

साधारण १९५३ पासून कामगार नाट्य– महोत्सवाचा शुभारंभ झाला. त्या पूर्वी या स्पर्धा, अथवा नाट्यकला ही जाणकार सुशिक्षित, सधनवर्गाची मिरासदारी होती. नाट्य प्रयोगांना सुजाण रसिक प्रेक्षकांची उपस्थिती असायची. या क्षेत्रापासून कामगार वर्ग उपेक्षित होता. त्यांना काय कळतेय, ही भावना होती. परंतु जशा 'कामगार नाट्यस्पर्धा' सुरू झाल्या, तशा, अशा प्रकारच्या गैर समजूतींना छेद मिळाला.

कलेची जाण असणारा कामगार कलावंत या चळवळींकडे आकर्षित झाला. कामगार वर्गातला रसिक प्रेक्षक तयार झाला. त्याची अभिरुची तयार होत गेली. कामगार कलावंतांना, कामगार प्रेक्षकांची उत्तम दाद मिळायला लागली, या चळवळीने अनेक कलावंत रंगभूमीला दिले. नवे दिग्दर्शक, निर्माति, रंगभूषाकार, संगीत संयोजक, ध्वनी संकलक, प्रकाश संयोजक, वेशभूषाकार व्यवस्थापक, नेपथ्यकार तयार व्हायला लागले. हळूहळू कामगार, रंगभूमीचा विकास व्हायला लागला. खास कामगार नाट्यस्पर्धेसाठी नव्या संहिता तयार व्हायला लागल्या. नवे नाट्यलेखक उदयाला आले. सगळ्याच बाजूने कामगार रंगभूमी बाळसे धरु लागली.

सुरुवातीच्या काळात ही मंडळी फारशी शिकलेली नव्हती. मात्र दिवस बदलत गेले आत्ता कामगांरा सोबत अन्य व्यवसायिकांना माफक प्रमाणात या स्पर्धेत अधिकृतपणे सहभाग घेता येऊ लागला. पण, प्राधान्याने कामगारांचा सहभाग असावा, असा नियम झाला आणि 'कामगार नाट्यस्पर्धा या चळवळींनी नागरी नाट्य स्पर्धेचे रूप घेतले.

महाराष्ट्र कामगार कल्याण केंद्रांचे सर्वच केंद्र संचालक सैदव तत्पर असत. कलावंतांना जमवण्यापासून त्यांच्या अडी– अडचणी सोडवण्यात सहकार्य करीत. कारण तेच निर्माते असत. त्यांचा उत्साह, उल्लेखनीय असायचा. मू. सि. जटला, तुम्मा, गायकवाड, बंडगर, स्वामी, चंदाबावडी, फडणीस, निजमल्लू अशी अनेक नावं या क्षणी आठवतात. सुमारे ३६ नाट्यसंस्था या काळी कामगार रंगभूमीवर, कार्यरत होत्या. कामगार रेल्वे कामगारांची ललितकला, देव सरांची श्रुति मंदिर, मेहतांची निशिगंध, बोल्ली– कन्ना यांची पूर्व– भागातील अश्विनी नाट्य मंदिर, नंदू किरपेकर, शुकुर, सैय्यद यांची 'नाट्य पुष्पांजली', विठ्ठल अवशेट्टी, वसंत एकबोटे, पंडित कुलकर्णी, यांची 'हिमगंगा नाट्य मंडळ', रंगसंवाद, रंगशारदा, लक्ष्मण काटे यांची लक्ष्मी विष्णू मिल त्याचबरोबर ललित कला, नाट्यउपासना, नाट्य मंजुषा, अशा कितीतरी नाट्यसंस्थानी नाट्यकलेची श्रीमंती वाढवली, डॉ. वामनराव देगांवकर, किर्लोस्कर यांच्या सुप्रसिध्द 'नाट्यआराधना' या संस्थेने कामगार स्पर्धेत सहभाग दिला नसला तरी त्यांचे सहकार्य लाभत असे.

रेवण उपारे, जनार्धन धनवे, शंकर नादरगी, बाबुराव काळे, राजा सलगर ही दत्त क्लबची मंडळी स्त्री भूमिका करीत नंतर लक्ष्मण काटे, नंदलाल भैय्या, म. इसाक मिनियार, अरुणकुमार यादव अशा कलावंतानी स्त्री भूमिका गाजवल्या पुढच्या काळात नाटयकलेला प्रतिष्ठा मिळाली आणि स्त्रिया, मुली पुढे येऊ लागल्या त्यामुळे स्त्री कलावंत नावारुपाला यायला लागल्या.

'संत तुकाराम' 'बेंबदशाही' 'मराठ्याचा मनसबदार' अश्या ऐतिहासिक, पौराणिक नाट्यकृती जून्या प्रेक्षकाच्या लक्षात आजही आहेत.

पूर्व भागातील तेलुगू कलावंतानी मराठी रंगभूमीवर चांगलाच दबदबा निमार्ण केला होता. ही मंडळी विणकर कामगार परंतु कामगार नाट्य स्पर्धेत यांचे योगदानही अविस्मरणीय ठरले. नाट्य सेवा मंडळ, आणि अश्विनी नाट्य मंदिर यांच्या संस्थांनी अनेक उत्तम आणि दर्जेदार प्रयोग दिले. देवमाणूस, चित्रलेखा, सैनिक नावाचा माणूस, मैलाचा दगड,मानलेली बहीण, अपराध मीच केला, काळे बेटे लाल बत्ती, पुन्हा पुन्हा मोहोजोदारो, हद्दपार, कालाय तस्मै नमः असे अनेक दखलपात्र प्रयोग पूर्वभागांनी दिले त्यात लक्ष्मीनारायण आकेन, नागेश कन्ना, विश्वंभर कन्ना, लक्ष्मीनारायण बोल्ली, शोभा बोल्ली, विठ्ठल आरकाल, जयप्रकाश पल्ली ही मंडळी अग्रेसर होती. नाट्य सेवा मंडळाने सादर केलेले देवमाणूस अजूनही अनेकांच्या आठवणीत आहे. नागनाथ कन्ना या कलावंताने 'मानलेली बहिण' या नाटकात 'नागेश' ची भूमिका उत्तम सादर केली. त्यामुळे तो

नागनाथ कन्ना ऐवजी 'नागेश कन्ना' या नावाने ओळखला जाऊ लागला. केवळ एखादी भूमिका उत्तम सादर केल्यामुळे त्याच नावाने ओळखला जाणारा सोलापूरातील तो एकमेव कलावंत होता.

लक्ष्मी-विष्णू मिलच्या ललितकला मंडळातील आजचे आघाडीचे नाट्यदिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल, फैय्याज, व्ही. एम. कंपल्ली, दिगंबर पितांबरे , शामराव कसबे, नामदेव वठारे, संजीवनी काळे, कमलप्रभा हावळे, बादल, निशा खांडेकर, या व अशा अनेक कलावंतानी कामगार रंगभूमी संपन्न केली.

'अशीच एक रात्र येते' (शैलजा मराठे) चांगुणा, गुरु हे प्रयोग अप्रतिम झाले. नानासाहेब चक्रदेव (रंगवैभव) भाऊसाहेब चंदवणकर, श्रीकृष्ण कामतकर, लक्ष्मण काटे या कलावतांची कामगिरी अविस्मरणीय ठरली. (राणीची बाग) पांडुरंग काळे, विद्या काळे, चंद्रभूषण कुलश्रेष्ठ पं.म. कामतकर व्यंकटेश कामतकर, प्रा. निशिकांत ठकार, जयप्रकाश कुलकर्णी, डॉ. लक्ष्मीनारायण बोल्ली, रजनीश जोशी, जयप्रकाश कुलकर्णी, त्र्यं. वि. सरदेशमुख, कुमार, कोठावळे, शरद्कुमार एकबोटे, आनंद खरबस असे अनेक नाट्य लेखक निमार्ण झाले. लेखन, दिग्दर्शन कलावंत म्हणून शशिकांत लावणीस नावारुपाला आले. 'जिव्हाळा' या संस्थेने दर्जेदार प्रयोग करुन रसिकांची मने जिंकली शिरिष देखणे यांच्या रहस्यमय, आणि काव्यात्मक नाट्य प्रयोगांनी चांगलीच रसिकप्रियंता मिळवली. मुकुंद हिंगणे यांचे नाट्यलेखन हा कौतुकाचा विषय ठरला.

दिग्दर्शन क्षेत्रात सुनील गुरव (त्रिकोणाची चौथी बाजू) विद्याचंद्र होमकर, राजा राजेशचंद्र, आनंद किरपेकर, अरुण मेहता, प्रमोद लांडगे, योगेश ताकपेरे, पंडितराव कुलकर्णी, सत्यशील क्षीरसागर, हेमंत वर्तक, प्रकाश यलगुलवार आणि अशी अनेक नावे चर्चेत होती. साहिर नदाफ, विजय साळुंके, श्रावण ओमप्रकाश, गुरुराज वठारे, बटाणे, नामदेव वठारे, ही नावे तंत्रज्ञ म्हणून चर्चेत होती.

सरला येवलेकर, फैय्याज, गुरुराज अवधानी ही मंडळी चित्रपट क्षेत्रातही चमकली, अमोल देशमुख, मंदार काळे, विजय कटके, यांचा 'कोर्ट मार्शल' अविस्मरणीय ठरला.

झंकार सांस्कृतिक मंचने सादर केलेला 'अग्निदिव्य' एक उत्तम आणि वेगळा प्रयोग माणकेरी यांच्या दिग्दर्शन कौशल्याची प्रचिती देणारा ठरला. सारिका अग्निहोत्री, मीरा शेंडगे, अश्विनी तडवळकर, सुमित फुलमामडी, अनुजा मोडक, सुहास मार्डीकर, अशोक किल्लेदार, रणधीर अभ्यंकर ही नावे चर्चेत दिसतात. रंगभूमीवरील त्यांची कामगिरी विशेष अधोरेखित ठरावी, अशीच आहे. याखेरीज कामगार रंगभूमीला उजाळा देणारी बरीच कलावंत मंडळी उद्याचे आशास्थान ठरेल, ही अपेक्षा आहे. आज कामगार नाट्यमहोत्सवाचा अस्त झाला असला तरी एके काळी रंगभूमीचे बीजारोपण यांचे चळवळीने केले आहे हे विसरुन चालणार नाही एकूणच सोलापूरच्या रंगभूमीसाठीही चळवळ म्हणजे एक अभिमानाची विषय ठरावा, अशीच आहे.

१९५३ साली सुरु झालेली कामगार नाट्य स्पर्धा या स्पर्धेत तीस तीस नाटकं सादर व्हायची. त्या त्या काळाच्या मागणीप्रमाणे नाट्यसंहिता निवडल्या जायच्या अभिनय, दिग्दर्शन, तांत्रिक बाजू त्या काळाला अनुसरुन होत्या या स्पर्धेतील नाटकांना १२ वर्षांवरील प्रेक्षकही आवर्जून उपस्थित असे. यांचे पालक सोबत असत. नाट्यकलेचे संस्कार त्या वयात व्हायचे. पण हळुहळु या स्पर्धेला ग्रहण लागले, दर्जा घसरु लागला आणि गेल्या पंधरा वर्षात सोलापूरचे कामगार नाट्य स्पर्धेचे केंद्रच काढून घेण्यात आले. आता दोनचार संस्था, पुणे कोल्हापूर या केंद्रावर जाऊन प्रयोग सादर करतात. पण, एकेकाळी सोलापूरची कामगार रंगभूमीची झळाळी नजरेत भरणारी होती. या रंगभूमीने राज्यनाट्य स्पर्धेची रंगभूमी घडवली, उन्नत केली हे विसरता येणार नाही. स्पर्धेसाठी 'राणीचा बाग' नाटक सादर केलं. सोलापुरात प्राथमिक फेरीत आम्हाला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले, अंतिम स्पर्धा मुंबईत झाल्या. अंतिम स्पर्धेत मुंबईत माझ्या 'उमा' च्या भूमिकेला अभिनयाचे प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. परीक्षक होते केशवराव दाते, चिंतामणराव कोल्हटकर, अनंत काणेकर, राज कपूर, सिनेनट डेव्हिड !

अशा रीतीने सोलापूरच्या कामगार रंगभूमीने प्रथम वर्षातच आपल्या नाट्य कर्तृत्वाची पताका मुंबईत उंचावर फडकत ठेवली.

■■

# सोलापूरची संगीत रंगभूमी तेंव्हाची आणि आत्ताची

-प्रा. विद्या काळे

रंगभूमीवर हसवणे आणि रडवणे या दोन्हाही गोष्टी अतिशय अवघड असतात. संगीत रंगभूमीवर याच गोष्टी त्याहूनही अवघड. सोलापूरची संगीत रंगभूमी ही १९५७ च्या एकोणचाळिसाव्या नाट्यसंमेलानात ओझरत्या झलकेनिशी पहावयास मिळाली. त्यात पहावयास संगीत संशय कल्लोळ या नाटकाचा प्रयोग मिळाला. त्यात काम करणारे कालाकार हे सोलापुरात होत. नंतर नंतर त्या गोष्टी तग धरुन सोलापूरची संगीत रंगाभूमी वाटचाल करु लागली. सोलापुरातील त्या काळातील प्रसिध्द डॉ. दिवाडकर यांच्या हौसेमुळे व्यवसायिक रंगभूमीला, तोडीसतोड संगीत रंगभूमी चे प्रयोग अभिनय साधना मंदिर या नाट्यसंस्थेने दाखविण्यास सुरुवात केली.

त्यात बाळासाहेब भागवत, बाळ लिमये, सायखेडकर, ठाकूर देसाई, सौ. प्रधान, प्रभुदेव सरदार, कु. प्रभा चक्रदेव, अश्या कलाकराची वर्णी लागत असे. पण त्यातील स्त्रिया एखाद्या दुसऱ्या वर्षानंतर लग्न होऊन जात असत आणि स्त्री भूमिकांच्या शोध सुरु होत असे.

सोलापुरात सुखवस्तू रसिक वर्ग मोठा असल्यामुळे या ठिकाणी संगीत कलेची आणि नाट्यकलेची जोपासना होण्यासाठी विपुल क्षेत्र आणि पाठिंबा मिळाला. संगीत कलेचे त्या काळातील आद्यस्थान म्हणजे सोलापुरातील सुप्रसिध्द भांड्याचे व्यापारी श्री. सिध्दरामण्णा मोहरे यांचे 'नूतन संगीत थिएटर' हे होय. तिथे किंवा जुन्या विठ्ठल मंदिरात त्या काळी संगीत नाटके पण होत असत. १८७४ साली वत्सला हरण, रामजन्म, सुभद्राहरण, दामाजी पंताचा फोर्स. अशी गद्य आणि संगीत नाटके होतं होती.

त्याच काळात किर्लोस्कर संगीत नाटक मंडळी आणि कलादर्श नाटक मंडळी इत्यादी नाटक मंडळ्या या पुढे येऊन संगीत नाटकांचे प्रयोग करु लागली होती. पण खुद्द सोलापूरातील नट मंडळी म्हणाव्या, तितक्या ताकदीने रंगभूमीवर नव्हती. मधला मोठा कालखंड वगळता १९४७ पासून एके काळी गिरणगाव म्हणून गाजत असणाऱ्या सोलापूरने संगीत रंगभूमीवर कामे करण्यास सुरुवात केली. १९५०-६० या दशकात लक्ष्मी विष्णू मिलचे इंजिनियर आणि रंगवैभव या संस्थेचे संस्थापक कै. नानासाहेब चक्रदेव यांच्या संस्थेने संगीत सौभद्र स्वयंवर, संशय कल्लोळ इत्यादी संगीत नाटकांची मेजवानी दिली. त्याच काळात कॅलटेक्स कंपनीचे सोलापुर येथील मॅनेजर श्री. कोटणीस यांच्या सुविद्य पत्नी सौ. कोटणीस यांना गायिका अभिनेत्री म्हणून काम करण्याची संधी मिळाली. त्याचप्रमाणे सी.ए. द.ना. तुळपुळे यांच्या सहकार्याने सोलापुर, फलटण आणि मुंबई येथे संगीत नाटकाचे प्रयोग करुन सोलापुरलाही संगीत नाटकास आघाडीवर नेण्याचे काम सुरु. याच काळात ह.दे. प्रशालेने वार्षिक स्नेह संमलेनात संगीत सौभद्र, मृच्छकटिक, संगीत सत्तेचे गुलाम मानापमान, शारदा, शाकुंतला इत्यादि. अभिजात संगीत नाटकांचे

प्रयोग सोलापुरात करुन सोलापूरची रंगभूमी मोठ्या प्रमाणावर कार्यरत केली. त्यानंतर १९६५-६६ या कलावधीत श्रुति मंदिरचे संस्थापक स्व. पद्माकर देव सर यांनी एकपात्री आणि द्विपात्री संगीत 'स्वयंवर' आणि 'मानापमान' या नाटकांचे प्रयोग सोलापूर पासून दिल्लीपर्यंत सोलापुरचे नाव महाराष्ट्राच्या रंगभूमीवर झळकवण्यास सुरुवात केली.

त्याच काळात सोलापूरात तेलगू संगीतरंगभूमी ही कार्यरत होती. श्री संगप्पा सिडगीद्दी यांनी 'एकच प्याला' नाटकाचा 'सुराहरा' या नावाने तेलगू अनुवाद करुन, त्याचा प्रत्यक्ष बालगंधर्वांसमोर प्रयोग सादर करुन वाह वाह मिळवली त्या नंतर १९८२-८३ सालात ललित कलेतर्फे 'संगीत कधीतरी कुठेतरी' या नाटकाचा संगीत नाट्य स्पर्धेत प्रयोग सादर केला. १९८३-८४ या कालात 'स्वरमंच' नाट्यसंस्थे तर्फे संगीत 'संशय कल्लोळ' चा प्रयोग संगीत नाट्यस्पर्धेत केला गेला. १९८९ मध्ये मनोरंजन संस्थेमार्फत राजू मोडक यांनी 'कट्यार काळजात घुसली' चा प्रयोग केला. पण, या सर्वात 'श्रुति मंदिर'ही संस्था १९६४ सालापासून संगीत रंगभूमी वर सतत कार्यरत होती. त्यांनी संगीत एकच प्याला, शाकुंतला, मानापमान, मृच्छकटिक, अमृतासिध्दी, संत कान्हापात्रा, संगीत संशय कल्योळ, उद्याचा संसार, द्रौपदी (बालगंधर्व संगीत मंडळी) नंतर ५२ वर्षांनी श्रुति मंदिर संस्थेने दिल्ली, सांगली, सोलापूर इ. ठिकाणी त्याचे प्रयोग केले.) गोव्यातही संगीत नाटके सादर करुन श्रुति मंदिरने आपल्या संस्थेचा नावाचा झेंडा दिल्लीवर फडकवला. हा इतिहासजमा काळ आहे. पण आत्ता सोलापूरची संगीत रंगभूमी ही श्रुति मंदिर संस्था प्रत्येक वर्षी संगीत नाट्यस्पर्धेत 'संगीत चाफा सुगंधी' हे संगीत नाटक नाट्यस्पर्धेत सादर केले. संगीत नाटकाला उर्जितावस्था येईल, असे वाटत असतानाचा या संस्थेने संगीत नाटकाचा प्रयोग बंद केला आणि हा प्रयत्न अल्पजीवी ठरला. पण सर्व गोष्टींना धरुन सध्याची सोलापूरची संगीत रंगभूमी व्हेंटिलेटरवर आहे. असे म्हटले, तर वावगे ठरु नये. यांची कारणे अनेक आहेत.

संगीत नाटकांच्या नवीन संहिता मिळत नाहीत. तसा प्रयत्नही करताना कुणी दिसत नाही. तसेच गायक नट आणि गायक नटी हेही मिळणे दुरापास्त होत आहे. याचे प्रमुख कारण टीव्ही रिॲलिटी शो मध्ये गायला मिळणं हाच एक मोठा भाग कलाकाराला वाटत असतो. तसेच आपण टिव्ही वर दिसतो, हा एक विचित्र समज आणि हौस आहे. आहे. यातून पुढे निष्पन्न काय ? याचा विचार कोणीही करत नाही.

संगीत नाटकात काम करण्याची विचारणा केल्यास प्रामुख्याने काही गोष्टी आढळतात, पैकी एक संगीत नाटकातील सगळीच पात्रं गाणारी असतात, हा एक भ्रामक समज, तसेच आम्हाला फक्त गाणं म्हणायला मंच उपलब्ध करुन द्या, नाटक नको. पुढचा भाग ज्या गुरुकडे हे कलाकार शिकत आहेत. त्यांच्या प्रामुख्याने जोरदार नकार असतो. किंबहुना सगींत नाटकात जाऊ नये, अशी अडवणूक केली जाते, ती अनेक स्तरावर असते. नाटकात काम करताना तुम्हाला रात्र वेतन किती दिलं जाणार ? हा प्रश्न गुरुकडून शिष्याला विचारला जातो. बालांपासून रंगभूमीची हौस असूनही, केवळ संगीत परीक्षेपायी या हौसेची गळा दाबला जातो, अश्या परिस्थितीत गुणी कलावंताना संगीत नाटकात यायची इच्छा असूनही ते येऊ शकत नाहीत, किंबहुना संगीत नाटकात कोणतं मोठं नाव तुम्ही मिळवणार आहात? असा सवाल केला जातो, या सर्वांचा परिणाम कलाकारांवर होऊन, कलाकार संगीत नाटकापासून दूर चालला आहे. राज्य नाट्य स्पर्धेत मराठी नाटकांच्या अंतिम फेरीतील प्रथम क्रमांकास एक लाखाचे पारितोषिक (सांघिक) आहे. पण, संगीत नाटकासाठी ५०% गुण संगीताला असतात त्यात ऑर्गन, तबला, व्हायोलिन, सारंगी, फ्लूट इत्यादी गोष्टींच्या आधारे संगीत उभे केले जाते. नवीन गाण्यांना चाली देणे, तालीम करुन घेणे, शिवाय नेपथ्य प्रकाश योजना, पार्श्वसंगीत, रंगभूमी या सर्व गोष्टी मराठी गद्य नाटकांच्या स्पर्धेतील असतात, पण एकच अंतिम स्पर्धेची फेरी होऊन बक्षीस मात्र तीस किंवा चाळीस हजार इतकंच असतं, या गोष्टींचा विचार करता खरोखरच संगीत नाटक कलाकारांच्या हौसेपोटीच मार्यादित राहिले आहे. ही बाब नजरेआड करता येत नाही. व्यावसायिक संगीत रंगभूमी वर तुरळक पण संगीत देवबाभळी सारखा उत्कृष्ट नाट्यप्रयोग पाहावयास मिळतो. आणि पुन्हा एकदा आमच्या सारख्या हौशी कलावंताच्या मनाला आशेची पालवी फुटते. संगीत राज्य नाट्य स्पर्धेत ३२-३४ इतकी संगीत नाटके असताना त्यांचे प्रयोग होताना दिसत नाहीत. वरील, सर्व कारणे आणि आर्थिक गणित या सर्वांचा मेळ घातला गेला किंवा बसला तर संगीत रंगभूमी तरुन जाईल, असे वाटते.

■■

# सोलापूरची प्रायोगिक रंगभूमी

–रजनीश जोशी

सोलापूरच्या कलावंतांनी केलेले वेगळे 'नाट्यप्रयोग' किंवा 'सोलापूरच्या रंगभूमीवरील प्रयोगशीलता' या मध्यवर्ती कल्पनेवर छोटेखानी स्वरूपाचा लेख लिहिण्याची विनंती संपादकांनी केल्यामुळे सोलापुरी मातीतील प्रयोगशीलतेची नोंदवजा दखल प्रस्तुत लेखात घेतली आहे. शब्दमर्यादा आणि विषयाची व्यापकता यामुळे अनेक गोष्टी सुटल्या असण्याचीही शक्यता आहे. लेखातील उल्लेख कालक्रमाने नाहीत, स्मरणानुसार केलेले आहेत हेही ध्यानात घेणे गरजेचे आहे.

**प्रयोगशीलतेतून स्वतःचा शोध !**

नाटक ही जिवंत कला असल्याने प्रत्येक खेळ वेगळा होणार, हे उघड आहे. मात्र, आशय-विषय आणि सादरीकरणाच्या अंगाने असलेल्या वेगळेपणाने ते अधिक उठावदार होते. सगळ्याच मराठी प्रेक्षकांप्रमाणे सोलापूर जिल्ह्यातील लोकही नाट्यवेडेच! त्यामुळे उत्तम नाटकाला गर्दी होणारच, अशी मुंबईहून येणाऱ्या नाटकवाल्यांना खात्री होतीच. प्रभाकर पणशीकरांसारख्या नटश्रेष्ठाने 'तो मी नव्हेच' सारख्या नाटकाचे शेकडो प्रयोग सोलापुरात केले. कित्येकदा छोट्या-मोठ्या भूमिकांमध्ये सोलापूरच्या स्थानिक कलावंतांना संधी देण्याचा प्रयोगही त्यांनी करून पाहिला. तीच गोष्ट नंतरच्या काळातल्या 'ऑल दि बेस्ट' या 'चंद्रलेखा'च्या नाटकाची. याही नाटकाचे शेकडो प्रयोग सोलापूर शहर आणि जिल्ह्यात झाले. या नाटकाच्या जाहिरातीमध्ये आकर्षक असा प्रयोग करण्यात आला होता. 'इसापनीती' मधील विविध गोष्टींचा कल्पक वापर करून या जाहिराती तयार केल्या होत्या. चंद्रकांत आणि रविकिरण पोरे या बंधूंकडे या आगळ्या जाहिरातींचे श्रेय जाते. व्यावसायिक रंगभूमीवरील या नाटकाच्या जाहिरातींनी राज्यभरातील प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले होते. सोलापूरच्या कलावंतांचा हा प्रयोग वैशिष्ट्यपूर्ण ठरल्याने त्याची दखल घेणे आवश्यक आहे. मात्र, व्यावसायिक रंगभूमीवर होणाऱ्या नाविन्यपूर्ण गोष्टींचा गाजावाजा केला जातो. त्याचे अनुकरण हौशी रंगभूमीवरील कलाकार पुढच्या काळात करत राहतात, असे अनेकदा निदर्शनास आले आहे. राज्य नाट्य स्पर्धांमध्ये किंवा एकांकिका स्पर्धांमध्ये 'बक्षीसाची गणिते' घालून वेगळेपण जपण्याचा प्रयत्न केला गेल्याचे आढळते. त्यांना 'प्रयोगशीलते'मध्ये गणता येणे कठीण आहे. रात्रभर चालणारे नाट्यप्रयोग पाहणाऱ्या प्रेक्षकांचा एक काळ होता. बालगंधर्व नाटक मंडळीचा मुक्काम सोलापूरात असे, तेव्हा अशी संगीत नाटके होत. बालगंधर्वांच्या नाट्यगीत गायनामुळे प्रत्येक प्रयोग वेगळा आणि रंगतदार होत असे. सूर्यास्तापासून सूर्योदयापर्यंत चालणारी नाटके हे कर्नाटकाच्या सीमेवर असलेल्या अक्कलकोट तालुक्याचे वैशिष्ट्य. 'दोड्डाटा', 'बैलाटा' अशी नाटके सीमावर्ती भागात दीर्घकाळ चालत. ही नाटके प्रयोगशील होती. कारण बऱ्याच नाटकांच्या लिखित संहिता नसत. दरवेळी प्रेक्षकांचा अंदाज घेत नटमंडळी आपापले संवाद म्हणत असत. अशा प्रकारच्या प्रयोगांत वेगळेपण होतेच, पण उपजीविका किंवा प्रेक्षकानुनयाचा भाग जास्त होता. लेखक-दिग्दर्शक आणि कलावंतांनी नाटकातून स्वतःला आजमावण्याचा प्रयत्न करून पाहिल्याचे पद्माकर देव, माया मल्लापूर यांच्या प्रयोगांमधून दिसून आले. संगीत स्वयंवर आणि अन्य संगीत नाटकांचे द्विपात्री प्रयोग सादर करून श्री. देव यांनी वेगळेपण दाखवून दिले. मूळात सोलापूरची संगीत रंगभूमी आणि पद्माकर देव हे समीकरण जुळलेले होते. त्यांनी रूढ संगीत नाटके दिल्लीतील नाट्य स्पर्धेसाठी जरूर केली, पण नाटकाचा नेमका आशय पोहचवीण्याचे भान कायम ठेवून दोन पात्रात ते सादर करण्याचे कौशल्य वादातीत. कलावंतांचा कस पाहणारे हे प्रयोग होते, असेच म्हणावे लागेल. कारण त्याकाळी संगीत नाटकाचा बराचसा प्रेक्षकवर्ग चतुरस्त्र, बहुश्रुत आणि जाणकार होता. त्यामुळेच त्याचे मोठेपण वादातीत आहे. वामनराव सायखेडकर यांनी एकपात्री 'एकच प्याला' केल्याची चर्चा ऐकली होती, तो प्रयोग मात्र पाहता आला नव्हता. जयंत पवार यांनी लिहिलेली आणि सुनील साठेने दिग्दर्शित केलेली 'दरवेशी' ही एकांकिका मला आठवते. कुठल्याशा स्पर्धेत तिचा प्रयोग होता. दरवेशी आणि त्याचे अस्वल यांच्या माध्यमातून समाजव्यवस्थेवर बोचरी टीका करणाऱ्या या एकांकिकेचा उत्तम प्रयोग राजू पाटील आणि उमाकांत चौंडे, उत्कर्ष गरड, पद्माकर कावळे आदी कलावंतांनी केला होता. त्यातील अभिनय हा तर लक्षणीय होताच, पण दरवेशी जे वाद्य वाजवतो, ते ताशासारखे वाद्य उपलब्ध न झाल्याने विंगेतून पत्र्याच्या खुर्चीवर सुनीलने ताशा वाजवला होता. ही एकांकिका पहिली आली हा भाग अलाहिदा! गरजेनुसार किंवा नाईलाजामुळे असे प्रयोग करणं ही प्रयोगशीलता म्हणता येणार नाही, वेळ मारून नेण्याचा किंवा प्रसंगावधानाचा तो भाग म्हणता येईल. लेखन, आशय

आणि विषयाचे वेगळेपण मांडणाऱ्या सोलापूरी मातीतील नाटकांचा विचार करायचा तर 'बखर : एका राजाची' या प्रा. त्र्यं. वि. सरदेशमुख यांच्या कादंबरीचे त्यांनी केलेले 'टाहो' हे नाट्यरूपांतर विचार करण्याजोगे आहे. अक्कलकोट संस्थानात घडलेल्या एका महानाट्याचे नाट्यरूप स्वतः प्रा. सरदेशमुख यांनीच तयार केले होते. त्यामुळे विषय आपल्या मातीतलाच, लेखकही इथलाच आणि 'नाट्य आराधना' सारख्या मातब्बर संस्थेने केलेले त्याचे सादरीकरण हेही गुणवत्तेच्या दृष्टीने उत्तम दर्जाचे होते. स्पर्धेतील नाटक आणि त्याची पारितोषिके वगैरे मुद्दे बाजूला ठेवून सोलापूरकरांनी केलेले 'प्रयोग' या सदरात हे नाटक मोडते. 'बखर'मधील दाहकता 'टाहो'मध्ये तितकी भेदक वाटत नाही, असे 'वाचकां'चे म्हणणे असले तरी नाट्यप्रयोग म्हणून त्याची नोंद कायम राहिल, यात शंका नाही. राजा-राणी असले तरी त्यांचं माणूसपण अधोरेखित करण्याचा नाटककाराचा प्रयोग अद्भूत होता.

सोलापूर हे बहुभाषिक असल्याने अनेक तेलुगुभाषिक कलावंत सोलापूरी मातीत मिसळून गेले आहेत. डॉ. लक्ष्मीनारायण बोल्ली यांनी लेखन-दिग्दर्शन आणि सादरीकरणामध्ये वेगळेपण दाखवले आहे. 'संत वेमना'सारखे त्यांनी लिहिलेले नाटक हे त्याचेच द्योतक आहे. संत तुलसीदासांच्या जीवनकथेसारखीच वेमना यांची जीवनकहाणी आहे. 'भोगी ते योगी' असा हा प्रवास डॉ. बोल्ली यांनी उत्तमरीतीने रेखाटला आहे. तीच गोष्ट त्यांच्या 'विरहिणी वासवदत्ता' या नाटकाची. सगळ्याच बाबतीत सोलापूरी म्हणावे असे हे प्रयोग होते. प्रयोगशीलतेबाबत लक्ष्मीनारायण आकेन यांचा उल्लेखही महत्त्वाचा आहे. संवाद ऐकून मुखोद्गत करणारा हा कलावंत त्याच्या नाट्यप्रेमामुळे संस्मरणीय ठरला आहे. कामगार असूनही त्यांनी वठवलेल्या राजाच्या भूमिका जुन्या पिढीतील प्रेक्षकांच्या अजूनही लक्षात आहेत.लक्ष्मण काटे हे सोलापूरचे अवलिया कलावंत होते. त्यांनी स्वतः एकांकिका लिहिल्या, नाटकांचे दिग्दर्शन केले आणि नाटकांमध्ये स्त्रीभूमिकाही केल्या. त्यासाठी मोठी कौटुंबिक किंमत त्यांना मोजावी लागली. नाट्यवेडापायी वाट्टेल ते सहन करण्याची ताकद त्यांच्या ठायी होती. त्यांच्या अभिनयाची साक्षात राजकपूरने वाखाणणी केल्याची वदंता ऐकिवात आहे. श्री. काटे यांच्यासारखे कलावंत रंगभूमीवर प्रयोग तर करतातच, पण स्वतःच्या आयुष्यातही अनेक प्रयोग करून पाहतात, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. व्यावसायिक रंगभूमीवर किंवा पुण्या-मुंबईत गाजणारी अनेक नाटके सोलापूरात झाली. राज्य नाट्य आणि कामगार नाट्य स्पर्धांमुळे तशी संधी इथल्या अनेक कलावंतांना मिळाली. एकेकाळी सोलापूरची राज्य नाट्य स्पर्धा महिना-दीड महिना चालत असे, इतके नाट्य संघ सोलापुरात होते. हौसेचा मामला जास्त असला तरी नाटक करण्याची जिद्द मोठी होती. रंगकर्मी नामदेव वठारे आणि ललित कला मंदिर संस्थेचे कलावंत हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. डॉ. जब्बार पटेल, अभिनेत्री फैय्याज असे गुणी कलावंत व्यावसायिक रंगभूमी आणि चित्रपटसृष्टीला या संस्थेने दिले.शिरीष देखणे यांनी 'कृष्णपक्ष'सारख्या नाट्यलेखनातून कलावंताच्या जीवनाची दुसरी बाजू दाखवली. बी.व्ही. कारंथ किंवा त्यांच्यासारख्या कलावंतांच्या आयुष्याची आठवण त्यामुळे सहजच होते. किशोर महाबोले, डॉ. संज्योत मानकामे, रजनीश जोशी यांनी या नाटकात भूमिका केल्या होत्या. विषय-आशयाचे वेगळेपण, उत्तम अभिनय आणि विजय साळुंके यांनी केलेल्या नेपथ्य-प्रकाश योजनेतील नाविन्यामुळे या प्रयोगाला राज्य नाट्य स्पर्धेच्या अंतिम फेरीत पाचवा क्रमांक मिळाला होता. मोहन वाघांसारखा मोठा नाट्यनिर्माता हे नाटक पाहायला आवर्जून आलेला होता.प्रदीप कुलकर्णी आणि शोभा बोल्ली यांनी अलीकडच्या दोन दशकांमध्ये 'रिलेशनशिप'वरील नाटक आणि एकांकिकाचे यशस्वी प्रयोग केले. यशाच्या शिखरावर असलेल्या उद्योजकाची अधोगती आणि अंगभूत गुणांनी यशाचे शिखर गाठणारी त्याची पत्नी यांच्या नात्यावर आधारित 'छेद' हे नाटक त्यांनी उत्तम सादर केले. पुण्या-मुंबईसह कोकणात त्याचे प्रयोग झाले. रजनीश जोशी यांनी ते लिहिले होते. स्त्री-पुरूष नात्यामधील विविध कंगोऱ्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न रजनीश जोशी यांनी त्यांच्या 'रुपक', 'मॅजिक मिरर', 'भूलभिंगरी', 'दोला' या नाटकांमधून केला आहे. 'सलगी तुरा', 'वंश', 'कोलाहल', 'द केज' या एकांकिकाही अशाच इथल्या मातीतील आहेत. नात्यांचा गुंता ही फक्त महानगरी जाणीव नाही, सोलापूरसारख्या लहान शहरामध्येही त्याचा तिढा असतोच. माणसांच्या न बदलणाऱ्या स्वभावांमुळे तो अधिक जटिल होत जातो.अरविंद काणे यांनी 'लक्ष्मणरेषा' हे नाटक लिहिले आहे. ख्यातनाम व्यंगचित्रकार आर. के. लक्ष्मण यांच्या 'यू सेड इट' या 'टाइम्स ऑफ इंडिया'मधील पॉकेट कार्टूनवर आधारित हे नाटक होते. रजनीश जोशी यांनी ते दिग्दर्शित केले होते. अनिल कुलकर्णी यांनी त्यातील कॉमनमॅनची भूमिका केली होती. स्वतः आर. के. लक्ष्मण आणि त्यांच्या पत्नी कमला लक्ष्मण यांच्यासमोर या नाटकातील काही प्रवेशांचे सादरीकरण लेखकाच्या उपस्थितीत झाले होते. लक्ष्मण यांनी या प्रयोगाचे कौतूक केले होते हे विशेष.प्रा. त्र्यं. वि. सरदेशमुख यांनी खलील जिब्रान यांच्या 'द प्रॉफेट' या विचारकाव्याचा 'देवदूत' या नावाने अनुवाद केला आहे. त्याचे नाट्यरुपांतर करून अभिनय व दिग्दर्शन रजनीश जोशी यांनी केले होते. सोलापुरातील नृत्यशिक्षिका मनीषा जोशी

आणि त्यांच्या चमूतील मुलींनी या नाटकातील विविध प्रसंगांवर आधारित आशयानुरूप नृत्ये सादर केली. बाख, बिथोवन, मोझार्ट यांच्या सिंफनीज वर ते बसवले होते. त्यांची निवड सुनीता तारापूरे यांच्या संग्रहातून केली होती. सोलापूरसह बेंगळुरू, देवबाग इथे झालेले या नाटकाचे प्रयोग वाखाणले गेले. शुभांगी दामलेंसारख्या जाणत्या कलावंतांनी प्रयोगाचा गौरव केला. प्रा. निशिकांत ठकार यांनी लिहिलेल्या अनेक नाटकांचे प्रयोग अरूण मेहता यांनी दिग्दर्शित केले. त्याला स्पर्धात्मक यशही खूप मिळाले. प्रा. ठकार यांच्या लेखनाप्रमाणेच प्रशांत देशपांडे यांचे संगीत व गायन यामुळे ही नाटके गाजली. नाट्य, संगीत, गायन, सादरीकरणाचा अफलातून मिलाफ झालेले हे प्रयोग रसिक सोलापूरकरांच्या स्मरणात दीर्घकाळ राहतील. 'श्रीचंपा - द्वैतापल्याड तू अद्वैता', 'कहाणी वाघाच्या सावलीची', 'गाणं पंचरंगी पोपटाचं' हे प्रयोग सर्वांगाने वेगळे होते. त्यांचे मूळ कर्नाटक, राजस्थान, मारवाडात असले तरी ती नाटके अस्सल मराठीत सादर झाली. प्रशांत देशपांडे यांच्या संगीतविषयक जाणकारीने अनोखे दर्शन या प्रयोगांनी घडवले. 'जादू जंगल' हे राजेश जोशी यांचे मूळ हिंदी नाटक प्रा. ठकार यांनी अनुवादित केले होते. श्री. रेवण उपारे यांनी त्याचे दिग्दर्शन केले होते. त्याचाही उत्तम प्रयोग राज्य नाट्य स्पर्धेत झाला होता. सुलभा सरवदे या गुणी अभिनेत्रीने तिला मिळालेल्या संधीचे सोने केले होते.श्रीराम पंडित, इसाक शेख आदी कलावंतांनी 'इट्स मॅड मॅड वर्ल्ड' नावाची आशय-विषयापासून वेगळेपण असलेली एकांकिका समूह स्वरूपात सादर केली होती. तिची त्यावेळी बरीच चर्चा झाली होती. डॉ. वामन देगावकर यांनी 'नाट्य आराधना' ही संस्था नावारुपाला आणली. १९९१ साली मुख्यमंत्री निधीतून एक लाख रूपयांचा निधी मिळवणारी ही संस्था सोलापूरचे भूषण आहे. शशिकांत लावणीस यांनी केलेले जी. ए. कुलकर्णी यांच्या 'कैरी'चे नाट्यरुपांतरही उत्तम झाले होते. अरविंद काणे यांचे 'चाणक्य'देखील लक्षवेधी होते. प्रा. चंद्रभूषण कुलश्रेष्ठ यांनी लिहिलेले 'गजाआडचे गाणे', शरदकुमार एकबोटे यांचे 'द रॉक', 'माकडाचा न्याय'सारखी नाटके प्रयोग म्हणून अव्वल होती. अशी आणखी अनेक उदाहरणे देता येतील, विस्तारभयास्तव ती मर्यादित ठेवली आहेत.आपल्या मातीतील प्रश्न, इथले संस्कार, संस्कृती, परंपरांचे विषय करून ते सादर करून पाहणे हे खऱ्या प्रयोगशीलतेचे लक्षण आहे. सोलापूरात १७ बोलीभाषा बोलल्या जातात. त्यांचे एक भाषिक नाट्य आहे. त्याकडेही नव्या, तरुण आणि ताज्या दमाच्या कलावंतांनी लक्ष दिले पाहिजे. बक्षीसपात्र ठरू शकणाऱ्या पुणे-मुंबईच्या रंगभूमीवर झालेल्या नाट्यसंहिता निवडून बरहुकूम नाटक सादर करणे म्हणजे प्रयोग नव्हे. अस्सल नाटक आपल्याला उन्नत करते, आपल्यातील वेगळ्या क्षमतांचे दर्शन घडवते. त्यामुळे रूढ, पारंपरिक नाटके करताना वेगळ्या आशय-विषयाला आपण हात घालू शकतो का, याची चाचपणी करून पाहणे आवश्यक आहेच. वेगळे नाट्यप्रयोग करताना कलावंत एकप्रकारे स्वतःचाच शोध घेत असतो. आपल्यातले वेगळेपण आपल्याला त्यानिमित्ताने गवसले तर या सगळ्या खटाटोपाचे सार्थकच झाले म्हणायचे !! -

■■

# सोलापूरचे रंगमंच

- डॉ. सीमंतीनी चाफळकर

सर्व रंगकर्मी व नाट्य रसिकांना नमस्कार !

वास्तुविशारद सतत बाहेरील व अंतर्गत अवकाशाचा आणि रचनेचा विचार करत असतो त्यामुळे तो नाट्यमंचाचा अवकाश उत्तम समजू शकतो. सोलापुरात वास्तुरचना, अंतर्गत रचना व परिसर नियोजन यांचा व्यवसाय करताना नाटकाकडे बंदिस्त अवकाशातील घडोघडी बदलणारी व्यक्ती व वस्तुंचा खेळ या दृष्टीने पाहीले. काही नाटकांसाठी नेपथ्य करायची संधी मिळाली तेव्हाही काय वेगळे करता येईल याचा विचार केला. पुढे सोलापूरच्या वास्तुकलेचा इतिहास अभ्यासताना नाट्यगृहे व सिनेमागृहे यांचे अनेक संदर्भ नोंदवले. सोलापूरकर किती नाट्यप्रेमी होते त्यातून उमजते.

एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या २५ वर्षात शेठ मुरारजी गोकुळदास यांची 'सोलापूर सूत व कापड गिरणी' (स्थापना १८७६) सुरु झाल्यामुळे पूर्वीचे शांत व लहानसे सोलापूर गाव झपाट्याने विस्तारत गेले. गिरणीत कामासाठी आजूबाजूच्या दुष्काळी भागातून विविध संस्कृतींचे लोक सोलापुरात स्थायिक झाले. अधिकारी, कारकून, धनिक, वणिक, व्यापारी, सराफ असेही अनेक व्यवसायातील लोक आले. अनेक बोली भाषा ऐकायला येऊ लागल्या, तसेच अनेक सण, उत्सव साजरे होऊ लागले. या सगळ्यांची स्थानिक संस्कृतीशी सरमिसळ होऊन एक नवीच खास सोलापुरी संस्कृती उदयाला येण्याचा हा काळ. पुढच्या ३५ वर्षात १९१० पर्यंत सोलापुरात ७ गिरण्या सुरु झाल्या, ज्यात २५००० कामगार काम करत.

या सगळ्या श्रमजीवी वर्गाची करमणूक करण्यासाठी अनेक कलाकार बाहेरगावहून येत. जादूचे प्रयोग, मॅजिक लँटर्न (स्लाईड शो), तमाशा, सर्कस, नाटके, गाण्या बजावण्याचे कार्यक्रम, सप्ते, भजन-कीर्तन- प्रवचन, कुस्तीचे फड, लाठी-काठी चालवायच्या स्पर्धा, व्याख्यानमाला असे अनेक पर्याय उपलब्ध होते. ज्याच्या-त्याच्या आवडीप्रमाणे निवड करता येई. शिवाय गड्ड्याची यात्रा म्हणजे महिनाभर चालणारी मौजमजेची सोय. यात्रा याच काळात जास्त मोठी होत गेली. तर या सगळ्या गोष्टी कुठे होत असत याचा शोध खूपच रंजक ठरला.

सगळ्यात पहिला नाट्यगृहाचा उल्लेख तळ्यावरच्या थोबडे वाड्याचा आहे. ते कदाचित आजच्या रितेश हॉटेलच्या ठिकाणी असावे. १८७८ च्या सुमारास इथे नाटक कंपन्या मुक्काम ठोकत आणि रोज संध्याकाळी आपले प्रयोग सादर करत. प्रयोग अनेकदा पहाटेपर्यंत रंगत. वाड्याचे मधले अंगण आच्छादून प्रेक्षकांना बसण्याची सोय केली जाई. समोरील ओसरीवर रंगमंच असे. आतील वाड्यातून कलाकारांना येणे-जाणे करता येई, तर बाकीच्या तीन ओसऱ्यांवर कमी तिकिटाचे प्रेक्षक बसत. वाड्याचे खांब मध्ये न येतील अशी अंगणातली जागा जास्त तिकिटाच्या महत्त्वाच्या प्रेक्षकांसाठी असे. तिथे गाद्या गिरद्यांची बैठक असे, तर ओसऱ्यांवर फळकुटे ठोकून पायऱ्या बनवलेल्या असत. याच सुमारास सोलापूर गिरणीच्या आवारात होळीच्या सणात ब्रज भाषेत गाणी गाऊन रास-क्रीडेचे कार्यक्रम होत. गिरणीतील उत्तर भारतीय मंडळी यात सहभागी होत, पण आमंत्रित स्थानिक प्रेक्षक भाषेमुळे पूर्ण आनंद घेऊ शकत नसत. गड्ड्यावर एक धर्मशाळा होती (कदाचित आताच्या भक्तनिवासाच्या जागी) तिथेही नाटके होत.

या काळात बेलारीकर, पुणेकर, सांगलीकर, इचलकरंजीकर, मिरजकर, कोल्हापूरकर, बेळगावकर, विजापूरकर, मुंबईकर, शाहुनगरवासी अशा आपल्या गावांच्या नावांनी ओळखल्या जाणाऱ्या नाटक मंडळ्या सोलापुरात खेळ करून गेल्या, पण सोलापूरकर नाटक मंडळी मात्र कधी निघाली नाही. दत्तप्रसादोद्भव, शंकर संगीत, महालक्ष्मी प्रासादिक, करुणेश प्रासादिक, मुसलमानी अशी आपली धार्मिक ओळख सांगणाऱ्या काही नाटक कंपन्या असत, काही सुजनमनोरंजक, नाट्यकला प्रवर्तक, अशी नावातून करमणुकीची खात्री देणाऱ्या असत. किर्लोस्कर, भावे, पाटणकर अशा
आपल्या कर्त्यांच्या नावाची द्वाही फिरवणाऱ्या काही होत्या.

भारतात स्वातंत्र्य चळवळीची सुरुवात झाल्यावर महाराष्ट्र, स्वदेश हितचिंतक, बळवंत (लोकमान्यांचे नाव) अशा नावांची रेलचेल झाली. पारशी व्हिक्टोरिया ऑपेरा कंपनीने पण दोन महिने प्रयोग केले पण प्रेक्षकांना ऑपेरा प्रकार व इंग्रजी भाषा परिचित नव्हते त्यामुळे त्यांना फारसा प्रतिसाद मिळाला नाही.

नाटके धार्मिक, पौराणिक, ऐतिहासिक व सामाजिक विषयांवर आधारित असत. सुभद्राहरण, कालासुर गर्वसंहार, सार्थ सुधन्वा, कीचकवध, प्रमिला स्वयंवर, बभ्रुवाहन, किरातार्जुन युद्ध, दुष्यंत शकुंतला आख्यान, अहिमहीवध, हरिश्चंद्र सत्यदर्शन, चक्रव्युह, भीष्मप्रतिज्ञा, ताराविलाप, रामराज्य वियोग, विकल्प विमोचन, त्राटिका, संताप शमन, विक्रमचंद्रकला, प्रतापराव आणि मंजुळा, कांचनगडची मोहना, दामाजीपंतांचे चरित्र, अकल बडी कि पैसा बडा, गुणोत्कर्ष, मंजुघोष, गुप्तमंजुष या नावांवरून कथानकांचा अंदाज येतो आणि त्या काळच्या प्रेक्षक पसंतीची कल्पना येते. देवलांचे दुर्गा, शेक्सपियरचे हॅम्लेट, ही नाटके सादर होऊ लागली आणि त्यातून प्रेक्षकांच्या आवडीला वेगळे वळण मिळाले. स्वदेश हितचिंतक मंडळीने १८९९ मध्ये 'अभिज्ञान शाकुंतल चा प्रयोग संस्कृतमध्ये केला. सोलापुरात झालेले हे पहिले संस्कृत नाटक आणि ते झालेही उत्तम. पुढे किर्लोस्कर नाटक मंडळीची शाकुंतल आणि संगीत शारदा ही नाटके प्रेक्षकप्रिय ठरली.

सोलापुरात १८६८ पासून काकडे कुटुंबाचे कल्पतरू हे चार पानी साप्ताहिक रविवारी प्रकाशित होई तर १८८५ पासून जक्कल कुटुंबाचे सोलापूर समाचार हे त्याच स्वरूपाचे साप्ताहिक मंगळवारी प्रकाशित होई. या दोन्ही स्थानिक वर्तमानपत्रात नाटक मंडळी आल्याची बातमी, नाटकांची परीक्षणे, त्यांना मिळणारा प्रतिसाद याबद्दल लिहिले जाई. नाटक मंडळ्या १ आठवड्यापासून ३-४ महिन्यांपर्यंत मुक्काम करत. हा काळ त्यांना मिळणाऱ्या प्रतिसादावर अवलंबून असे. कधी एका वेळी दोन नाटक मंडळी, आपल्यातल्या नटांची अदलाबदली करून संयुक्त प्रयोग सादर करत, त्यांची खूप चर्चा होई, अर्थातच गर्दीही जास्त जमे. १८८२ मध्ये पुणेकर स्त्री नाटक कंपनीने पहिल्यांदा स्त्रियांना मंचावर आणले. त्यांनी दत्तप्रासादिक मंडळी बरोबर संयुक्त प्रयोग करून रसिकांची मने जिंकली. त्यानंतर स्त्रिया पुन्हा मंचावर आल्या ते तब्बल २१ वर्षांनी १९०३ मध्ये बेळगावकर नाटक कंपनीतून. तरीही पुन्हा २७ वर्षांनी जेव्हा हिराबाई बडोदेकर सुभद्रा बनून मंचावर आल्या (१९३१) तेव्हा त्यांना पहिलेपणाचे श्रेय दिले गेले. या त्रोटक उल्लेखांवरून एकूण समाजाचा स्त्रियांनी रंगमंचावर काम करण्याला किती तीव्र विरोध होता, बदल घडायला किती दीर्घ काळ जावा लागला हे लक्षात येते.

कधी तिकिटे कमी करून तर कधी टांग्यातून आकर्षक जाहिराती करून प्रेक्षक वाढवण्याचा प्रयत्न होई. मोठ्या मुक्कामामुळे कलाकारांच्या स्थानिक रहिवाशांशी ओळखी होत. आवडत्या कलाकारांना धनिक मंडळी पानसुपारी किंवा भोजनाला बोलावत. नाटकवाले एखाद्या गरजू संस्थेसाठी किंवा धार्मिक कामासाठी एखाद्या प्रयोगाचे उत्पन्न देणगी देत. १८९५ मध्ये पाटणकर संगीत मंडळीने दोन महिन्यांच्या मुक्कामानंतर रेवणसिद्धेश्वर मंदिराच्या जीर्णोद्धारास २०० रु देणगी दिली. नाटकांमुळे स्थानिक स्वयंपाकी, किराणा दुकानदार, भाजी, दूधविक्रेते, टांगेवाले, रंगारी-चितारी-सुतार यांना काम मिळे. एकूणच अर्थव्यवस्थेला टॉनिक मिळे. क्वचित कधी एखाद्या कलाकाराचे नाजूक संबंध जुळून येत आणि लग्नाच्या मंडपापर्यंत गाडी पोचे.

१८९० च्या दशकात संगीत थियेटर मध्येही नाटके व्हायला लागली. मोहिरे यांचे हे नाट्यगृह बहुधा नवी पेठेत कल्पतरू काकडे वाड्याशेजारी लक्ष्मी थियेटरच्या जागी असावे. संगीत थियेटरात कुस्त्या होत, धार्मिक सप्त्यांचे कार्यक्रम आणि तमाशेही होत. एकदा आपले भाडे मिळाले की संपले. कार्यक्रम कसला याच्याशी मालकांना काही देणे घेणे नसे. आजूबाजूचे रहिवासी मात्र आवाज, प्रेक्षकांची भांडणे, गोंधळ यांना वैतागत. कलेक्टरकडे तक्रारी जात. शेवटी कलेक्टरने त्यांना मागील रस्त्यावरून ये-जा करण्याची परवानगी दिली. पुढे १९०१ मध्ये तखतमल नरसिंगदास मंत्रींनी ते सुताच्या गाठी ठेवण्यासाठी भाड्याने घेतले, पण एकदा क्षुल्लक नजरचुकीने आग लागली, कापसाच्या गाठी असल्याने आग झपाट्याने पसरली अन संपूर्ण संगीत थियेटर खाक झाले, त्याकाळी तब्बल सव्वा लाख रुपयांचे नुकसान होते ते.

जून १९०२ मध्ये करबसप्पा काडादी यांनी सिद्धेश्वर पेठेत त्यांच्या कापूस गोडाऊनच्या जागेत भले मोठे थियेटर बांधले आणि त्याचे उद्घाटन किर्लोस्कर नाटक मंडळीच्या दौऱ्याने झाले. त्याच सुमारास जळलेल्या संगीत थियेटरशेजारी नॉवेल्टी थियेटर बांधले गेले, महालक्ष्मी प्रासादिक संगीत मंडळीने तिथे संगीत शारदाचे प्रयोग लावले. १९०२ च्या सणासुदीत सेठ हिराचंद सखाराम गांधी या धनिकांनी नवी वेसेच्या पश्चिमेला एक भव्य नाट्यगृह बांधण्याचे जाहीर केले. दसऱ्याच्या मुहूर्तावर मेकोनॉकी कलेक्टरच्या हस्ते त्याचे भूमिपूजनही झाले. १९०३च्या हिवाळ्यात मुंबई इलाख्याचे गव्हर्नर सर मॉटिथ यांनी बांधकामाला भेट देऊन शेठजींचे कौतुक केले. दरम्यान संगीत थियेटरची पुन्हा बांधणी होऊन १९०३ च्या उन्हाळ्यात ते रसिक सेवेत रुजू झाले. १९०४ च्या ऑगस्ट महिन्यात अखेर गांधी सेठजींचे भव्य थियेटर बांधून पूर्ण झाले. मेकोनॉकी कलेक्टरच्या हस्ते त्याचे उद्घाटन झाले. गांधी सेठ आणि मेकोनॉकी यांच्या मैत्रीचे प्रतिक म्हणून उभारलेल्या या शानदार इमारतीला मेकोनॉकीचे नाव दिले गेले. मल्लिकार्जुन नारायण, विठ्ठल हरी मिस्त्री, लक्ष्मण हरी मिस्त्री या स्थपतींचा सत्कारही कलेक्टरच्या हस्ते करण्यात आला. संपूर्ण स्थानिक तंत्रज्ञ व कारागिरांकडून अंदाजे ५०-६० हजार रुपये खर्चून भारतीय वासाहतिक शैलीत बांधलेले हे नाट्यगृह पुढे ४-५ दशके सोलापूरच्या सांस्कृतिक घडामोडींचे केंद्र बनले. स्टेशन कडून येणाऱ्या आणि पुढे पुण्याकडे जाणाऱ्या रस्त्याला नवीपेठेचा मुख्य रस्ता मिळतो त्या चौकात आपल्या भव्य आवारात हे नाट्यगृह रसिकांना आमंत्रण देत राहिले. मग या चौकाचेही नामकरण लोकांनीच केले मेकोनॉकी चौक.

नव्या शतकात जसजशी स्वातंत्र्य लढ्याला धार चढत होती, वीर, शोक आणि हास्य रस शृंगार रसापेक्षा जास्त लोकप्रिय ठरू लागले. वसईकर नाटक कंपनीची पानिपतचा मोबदला, गिलच्यांचा सूड आणि पृथ्वीराज संयोगिता ही नाटके गाजली. साताऱ्याच्या फणसळकर वकिलांचे स्वदेशी हे नाटक लोकांना स्थानिक वस्तूंचा वापर व स्वदेशाचे प्रेम यांचे महत्त्व सांगण्यासाठीच निर्मिलेले होते. १९१३ मध्ये नुतनिकरणानंतर संगीत थियेटरचे उद्घाटन डॉ. वा. का. किर्लोस्करांनी केले तर किर्लोस्कर नाटक मंडळींनी उद्घाटनाचे प्रयोग लावले. या नूतन संगीत थियेटरमधे परिषदा व प्रवचने सारख्याच उत्साहाने भरत. १९१६ च्या एका पूर्वमोसमी वादळात मेकोनॉकी आणि नूतन संगीतथियेटर वरील पत्रे उडून गेले आणि बराच गोंधळ माजला. दरम्यान १९१३ मध्ये दादासाहेब फाळकेंनी संपूर्ण स्वदेशी बनावटीचा राजा हरीश्चंद्र सिनेमा आणला आणि रात्रभर चालणाऱ्या नाटकांची घसरण सुरु झाली. तेव्हा सगळ्या नाट्यगृहात सिनेमा दाखवण्याची सोय केली. कधी नाटक, कधी सिनेमा अशी कसरत सुरु झाली. मग बदलत्या काळाची पावले ओळखून सेठ हिराचंद सखाराम गांधींसारख्या हुशार धनिकाने मेकोनॉकीच्या आवारात आणखी एक थियेटर बांधायला काढले. १९२३ मध्ये रतिलाल या नावाने ते रसिक सेवेत रुजू झाले. हा कदाचीत मीना टॉकीजचा पुर्व अवतार. १९२४ मध्ये बालगंधर्वांचा दौरा झाला तेव्हा त्यांचे अनेक सत्कार सोलापुरात झाले.

ऑक्टोबर १९३१ मध्ये सोलापूर मार्शल लॉच्या दमनशाहीतून सावरत असताना नूतन संगीत विद्यालय (नाट्य शाखा) या संस्थेने आपली नाटके केली. खांसाहेब अब्दुल करीम खान या प्रख्यात शास्त्रीय गायकाच्या कुटुंबाच्या या नाटकांनी हिराबाई बडोदेकर, कमलाबाई, सरस्वतीबाई या बहिणी, सुरेशबाबू माने हे बंधू व सवाई गंधर्व हे गुरुबंधू या नंतर शास्त्रीय संगीतात दिगंत कीर्ती मिळवणाऱ्या युवा ताऱ्यांना अनुभवण्याची संधी रसिकांना दिली. त्यांच्या सौभद्र आणि मीराबाई या नाटकांना मोठा लोकाश्रय लाभला. याच सुमारास सरस्वती विलास या नाट्य-सिनेगृहाचा उल्लेख येतो. अनेक मालक व व्यवस्थापक बदलत शेवटी ते महिंद्रकरांचे चित्रा टॉकीज झाले. सध्याच्या पारस इस्टेटच्या ठिकाणी ते असावे. या काळात सिनेमाकडे लोकाचा ओढा वाढू लागला व उपलब्ध जागा सिनेमांनी व्यापल्या त्यामुळे नाटक कंपन्यांना आपले बस्तान लवकर हलवावे लागते अशी तक्रार सुरु झाली.

१९३४ मध्ये सोलापुरातील नाट्य प्रेमींनी वसुंधरा संगीत मंडळी हा नाट्यक्लब सुरु केल्याची नोंद आहे, पण ते स्वतःची नाटके बसवत की नाट्यप्रयोगांचे आयोजन करत हे

मात्र कळत नाही. १९३५ च्या नोव्हेंबरात शंकरराव भागवतांच्या चित्रमंदिर या आलिशान सिने-नाट्यगृहाचे उद्घाटन झाले. तिथे प्रामुख्याने सिनेमे दाखवले जात, पण प्रचंड मोठ्या रंगमंचामुळे नाटकेही करता येत. जागतिक कीर्तीचे नर्तक उदयशंकर यांच्या प्रख्यात बॅले गटाचा कार्यक्रम १९३५ डिसेंबरमध्ये सोलापूरकरांना तिथे पाहायला मिळाला. १९३९ च्या पावसाळ्यात दिनानाथ मंगेशकरांच्या बळवंत संगीत मंडळीने नूतन संगीत नाट्यगृहात रणदुंदुभी, भावबंधन, ब्रह्मकुमारी ही नाटके सादर केली. या वेळी त्यांनी चाटी अनाथ विद्यार्थी गृह, सरस्वती मंदिर, सेवासदन, व मूक बधीर शाळांच्या मदतीसाठी काही प्रयोग आयोजित केले. कदाचित याच दौऱ्यावेळी दीनानाथांच्या मुलीने, 'लता'ने संगीत मैफलीत आपल्या पित्याचे गाणे प्रस्तुत करून सोलापुरातून आपल्या कारकीर्दीचा श्रीगणेशा केला. पुढे १९४२ मध्ये दीनानाथांचे अकाली निधन झाल्यावर ३ वर्षांनी त्यांच्या पुण्यतिथी निमित्त 'निरागस' नाट्य मंदिराच्या मुक्त नाट्यगृहात लता व मीना या भगिनींचा गाण्याचा कार्यक्रम झाल्याची नोंद आहे. निरागसचा मंच सेवासदनसमोरच्या चंचला देवी व चंदुलाल गांधींच्या बंगल्याच्या आवारात होता. तिथे नवयुग व्याख्यानमालेची व्याख्याने होत असत. स्वामी रामानंदतीर्थ, दत्तो वामन पोतदार, मालतीबाई बेडेकर, एम एन रॉय यासारखे दिग्गज वक्ते तिथे बोलून गेले. १९४८ मध्ये तिथे डॉ इरावती कर्वे यांचे व्याख्यान चालू असताना गांधीजींच्या निधनाची बातमी आली आणि व्याख्यान अर्धे सोडून बाईंना परतावे लागले. या काळात कामगार नाट्यचळवळ वाढीस लागलेली होती. प्रत्येक मिलमध्ये गणेशोत्सव उत्साहाने साजरा होई, त्यात नाटके बसवली जात. कामगार चाळीतील सभागृहे व रेल्वे वसाहतीतील गणेश हॉलने अनेक धडपड्या नाट्यकर्मींना अवकाश दिला. सदर बझारमधील व कुचन हायस्कूल जवळील कामगार कल्याण केंद्रे, सेवासदन मधील कुमुदिनीबाई दोशी स्मृती कलामंच व सभागृह, हरीभाई देवकरण शाळेतील मुळे हॉल, सरस्वती मंदिर शाळेतील मुक्त मंच, नगरपालिकेचे मुळे पॅव्हीलीयन, सारस्वत समाजाचा हॉल, विकास नगरचे गणेश मंदिर, शासनाचे रंगभवन सभागृह व समाज कल्याण मंदिरे, ख्रिस्त सेवा मंदिर, रेल्वे अधिकारी क्लबातील व उजनी कॉलनीतील हॉल या सर्व ठिकाणी सोलापुरातील हौशी नाट्य चळवळ फोफावली. विसावे शतक संपेपर्यंत ती चांगलीच जोमदार होती.

१९४३ मध्ये मराठी नाटकाची शताब्दी साजरी करण्यासाठी नाट्य महोत्सव झाला त्यात कलाविलास आणि नाट्य निकेतन या कंपन्यांची नाटके झाली शिवाय स्थानिक नाट्यलेखन व सादरीकरणास उत्तेजन देण्यासाठी सोलापूरच्या शेडजाळे'नी लिहिलेल्या व स्थानिक मंडळींनी बसवलेल्या 'मीठभाकर' या नाटकाचा प्रयोग झाला. प्रख्यात नाट्य व सिने कलावंत पृथ्वीराज कपूर १९४९ मध्ये आपल्या नाटकांचा संच घेऊन आले. ५-६ दिवसात त्यांनी ५-६ वेगळी नाटके सादर केली, तिकिट जास्त असूनही त्यांचे प्रयोग हाउसफुल गर्दीत झाले. त्यांनीही भावे रुग्णोपयोगी संस्थेला देणगी दिली. रसिकांच्या प्रेमाने त्यांना पुन्हा १९५६ मध्ये यावे लागले. १९६४ मध्ये उमा मंदिराच्या उद्घाटनाला त्यांचे सुपुत्र राज कपूर आपल्या संगम चित्रपटाचे सहकारी घेऊन आले होते.

वरचेवर हिंदी चित्रपटसृष्टीचा पसारा व लोकप्रियता वाढत गेली तसे नाटकांचे आकर्षण कमी होत गेले. १९५० च्या सुमारास सोलापूर मिल बंद पडली तशी गिरणगावाचे वैभव उतरणीला लागले. मेकॉनोकी थियेटर पाडून तिथे 'आशा' बांधले गेले, 'नूतन संगीत' जाऊन लक्ष्मी सिनेगृह आले, पुढे 'चित्रा' जाऊन तिथे बाजारपेठ झाली. त्याचवेळी अनेक नवी सिनेमागृहे बांधली गेली. पण नाट्यगृहांची सद्दी संपली. पूर्वीही जिथे नाट्यगृहे उपलब्ध नाहीत तिथे मैदानात तात्पुरते मंच उभारून व मांडव घालून नाट्यप्रयोग होत, आजही होतात. जाणता राजा सारखे महानाट्य किंवा नाट्य संमेलनातील मोठ्या प्रेक्षकसंख्येची नाटके अशाच मंचावर होऊ शकतात.

१९७७ मध्ये भागवत चित्रनगर आवारात मुक्त नाट्यगृहाची सुरुवात पं भीमसेन जोशींच्या संतवाणी कार्यक्रमाने झाली. त्याच सुमारास कधीतरी सातरस्ता परिसरात दमाणी नाट्य संकुलाची उभारणी झाली आणि सोलापूरकरांना त्यांचे हक्काचे आधुनिक नाट्यगृह मिळाले. नंतर १९८०च्या दशकात हुतात्मा स्मृती मंदिराची उभारणी महानगरपालिकेने केली. आज तेच एकमेव संपूर्ण नाट्यगृह

उपलब्ध आहे. हि. ने. वाचनालय आवारातील किर्लोस्कर सभागृह व लोकमान्य टिळक सभागृह, होमी हाउस निकट मंच, लोकमंगल कलामंच, शिवस्मारक, फडकुले, गोविंदश्री, उद्योग बँक ही सभागृहे असे विविध आकार प्रकारचे व कमीजास्त सोयी सुविधांचे मंच अनेक सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी वापरले जातात. सर्व मुख्य महाविद्यालयात त्यांची सभागृहे व मुक्त मंच आहेत. हौशी रंगकर्मींचा उत्साह जराही उणावला नाही. मराठी माणसाच्या नाट्यप्रेमाने अनेक वळणे घेतली, तरी आजही प्रायोगिक व व्यावसायिक नाटकांचे सशक्त प्रवाह वहात आहेत. त्यांच्यातला फरक कमी होतोय. शाळा, कॉलेज, गणेशोत्सव, स्पर्धा, महोत्सव, उन्हाळी नाट्यवर्ग यातून नाट्यप्रेमाची पायाभरणी व प्रशिक्षण होत असते. सोलापूरचे नाट्यक्षेत्र त्याला अपवाद कसे असेल?

(लेखिका वास्तुविशारद, प्राध्यापक, स्थानिक व नागरी इतिहास संशोधक, समन्वयक इंटॅक सोलापूर विभाग, आहेत.)

■■

# सोलापूरी नाटककार

– श्रीपाद येरमाळकर

महाराष्ट्रात मराठी रंगभूमीला १७०वर्षांची परंपरा लाभली आहे आणि ही परंपरा आजही कायम आहे या १७० वर्षात मराठी रंगभूमीवर अनेक स्थित्यंतरे झाली. नाटकाचे नवनवीन फॉर्म आले, जॉनर (जातकुळी) आले नवनवीन तंत्रज्ञान व आधुनिक विषय आले. व्यावसायिक, प्रायोगिक,समांतर अशा वेगवेगळ्या विभागात रंगभूमी विभागली गेली. नवनवीन कलाकार, लेखक निर्माण झाले नाटकाचे तंत्र बदलले ते अधिक प्रगत झाले विशेषतः प्रकाशयोजना, नेपथ्य, ध्वनी अशा तांत्रिक बाबीत अमुलाग्र बदल झाला. फार्स (अतिनाट्य), विनोदी नाटक आणि मेलो ड्रामा या प्रकारातून नाटक अधिक लोकप्रिय झाले .

खरं तर नाटकाच्या संहितेला आवाहक आकृतिबंध प्राप्त होतो तो नाटकाच्या प्रयोगातच. नाटकाची संहिता ही प्रयोगासाठीच अवतरत असते पण ती संहिता प्रयोगात भ्रष्ट होऊ शकते किंवा तिचे कलात्मक संपादनही होऊ शकते तथापि प्रयोगावाचून नाट्यसंहिता ही अर्थहीन असते असे समजण्याचे कारण नाही परंतु केवळ नाट्यसंहिता वाचत असताना जो अनुभव येतो तो संकल्पनात्मक किंवा काल्पनिक असतो. संहिता जेव्हा रंगमंचावर दृकश्राव्य होते , तेंव्हाच ती जास्त संवेदनात्मक होते . संहिता प्रयोगरूपात अवतरली तरच खऱ्या दृष्टीने अनुभवता येते. नेपथ्य, वेशभूषा, प्रकाशयोजना ,अभिनय, संवाद ,संगीत , पात्रांचा रंगमंचावरील वावर इत्यादी दृकश्राव्य अंगे जी संहितेत बीज रूपाने असतात त्याचे हळूहळू एका मोठ्या वृक्षात रूपांतर होत असते आणि ते प्रेक्षकांना एक जिवंत अनुभव देते. एकाच नाट्यसंहितेची अनेक प्रयोगरूपे असू शकतात. त्या विशिष्ट रूपानुसार नाट्य अनुभवाचे रूप नियत होते.सुरुवातीच्या काळात पौराणिक आणि त्यानंतर ऐतिहासिक अशी दोनच प्रकारची नाटके सादर होत असत. पुढे काही पुरोगामी विचारांचे नाट्यलेखक; सामाजिक आणि राजकीय विषयावरही नाटक लिहू लागले. अशी वास्तववादी नाटके प्रेक्षकांना आवडू लागली. आणि आधुनिक मराठी रंगभूमीचा उदय झाला १९७० च्या दशकात भारतीय रंगभूमीवर एक उधाण आले विजय तेंडुलकर, गिरीश कर्नाड, बादल सरकार

,मोहन राकेश यांनी राजकीय, सामाजिक तसेच तात्कालीन कौटुंबिक परिस्थितीच्या संदर्भात  नाटकाच्या माध्यमातून प्रश्न उपस्थित केले. प्रेक्षकांसाठी हा एक वेगळाच अनुभव होता. प्रेक्षक अशा नाटकांकडे ओढला गेला आणि रंगभूमीला एक नवा आयाम प्राप्त झाला. खरे म्हणजे वेगवेगळ्या जॉनर (जातकुळी) ची नाटके वेगवेगळ्या फॉर्म मध्ये प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्याचे बहुतांश श्रेय मी देऊ इच्छितो ते महाराष्ट्र शासनाने सुरू केलेल्या राज्य नाट्य स्पर्धेला आणि कामगार नाटय स्पर्धेला.मराठी रंगभूमीवर अशी अनेक नाटके आहेत की जी मैलाचा दगड ठरली आहे ती सर्वप्रथम महाराष्ट्र शासनाच्या राज्यस्तरीय स्पर्धेत आणि कामगार नाटय स्पर्धेतच सादर झाली आहेत. सोलापूरलाही नाट्य लेखकांची जुनी परंपरा आहे . स्पर्धेसाठी नाट्यलेखन करणारी चौथी पिढी आता उदयास आली आहे. पैकी काही नाटके व्यवसायिक रंगभूमीवरही आली परंतु ती बोटावर मोजण्या इतकीच. १९५६ ते २०२३ हा या कालावधीत सोलापुरात अनेक नाट्यलेखक उदयास आले. आपल्या प्रतिभेच्या पंखानी त्यांनी नाट्यक्षेत्रात गरुड झेप घेतली. सुरवातीच्या काळात स्पर्धेसाठी नाटक लिहणारी कुमार कोठावळे, कवी रा. ना. पवार, त्र्यं. वी. सरदेशमुख, चंद्रभूषण कुलश्रेष्ठ, व्यंकटेश कामतकर, मनोहर देखणे, अजीज नदाफ, पांडुरंग काळे, लक्ष्मीनारायण बोल्ली ही पिढी आता काळाच्या पडद्याआड गेली आहे. पण त्यांनी आपल्या सशक्त लेखणीने सोलापूरची रंगभूमी सशक्त करून ठेवली आहे.

१९५६ ला कुमार कोठावळे यांनी आपलं पहिलं स्वलिखित नाटक महात्मा बसवेश्वर हे रंगमंचावर आणले. त्यानंतर मंगळसूत्र, मानलेली बहीण, संत हरळय्या, झाशीची राणी, शिंग फुंकले रणी, त्याच बरोबर दोन घडीचा डाव, स्वातंत्र्यलक्ष्मी ,आणि सावित्री अशी नाटके सातत्याने लिहिली आहेत

कवी रा ना पवार हे जुन्या पिढीतील कसलेले नाटककार त्यांचे कविराय राम जोशी , हे एक अतिशय गाजलेलं नाटक. हंसा वाडकर,जयमाला शिलेदार, लीला गांधी ,ज्योती चांदेकर, वसंत शिंदे अशा व्यावसायिक नटांना घेऊन हे नाटक त्यांनी व्यावसायिक रंगभूमीवर आणले आणि ते गाजलेही. त्याचबरोबर दोन गडी बारा भानगडी, बिलासखानी, तोडी, जिंकू किंवा मरू, नवरे चालत येतात अशा अनेक उत्तमोत्तम संहिता त्यांनी सोलापूरच्या रंगभूमीला दिल्या माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनीही त्यांच्या अनेक नाटकातून अभिनय केला आहे.

यानंतर नाव येते ते सोलापुरातील प्रख्यात साहित्यिक त्र्यं. वी. सरदेशमुख सर यांचे. यांनी रंगभूमीसाठी दोन नाटके दिली पहिलं टाहो. टाहो हे नाटक त्यांच्याच बखर एका राजाची या कादंबरीवर आधारित होते तर दुसर थैमान दोन्हीही नाटके रंगभूमीवर अतिशय यशस्वी झाली.

याचबरोबर आधुनिक शैलीत नाटक लिहिणारे एक नवीन नाटककार प्राध्यापक चंद्रभूषण कुलश्रेष्ठ हे उदयास आले. प्रयोगशील व तरुण पिढीचे नेतृत्व करणारे प्राध्यापक कुलश्रेष्ठ यांनी अश्वत्थामा, विस्फोट, गजाआडचे गाणे, अंतर निरंतर यासारखी नाटके रंगभूमीला दिली.

त्याच दरम्यान व्यंकटेश कामतकर यांच्यासारख्या कवी–नाटककारांने समुद्रमंथन, जिवंत समाधी, संगीत भक्त पुंडलिक, यासारखी नाटके लिहिली आणि ती मंचावर सादरही झाली.खरी कमाई या त्यांच्या नाटकाला राज्यस्तरीय पुरस्कारही मिळाला.

मनोहर देखणे हे अतिशय प्रतिभासंपन्न लेखक सोलापूरच्या रंगभूमीला लाभले गणेशोत्सवासाठी आणि कामगार नाट्य स्पर्धेसाठी त्यांनी वेड पामराचे ,सावध मी येत आहे, माझं स्वप्न होतं एक, हीच आपली सीमा इत्यादी नाटके लिहिली. ते एक उत्तम दिग्दर्शकही होते.

अभिनय, दिग्दर्शन आणि लेखन अशी तिहेरी भूमिका बजावणारे डॉक्टर अजीज नदाफ हे एक उत्तम नाटककार होते त्यांनी काटेरी फुले, येथे सारे स्वस्त आहे ,व्यथा ही हृदयाची, अडीच अक्षरे प्रेमाची यासारखी नवीन शैलीतील नाटके सोलापूरच्या रंगभूमीला दिली.सोबतच त्यांनी बरीच उत्तम उत्तम लोकनाट्येही लिहिली आहेत.

सुरुवातीला श्रुतिका लेखन करणारे नाट्यलेख पांडुरंग काळे दरम्यानच्या काळात उदयास आले व्यक्तिचित्रे, चरित्रात्मक लेखन यासोबतच त्यांनी एकांकिका, तीन अंकी नाटके आणि बालनाट्य असे विपुल साहित्य निर्माण केले आणि त्यात ते यशस्वीही ठरले. म्हणूनच जग फसतं. जिथं तिथं कांचन मृग, अतृप्ता, हे झाड जगावेगळे, तिसरी आजादी, महत्त्वकांक्षी, यासारखी नाटके त्याचबरोबर आम्ही पालखीचे भोई, दिंडी, नाटक, कोरफड यासारख्या एकांकिका आणि आश्चर्य ! युवराज बरे झाले, राजाला चूक उमगली इत्यादी बालनाट्ये त्यांनी लिहिली. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद मुंबई मध्यवर्ती शाखेने त्यांना गोविंद बल्लाळ देवल पुरस्कार देऊन सन्मानित केले.

लक्ष्मीनारायण बोल्ली, सोलापूरच्या नाट्यपरंपरेतील व इतिहासातील एक सोनेरी पान. मुळातच तेलुगु भाषिक असणारे लक्ष्मीनारायण बोल्ली याचं मराठी भाषेवर प्रचंड प्रभुत्व होतं. तेलुगू, मराठी भाषेचा पूल म्हणून त्यांना संबोधले जाते. वैचारिक आणि चरित्रात्मक लेखनाबरोबरच त्यांनी नाट्य लेखनातही आपला ठसा उमटवला. हॉटेल षण्मुखम, मी हिरणी तू व्याध, हद्दपार, स्वीकार, मा. निषाद, विरहणी वासवदत्ता बौद्ध कालीन जातक कथेवर आधारित

काव्यनाट्य, बुर्रा कथा या तेलुगू लोककथेच्या माध्यमातून संत तुकारामाला समकालीन तेलुगू संत बेमन्ना यांच्या जीवनावरील विश्वदाभिरामा यासारख्या सशक्त नाट्यकलाकृती त्यांनी लिहिल्या. त्यासोबतच त्या रंगमंचावरही आणल्या.या नाटकांना प्राथमिक व अंतिम फेरीतही यश लाभलं. लेखनाची पारितोषिकेही मिळाली. विशेष बाब म्हणजे त्यांच्या विपुल साहित्य संपदेसाठी त्यांनी डी. लिट ही पदवी देऊन गौरविले आहे.

दरम्यान 'जादू जंगल' हे नाटक लिहून प्रा.निशिकांत ठकार यांनी सोलापूरातील नाट्य क्षेत्रात खळबळ माजवली, सोबतच गाणं पंचरंगी पोपटाचं, कहाणी वाघाच्या सावलीची, द्वैता पल्याड तू अद्वैता, नटी विनोदिनी, नाटक अग्निचे पाऊस पाण्याचे, महामाई अशा कन्नड नाटकांचे भाषांतरही त्यांनी केले. ही सर्व नाटके राज्य व कामगार स्पर्धेत सादर झाली. सोलापूरातील निशिगंध या संस्थेने ही सर्व नाटके सोलापूरच्या रंगभूमीवर आणली आणि ती यशस्वीही झाली. इतकी की, यातल्या जवळपास सगळ्याच नाटकाला प्राथमिक व अंतिम फेरीत घवघवीत यश मिळालं. अनेक नाटकांना अंतिम स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळाला व अभिनय, दिग्दर्शन, पार्श्व संगीत अशी अनेक पारितोषिके मिळाली. त्यांच्यामुळे सोलापूरचा दबदबा अंतिम फेरीत निर्माण झाला.

नव्या पिढीचे प्रतिनिधित्व करणारे नाट्य लेखक शरदकुमार एकबोटे यांची अनेक नाटके ही सोलापूरातील रंगभूमीसाठी मैलाचा दगड ठरली. अतिशय प्रतिभासंपन्न असे एक नवीन पिढीचे प्रतिनिधित्व करणारे सशक्त लेखक सोलापूरच्या रंगभूमीला त्यांच्या रुपाने मिळाले. निखारा, हा फास रेशमाचा, मातीच पाऊल, दि रॉक, बळी, युद्धे, मी एक सूर्यफूल, माकडांचा न्याय, बचनाग यासारख्या नाट्यकलाकृती त्यांनी निर्माण केल्या. त्या सोबतच शहीद भगतसिंग जन्मशताब्दी निमित्त भगतसिंग नावाची संहिता ही त्यांनी रंगभूमीवर आणली.

युवा पिढीचे नेतृत्व करणारे नाट्य क्षेत्रातील आणखीन एक प्रतिभासंपन्न नाव म्हणजे मुकुंद हिंगणे, हाडाचे पत्रकार असणारे मुकुंद हिंगणे यांनी सामाजिक व राजकीय विषयावरील अनेक संहिता स्पर्धेसाठी लिहिल्या. काही अग्नी शमत नसतात. ट्रिपल डोस, आता राज्य आमचंच, तिच्या अस्वस्थ वेदनांचे जंगल, धागेदोरे, एक कप्पा रिकामा, ओंजळ माझी रीती गं, बेकरार, यदा यदाही, पाय टाकुनी जळात बसला इत्यादी नाटके तर त्यासोबतच सापळा, समस्या, शांतता हिंसा चालू आहे, एक कप्पा रिकामा, इन्शुरन्स फॉर डेथ, बजो, गाभूळ, भुताळ गप्पा यासारख्या सशक्त एकांकिका त्यांनी सोलापूरच्या रंगभूमीला दिल्या आहेत.

याच दरम्यान अतिशय संवेदनशील नाट्य लेखक शिरीष देखणे यांनीही लेखनास प्रारंभ केला होता. पराभव, स्वप्न, आई म्हणोन कोणी, गोष्ट प्रेमाचीच पण, काका मला वाचवा, या एकांकिका व त्यासोबतच चाफा, कोंडुरा, त्या बकुळीच्या झाडाखाली, कृष्णपक्ष, एक धागा दुःखाचा, रेशीम धागे, शनिवारी रात्री एक वाजता, क्राइम पॅशन अशी विविध सामाजिक आणि कौटुंबिक नाटके त्यांनी लिहून सोलापूरच्या रंगभूमीला एक नवा आयाम दिला. यातली काही नाटकं अंतिम स्पर्धेत गेली आणि चाफा नंतर अमाप यश मिळावलं. आजचा आघाडीचा अभिनेता अतुल कुलकर्णी याने त्या काळी चाफा या नाटकात लिड रोल केला होता व अभिनयाचं रौप्यपदकही अंतिम स्पर्धेत पटकावलं होतं.

याच दरम्यान सोलापूरच्या नाट्यलेखन परंपरेत मोलाची भर टाकली ती एका नवीन सशक्त व आशयघन लेखकाने तो म्हणजे जयप्रकाश कुलकर्णी. प्रीती सुरी दुधारी, प्रेमी राष्ट्र प्रेमी, सुरवंट, तथागत (नृत्य नाट्य), का जीव असे जोडावे, प्रारुप, भारतीय दंड विधान, आणि अखेर ती वेळी आली, कंपल्शन टू कन्फेस, छद्म इत्यादी सामाजिक आणि कौटुंबिक नाटके त्यांनी सोलापुरच्या रंगभूमीला दिली त्यासोबतच नायक, हेड स्टडी, शोध बाई शोध ही विनोदी एकांकिका हर्क्युलस, अनृतबंध या एकांकिका आणि बाल नाट्य 'जत्रा' ही त्यांची लेखन संपदा. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद मुंबई २००७ चा नाट्यलेखन पुरस्कार, अखिल भारतीय २००० मराठी नाट्य परिषदेचा २०११ चा नाट्य लेखन पुरस्कार, सुशील करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा २०११ चा नाट्य लेखन पुरस्कार, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद मुंबई यांचा २०१२ चा नाट्य लेखन पुरस्कार २००६ ला नामदेव वठारे नाट्य महोत्सवात उत्कृष्ट लेखन पुरस्कार इत्यादी अनेक लेखनाचे पुरस्कार त्यांनी पटकावले नाट्य लेखनासोबतच ते उत्कृष्ट प्रकाशयोजनाकार व नेपथ्यकार आहेत सोलापुरातील अनेक संस्थांना त्यांनी विनाशुल्क, विनामानधन प्रकाशयोजना त्याचप्रमाणे नेपथ्यरचनाही करुन दिली आहे.

दरम्यान महाराष्ट्राच्या रंगभूमीवरची लेखनाची परंपरा क्षीण झाली की, काय असे वाटून व त्यासोबतच नवलेखकांना प्रोत्साहन म्हणून महराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक संचालनलयात एक नवीन नियम काढला त्यात राज्य नाट्य स्पर्धेसाठी मागील तीन वर्षाच्या आतील संहिता साजरी करण्याचे बंधन घालण्यात आले आणि मग भराभर तरुण लेखक हातात लेखन घेऊन सरसावले, या नियमामुळे तरुण पिढीतील एक प्रतिभावंत लेखक म्हणून विजय कटके हे नवोदित लेखक उदयास आले दुभंगून जाता जाता, ही त्याची

पहिली नाट्यसंहिता अतिशय गाजली आणि त्यानंतर त्यांची लेखणी थांबलीच नाही 'चौथा पर्याय' आणि नाईलाजास्तव, फज्जा झाला रे, अन आत्मा थंड झाला, द बेट, भेट उध्वस्त पण कोण, सरहद, फक्त एक हिसका आणि, वळीव, अबाउट टर्न, डर्टी पॉलिटिक्स या एकांकिमा तर दुभंगून जाता जाता, व्हाट्स अँन आयडिया सरजी, व्हायरस, सांग तुझ्या बापाला, डबल डिल, आसमान से टपका इत्यादी दोन अंकी नाटके त्यांनी मराठी रंगभूमीला दिली. त्यासोबतच त्यांनी बऱ्याचशा मराठी कथा लिहिल्या आहेत. चित्रपटासाठीही त्यांनी पटकथा व संवाद लेखन केले आहे. सोबतच इंग्रजी मधूनही त्यांनी दोन एकांकिका लिहिल्या आहेत.

रंगभूमीवर अभिनय करणारे नाट्य अभिनेते मंदार काळे यांच्या रुपात एक नवीन लेखक सोलापूरच्या रंगभूमीला मिळाला त्यांनी कोर्ट मार्शल, स्काय इन ब्ल्यू ह्या दोन भाषांतरित संहिता राज्यनाट्य स्पर्धेला दिल्या. पैकी कोर्ट मार्शल या नाटकाला प्राथमिक तसेच अंतिम फेरीत घवघवीत यश मिळाले या नाटकाने कामगार नाट्य स्पर्धेतही बाजी मारली.

मूळचे अभिनेता असणारे रत्नाकर जाधव यांनीही नाट्यलेखनात मोलाची भर टाकली. एम फिफ्टीन एक्सप्रेस हायवे, वायलन्स इन द सायलेन्स वेलकम टू सिरॉक ब्लाइंड चेस, हँग ओव्हर, यस! इट्स माय ऑर्डर यासारखी दर्जेदार नाटके आणि त्यासोबतच जोर का झटका, सेलिब्रेशन, शुअर शॉट या एकांकिका तर सांध, मास्क, बल्ल्या पार्टीचा, सोलापूरी वस्ताद, बी स्मार्ट अशा शॉर्ट फिल्म त्यांनी लिहिल्या. रहस्यमय, सामाजिक आणि विनोदी विषयाची नाटकाची जबरदस्त हाताळणी करण्याचं कौशल्य त्यांच्याकडे आहे.

नव्या युगाचे एक प्रतिभावंत लेखन रजनीश जोशी यांनी फंदी, छेद, रुपक अशी अनेक नाटके लिहून सोलापूरच्या रंगभूमीवर आपली एक नवीन ओळख निर्माण केली. स्वतः अभिनेते असूनही त्यांनी विविध सामाजिक अशी आशयघन नाटके लिहून लेखक म्हणून आपला एक नवीन ठसा सोलापूरच्या रंगभूमीवर उमटविला. छेद व रुपक या नाटकांना राज्यनाट्यच्या अंतिम स्पर्धेत अभिनय, दिग्दर्शन, नेपथ्य, पार्श्वसंगीत या सगळ्यातच घवघवीत यश मिळालं.

ज्येष्ठ नाट्यदिग्दर्शक व सोलापूरच्या संगीत नाटकात मानाचे स्थान असणाऱ्या प्रा. विद्या काळे यांनी दिग्दर्शन अभिनय यासोबतच लेखन क्षेत्रातही आपली लेखणी आजमावली आणि त्यात त्या यशस्वीही झाल्या.

अनेक बालनाट्य त्यांनी सोलापूरच्या रंगभूमीला दिली त्यासोबतच लेखन क्षेत्रातही आपली लेखणी आजमावली आणि त्यात त्या यशस्वीही झाल्या. अनेक बालनाट्य त्यांनी सोलापूरच्या रंगभूमीला दिली त्यासोबतच ना पत्नी माता, भ्रमनिरास, कथा मानकावतीची अशा सशक्त संहिता त्यांनी राज्य नाट्य स्पर्धेला दिल्या. यापैकी ना पत्नी माता ही त्यांची नाट्यकृती गद्य व संगीत रंगभूमीवर फारच यशस्वी ठरली. त्यांच्या नाटकांनी दिल्ली गाजवली.

कवी मनाचे कथा व कादंबरीकार प्रा. राजेंद्र शेंडगे यांनीही नाट्य क्षेत्रात आपली लेखणी आजमावली फक्त माणूस म्हण पावसा आधीचा पाऊस या दोन संहिता त्यांनी राज्य नाट्य स्पर्धेसाठी लिहिल्या, पैकी 'फक्त माणूस म्हण' या नाटकाला त्यांना कामगार नाट्य स्पर्धेत घवघवीत यश मिळाले.

नाट्य अभिनेते आनंद खरबस यांनीही सोलापूरच्या रंगभूमीला यशस्वी संहिता दिल्या. २००७ ते २०२२ च्या दरम्यान त्यांनी विपुल लेखन केले ऐन्यार्ली पैन्यार्ली, हिल टॉप व्हिला, दैवम् अचिन्त्यम्, लाईफ फॅक्टर, स्मृती विस्मृती, सूर्यास्त, परीघ, इस्कॅलॅवो, जारव्यांच्या जंगलातून, चखोट घास इत्यादी नाटके व त्यासोबतच बिचारे अप्पा बंड करतात. मनातला राक्षस, जगी धन्य तो, फड, पांडू पळाला, अन दगडी भिंत फुटली, फुलन, तेरे मेरे बीचमें, वाळ , गंमत, एक वेडा माणूस, अॅक्ट्रेस, पेरीशड्, बळी, ज्याचं त्याचं वर्तुळ, दे धक्का, चखोट घास या एकांकिका, पांडु पळाला रे दीर्घांक आणि हाका नाका माका नाका, एक दोन तीन चार, भ भ भुताचा, छोटा मावळा, टेडी, चार्ली, रोबो आणि बंटी, देव माणूस, एक रात्र गडावर इत्यादी बालनाट्यं त्यांनी राज्य नाट्य स्पर्धेसाठी लिहिली आणि त्याला अनेक पारितोषिके मिळाली.

नाट्यशास्त्राचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेतलेले पदव्युत्तर असे तरुण नाट्यलेखक गणेश मरोड यांनीही सोलापूरच्या रंगभूमीवर नाट्यलेखन करुन मोलाची भर टाकली, यामध्ये शोध अस्तित्वाचा, आयडेंटीटी, बोला यासारखी बालनाट्ये त्यासोबत आश्रय, मुमुक्षू, चिवडा, जोगतीण अशा एकांकिका तर 'रातराणी' सारखे नाटक त्यांनी सोलापूरच्या रंगभूमीला दिले. सोबतच त्यांनी अनेक लघुनाटिका लिहिल्या आहेत. 'डर्टी पॉलिटिक्स' ही त्यांची अतिशय गाजलेली लघुनाटिका महाविद्यालयीन

विद्यार्थ्यांमध्ये लोकप्रिय झाली. या सर्वच लेखनाला त्यांना राज्यनाट्य स्पर्धा आणि अन्य स्पर्धांमधून विपुल बक्षिसे मिळाली आहेत.

सोलापूरच्या रंगभूमीवरील एक यशस्वी दिग्दर्शक डॉ. दिनेश रसाळ सुरुवातीला एकांकिका लेखन करत दोन अंकी नाटके लिहूलागले आणि हा त्यांचा नाट्यलेखनाचा प्रवास त्यांना व्यावसायिक रंगभूमीवर घेऊन गेला. मनोमंथन, तिचं आभाळ, एका साथीचा सरकारनामा, जयोस्तुते, गौरा येऊ दे अंगणी यासारख्या दर्जेदार एकांकिका द काऊन्सलर हा दीर्घांक, तर बखर एका डॉक्टरची, प्रयाणपार, झोल-मसाला, मेरे अंगने में धन्य म्हणवीन, इहलोकी लोका, ब्रँड ॲम्बेसेडर अशी अनेक सामाजिक कौटुंबिक, परिवर्तनवादी नाटके लिहून सोलापूरच्या रंगभूमीवर त्यांनी एक नवीन आयाम स्थापन केला, पैकी ब्रँड अँबेसेडर हे त्यांचे नाटक सध्या व्यावसायिक रंगभूमीवर गाजत आहे.

सोलापूरच्या रंगभूमीला असे अनेक प्रतिभावंत लेखक मिळाले. आणि खऱ्या अर्थाने सोलापूरची रंगभूमी ही प्रगल्भ झाली. या सर्व लेखकांचा सोलापूरच्या रंगभूमीच्या यशस्वितेत मोलाचा वाटा आहे.

■■

# सोलापूरची उर्दू-हिंदी रंगभूमी

– राजा बागवान

सोलापूरच्या नाट्यसृष्टीला फार मोठा इतिहास आहे. बहुभाषिक असलेल्या या शहरातील नाटकही तसेच बहुभाषी आहे. इथले नाटक वाढलं ते मराठी बरोबरच कन्नड, हिंदी, तेलुगू अणि उर्दू या भाषांच्या मांडीवर. सोलापूर या गिरणगावातील उर्दू नाटकांची परंपरा खूप जुनी आहे. इथल्या अनेक नाट्य संस्थांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत केवळ नाटय चळवळ जागवत ठेवली असं नाही, तर नाटकांना समर्थपणे छेद देऊन नव्या वळणाची प्रायोगिक नाटकं गिरणगावात रुजवण्याचं कार्य केलं.

स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्यानंतर च्या काळात पारसी थिएटर तसेच पृथ्वीराज कपूर यांच्या संस्थेने सोलापूरात उर्दू, हिंदी नाटक सादर केले, त्याच काळात अल्-हिलाल क्लब च्या वतीने अलाउद्दीन मुन्शी यांनी सोलापूरमध्ये आपल्या दिग्दर्शनाखाली दरबार की सुरत, जहरीला सांप, चोर, दारुस्सलाम इत्यादींचे प्रयोग केले. पुण्यातील गंधर्व कंपनीद्वारे अ.रशीद यांनी सोलापुरात अनेक दर्जेदार नाटकं सादर करुन सोलापूरच्या नाट्यरसिकांची अभिरुची संपन्न करण्यात महत्वाचा वाटा उचलला. पंजाब तालीम मोहल्लयातील काही कलाकारांनी लाल उस्ताद यांच्या दिग्दर्शनाखाली आगा हशर काश्मेरी यांच्या 'नेक परवीन' या नाटकाचा प्रयोग करुन प्रेक्षकांची वाहवा मिळवली. इथल्या सोमवार पेठेतील 'अल्-हिलाल अनवर क्लब' च्या वतीने 'यहुदी की लडकी' आणि 'पाक दामन' ही दोन नाटकं विजापूर वेशीत सादर करण्यात आली या नाटकांचा दिग्दर्शन अ.रजाक चकोले यांनी केलं होतं. शनिवार पेठ इथल्या इकबाल क्लब ने 'गृहलक्ष्मी' हे संगीत नाटक केले होते. या नाटकांच गीत लक्ष्मण साठे आणि मो. हनिफ दुर्वेश यांनी लिहिलं होतं.

स्वातंत्र्यानंतर दिल्लीच्या ड्रामा अॅक्ट कंपनीने सहा

महिने माणिक चौक येथील गणेश टॉकीजमध्ये आपल्या कंपनीचं प्रसिद्ध नाटक सादर केले आणि त्याला रसिकांनीही दाद दिली. यातील बऱ्याच नाटकांच दिग्दर्शन महेमूद खान यांनी केलं होतं.

पुढे उर्दू नाटकांचा प्रवास संथ गतीने झाला. १९६० ते १९७५ पर्यंत ही चळवळ शालेय व महाविद्यालयांतील स्नेहसंमेलनांपुरती मर्यादित राहिली. त्यातही अ.कदीर सोलापूरी, आदील जनाब, अ.हमीद पटेल जनाब, अ.गफ्फार शेख, म. इकबाल कांचवाला, अ.कदीर अलीम इत्यादीनी ही चळवळ पुढे नेण्याचे भरपूर प्रयत्न केले. १९७८ मध्ये सोलापुरातील काही शिक्षकांनी नव्या दमाने ही चळवळ पुन्हा सुरु केली. फनकार ड्रामा असो. ही संस्था स्थापन करुन नसीम मन्नान लिखित 'बहार आने तक' हे नाटक मो. हनिफ सय्यद (पैलवान जनाब) यांच्या कल्पक दिग्दर्शनाखाली सोलापूर व पुणे इथे सादर केले. या नाटकामुळे उर्दू रंगभुमीला एक गती मिळाली पुढे बी.एच. करजगीकर व ताहेर फडणीस लिखित 'जुकाम साहब' की खांसी हे विनोदी नाटक प्रसिद्ध दिग्दर्शक प्रा. डॉ. अजीज नदाफ सर यांच्या, दिग्दर्शनाखाली सादर करण्यात आलं. नसीम मन्नान सर लिखित विनोदी नाटक 'ढिल्ली खाट' १९७८ साली सय्यद सईद अहमद व १९८० साली राजा बागबान यांच्या दिग्दर्शनाखाली सादर करण्यात आले. याच कालावधीत अ. वहाब लुंजे लिखित नाटक खिलाडी, लेखक अ. रशिद अर्शद लिखित 'मंटो' व 'जजर' व तजम्मूल हुसेन तमन्ना लिखित 'आसमा रुठ रहा है' नाटक दिग्दर्शक म.इसाक मनियार यांनी दिग्दर्शीत केले होते.

१९७५-७६ साली माहराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमीची स्थापना करण्यात आली पण सोलापूरच्या साहित्यिकांना याची कुठलीच कल्पना नव्हती प्रा. डॉ. म. अली वडवान सर हे उर्दू साहित्य अकादमीचे सदस्य झाले आणि त्यांच्या प्रेरेणेने सय्यद सईद अहमद याने रत्नाकर मतकरी लिखित एकांकिका 'पोर्ट्रेट' चा उर्दू अनुवाद उर्दू अकादमीच्या स्पर्धेत पहिल्यांदा सादर केला. नंतर १९७९ साली तजम्मुल हुसैन तमन्ना लिखित व मुनीर शाह मलिक दिग्दर्शित एकांकिका आईना ही स्पर्धेत सादर केली आणि प्रथम क्रमांक प्राप्त केला. इथून उर्दू नाट्य चळवळीने संपूर्ण ताकदीने आपली वाटचाल पुढे सुरु केली. नंतर डॉ.जी.एम पटेल, सय्यद इकबाल आणि राजा बागबान यांनी महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमीच्या मानाची आगा हशर कश्मेरी ट्रॉफी जिंकुन मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद, मालेगाव येथील संस्थांना अंचबित केलं.

डॉ.जी.एम पटेलच्या निशात अकादमीतर्फे 'खाला खालिद की' या मराठी नाटकाचे हिंदी अनुवाद करुन महाराष्ट्रात २५ प्रयोग केले. सोलापुरातील प्रसिद्ध नाटय संस्था निशात अकादमी तर्फे डॉ.जी.एम पटेल यांनी पगला घोडा, बाकी इतिहास, डायरी की पन्ने, एवम इंद्रजित इत्यादी नाटक महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक कार्यालय आयोजित हिंदी हौशी नाट्य स्पर्धेत सादर केले, नाटय आराधना यांनी नाटक 'त्रिकोन का चौथा कोन' हे सादर केले तसेच प्रसिद्ध दिग्दर्शक अरुण मेहता यांनी 'सखी प्रिय सखी', 'द्वैत से परे अद्वैत हो तुम', 'गाना पंचरंगी तोतेका', 'कहानी बाघ के परछाईकी', 'अग्नी जलती है वर्षा होती है', 'नटी बिनोदिनी', 'महामाई', 'लिव्ह मी अलोन', 'नदीतीरी करुणा बिस्तारी', 'द्रौपदी' ही हिंदी नाटकं सादर करुन सतत सात वर्षे प्रथम पारीतोषिक मिळवण्याचा विक्रम केला. तसेच दिग्दर्शन, अभिनय, संगीत, लाईट साठीची असंख्य बक्षिसे प्राप्त केली. ललित कला भवन यांनी रक्तबिज, एक और द्रौणाचार्य, अनोखा अश्वत्थ, रेशम गाठ, बंधुवा इत्यादी हिंदी नाटके सादर केले तसेच नागेंद्र माणेकरी यांनी झंकार संस्थेतर्फे पुनम की चंदा, सुगंधित चम्पा, अग्निदिव्य, एक अमृत गाथा, धूप की चांदनी, सांत्वन, अल्पविराम, अस्तित्व इत्यादी नाटके सादर करुन हिंदी रंगभुमीची सेवा केली. आर्ट अकादमी ऑफ सोलापुरच्या वतीने पहिल्यांदाच सोलापुरात विविध ठिकाणी पथ नाट्य करण्यात आलं. याचं दिग्दर्शन सय्यद इकबाल यांनी केलं होतं सोलापूरातील उर्दू रंगभूमीसाठी झटणारे असंख्य उर्दू आणि मराठीचे रंगकर्मी आहेत. त्यांत प्रामुख्याने म.हनिफ सय्यद (पैलवान जनाब), म. हनिफ नाना, नसीम मन्नान सोलापूरी, बशीर परवाज सर, म. इस्हाक मनियार, मंजूर आलम सर, बी.एच. करजगीकर, अ. रशीद सय्यद, तजम्मूल हुसैन तमन्ना, अ. कादर सागर अ.वहाब लुंजे, अ.जब्बार नल्लामंदु, अ. खालिक शेख, तहसीन अहमद शेख, म. सलीम बंदुकवाले, इन्तेखाब आलम, अलाउद्दीन तालीब, एजाज मजुर आलम, वजाहत अ.सत्तार, डॉ हारुन रशीद बागबान, डॉ. ऐहतेशाम नदाफ, सर्फराज बलूलखाने, अख्तर शेख, जाफर बांगी, अशफाक सातखेड, जुबेर हिप्परगी, मो. जुलकीफ्ल बागबान, तन्वीर बिजापूरे, हारुन करकमकर, मुजमील शेख, इरफान लालकोट आदींनी उल्लेखनीय कार्य केलं आहे.

१९८० पासून उर्दू रंगभूमीला तांत्रिक बाजू सांभळणाऱ्यांची कमतरता भासत होती. त्या काळापासुन आजपर्यंत साहिर नदाफ यांनी संगीताची बाजू सांभाळली, आणि मोठया प्रमाणात आपलं योगदान दिलं. तसंच मराठी रंगभूमीचे रंगकर्मी आणि तंत्रज्ञ यांचा हातभार त्यांची आत्मीयता उर्दू रंगभुमीला लाभली. या प्रवासात आम्हा उर्दू कलाकारांना नागेश कन्ना काका, डॉ. लक्ष्मीनारायण बोल्ली, विद्याधर होमकर, शशिकांत लावणीस, लक्ष्मीनारायण आकेन काका, शोभाताई बोल्ली, विजयदादा साळुंके, सुनील गुरव, राजा राजेश्चंद्र, गुरु वठारे, राजू मोडक, विष्णु संगमवार, शुकुर सय्यद, अशोक किल्लेदार, बाळासाहेब खरबस, जयप्रकाश कुलकर्णी, राजा जाधव, देवदत्त सिध्दम, सुमित फुलमामडी असं अनेकांच मार्गदर्शन आणि सहकार्य लाभलं असून उर्दू नाटय चळवळ सदैव त्यांची ऋणी राहील. सध्या महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमी शिवाय उर्दू नाटकाला दुसरं व्यासपीठ नसल्याने उर्दू नाटय चळवळीची मोठी हानी होत आहे. १९७६ पासून महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमी एकमेव एकांकिका स्पर्धा आयोजित करत होती पण काही वर्षांपासून ही स्पर्धा बंद करुन एकांकीका महोत्सव आयोजित करत आहे. नवीन कलाकारांना दर्जेदार कलाकृती तयार करण्यासाठी, जिंकण्याची जिद्द निर्माण करण्यासाठी आणि नवनवीन प्रयोग करण्यासाठी पुनश्च ही स्पर्धा सुरु करावी. तसंच दोनअंकी नाटकांचा राज्यस्तरीय महोत्सव आयोजित करुन उर्दू नाटय चळवळीस पुनर्जीवित करावं, अशी सोलापूरच्या रंगकर्मींची तसेच रसिक प्रेक्षकांची अपेक्षा आहे.

(अनभिज्ञपणे काहींच्या नावाचा उल्लेख राहून गेला असल्यास क्षमस्व!)

■■

# सोलापूरातील नाट्यचळवळ

– शशिकांत लावणीस

सोलापुरची रंगभूमी ही अतिशय समृद्ध आहे. सोलापुरात कामगार नाट्यसंमेलन आणि नाट्यस्पर्धा व्हायच्या. पण माननीय सूशिलकुमारजी शिंदे यांच्या प्रयत्नाने राज्य नाटय स्पर्धाही सुरु झाला, सोलापूरातील कलावंत फक्त राज्य नाट्य किंवा एकांकिका स्पर्धेतच चमकत नाहीत तर रजतपटावरही चमकत आहेत. जब्बार पटेल अतुल कुलकर्णी, फैय्याज, सरला येवलकर, निर्मोही अग्निहोत्री ही सगळी मोठी नावं महाराष्ट्रभर गाजत आहेत.

सोलापूरमध्ये होणाऱ्या सूशिल करंडक एकांकिका स्पर्धेमध्ये रसिकांचा पूर असतो. ती नाट्यपंढरीची यात्राच असते जणू! अनेकांना एकांकिका सादर करण्याची संधी मिळते. स्पर्धेसाठी बाहेर गावाहून येणाऱ्या नाट्यसंघांची राहणाची व जेवणाची अवस्था केली जाते. त्यासाठी ज्योतिबा काटे, सुमित फुलमामडी सुहास मार्डीकर, अशोक किल्लेदार जे.पी. कुलकर्णी ही सर्व मंडळी रात्रंदिवस राबत असतात. सोलापुरात असंख्य नाट्यसंस्था आहेत, संगीत नाटकात ज्यांनी भरीव कामगिरी केली आणि सोलापूरचे नांव महाराष्ट्राबाहेर नेलं त्या पद्माकर देव सर आणि विद्या काळे यांची श्रृती मंदीर' ही संस्था. या संस्थेने अनेक संगीत नाटके सादर केली. अगदी दिल्लीचीसुद्धा स्पर्धा गाजवली. श्रीकृष्ण खाडिलकर, रागिणी म्हैसकर, मधुरा देशमुख, अवधूत गांधी, माधवी रायते, शुभांगी देशक यांनी अनेक बक्षीसे मिळवली. पद्माकर देव सरांनी त्यांच्या घराचा एक मोठा हॉलच नाट्यपरिषदेसाठी उपलब्ध करून दिला आहे. याबद्दल सोलापूरकर रंगकर्मी नेहमीच यांचे ऋणी राहतील.या हॉलमध्ये दर शनिवारी 'रंगवर्धन' या नावाची एक चळवळ नाट्यपरिषदेने सुरु केली आहे. नाटक, अभिवाचन, एकांकिका, संगीत असे अनेक कार्यक्रम तिथे होतात आणि त्यासाठी हा हॉल सोलापूरकरांना विनामूल्य उपलब्ध करून देण्यात येतो. पद्माकर देव सरांच्या पश्चात विद्या काळे यांनी

संगीत नाटकाची परंपरा अजूनही सातत्याने चालू ठेवलेली आहे, आता ज्या संस्थेचे नांव घेतल्याशिवाय पुढे जाताच येणार नाही अशी संस्था म्हणजे 'नाट्य-आराधना' डॉ. वामन देगांवकर, शरद भुताडिया, सुनील गुरव, काणे मामा प्रतिभा काणे, कला काणे, वनमाला किणीकर, गुरु अवधानी, बीना जवळगीकर अशा सर्व मंडळींनी 'चाफा, शांतता कोर्ट चालू आहे', नाटककाराच्या शोधात सहा पात्र, 'पाहिजे जातीचे' अशी अनेक नाटके गाजवली. शशिकांत बटाणेसारखा उत्कृष्ठ प्रकाश योजनाकार आणि शिरीष देखणे हा संगीत संयोजक मिळाला आणि आराधनाचं भाग्य म्हणजे सेवासदन प्रशाला तालमीसाठी कायमची आंदण मिळाली. सुनील गुरव यानी स्वतंत्र समाराधना ही नाट्य संस्था निर्माण केली आसावरी नारकर, अपर्णा गव्हाणे यांचाही त्यांच्या संस्थेत मोलाचा सहभाग आहे. यानंतर 'ललितकला नाट्यमंदिर' ही संस्था. यानंतर पांडुरंग काळे, नामदेव वठारे, रेवण उपारे, संजीवनी काळे, सूशिला वनसाळे, विश्वास पाळंदे, ताकपेरे, यांनी चांगुणा, डाऊन ट्रेन हे झाड जगावेगळे, अशी अनेक नाटके गाजवली, सुहास बांदल आणि कमल बांदल यांनी सादर केलेले शंकर शेष यांचे 'रक्तबीज' हे नाटक तर खूप गाजले.

'नक्षत्र थिएटर्स' ही एक रंगभूमीवर सतत कार्यरत असलेली आगळीवेगळी संस्था. पेशाने सिव्हिल इंजिनियर असणाऱ्या 'समद उर्फ' सुमित फुलमामडी' यांनी २२ मार्च १९९७ ही संस्था स्थापन केली आणि गेल्या २५ वर्षात अनेक स्पर्धामध्ये घवघवीत यश मिळवलं, महाराष्ट्रातील फक्त सोलापूर पुणे, कोल्हापूरातच नव्हे तर महाराष्ट्राबाहेर दिल्ली, आग्रा, कोलकता, इंदूर, हैद्राबाद, कर्नाटक इथेही आपला ठसा उमटवला. हा नक्षत्राचा डंका फक्त मराठी नाटकांपुरता मर्यादित न राहता हिंदी एकांकिका तसंच उर्दू नाट्य समेलनातही आपली छाप उमटवली. राजा राजेशचंद्र, अपर्णा जोशी, अशोक किल्लेदार, रणधीर अभ्यंकर, किरण फडके, मिलिंद पटवर्धन, रत्नाकर जाधव, विजयालक्ष्मी कोकणे, सुनंदा शेंडगे ही कलाकार मंडळी सतत कार्यरत असतात. नक्षत्र थिएटर्स बहरायला 'सरस्वती विद्यामंदीर था शाळेचाही तितकाच महत्वाचा वाटा आहे.

शशिकांत लावणीस, म्हणजे माझी 'जवळीक' ही संस्था अनेक नाटक, एकांकिका, अभिवाचन, शॉर्ट फिल्म, प्रहसन, कवितांचे कार्यक्रम करते. सोलापुरात झालेल्या साहित्य संमेलनात मी सुयश शाळेच्या ४० विद्यार्थ्यांना घेऊन सोलापूरातील प्रसिद्ध कवी दत्ता हलसगीकर यांची 'झपझप चाललेत नाजूक पाय' ही कविता रंगमंचावर अभिनित केली. जी. ए. कुलकर्णींच्या 'कैरी' कथेवरची एकांकिका तर अखख्या महाराष्ट्रात गाजली. त्यांत तानी- मावशीची भूमिका वनिता म्हैसकर यांनी व लहान मुलाची भूमिका अविनाश लावणीस याने केली. दत्ता बेंद्रे, डॉ. सुरेश जयदीप यांच्याही भूमिका अतिशय सुंदर होत्या. त्यामुळे जी. ए. महोत्सवात ही एकांकिका करायची संधी आणि मानाचे निमंत्रण मिळालं. डॉ. श्रीराम लागू या प्रयोगाला होते. प्रयोग संपल्यावर त्यांनी आत येऊन सगळ्या कलावंतांची पाठ थोपटली. या प्रयोगाला कवी ग्रेसही होते. अशीच विजय तेंडुलकरांची 'बिचारे अप्पा बंड करतात' ही एकांकिकाही खूप गाजली, वनिता म्हैसकर, किशोर महाबोले, रजनीश जोशी, रागिणी म्हैसकर, अविनाश लावणीस यांच्या भूमिका अतिशय सुंदर झाल्या. बाईच्या प्रयोगाला स्वतः तेंडूलकर हजर होते. एकांकिका पाहून ते खूप भारावून गेले. महेश एलकुंचवार यांच्या 'वासांसि जीर्णानि 'रक्तपुष्प' 'यातनाघर' या एकांकिका स्पर्धेत गाजल्या. यातनाघर या एकांकिकेत शोभा बोल्ली या गुणी अभिनेत्रीने व्हील चेअरचा वापर खूप छान केला. आणि साहिर नदाफ यांनी या एकांकिकेच संगीत अतिशय सुंदर केलं होत.

राज्य नाट्य स्पर्धेच्या सोलापूरच्या पहिल्याच वर्षी चंद्रभूषण कुलश्रेष्ठ यांनी आरती प्रभू यांच्या जीवनवार लिहिलेले 'गजाआडचे गाणं' या नांवाचे नाटक स्टेट बँक ऑफ इंडिया तर्फे आम्ही सादर केले. '

महेश जोशी, अशोक शेट्टी अशी रंगमंचावर त्यावेळी धडपडणारी कितीतरी मंडळी होती. मोहन डोणगावकर आणि अनुराधा डोणगांवकर यांनीही स्यमंतक मण्याचे प्रकरण या नटकाचे कोल्हापूर कोकण, मराठवाडा इथे असंख्य प्रयोग केले. मोडक हा प्रकाश योजनाकार व नेपथ्यकार असूनही त्याने या नाटकांत खूप छान भूमिका केली 'खाला खालीद की' हे नाटकही डोणगांवकर दांपत्याने छान केले होते.

शुकूर सय्यद हा ही असाच एक झपाटलेला कलावंत, माझा शाळा सोबती व समवयस्क, त्याच डोळे अतिशय बोलके असे होते. त्याने 'बॅरिस्टर' हे नाटक केले होते. इसाक मणियार हाही नाटकामध्ये खूप रस असलेला आणि बऱ्याचवेळा स्त्री भूमिका करणारा कलावंत, डॉ. संज्योत मानकामे ही अतिशय गुणी अभिनेत्री. निशात ॲकॅडमीचे डॉ. जी. एम. पटेल यांच्या अनेक नाटकातून तिने भूमिका केल्या. डॉ. पटेल यांनी अमृता प्रीतम, इमरोज आणि साहिर लुधियानवी यांच्यावर एक नाटक लिहिलं आणि दिग्दर्शित केलं. तसेच पगला घोडा' हे ही नाटक केले.

'अश्विनी नाट्य मंदिरचे सर्वेसर्वा लक्ष्मीनारायण बोल्ली यांचे रंगभूमीवरील देणं कोण विसरेल?, लक्ष्मीनारायण बोल्ली, लक्ष्मीनारायण आकेन, विलास बुगडे, भैसे, जानकी, शोभा बोल्ली ही सर्व खरं म्हणजे तेलगूभाषिक मंडळी, पण खानोलकरांचं 'कालाय तस्मै नमः', त्र्य. वि. सरदेशमुख

सरांचे टाहो' अशी कितीतरी मराठी नाटक केली, अनेक बक्षीस आणि रौप्यपदक मिळवली. लक्ष्मीनारायण आकेन या वयानं ज्येष्ठ असलेल्या रंगकर्मीने मराठी, हिंदी, उर्द अशा अनेक नाटकातून काम केली, निगर्वी असा हा माणूस सायकलवरून रात्री तालमीला यायचा.

आनंद किरपेकर यांची 'नाट्य पुष्पांजली' संस्था हिरीरीने स्पर्धेत भाग घ्यायची, त्यांचे 'डोंगर म्हातारा झाला' हे नाटक राज्यस्तरीय स्पर्धेला झालं, तेंव्हा तिकिटांचा काळा बाजार झाला होता.

काही वर्षापूर्वी सोलापुरातील नाट्यसंमेलन अतिशय गाजलं. प्रकाश यलगुलवार यांनी नाट्य संमेलनाचा गोवर्धन पर्वत खरंतर एका करंगळीवर उचललेला होता, मराठी, हिंदी, कानडी अनेक नाटक एक आठवडाभर चाललेली होती.

सोलापूरात लेखकांनाही खूप चांगला वाव मिळतो. शरद एकबोटे, रजनीश जोशी, पांडुरंग काळे, जे.पी. कुलकर्णी, शिरीष देखणे ही त्यांतली काही प्रमुख नांव. आझम शेख हा असाच एक नाट्यप्रेमी, रोटरीचा माजी अध्यक्षः रंगमंचावर काम करणारा हा कलाकार नव्हे, पण नाट्य संस्थांना मदत करणारा एक दिलदार मित्र. त्यांचं 'मंजू नांवाचं हॉटेल' स्टेशन रोडला स्टेट बँकेसमोर होते आणि तिथे सगळ्या नाट्यप्रेमी मंडळींचा अड्डा जमलेला असायचा.

अरुण मेहता आणि शैला मेहता या जोडप्यानेही त्यांच्या निशिगंध नाट्यसंस्थेतर्फे असंख्य नाटके स्पर्धेला केली आणि अंतिम स्पर्धेलाही घवघवीत यश मिळवले. 'विठो रखुमाई' गाणं पंचरंगी पोपटाचं ' हयवदन' ही नाटकं खूप गाजलं. गोविंद दाते, अशोक किल्लेदार यांच्या त्यांन भूमिका होत्या. 'हयवदन' नाटक खूप गाजल, याच संगीत प्रशांत देशपांडे यांनी स्मरणीय केलं होतं. अरुण मेहता यांनी मिळवलेल्या प्रशांत देशपांडे यांच्या संगीताचा खूप मोठा वाटा आहे, त्याची अप्रतिम संगीत योजना असायची.

डॉ. हेमंत वर्तक, सुहास वर्तक, महेश जोशी, मंदार काळे, आनंद खरबस, गीतांजली देशमुख, अजय दासरी, रवी गायकवाड, पूनम चव्हाण, स्नेहा पुरोहीत, मुकुंद हिंगणे, नागेंद्र माणेकरी, राजू पाटील, विष्णु संगमवार, चंद्रभूषण, कुलश्रेष्ठ अश्विनी तडवळकर, अशी कितीतरी नावं आहेत की सर्व नाट्यवेडाने झपाटलेले आहेत, या सर्व कलावंतांनी रंगदेवतेची खूप सेवा केली.

राजू मोहोळकर, रवी मोहोळकर अपर्णा रामतीर्थकर यांनीही राज्य नाट्य स्पर्धा गाजवली. अपर्णा रामतीर्थकर नाट्य कलावंत होत्याच पण सामाजिक कार्यकर्त्या होत्या.

बनशंकरी बहुउद्देशीय संस्था, झंकार नाट्य मंडळ, झपूर्झा नाट्य मंडळ कट्टा गणपती, युवा रसिक, युवक व्यासपीठ अशा सोलापूरच्या कितीतरी नाट्य संस्थांनी रंगदेवतेची सेवा केलेली आहे.

आता दूरदर्शननंतर हातात असलेला मोबाईल याच्यामुळे वेगळा वेळ काढणं तरुण रंगकर्मीना शक्य होत नसावं पण, नाटकाशिवाय पुढे कुठेही व्यावसायिक किंवा चित्रपटात संधी नाही हे लक्षांत येत आहे. सुदैवाने पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठात नाटक हा विषय शिकवला जातो. अमोल देशमुख यांचा मुलगा आदित्य, अविनाश लावणीस यांचा मुलगा अथर्व, शोभा बोल्ली यांची मुलगी ममता बोल्ली, सारिका अग्निहोत्रीची मुलगी निर्मोही यांनी आता ही नाट्यदिंडी पुढे न्यायची आहे. रंगभूमीवर काम करणाऱ्या रंगकर्मींनी 'अभिनय साधना. हे पुस्तक जरूर वाचायला हवं. कणकवलीहून जो 'रंगवाचा' हा नाट्य विषयक अंक निघतो तो वाचायला हवा. संपूर्ण महाराष्ट्रात चालणाऱ्या रंगमंचावरील नवनवीन घटनांची माहिती आपल्याला मिळते,

रंगभूमीवर मनापासून नितांत प्रेम करणारा एक रंगकर्मी म्हणून मी एव्हढेच म्हणेन–

''इस तरह तय की है हमने मंजिले
गिर पडे, गिरकर उठे, उठकर चले ...''

सर्व रंगकर्मीना अनेक अनेक शुभेच्छा...!

■■

# सोलापुरातील अमराठी भाषिकांची रंगभूमी

– नागेंद्र माणेकरी

सोलापूर तसे बहुभाषिकांचे शहर.... तब्बल हजार एक वर्षाचा इतिहास जागवणाऱ्या या शहरात अनेक संस्कृती, परंपरा आहेत. (इथे मराठीबरोबरच कन्नड, तेलुगू, गुजराती, मारवाडी, उर्दू या अशा अनेक भाषा हातात हात घालून वर्षानुवर्षे गुण्यागोविंदाने नांदत आहेत.) या साऱ्याच बहुभाषिकांनी इथल्या विविध संस्कृतीशी एकरूप होऊन या शहराला आपलं मानलं. सर्वधर्मसमभावाचा मंत्र इथल्या मातीत रुजला. सोलापुरात मात्र केवळ मराठी माणसांनीच नाही तर इथल्या अमराठी भाषिकांनी देखील मराठी नाट्यपरंपरेला आजतागायत जिवंत ठेवले आहे. मराठी माणसांबरोबरच अमराठी भाषिक लोकांनीदेखील मराठी नाटकांवर इतके प्रेम केले आहे की, त्यांना अमराठी भाषिक म्हणून संबोधणे धाडसाचे ठरेल. त्यांनी केवळ प्रेमच केले नाही तर वेगवेगळे प्रयोग आजही करताना दिसताहेत.

तुझे आहे तुजपाशी, मरणरंग, त्या तिथे पलिकडे, आकाशपक्षी, बॅरिस्टर, देवमाणूस, वेड्याचं घर उन्हात, डोंगर म्हातारा झाला..... अशा पन्नासएक नाटकामधून सशक्त अभिनय करणारे 'शुकुर सय्यद' हे सोलापूरच्या रंगभूमीवर अमराठी कलावंत म्हणून नटसम्राटासारखे वावरत होते. राज्य नाट्य स्पर्धा, कामगार नाट्य स्पर्धा या व्यतिरिक्त अनेक स्पर्धांमधून त्यांनी आपल्या अभिनयाचा दबदबा निर्माण केला.

सोलापूरच्या मराठी रंगभूमीवरील एक राजा म्हणजे 'राजा राजेशचंद्र' हे व्यवसायाने कंत्राटदार . त्यानी मराठी रंगभूमीची इमाने इतबारे सेवा केली. 'राम-रहिम' या बालनाट्यात काम केले. १९ व्या वर्षीपासून सुरुवातीला मला निवडून द्या, निखारा, हा पाश रेशमाचा, बळी, मंतरलेली चैत्रवेल, एवम् इंद्रजित, मातीच्या पाऊलखुणा, पगला घोडा, बचनाग, लपून-छपून या नाटकात त्यांना अभिनयाचे रौप्यपदक मिळाले.

त्याच कालखंडात जी.एम.पटेल यांनी त्यांच्या 'निशात अकॅडमी' च्या माध्यमातून अनेक उर्दू, मराठी नाटके बसवली, दिग्दर्शित केली. मराठी रंगभूमीसाठी त्यांनी दिलेले योगदान मोलाचे आहे. त्याचबरोबर इसाक मणियार यांनी देखील मराठी-उर्दू रंगभूमीसाठी प्रचंड काम केले आहे. आपला एक मोठा चाहतावर्ग त्यांनी निर्माण केला. अनेक कलाकारांना निर्माण केले.

राजासाहेब अहमदसाहेब बागवान म्हणजेच राजा बागबान : संगमेश्वर महाविद्यालयात शिकताना त्यांनी सुरुवातीला 'चोटी रानी, मुँछे गुलाम' या उर्दू एकांकिकेतून रंगभूमीवर पदार्पण केले. त्यांनी 'फनकार' थिएटरच्या माध्यमातून उर्दू-मराठी रंगभूमीवर सातत्याने कार्य केले. त्यांचे विशेष उल्लेखनीय कार्य म्हणजे त्यांनी मराठीतील बारा एकांकिकांना उर्दूमध्ये अनुवादित करून ती नाटके रंगभूमीवर आणली. दृष्टी, मेल्या आईचा चहा, ढोल वाजतोय, कदाचित, साडेसहा रुपयाचे काय केले ? इन्वेस्टीगेशन....या अनुवादित एकांकिकेच्या पुस्तकाला उर्दू साहित्य अकादमीचे पुरस्कार मिळाले. हे त्यांचे उल्लेखनीय कार्य म्हणता येईल.

इम्तियाज मालदार अनेक मराठी एकांकिकेतून त्यांनी तीनशेच्यावर बक्षिसे मिळवली, राज्यनाट्य स्पर्धेत मोठ्या जोमाने, स्फूर्तीने आजही मालदार नाटके सादर करीत असतो. इम्तियाज मालदार उर्दूभाषिक असूनही अस्सल मराठी नाटके रंगभूमीवर प्रचंड ताकदीने सादर करीत असतो.

फुलमामडी समद (सुमित) हमीद आतापर्यंत याने पन्नासपेक्षा जास्त एकांकिका - नाटकातून कामे केली. नाट्य निर्मिती, नाट्य दिग्दर्शन केले. अ.भा. मराठी नाट्य परिषद (मध्यवर्ती), मुंबई येथे त्यांची नियामक मंडळावर निवड झाली आहे. त्यांनी आजपर्यंत निवडुंग, बाकी इतिहास, सरहद्द, साठा उत्तराची काहानी, लपून-छपून, घनगर्भ, बचनाग, टू इज कंपनी, उंच माझा झोका, इ. नाटकामधून अभिनय निमिर्ती व दिग्दर्शन केले आहे.

उर्दू भाषीक कलावंतासोबतच सोलापूरच्या रंगभूमीवर हिंदी, गुजराती कलाकारांनीही मोलाचे योगदान दिले आहे. त्यापैकीच एक स्त्री-पार्टी कलाकार म्हणजे 'नंदलाल गुप्ता' हे होय. त्यांना नंदलाल भैय्या म्हणूनच ओळखतात, ज्याकाळी स्त्री भूमिका करण्यासाठी स्त्री कलाकार मिळत नव्हते, त्याकाळी त्यांनी अगदी सशक्तपणे स्त्री भूमिका वठवल्या. देवमाणूस, मुंबईची माणसे, घराबाहेर, भावबंधन, एखाद्याचं नशीब, लग्नाची बेडी, डॉ. कैलास, भाऊबंधकी, माझं कुंकू, रक्ताचं नातं, वनवास, ये गं, ये गं विठाबाई, तुझं माझं संगती या व अशा अनेक मराठी नाटकातून त्यांनी स्त्री भूमिका वठवली.

हिंदी भाषिक चंद्रभूषण कुलश्रेष्ठ अत्यंत संवेदनशील कवी मनाचा कादंबरीकार कवी, नाटककार म्हणून त्यावेळी त्यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जात होते.

त्यांनी कादंबरीबरोबरच काव्यलेखनही केले. आणि मराठी नाटके लिहिली. दयानंद महाविद्यालयात ते प्राध्यापक म्हणून कार्यरत होते. त्यांनी लिहिलेले पहिले नाटक होते. 'अश्वत्थामा'! त्यानंतर त्यांनी प्ले फॉर प्ले, गजाआडचे गाणे, कॉफी ड्रामा इत्यादी नाटके लिहिली आणि बसवली.

'निशिगंध नाट्य संस्थेच्या माध्यमातून अरुण महेता यांनी अर्धांगिनी शैला अरुण मेहता यांच्या सहकार्याने सलग सहा वर्षे राज्य नाट्य स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रथम क्रमांक मिळवला. आणि एक अद्वितीय विक्रम केला. आजतागायत महाराष्ट्रातील कुठल्याही संस्थेने त्यांचा तो विक्रम मोडला नाही हे विशेष. केवळ मराठीच नाही तर हिंदी रंगभूमीवर देखील या अवलियाने अक्षरश: धुमाकूळ घातला. या पती-पत्नी मेहता दांपत्यानी आणि त्यांच्या मुलाने अनेक रौप्यपदके पटकावली. सर्वाधिक रौप्य पदक मिळवण्याचाही त्याने विक्रम केला. हयवदन, मरणरंग, सखी प्रिय सखी, गाणे पंचरंगी पोपटाचे, विठो रखुमाय, कहानी वाघाच्या सावलीची, नटी-विनोदिनी, अग्निवर्षा, महामाई, लिव्ह मी अलोन, चांदणे शिंपीत जा, मोरूची मावशी असे अनेक नाट्य प्रयोग केले. शैला मेहता यांनी संपूर्ण कारकिर्दीत तब्बल १८ अभिनयाची रौप्यपदके मिळवली

साधारणपणे २००८ साली झंकार सांस्कृतिक मंच, सोलापूर या पूर्वभागातील संस्थेच्या माध्यमातून तारासिंग मरोड यांनी नेपथ्यामध्ये आणि त्यांचा मुलगा गणेश मरोड याने अभिनय - दिग्दर्शन व प्रकाशयोजनेत रंगमंच गाजवला.

शोभा कल्याणी बोल्ली या कन्नड भाषिक, परंतु मराठी भाषेवर त्यांचे विलक्षण प्रभुत्व! अश्विनी नाट्य मंदिराच्या माध्यमातून शोभा बोल्ली यांचा अभिनय प्रवास सुरु झाला. नागेश कन्ना यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी नाट्यकलेचे धडे गिरवले. पुढे अनेक मराठी, हिंदी, नाटकामधून त्यांनी अभिनय केला. अभिनयाची रौप्य पदके त्यांनी मिळवली. तो मी नव्हेच' या नाटकात त्यांनी प्रभाकर पणशीकर या महान अभिनेत्यासोबत काम केले

८१ वर्षाचे नारायण शंकरप्पा जानकी हे कन्नड भाषिक कलाकार. त्यांचा व्यवसाय बुकबाईंडिंगचा. १९६८ पासून नाट्यक्षेत्रात त्यांचा शिरकाव झाला. पूर्वीच्या काळी कन्नडमध्ये 'दोड्डाटा', पारिजातक असे कार्यक्रम होत असत. 'दोड्डाटा' म्हणजे संगीतमय प्रदीर्घ नाटक. अशा 'दोड्डाटा', मध्ये वयाच्या १२ व्या वर्षीच पदार्पण. त्यामध्ये त्यांनी लव, सहदेव, अभिमन्यू इ. भूमिका साकारल्या. पुढच्या काळात 'दोड्डाटा' बंद झाले त्यामुळे त्यांनी त्यावेळच्या 'रामलिंग चौडेश्वरी नाट्य मंडळ' या संस्थेमधून नागेश कन्ना व विश्वंभर कन्ना यांच्यासोबत' डॉ. कैलास या नाटकात काम केले. 'नवा संसार' 'पळसाला पाने तीनच' तदनंतर डॉ. लक्ष्मीनारायण बोल्ली यांच्या 'अश्विनी नाट्य मंदिरात प्रवेश केला. काळोख देत हुंकार, मन धुवाँधार, हद्दपार, चित्रलेखा, टाहो, देवांचे मनोराज्य अशा अनेक नाटकांतून त्यांनी अनेक भूमिका वठवल्या आणि रसिकांची वाहवा मिळवली.

कन्नड भाषिक पण मराठीवर उत्तम प्रभुत्व असलेला कलावंत म्हणजे नरेंद्र गंभीरे महाविद्यालयीन जीवनापासून त्याने नाटक, एकांकिकेत काम करायला सुरुवात केली. त्यानंतर राज्य नाट्य कामगार नाट्य स्पर्धेत भाग घेतला. थँक्यु मिस्टर ग्लाड, संगीत अभोगी, लोककथा ७८ शांतेचं कोर्ट चालू आहे, अखेरचा सवाल, कायर, दिवा जळू दे सारी रात, आदी नाटकांतून त्यांनी प्रमुख भूमिका केल्या आणि पारितोषिक पटकावली.

दत्तात्रय भैसे यांनी मराठी रंगभूमीवर विविधांगी भूमिका करून आपल्या अभिनयाचे कौशल्य रसिकांना दाखवले. नागेश कन्ना, डॉ. लक्ष्मीनारायण बोल्ली यांच्यासोबत त्यांच्या दिग्दर्शनाखाली त्यांनी मन धुंवाधार, हद्दपार, टाहो, कालाय तस्मै नमः, मां निषाद, देवांचे मनोराज्य इत्यादी नाटकातून त्यांनी सशक्त भूमिका साकारून मराठी रंगभूमीवर आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला. प्रशांत शिंगे यांच्या मदतीने त्यांनी 'जय जय स्वामी समर्थ' हा चित्रपट स्वतः काढला, स्वामी समर्थांची त्यांनी त्यात भूमिका केली

अमराठी कलावंतांमध्ये कृष्णा हिरेमठ या कन्नड भाषिक कलाकाराने युवक महोत्सवातील एकांकिका, लघुनाट्य, मूकनाट्य, पथनाट्य इत्यादी नाट्यप्रकारातून त्याचे अभिनय केला. 'घुसखोरी' या पथनाट्याचे ८५ प्रयोग त्यांनी केले.

सोलापूरच्या मराठी रंगभूमीवर पूर्वभागातील तेलगू माणसांनी दिलेले योगदान सोलापूरच्या सांस्कृतिक क्षेत्रासाठी लक्षणीय आहे. सोलापूरातील पूर्वभागातील कन्ना चौक हे त्याकाळी मराठी नाटकांच्या चळवळीचे केंद्रबिंदू होते. कारण नागेश कन्ना यांनी मराठी रंगभूमीसाठी केलेले कार्य ! नागेश कन्ना हे 'अश्विनी नाट्य मंदीर' चे संस्थापक. त्यांनी मराठी नाटकावर अतोनात प्रेम केले. डॉ. कैलास, काळे बेट लाल बत्ती, देव माणूस, मन धुंवाधार या सारखी अनेक नाटके त्यांनी दिग्दर्शित केली. !

डॉ. लक्ष्मीनारायण बोल्ली हे एक ज्येष्ठ साहित्यिक, नाटक, कथा, काव्य, कादंबरी, आत्मचरित्र, संशोधनात्मक साहित्य निर्मिती त्यांनी केली. एक तेलुगू माणूस मराठीवर इतका नितांत प्रेम करू शकतो हे कोणाला खरेच वाटत नाही. डॉ. बोल्लीनी मराठी नाटके लिहिली, दिग्दर्शन केले आणि अनेक कन्नड-तेलुगू, मराठी कलाकारांना रंगभूमीवर आणले हे त्यांचे उल्लेखनीय कार्य आहे. राज्य नाट्य स्पर्धा, कामगार नाट्य स्पर्धा या व इतर अनेक स्पर्धा त्यांनी अंतिम फेरीपर्यंत

गाजवल्या. त्यांच्या तेलुगू - मराठी साहित्यातील कार्याची दखल घेऊन हैद्राबादचा पोट्टी श्रीरामुलू विद्यापीठाने त्यांना 'डी. लिट्,' पदवी प्रदान केली.

लक्ष्मीनारायण आकेन. सारेच त्यांना पंतुलू नांवाने ओळखत व हाक मारीत. लक्ष्मीनारायण आकेन पंतुलू हा एक वृत्तस्थ, साधू प्रवृत्तीचा कलाकार. अत्यंत शालीन, नम्र, आज्ञाधारक, शुद्ध वाणी असलेला कलाकार रंगभूमीवर असणे हे रंगभूमीचे अहोभाग्यच ! आपल्या आयुष्याच्या शेवटपर्यंत रंगभूमीची इमाने-इतबारे सेवा करीत राहिले. अनेक मराठी, उर्दू नाटकातून त्यांनी काम केले. प्रत्येक भूमिका मग ती लहान असो की मोठी त्यांनी तेवढ्यात ताकदीने, निष्ठेने रंगभूमीवर सादर केली. अभियनाची सर्टिफिकटे रौप्य पदके आपल्या नावावर केली.

याच बरोबर बालाजी भिमनपल्ली, बाळकृष्ण विठ्ठल पोगुल, लक्ष्मण सिध्दप्पा सिड्गीद्दी, या तेलुगू भाषिक कलावंतानीही मराठी रंगभूमीची सेवा केली.

व्यंकटेश ऊर्फ राजू रामदास रंगम याने महाविद्यालयात शिकत असताना अतुल कुलकर्णी यांच्याबरोबर 'मद्रासीने केला मराठी भ्रतार', 'करायला गेलो एक... अशा एकांकिमधून कामे केली. पुढे अश्विनी नाट्य मंदिरमधून छोट्या-मोठ्या भूमिका करत राहिला. बऱ्याच नाटकांसाठी त्याने बॅक स्टेजची कामेही केली. त राज्यनाट्य स्पर्धा, कामगार नाट्य स्पर्धा यामध्ये सातत्याने सहभाग असतो. रंगभूमीची अविरत सेवा करताना दिसतो.

प्रा. अजय लक्ष्मीपती दासरी यांनी प्रथम प्रॉम्प्टर म्हणून नाट्य- सृष्टीत प्रवेश केला. काळे बेट लाल बत्ती, 'थँक्यू मिस्टर ग्लाड' पडघम, द्वंब द्वीपाचा मुकाबला, विरहिणी वासवदत्ता, विश्ववाभिरामा इत्यादी नाटकांतून त्यांनी प्रमुख भूमिक व दिग्दर्शनही केले, आणि राज्य नाट्य स्पर्धा, कामगार नाट्य स्पर्धेत अगदी अंतिम फेरी- पर्यंत धडक मारून अनेक पारितोषिके मिळवली. उस्मानाबाद येथील, नागपुरातील अ.भा. नाट्य संमेलनात त्यानी महानगर शाखेच्या वतीने नाटके सादर केली आणि नाट्यचळवळ जिवंत ठेवली आहे.

आनंद तुळशीगार हा तेलुगू कलावंत मराठी रंगभूमीवर शेवटच्या श्वासापर्यंत कार्यरत राहिला. मराठी नाटक, रंगभूमी हा त्याचा श्वास होता. गुडबाय डॉक्टर, प जोहार मायबाप जोहार, अग्निदिव्य-एक अमृतगाथा, चाफा सुगंधी, कंस-कथा अस्तित्वाची, सम्राट अशोक, रक्ताभिषेक अशा अनेक मराठी- हिंदी नाटकामधून त्याने समर्थ अभिनय केला. अनेक परितोषिके पटकावली. आज हा कलावंत नाही. हे मोठे दुःख आहे.

नरेंद्र नारायण कोंगारी याने जोहर माय बाप जोहर कथा एका सोंगाड्याची, अंत अस्तित्वाचा, यज्ञकुंड, इत्यादी नाटके लिहिली आणि दिग्दर्शित केली, नाटक, दिग्दर्शन, संगीत, नेपथ्य अभिनय या सर्व घटकातील पारितोषिके पटकावली.

नागेंद्र अंबाजी माणेकरी या तेलुगू समाजातील लेखक - दिग्दर्शक-अभिनेत्याने पौर्णिमा, गुडबाय बाईसाहेब तुम्ही---!, माणूस म्हंत्यात मला, युगांतर, प्रलय, अस्तित्व, अगतिकता, भाकरीचा चंद्र, कौल, आधार, सांत्वन, उन्हातले चांदणं, या एकांकिका, पुनवा, संगीत चाफा सुगंधी, अग्निदिव्य-एक अमृतगाथा इत्यादी नाटके लिहिली. सम्राट अशोक, रक्ताभिषेक, केस - कथा आस्तित्वाची ही नाटके अनुवादित करून सारीच नाटके रंगमंचावर सादर केली. राज्य नाट्य स्पर्धा, कामगार नाट्य स्पर्धा व इतरही अनेक नाट्य स्पर्धेमधून मराठी-हिंदी नाटकांसाठी प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांकाची पारितोषिके पटकावली.

प्रथमेश माणेकरी. त्याने दिग्दर्शित केलेल्या अग्निदिव्य - एक अमृतगाथा, रक्ताभिषेक या मराठी-हिंदी नाटकांनी त्याला राज्य नाट्यस्पर्धेत घवघवीत यश मिळवून दिले. दोनवेळा त्याला रौप्यपदक मिळाले. प्रथमेश माणेकरीने मंगळवेढा, पंढरपूर, कोल्हापूर इथे बालनाट्य शिबिरातून मुलाना प्रशिक्षण दिले आहे.

'सोलापूरातील अमराठी भाषिकांची रंगभूमी' हा लेख अगदी त्रोटकपणे लिहतांना अनेक अमराठी दिग्गज कलाकारांचा समावेश करता आला नाही याचा मला खेद वाटतो. परंतु लेखाची मर्यादा आणि कालमर्यादा व माझ्या क्षमतेची मर्यादा लक्षात घेऊन कलाकारांनी मला क्षमा करावी. उर्द, कन्नड, तेलुगु, गुजराथी, हिंदी भाषिक अमराठी कलाकारांचे रंगभूमीवरील कार्य इतके मोठे आहे कि 'या छोट्याशा लेखात सर्वांचा परामर्श घेणे कठीण आहे आणि आव्हानात्मक आहे. परंतु अनेक अमराठी कलाकारांनी सोलापूरची रंगभूमी अत्यंत शक्तीशाली व समृद्ध बनवली याला सोलापूरच्या सांस्कृतिक इतिहासात तोड नाही. सोलापूरचा सांस्कृतिक इतिहास लिहिताना मराठी रंगभूमीसाठी अमराठी भाषिकांनी दिलेले योगदान नाही लिहिले तर तो इतिहास अपूर्ण राहील.

■■

# सोलापूर शाखेची जडणघडण

- ॲड. जे. जे. कुलकर्णी

अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषदेचे शंभरावे नाट्यसंमेलन नुकतेच जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात पुणे, पिंपरी चिंचवड येथे मोठ्या दिमाखात संपन्न झाले. येत्या २७-२८ जानेवारीला सोलापूरचे संमेलन संपन्न होणार आहे. मुंबईच्या मध्यवर्ती संस्थेवर १९८३ ते १९९८ अशी सलग १५ वर्षे मी कार्यकारिणी सदस्य म्हणून सोलापूरचे प्रतिनिधित्व केले आणि सोलापूर नाट्य परिषद शाखेचा कार्यभारही सांभाळला. सोलापूर शाखेची स्थापनेपासूनची वाटचाल सर्व नाट्यकर्मी, रंगकर्मी यांना माहीत व्हावी म्हणून हा लेखन प्रपंच. जुन्या आठवणीचा 'धांडोळा' शब्दबद्ध करुन ठेवण्याचा हा एक लहानसा प्रयत्न आहे.

अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषदेचे शंभरावे नाट्यसंमेलन नुकतेच जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात पुणे, पिंपरी चिंचवड येथे मोठ्या दिमाखात संपन्न झाले. येत्या २७-२८ जानेवारीला सोलापूरचे संमेलन संपन्न होणार आहे. मुंबईच्या मध्यवर्ती संस्थेवर १९८३ ते १९९८ अशी सलग १५ वर्षे मी कार्यकारिणी सदस्य म्हणून सोलापूरचे प्रतिनिधित्व केले आणि सोलापूर नाट्य परिषद शाखेचा कार्यभारही कार्यवाह म्हणून सोलापूरचे प्रतिनिधित्व केले आणि सोलापूर नाट्य परिषद शाखेचा कार्यभारही कार्यवाह म्हणून सांभाळला. सोलापूर शाखेची स्थापनेपासूनची वाटचाल सर्व नाट्यकर्मी, रंगकर्मी यांना माहीत व्हावी म्हणून हा लेखन प्रपंच. जुन्या आठवणीचा 'धांडोळा' शब्दबद्ध करुन ठेवण्याचा हा एक लहानसा प्रयत्न आहे.

आपल्या सोलापूर नगरीत जे पहिले संमेलन झाले ते म्हणजे स्वातंत्र्यानंतर सन १९५२ मध्ये! त्या काळच्या धुरिणांनी - रसिकांनी आयोजित केले होते. सोलापूरच्या भागवत चित्रमंदिरातील रंगमंचावर ते संमेलन पार पडले होते. त्या नाट्यसंमेलनाचे अध्यक्ष म्हणून त्यावेळचे ख्यातनाम लेखक, साहित्यिक, नाट्यकर्मी श्री.पार्श्वनाथ आळतेकर यांची निवड झाली होती. ही आठवण लक्षात राहण्याचे कारण म्हणजे माझे पिताश्री (कै) जे. ई. कुलकर्णी वकील यांचे समवेत उद्घाटन सोहळ्याला मी त्यावेळी ८ वर्षाचा होतो तरीही गेलो होतो. रंगमंचावर बॅनर आणि नटराजाची भव्य कटआऊट उभी केली होती. ती आजही माझ्या स्मरणात आहे. हे संमेलन यशस्वी करण्यात भागवत थिएटर्सचे बाळासाहेब भागवत आणि परिवार, नाट्य रसिक श्री. व सौ. डॉ. दिवाडकर, सौ. व श्री. डॉ. शारंगपाणी, एल. व्ही. मिल्सचे तत्कालीन इंजिनिअर श्री. नानासाहेब चक्रदेव , पद्माकर आळंदकर, सारंगमामा कुलकर्णी, पूर्व भागातील नागेश कन्ना, तसेच माझे वडील व इतर अनेकांचे सहकार्य लाभले होते. या संमेलनानंतर सोलापूरातील हौशी नाट्यसंस्था व नाट्यप्रेमी लोकांनी नाट्य चळवळ पुढे नेली. त्यानंतर मध्यंतरीच्या काळात ही चळवळ मंदावली. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर सोलापूरच्या नाट्य चळवळीने पुन्हा एकदा उभारी घेतली व महाराष्ट्र राज्याच्या नाट्य स्पर्धेत काही नाट्य संस्थांनी हिरीरीने भाग घेतल्याचे आजही आठवते.

सन १९८० च्या दरम्यान झालेल्या नाट्य संमेलनाच्या अध्यक्षांना सोलापुरात आमंत्रित केले असताना त्यांच्या मार्गदर्शनाने व सूचनेवरून सोलापूरातही नाट्य परिषदेची शाखा स्थापन झाली. उत्साही हौशी कलावंतांनी नव्याने स्थापन झालेल्या नाट्य परिषद शाखेची पहिली कार्यकारिणी निवडताना दि. १३ एप्रिल १९८० रोजी अध्यक्ष म्हणून सेवासदन प्रशालेचे मुख्याध्यापक डॉ. वा. ऊ. तडवळकर यांची आणि कार्यवाहपदी माझी निवड केली. याच सुमारास सोलापुरात पुण्याचे श्री. डॅडी लोणकर हे आले असताना त्यांची माझी भेट झाली, त्यांनी सोलापुरात नाट्य परिषद शाखा आहे का? अशी चौकशी केली. मी होकार दिला तेव्हा त्यांनी परिषद शाखा स्थापन झाली आहे, तर मार्च १९८३ मध्ये मुंबईच्या परिषदेच्या कार्यकारिणीची निवड होणार आहे. त्या निवडणुकीस तुम्ही माझे बरोबर उभे राहाल का? असे विचारल्यावरुन मी आश्चर्यचकीत झालो, सोलापुरात अवघे ३०-३५ परिषद सदस्य आहेत, मी कसा निवडून येईन असे सांगितले. श्री. लोणकरांनी, तुम्ही उमेदवारी अर्जावर सही करा बाकीचे मी बघतो असे म्हणून

माझी अर्जावर सहीपण घेतली, व त्यांनीच माझा अर्ज मुंबईस पाठवून दिला. निवडणुकीचे मतदान पोस्टाने होते, तेव्हा सोलापूरच्या मतपत्रिका आल्या असताना त्या मी गोळा करुन पाठवून दिल्या. आपण काही निवडून येत नाही, याच समजूतीत मी होतो पण आश्चर्य म्हणजे श्री. डॅडी लोणकर यांनी बाकी मतदानासाठी काय केले हे आजतागायत मला माहित नाही पण मी निवडून आलो खरा! अशा रीतीने मुंबईच्या मध्यवर्ती कार्यकारिणी मंडळावर माझी निवड झाली व अचानक एक नवीन जबाबदारी माझ्यावर येऊन पडली,

सर्व प्रथम सोलापूरातील विविध क्षेत्रातील, तसचे हौशी रंगकर्मी, कलावंत या सर्वांना अ.भा.म. नाट्य परिषद, मुंबई या संस्थेचे आजीव सदस्य करून सदस्य संख्या वाढविली. काही दिवसांतच पुणे शाखेपेक्षा जास्त आजीव सदस्य सोलापूरहून नोंदले गेले होते. मुंबईच्या मध्यवर्ती कार्यकारिणीच्या दरमहा सभा होत होत्या. त्यासाठी मी न चुकता जात होतो, अल्पावधीतच सोलापूरच्या शाखेची दखल घेण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली. त्यावेळी मध्यवर्तीचे कार्यकारिणीचे निवडून आलेले सदस्य १५ व २ स्वीकृत सदस्य अशी केवळ १७ जणांची कार्यकारिणी होती.

मध्यवर्तीचा कार्यकारिणी सदस्य म्हणून दरवर्षी होणाऱ्या नाट्य संमेलनाला आवर्जून हजर राहू लागलो. कोल्हापूर येथील नाट्य संमेलनास पहिल्यांदा उपस्थित राहिलो होतो. पणजी-गोवा, नागपूर, इचलकंरजी, मालवण, इंदौर वगैरे ठिकाणी संपन्न झालेली नाट्य संमेलने जवळून पाहता आली. रंगमंचावर येण्यापेक्षा पडद्यामागे राहून सोलापूरची शाखा बळकट केली, हे कार्य उभे करत असताना माझ्या पाठीशी सदैव उभे राहिलेले आमच्या ह.दे. प्रशालेतील आमचे गुरुवर्य, बालगंधर्व-संगीत-प्रेमी श्री. पद्माकर देव तसेच बालगंधर्वभक्त आणि त्यांची नाटके पाहिलेले प्रसिद्ध मंडप कॉन्ट्रॅक्टर एस.एम.पाटील तथा सिद्धा पाटील आणि कलाप्रेमी रसिकाग्रणी विकास हॉटेलचे सुधाकर अण्णा चौधरी या तिघांना मी कधीही विसरु शकणार नाही. त्यांच्या भरभक्कम पाठिंब्यामुळेच १५-१६ वर्षे मी परिषद शाखेसाठी कार्यरत राहू शकलो.

सोलापुरातील हौशी कलावंतांसाठी नाट्य प्रशिक्षण शिबिराद्वारे अ.भा.म.ना.प. पुरस्कृत नाट्य शिक्षण शिबिर ऑक्टोबर १९८३ मध्ये आयोजित केले. शिबिरासाठी संचालक म्हणून प्रशिक्षण देण्यासाठी प्रख्यात दिग्दर्शक - कलावंत श्री. कमलाकर सोनटक्के यांना आंमत्रित केले होते. या १५ दिवसांच्या नाट्य प्रशिक्षण शिबिरात सोलापूरच्या ३० कलावंतांची निवड केली गेली होती.

प्रख्यात नटवर्य प्रभाकर पणशीकर यांची लागोपाठ दोन वेळा नाट्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाली होती. रविवार दि. ६ जानेवारी १९८५ रोजी हुतात्मा स्मृती मंदिरात 'तो मी नव्हेच' नाटकाच्या १६०० व्या प्रयोगाच्या निमित्ताने आणि नाट्य संमेलनाचे अध्यक्ष झाले म्हणून भव्य सत्कार सोहळा संपन्न झाला.

सन १९८५ मध्ये प्रख्यात नाटककार लेखक राम गणेश गडकरी यांची जन्मशताब्दी होती. तेव्हा आकस्मिक मला डॉ. शि.द.दिवाडकर यांचा फोन आला आणि जे जे एक आनंदाची बातमी, ''भाई'' माझ्यासाठी सोलापूरला गडकरींच्या ''राजसंन्यास'' नाटकाचे नाट्यवाचन करण्यासाठी येणार आहेत, तर तू हा कार्यक्रम आपल्या नाट्य परिषदेच्या शाखेसाठी आयोजित कर, आणि त्यासाठी तुला पुण्याला त्यांची भेट घेण्यासाठी जावे लागेल, ते २५ जानेवारी १९८५ ला हुतात्मा स्मृती मंदिरात राम गणेश गडकरी लिखित ''राजसंन्यास'' या नाटकाचे पु.ल.नी सादर केलेले नाट्यवाचन एक अलौकिक आनंद देऊन गेले. पण नाट्य वाचनाचे रेकॉर्डिंगही करायचे नाही, आणि फोटोही काढायचे नाहीत, अशा विशेष अटी होत्या. सौ. सुनीताबाईंनी तर साऊंड बॉक्सची रुम लॉक करुन किल्ली आपल्याकडे ठेवली होती. कार्यक्रमाचे उत्पन्नातून नाट्य परिषद शाखेला त्यावेळी रु. २५०१/- ची देगणी माझ्या हाती पु.ल.देशपांडे यांनी दिली.

१५ वर्षांच्या माझ्या कार्यकाळात नाट्य परिषद शाखेतर्फे रंगभूमीसंदर्भात अनेक कार्यक्रम सादर केले गेले. शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी नाट्य वाचन स्पर्धा आयोजित केली जात होती, त्यासाठी भागवत थिएटर्स परिवाराने योगदान देऊन फिरत्या ढाली देऊ केल्या होत्या.

१९९८ नंतर मला माझ्या कार्यबाहुल्यामुळे व व्यावसायिक कामामुळे शाखेचे कार्य पुढे चालू ठेवणे जमेना, मी व शाखा अध्यक्ष पद्माकर देव सरांनी विचार करुन आपण व्यवस्थितपणे सर्व रेकॉर्डसह लवकरच हस्तांतरण करुया या

विचारात होतो. २००५ साली आम्ही माजी आमदार प्रकाश यलगुलवार यांचेशी संपर्क केला, त्याला सर्व वस्तुस्थिती समजावून सांगितली आणि हे शाखा कार्य पुढे नेणे जरुरीचे आहे, याची कल्पना दिली. श्री. प्रकाश यलगुलवारांनी विचार करुन आपला होकार कळवला. त्यावेळी श्री. प्रभाकर पणशीकर यांचे अमृत महोत्सवी वर्ष होते, म्हणून त्यांना सत्कारासाठी आमंत्रित करुन यथोचित सत्कार केला व गौरवनिधी अर्पण केला, व त्यांचे शुभहस्ते अ.भा.म.ना.प. शाखा सोलापूर श्री. प्रकाश यलगुलवार यांचेकडे सुपूर्द केली.

श्री. पद्माकर देव सरांनी शाखेचे अध्यक्षपद शेवटपर्यंत सांभाळले व शाखेला सर्वतोपरी नावारुपाला आणले. श्री. पद्माकर देव सरांनी सोलापूरच्या नाट्य परिषद शाखेसाठी त्यांच्या राहत्या घरावरील (गच्ची) खुली जागा नाट्य परिषदेच्या शाखेसाठी दान केली आणि त्यावर परिषदेने एक हॉल बांधावा, अशी अट घातली. त्यानंतरही पद्माकर देव सरांनी तळमजल्याची राहती जागा दिली. आता अ.भा.म.नाट्य परिषद शाखा सोलापूर संस्थेस कायमचे छत्र मिळालेले आहे व तेथे कार्यालय कार्यरत आहे. या निमित्ताने पद्माकर देव सरांची स्मृती पण कायम राहिली. आहे.

२००८ साली पार्क मैदानावर मा.श्री.सुशीलकुमार शिंदे यांनी ८८ व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे दिमाखदार आयोजन तर केलेच शिवाय उद्घाटनाला भारताच्या तत्कालीन राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील यांनाही आमंत्रित केले. आणि सोलापूरकरांनी एक भव्य दिव्य आणि देखण्या नाट्यसंमेलनाचा आनंद लुटला, आता सोलापूर शाखेचा वटवृक्ष झाला आहे, त्याला शाखारुपी फांद्याही फुटल्या आहेत, मराठी रंगभूमीने सर्व दिवस पाहिले आहेत. आधुनिक तंत्रज्ञानामुळे नाटक बंद पडते की काय अशी भीती वाटते पण मराठी माणूस रसिक व नाट्यवेडा आहे, त्याला रंगमंचावरचा जिवंत अभिनय पाहायचा आहे. सोलापूरने नामवंत अभिनेते, दिग्दर्शक मराठी रंगभूमीला दिले आहेत. ही परंपरा व नाटक जिवंत ठेवण्याचे काम तरुण रंगकर्मींनी पुढे चालवावे, या शुभेच्छांसह ही लेखणी इथेच थांबवित आहे. धन्यवाद!

■■

# रंगमंच – सोलापूर जिल्हा

- शाम सावजी – पंढरपूर
- दिलीप हातवळणे – बार्शी
- सचिन वायकुळे – बार्शी
- औदुंबर भिसे – अकलूज

# पंढरपूरचे मेळे, नाटके आणि चित्रपट

-शाम सावजी

माझ्या लहानपणी मी घरच्यांकडून गणेशोत्सवात पंढरपुरात सादर होणाऱ्या मेळ्याच्या सुरस आठवणी ऐकत आलो. गणेशोत्सवात पंढरपूरकरांनी सादर केलेली काही नाटके मी बघितली आहेत. नंतर मी स्वतः पंढरपूरच्या या नाट्य, सिने चळवळीचा एक भाग बनलो. पंढरपूरच्या नाट्य क्षेत्रातील जुन्या जाणकार मंडळींशी केलेली चर्चा आणि काही लेख यामधून पंढरपूरकरांच्या कला क्षेत्रातील कामगिरीचा तेजस्वी प्रवास आपल्या समोर येतो. मेळ्यांचा काळ मी बघितला नाही पण, लहानपणी पंढरपुरात गणेशोत्सव काळात रंगणाऱ्या मेळ्याची चर्चा घरी दारी सुरु असायची. मेळे म्हणजे गायन, वादन, नाच, नाटके, नकला अश्या सर्व कलाप्रकारांचे एकत्रित सादरीकरण असायचे. बाबुराव अन्नदाते, राजाभाऊ मंगळवेढेकर, अंबिके पेंटर, अर्जुन पेंटर, वसंतराव बडवे, शंकर बनारे अश्या मंडळींनी हे मेळे बसवून पंढरपूरच्या गणेशोत्सवात धमाल उडवून दिली. नामांकितांबरोबरच नवोदितांनाही या मेळ्यामधून आपापले कला प्रकार सादर करायला मिळायचे. मराठी चित्रपट सृष्टीतील कितीतरी नामांकितांनी पंढरपूरच्या या मेळ्यातून हजेरी लावल्याच्या आठवणी जुने जाणकार सांगतात. गणेशोत्सवाचे १० दिवस ह्या मेळ्यासाठी चौका चौकात प्रेक्षकांची झुंबड उडायची, असे जुने जाणकार सांगतात. एकेका दिवसात ३ ते ४ प्रयोग केल्याच्या आठवणीही जाणार सांगतात. गणेश उत्सव आला आला, 'गंमत वाटे मला' अशी गाणी त्यावेळी मेळ्यांमधून गाजल्याचे जाणकार सांगतात. दिलीप टोमके, विजया बडवे असे बाल कलाकार या मेळ्यातूनच चमकले. दिलीप टोमके हे तर पुढे रेडिओ स्टार म्हणून नामांकित झाले. १९५६ च्या महापूरानंतर हे मेळे बंद पडल्याचे सांगतात पंढरपूरच्या नाट्यवेड्या कलाकारांनी बसवलेली नाटके हाही पंढरपूरच्या आकर्षणाचा भाग असायचा.

डॉ. मोहोळकर, शाहिर सावंत, भगवान कदम, सोनाबा सासवडे, विनय बडवे, बापू राजबिंडे, वसंत उत्पात, मधुकर (दादा) टोमके अशी काही मंडळी जोमाने नाटके बसवायची आणि गणेशोत्सवात त्यांचे धूम धडाक्यात प्रयोग व्हायचे. श्री विनय बडवे यांनी त्यांच्या 'नाट्य अभिनव' या संस्थेमार्फत नट सम्राट, चांदणे शिंपित जा, गुड बाय डॉक्टर, कवडी चुंबक, प्रेमा तुझा रंग कसा ?, घरात फुलला पारिजात, तीन चोक तेरा, दिवा जळू दे सारी रात, तरुण तुर्क अशी कौटुंबिक नाटके अगदी पुण्यापर्यंत सादर केली आणि आपल्या नाट्यसंस्थेचा दबदबा निर्माण केला. माझ्या सौभाग्यवतीने यातल्या कित्येक नाटकातून भूमिका केल्या आहेत. त्याचबरोबर जालिंदर वाडेगावकर, मधुकर टोमके, मोहन काळे, शिवाजी सागर, ज्ञानोबा शिंदे यांची ग्रामीण ढंगाची अस्सल गावरान नाटकेही गर्दी खेचायची. दसरा उजाडला , फकीरा , जय मल्हार टिळा लावते मी रक्ताचा अशी ग्रामीण ढंगाची नाटके बघण्यासाठी पंढरपूरकर वेडे व्हायचे. विजयेंद्र जोशी, मुरलेन्द्र शेटे, प्रभा काळे, छाया काळे, मोहन नेर्लेकर, अपर्णा रामतीर्थकर, मंदार काळे, बी. गोरे, सुभाष भिंगे, प्रकाश महाजन बडवे, अशोक गोडगे, संजय शहा, भिकोबा मिरजकर, बंडू महाजन बडवे, उत्तम अदमिले, गार्गी काळे, रोपळकर, माळगी म्याडम, अश्विनी पाटील, ठोंबरे काका, शिवराज सरनाईक, श्री रानडे साहेब व सौ. अनुराधा रानडे, पंचवाडकर अश्या मंडळींचाही पंढरीच्या नाट्य चळवळीत मोलाचा वाटा आहे.

वगसम्राट सुप्रसिद्ध विनोदवीर प्रेम कुमार भोसले यांना कोण विसरेल ? गणेशोत्सवाच्या नाटकांना खरा रंग भरला तो यांनी, पंढरपूरचे मार्मिक लेखक प्रशांत गळीतकर यांची टोपी रोख डोकं उधार, डॉक्टर बिघडला दवाखाना उघडला, कश्यात काय लफड्यात पाय अशी फार्सिकल नाटके प्रेम कुमार भोसले यांनी बसवली आणि पंढरपूरकर जनतेला खळखळून हसवले, काळू बाळू यांच्या लोकनाट्यातही प्रेम कुमार यांनी काम केले होते. त्यांची मेळ्यांमधली कामे बघून त्यांना मराठी चित्रपटातही कामे मिळाली. आणखी बरीच नावे राहून गेली आहेत त्याबद्दल क्षमस्व!

पंढरपूरच्या मंडळींची नाट्य चळवळ थंडावल्यानंतर कोल्हापूर, सांगली अश्या भागातल्या मंडळींची कलापथके, ऑर्केस्ट्रा पंढरपुरात यायला लागले. आम्हा महाविद्यालयीन तरुणांसाठी हे आकर्षण असायचं, रात्री जेवण वगैरे उरकून ही कला पथके बघायला आम्ही मित्र मित्र जायचो.

गल्ली बोळातून किंवा चौका चौकातून फुकट दाखविले जाणारे चित्रपट हाही पंढरपूरच्या गणेशोत्सवातला आकर्षणाचा भाग असायचा. चौकात किंवा गल्लीत पडदा लावून प्रोजेक्टरवर चित्रपट दाखवले जायचे, मुख्यतः मराठी कौटुंबिक चित्रपटच दाखवले जायचे कारण, त्या त्या

भागातला स्त्री वर्ग मोठ्या प्रमाणावर चित्रपट बघण्यासाठी गोळा झालेला असायचा. साधी माणसं, मोहित्यांची मंजुळा, चोरीचा मामला, सोंगाड्या असे कितीतरी गाजलेले चित्रपट गणेशोत्सवाच्या काळात असे फुकट पड्यावर बघायला मिळायचे. तेव्हा टी.. व्ही. वगेरे नसल्याने ह्याचे खूपच अप्रूप वाटायचे. लोक घरून चटया वगैरे घेऊन यायचे आणि जागा धरून सिनेमा कधी सुरु होतोय, याची वाट बघायचे गणेशोत्सवाचे हे १० दिवस कलाकार आणि त्यांच्या कला यांना झळाळी आणून देणारे असायचे. रम्य ते दिवस, रम्य त्या आठवणी आणि रम्य तो गणेशोत्सव. या नंतरच्या कालावधीत म्हणजे १९९० च्या कालावधीत माझ्यासह, बापू वाईकर, कैलास कापसे, निर्मला भिंगे, रवींद्र शेवडे, संतोष शिरगिरे, प्रमोद शेटे, नितीन बाबर, संतोष कुलकर्णी, रोहिणी बडवे (पेटकर), माधवी कुलकर्णी, विजय सगर, दत्तात्रय जगताप व जयश्री जगताप, महेश माने, सुरज जोशी, गंधाली कुलकर्णी, अश्या तरुण मंडळींनी पंढरपूरच्या मंडळींची नाट्य चळवळ थंडावल्या नंतर कोल्हापूर, सांगली अश्या भागातल्या मंडळींची कलापथके, ऑर्केस्ट्रा पंढरपुरात यायला लागले. छोटी माँ या सुप्रसिद्ध मालिकेचे बरेचसे चित्रीकरण पंढरपुरात झाले. व या निमित्ताने पंढरपूरचे कलाकार पहिल्यांदा मालिकेत झळकले. त्या नंतर ब्रम्हचैतन्य ही मालिका सह्याद्री वाहिनीवर प्रसारित झाली. त्यातूनही पंढरपूरचे असंख्य कलावंत झळकले. संत नामदेव ही आणखी एक पंढरपूरची निर्मिती असलेली मालिका. यातही पंढरपूरच्या कलावंतांना संधी मिळाली. हास्य सम्राट या झी मराठी वाहिनीवरील मालिकेत मी स्वतः अंतिम १० पर्यंत सहभागी होतो. दीपक नाईकनवरे हा पंढरपुरातील युवक झी वाहिनीवरील डान्स इंडिया या कार्यक्रमात सहभागी होता.

मालिकांप्रमाणे चित्रपटातही पंढरपूर परिसर आणि येथील कलावंत झळकले. जुन्या काळातल्या संत सखू , झाला महार पंढरीनाथ अश्या काही संत चित्रपटात पंढरपूर, चंद्रभागा दिसले. गल्ली ते दिल्ली या अशोक सराफ आणि निळू फुले अभिनित चित्रपटात पंढरपूरचे शाहीर प्रेमकुमार भोसले आणि किसन शिंगण हे कलावंत झळकले होते. लागे बांधे या रवींद्र महाजनी अभिनित चित्रपटाचे बरेचसे चित्रिकरण पंढरपुरात झाले होते. याच बरोबर बायको असावी अशी या चित्रपटाच्या एका दृश्याचे चित्रीकरण अशोक सराफ आणि निळू फुले यांच्यावर नदी पलीकडे चित्रित करण्यात आले होते. यानंतर मग खुद्द पंढरपूरची काही मंडळी चित्रपट निर्मितीसाठी सरसावली. श्री पवार यांचा जख्मी पोलीस ३०२ , श्री लउळकर बंधू यांचा जख्मी कुंकू, श्री पुसावळे यांचा माझी विठाई माऊली अश्या काही चित्रपटाची निर्मिती पंढरपुरात झाली. या चित्रपटांमुळे पंढरपूरचे स्थानिक कलावंत रुपेरी पड्यावर झळकले. मग अचानक आपल्या हरिश्चंद्राची फॅक्टरी ह्या पहिल्याच चित्रपटासाठी थेट ऑस्कर वारी करणारे श्री परेश मोकाशी पंढरपुरात आले आणि त्यांनी येथील कलाकारांना घेऊन 'एलिझाबेथ एकादशी' हा महत्वाकांक्षी चित्रपट बनवला. बर्लिन आणि स्विडन येथील महोत्सवांसाठी निवडल्या गेलेल्या या चित्रपटाला २०१४ सालचं सर्वोत्कृष्ट बाल चित्रपटासाठीचं राष्ट्रीय पातळीवरील सुवर्णकमळ मिळालं. पंढरपूरचा परिसर आणि पंढरपूरकर कलावंत जागतिक पातळीवर पोहोचले. त्यानंतर त्याच वर्षी श्री मकरंद माने यांच्या पहिल्या 'रिंगण' या चित्रपटाचं चित्रीकरण पंढरपुरात झालं आणि हा चित्रपट २०१५ सालचा राष्ट्रीय पातळीवरील सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपट ठरला. तसेच रिंगण' ची निवड जर्मन महोत्सव आणि कान्स महोत्सवासाठीही झाली. सलग दोन वर्ष पंढरपुरात चित्रित झालेले आणि पंढरपूरच्या कलावंतांचा सहभाग असलेले चित्रपट राष्ट्रीय पुरस्कारासाठी प्राप्त ठरले. योगायोगाने या दोन्ही चित्रपटात माझी महत्वपूर्ण भूमिका आहे. यानंतर पंढरपूरच्या कलावंतांचा उत्साह वाढला नसता तरच नवल! अनेक लघु चित्रपटांची आणि मोठ्या चित्रपटांची निर्मिती सध्या पंढरपुरात सुरु आहे, 'श्री विठ्ठलाची नगरी' या बरोबरच कलावंतांची नगरी म्हणूनही पंढरपूर ओळखले जात आहे. नाट्य रसिक आणि नाट्य कलावंत यांची खाण असणाऱ्या पंढरपुरात अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन दिमाखात साजरे झाले. ३१ जानेवारी, १ व २ फेब्रुवारी २०१४ रोजी पंढरपुरात मराठी चित्रपट आणि नाट्य सृष्टीतील मान्यवर कलावंत, रंगकर्मी अवतरले होते.

पंढरीतला अवलिया, कलंदर धडपड्या माणूस श्री दिलीप कोरके यांनी पंढरपुरात नाट्य परिषदेची स्थापना धूम धडाक्यात केली आणि मरगळलेल्या पंढरपूरच्या नाट्य सृष्टीत पुन्हा चैतन्याचं वारं वाहायला लागलं. नाट्य, चित्र कलावंत एकत्र जमायला लागले, पुन्हा काही करता येईल का? याची चाचपणी व्हायला लागली. यातूनच पंढरपुरात अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन घेता येईल का? अशी कल्पना दिलीप कोरके यांच्या मनात आली. त्यांनी ती इतर मित्रांसमोर मांडली खरी पण कित्येक लाखांच्या घरात जाणारा खर्च करायचा कसा'? हा प्रश्न होता. एकदा मनात कल्पना आली की, ती सत्यात उतरवण्यासाठी जीवचं रान करायचं हा दिलीप कोरके यांचा स्वभाव. त्यातच ते नाट्य परिषदेच्या मुंबई कार्यकारिणीवर निवडून गेले. मग उत्साह आणखी वाढला. नाट्य परिषदेचे अध्यक्ष श्री. मोहन जोशी यांच्याशी कोरके यांनी चर्चा केली, यशस्वितेची ग्वाही दिली आणि मोहन जोशी तयार झाले. पंढरपुरात नाट्य संमेलन घेण्यास मंजुरी मिळाली आणि मग खऱ्या अर्थाने कोरके आणि सहका-

यांची धावपळ सुरु झाली.
डॉ. मंदार सोनावणे, विनोद महाडिक, सागर यादव, सुनील मोहिते, नाना कवठेकर, श्रीराम परदेशी, राजेंद्र उराडे, दत्तात्रय जगताप, विवेक चौंडावार, बंटी अष्टेकर, नाना जगताप, राजेंद्र गोसावी अश्या पंढरपूर शाखेच्या मान्यवरांनी दिलीप कोरके यांच्या पाठीशी ठामपणे उभारण्याचा निर्णय घेतला आणि चक्रे वेगात फिरू लागली. देणगीदार उभे राहिले. वृत्तपत्रातून बातम्या झळकल्या, वातावरणात चांगलाच रंग भरला. आणि एकदाचं ३१ जानेवारी २०१४ रोजी पंढरपुरात अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन सुरु झालं.

मराठी नाट्य चित्र सृष्टीतील मान्यवर कलावंत, जेष्ठ रंगकर्मी या निमित्ताने पंढरपुरात अवतरले. ३१ जानेवारीला सकाळी सर्व मान्यवर कलावंतांची फेरी पंढरपूरच्या रस्त्यावरून निघाली. पंढरपूरकर रस्त्यांच्या दुतर्फा उभे राहून या तारे तारकांना डोळे भरून बघत होते. त्यांचं अभिनंदन करत होते, सजवलेल्या बग्गीतून मावळते संमेलनाध्यक्ष नटवर्य श्री मोहन आगाशे आणि सध्याचे अध्यक्ष श्री अरुण काकडे यांची मिरवणूक काढण्यात आली. तीन दिवस चाललेल्या या सोहळ्यात स्थानिक कलावंतांबरोबर, चित्रपट, नाट्य सृष्टीतील मान्यवरांनी आपली कला सादर केली, आजही त्या आठवणींनी उर भरून येतो. तर असा हा पंढरीचा कलारंग !

■■

# संगीत नाटकाच्या निमित्ताने बार्शीशी स्नेह जुळलेले नटसम्राट बालगंधर्व

– सचिन वायकुळे

बार्शीची नाट्यपरंपरा खऱ्या अर्थाने उंचीवर गेली व लक्षवेधी ठरली तरी बालगंधर्वांच्या बार्शीतील सततच्या येण्याने. बार्शीला नाटकांची खूप जुनी परंपरा आहे. या भूमीत हौशी आणि व्यावसायिक अशा दोन्ही प्रकारची नाटके होत राहिली. इथल्या नाट्यरसिकांनी नाटकांवर भरभरून प्रेम केलं. अनेक गाजलेली नाटकं बार्शीत झाली, आणि रसिकांनीही तितक्याच उत्साहाने या नाटकांचं जितकं मनापासून स्वागत केलं तितकंच नाट्यकलावंतानाही डोक्यावर घेतलं. महाराष्ट्राच्या नाट्यसृष्टीचा इतिहास ज्यांच्या नावाशिवाय पूर्ण होऊ शकत नाही ते बालगंधर्व अर्थात नारायण श्रीपाद राजहंस यांच्याही नाटकांचा बार्शीकरांनी अनुभव घेतला. येथील नाट्यचळवळीचा वेध घेत असताना बालगंधर्वांचा बार्शीशी असलेला विशेष स्नेह दुर्लक्षित करता येत नाही. अनेकांना हे ज्ञात नसेल पण बार्शीतील रंगभूमी बालगंधर्वांच्या पदस्पर्शाने पावन झालेली आहे.

नारायण श्रीपाद राजहंस उर्फ बालगंधर्व यांच्या नावाचा जरी उल्लेख केला तरी मनाच्या तारा झंकारतात. रंगभूमीच्या या बादशहाने सुमारे चार तपे मराठी मनावर राज्य केलं. ज्येष्ठ साहित्यिक पु.ल. देशपांडे म्हणायचे की, 'बालगंधर्वांसारखा लोकोत्तर कलाकार शंभर वर्षातून एकदा जन्माला येतो. अच्युत बळवंत कोल्हटकर महाराष्ट्रातील दैवतांची नावे घेताना छत्रपती शिवाजी महाराज व लोकमान्य टिळक यांच्याबरोबर बालगंधर्वांचाही उल्लेख करत. सांगली जिल्ह्यातील 'पलूस' या गावात जन्म घेतलेल्या बालगंधर्वांनी मराठी रंगभूमीला कलेच्या रुपाने मोठी श्रीमंती मिळवून दिली. भास्करबुवा बखले यांच्याकडून गायनाचे धडे घेतलेल्या बालगंधर्वांची शास्त्रीय संगीताची बैठक उत्तम होती. नाट्यसंगीताबरोबरच गझल, ठुमरी व भक्तगीते याच्यावर त्यांचे कमालीचे प्रभुत्त्व होते. शाकुंतल व मानापमान या नाटकांतील 'भामिनी या भूमिकेमुळे बालगंधर्वांनी खऱ्याअर्थाने सर्वांचे अवधान खेचले. आपल्या हयातीतच अख्यायिका बनून राहिलेला हा दिग्गज कलावंत बार्शीत महिना-महिना मुक्कामी असे. संगीत

नाटकांत त्यांनी केलेल्या स्त्री भूमिकाच अधिक गाजल्या अन् प्रेक्षकांनाही त्या भूमिका आवडल्या. खरे तर बालगंधर्व बार्शीत मुक्कामी असल्याचे नवल अनेकांना वाटेल पण ते खरे आहे. संगीत रंगभूमीला सुवर्ण काळ दाखविणाऱ्या या दिग्गज कलावंनाते संशयकल्लोळ, शारदा, मुकनायक, स्वयंवर, एकच प्याला, विद्याहरण आदी संगीत नाटकांनी रसिकांना अक्षरश: वेड लावले होते. आश्चर्याची गोष्ट म्हणजे यातील 'एकच प्याला हे त्यांचे संगीत नाटक त्यांनी स्वत: बार्शीतील अरुण थियटरमध्ये सादर केले होते.

इतिहासाची पाने चाळताना लक्षात येईल की सन १८९८ मध्ये लोकमान्य टिळकांनी 'बालगंधर्व ही पदवी त्यांना बहाल केली. बालगंधर्वांनी मराठी नाट्यसंगीताला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले, नाटकातील स्त्री व्यक्तिरेखा अभूतपूर्व कौशल्याने रंगविल्या.

'संगीत स्वयंवर' यातील 'अजि राधा बाला मीच गोपाला, अजुनी खुळा हा नाद पुरेसा कैसा होईना , नाटक झालें जन्माचें मनिं का हा येईना. व्यसनें जडली नवीं नवीं कुणी तिकडे पाहिना, नाव बुडविलें वडिलांचे किर्ती जगी माईना. याचबरोबर आता राग देई मना, आला जो मज प्रेमे वराया, काय पुरुष चळले बाई,अशी गाणी त्यांनी स्वरबध्द करून वेगळी छाप रसिकांच्या मनात टाकली होती.

बार्शीत नाट्यचळवळीचा बहराचा काळ होता, त्यावेळचे बार्शीतील हौशि कलावंत मधु पिंपरकर, सुखदेव चव्हाण, गजानन काळे, बापू माने, सोमनाथ घाणेगावकर, बापू काटकर, विश्वासराव शेटे, श्याम देशपांडे, बाळ माळवदे, मामासाहेब केळकर, चंद्रकांत सुरवसे, बी.जी. हलकट्टी, सिध्दलिंग खुडे, अंबादास बोधे, भगवान गवळी, शंभूलिंग हुंडेकरी, भैय्या अत्रे, बुहाण शेख, नेमीचंद करवा, विजयकुमार विश्वरुपे, रतिलाल देवधरे, भास्कर खडके यांचे योगदान विसरता येण्यासारखे नाही. आज यातील अनेक तारे गळून पडले आहेत, तर काही हयात आहेत. या हौशि नाट्यपरंपरेला आणखी झळाळी मिळाली ती बालगंर्ध यांच्या बार्शीतील प्रवेशामुळे. साधारण १९५९ च्या सुमारास नगरपालिकेचे तत्कालीन प्रशासक जी.के. बहुलेकर यांनी शहरात प्रथमच नाट्यमंडळाची स्थापना केल्यानंतर व्यावसायिक नाटके बार्शीत येत होती. नाट्यमंडळाची स्थापना होण्यापूर्वी नगरपालिका कर्मचारी व येथील हौशी कलावंतांची नाटक होत होती. याचकाळात बालगंधर्वांचे बार्शीत पाऊल पडले.बार्शीत बालगंधर्व यायचे तेव्हा १९४५ ते १९५५ असा तो काळ होता. ऐनापूर मारुती मंदिराच्या बाजूला औंधकर महाराज यांचा वाडा होता आणि त्याठिकाणी 'अरुण थियटरात बालगंधर्वांची संगीत नाटके होत असत. सोलापूरहून कित्येक नाट्यरसिक बार्शीत बालगंधर्व यांची होणारी संगीत नाटके पाहण्यासाठी येत.विशेष म्हणजे याच ठिकाणी त्यांचा कित्येक दिवस मुक्काम असायचा ही बार्शीकरांसाठी आजही अभिमान वाटावा अशी गोष्ट आहे. संगीत नाटकावेळी बार्शीतील जुन्या नाट्यकलावंतांनी सांगितलेल्या आठवणींमध्ये एक महत्त्वाची आठवण म्हणजे, बालगंधर्वांना अत्तराचा विलक्षण शौक होता. संगीत नाटकावेळी रंगभूमीवर जेव्हा ते पाऊल टाकायचे तेव्हा सर्वत्र अत्तर शिंपडलेले असायचे. आडतव्यापारी स्व. रूद्राप्पा वाळके यांचे लता चित्रमंदिरच्या बाजूला दुकान होते. संगीत नाटकांच्या निमित्ताने बालगंधर्व बार्शीत येत तेव्हा वाळके यांच्या दुकानात त्यांचा गप्पांचा फडही रंगत असे. बार्शीत आल्यानंतर बालगंधर्वांचा सहवास लाभलेले व त्यांना प्रत्यक्षात पाहिलेल्यांमध्ये वाळके यांच्यासह रामभाऊ पवार यांचाही समावेश आहे. नटसम्राट म्हणून ख्याती असलेले बालगंधर्व बार्शीत आले की रामभाऊ देखील त्यांच्याकडे जात असत. कित्येकदा रामभाऊ यांनी संगीत नाटकावेळी तबल्याचीही साथ त्यांना दिली.बार्शी शहरातील स्थानिक हौशी कलावंत व रसिक श्रोत्यांच्या मनात कायम कोरली गेलेली बालगंधर्वांची आठवण आजही बार्शीच्या नाट्यचळवळीचा विषय निघालाकी ताजी होते. महाराष्ट्राला आपल्या अभिनयाने वेड लावणारा इतक्या ताकदीचा नटसम्राट कलावंत बार्शीकरांच्या वाट्याला येणं ही बाब बार्शीच्या इतिहासात सुवर्णअक्षरांनी नोंद करून ठेवण्यासारखी आहे.

■■

# धांडोळा... एका नाट्यचळवळीचा...

-दिलीप हातवळणे

बार्शी...! पुण्या-मुंबई पासून जवळचे.. सांस्कृतिक दृष्ट्या महत्वाचे गाव.. एखाद्या शहराची प्रगती बाजारपेठ, शिक्षण, वैद्यकीय सेवा, कारखानदारी व सांस्कृतिक चळवळीने ठरविली जाते. 'स्वस्ताईचे शहर' ही खरी बार्शी शहराची ओळख. बार्शीने प्रमुख्याने साहित्य व सांस्कृतिक क्षेत्रात भरीव योगदान दिले आहे. आपल्या शाहिरी बाण्याने एकेकाळी 'महाराष्ट्र' जागवणारे शाहिर अमर शेख. बार्शी येथे ५४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष माजी केंद्रिय मंत्री सुशिलकुमार शिंदे व ज्येष्ठ साहित्यीक गं. भा. सरदार यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाले होते. तसेच उत्तम व गुणी कलाकारांचा नजराणा बार्शी ने मराठी रंगभूमीला सादर केला आहे. याचे उत्तम उदाहरण म्हणजे ज्येष्ठ अभिनेत्री कै. शांता तांबे ही गुणी अभिनेत्री बार्शीचीच.. प्रसिद्ध कादंबरीकार बाबा कदम यांच्या 'गुळाचा गणपती' या सिनेमाचे दिग्दर्शन बार्शीच्या तम्मा कोरे यांनी बार्शी...! पुण्या-मुंबई पासून जवळचे.. सांस्कृतिक दृष्ट्या महत्वाचे गाव.. एखाद्या शहराची प्रगती बाजारपेठ, शिक्षण, वैद्यकीय सेवा, कारखानदारी व सांस्कृतिक चळवळीने ठरविली जाते. 'स्वस्ताईचे शहर' ही खरी बार्शी शहराची ओळख. बार्शीने प्रमुख्याने साहित्य व सांस्कृतिक क्षेत्रात भरीव योगदान दिले आहे. आपल्या शाहिरी बाण्याने एकेकाळी 'महाराष्ट्र' जागवणारे शाहिर अमर शेख. बार्शी येथे ५४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष माजी केंद्रिय मंत्री सुशिलकुमार शिंदे व ज्येष्ठ साहित्यीक गं. भा. सरदार यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाले होते. तसेच उत्तम व गुणी कलाकारांचा नजराणा बार्शी ने मराठी रंगभूमीला सादर केला आहे. याचे उत्तम उदाहरण म्हणजे ज्येष्ठ अभिनेत्री कै. शांता तांबे ही गुणी अभिनेत्री बार्शीचीच.. प्रसिद्ध कादंबरीकार बाबा कदम यांच्या 'गुळाचा गणपती' या सिनेमाचे दिग्दर्शन बार्शीच्या तम्मा कोरे यांनी केले, अंतरराष्ट्रीय किर्तीची टेनिसपटू प्रार्थना ठोंबरे, विख्यात व्यंगचित्रकार खलील खान, प्रसिद्ध पार्श्वगायीका बेला सुलाखे यांनी बार्शीच्या वैभवात भरच घातली.

बालगंधर्व तर बार्शीच्या प्रेमात पडले होते. १९४८ ते १९५३ या बालगंधर्वांच्या सुवर्ण काळात त्यांनी अनेक कार्यक्रम बार्शीत सादर केले. त्या काळात स्व. रामभाऊ आबा पवार यांनी त्यांना साथसंगत केली व त्यावेळेपासून नाट्य चळवळी प्रती कृतज्ञता म्हणून रामभाऊ आबा पवार यांनी आपल्या दुकानात वेषभूषा, नेपथ्य व मेकअपचे सामान ठेवावयाला सुरुवात केली. बार्शीतील सर्व श्री. विश्वासराव शेटे, मधू पिंपरकर, सुखदेव चव्हाण, गजानन काळे, बापू माने, बापू काटकर, श्या' देशपांडे, बाळ माळवदे, मामा साहेब केळकर, चंद्रकांत सुरवसे, बी. जी. हलकट्टी, अंबादास बोधे, भगवान गवळी, शंभू हुंडेकरी, भैय्या अत्रे, बुर्हाण शेख, नेमीचंद करवा, विजयकुमार विश्वरुपे, रतिलाल देवधरे, भास्कर खडके यांच्या शिवाय बार्शीच्या रंगभूमीचा इतिहास अपुर्ण राहील. पदरमोड करुन यांनी शहरात नाट्य चळवळ जिवंत ठेवली. ही सर्व नाट्य क्षेत्रातील सोनेरी पाने आहेत.

बार्शीत बरीच वर्षे नाट्यगृह नव्हते. सिल्व्हर ज्युबिली शाळेच्या प्रांगणात नाटके सादर व्हायची. आणि बार्शीकर त्याला भरभरुन प्रतिसाद द्यायचे. विविध प्रकारच्या व्यवसायिक नाटकामुळे बार्शीकरांचे मनोरंजन व्हायचे. बार्शीत छोटी-मोठी नाट्य मंडळे आजही रंगभूमीची सेवा करतात. अबोली पालके यांनी 'गुलाबची मस्तानी' या नाटकाद्वारे तृतीय पंथीयांचा प्रश्न लिलया सादर केला आहे. बार्शीच्या दिलीप हातवळणे, सोमेश्वर घाणेगांवकर, व इतर कलाकारांनी मिळून श्याम फडके लिखीत 'बायको उडाली भुर्र' या नाटकाचे प्रयोग व्यवसायिक दृष्टीने अनेक ठिकाणी सादर केले. अमर देवकर व विनोद कांबळे यांनी अनुक्रमे 'म्होरक्या' व 'कस्तुरी' या चित्रपटांची निर्मिती केली, या चित्रपटांना राष्ट्रपती पुरस्कार मिळाला आहे. तसेच सध्या उदयोन्मुख कलाकार ज्येष्ठ अभिनेत्री विद्या सावळे, समीर परांजपे, अभय चव्हाण, चित्रपट निर्माते व अभिनेते विश्राम घाणेगांवकर व संजय श्रीधर कांबळे तसेच गोड गळ्याची गायीका सौ. वर्षा रसाळ, कलायात्री प्रतिष्ठानचे प्रा. प्रविण गाढवे सर तसेच निवेदक मुकुंदराज कुलकर्णी, निता देव, पालके व सोमेश्वर घाणेगांवकर ही सर्व गुणी कलाकार मंडळी बार्शीचीच. बार्शीने जशी रंगभूमीची सेवा केली अगदी तशीच लोककलेची सुद्धा केली.

रसिकांची व कलाकारांची कुचंबणा लक्षात घेऊन माजी मंत्री दिलीप सोपल यांनी जुन्या भाजी मंडई या ठिकाणी यशवंतराव चव्हाण नाट्यगृह उभारले. नाट्य चळवळीचे विविध पदर असे की.... हौशी रंगभूमी.. संगीत रंगभूमी.. बाल रंगभूमी.. व्यवसायिक रंगभूमी.. प्रायोगिक रंगभूमी.. कामगार रंगभूमी या संघटीत संस्था बार्शीत कार्यरत आहेत. त्यांना संजिवनी देण्याचे काम सध्या बार्शीची नाट्य परिषद करते आहे. साहिर लुधीयानवी यांच्या गझलेत सांगायचे झाले तर..

माना की इस जमीं को न गुलजार कर सके
कुछ खार कम तो कर गए गुजरे जिधरसे हम ।

■■

# १०० वे नाट्यसंमेलन -
# सोलापूरच्या सांस्कृतिक इतिहासातील सोनेरी पान

दिनांक २६,२७,२८ जानेवारी २०२४ दरम्यान अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे शंभरावे विभागीय नाट्य संमेलन परिषदेचे अध्यक्ष अभिनेते प्रशांत दामले यांच्या मार्गदर्शनाखाली व डॉ. जब्बार पटेल यांच्या अध्यक्षतेखाली सोलापुरात अतिशय दिमाखात संपन्न झाले. अवघ्या एक महिन्याच्या कालावधीत संपूर्ण तयारी करून हे विभागीय संमेलन आयोजकांनी यशस्वीपणे पार पाडले. दिनांक २१ जानेवारी ते २६ जानेवारी दरम्यान स्थानिक कलावंतांना हुतात्मा स्मृती मंदिर येथे 'पूर्वरंग' या कार्यक्रमांत संधी दिली गेली .बालनाट्य, एकांकिका, नाट्यछटा, एकपात्री, वैयक्तिक आणि समूह नृत्य, व्यावसायिक नाटकं, सोलापुरातील हौशी कलावंतांची नाटकं या दरम्यान पूर्वरंग कार्यक्रमात सादर केली गेली.

संमेलनामध्ये अनेक व्यावसायिक नाटके व सांस्कृतिक कार्यक्रम प्रचंड गर्दीत सादर झाले. सर्व कार्यक्रमांना सोलापुरातील नाट्यरसिकांचा उदंड प्रतिसाद मिळाला. काही नाटकांना तर इतकी गर्दी झाली की लोक प्रेक्षागृहात खाली बसून व बाजूला उभे राहून नाटक पाहत होते. संमेलनात 'संकर्षण कऱ्हाडे व्हाया स्पृहा जोशी', स्टॅन्डअप कॉमेडियन बंडा जोशी, महेंद्र गणपुले, दिलीप हल्याळ ,भालचंद्र कोळपकर, आणि विश्वास पटवर्धन यांचा 'आम्ही एकपात्री' हा कार्यक्रम तर व्यावसायिक नाटक 'तुझं आहे तुझंपाशी', दोन व्यवसायिक बालनाटये अद्वैत थिएटर्स मुंबई निर्मित 'अलबत्या गलबत्या', अष्टविनायक मुंबई निर्मित व्यावसायिक नाटक 'मर्डरवाले कुलकर्णी', मेरीड इंडिया कोल्हापूर निर्मित नाटक 'स्पायडरमॅन', गौरी थिएटर्स मुंबई निर्मित प्रशांत दामले अभिनीत 'सारखं काहीतरी होतंय', अभिनेते प्रदीप कबरे यांचं नाट्यअभिवाचन 'खिडकी', रसिक मोहिनी मुंबई निर्मित नाटक 'अमेरिकन अल्बम', ही नाटके हुतात्मा स्मृती मंदिर रंगमंचावर सादर झाली तर सोनाली कुलकर्णी ,पूजा सावंत ,श्वेता खरात, गौरी कुलकर्णी ,जुईली शेलार या व्यावसायिक सिने कलावंतांची कलारजनी- जल्लोष व त्यासोबत चौरंग मुंबई निर्मित मराठी बाणा हा कार्यक्रम नॉर्थकोट प्रशाला येथील मुख्य रंगमंचावर सादर करण्यात आला, सोबतच जादूगार जितेंद्र रघुवीर यांचे जादूचे दोन प्रयोग बालगोपाळांसाठी सादर करण्यात आले.

संमेलनाचे मुख्य आकर्षण ठरले ती नाट्यदिंडी. तीन किलोमीटर लांबीची ही नाट्यदिंडी अतिशय भव्य व देखणी होती. नाट्य दिंडीत मराठी चित्रपट व नाट्यक्षेत्रातील अनेक लोकप्रिय कलावंत उपस्थित होते तर संपूर्ण महाराष्ट्रातील ३०० पेक्षा जास्त लोककलावंत या नाट्यदिंडीत सहभागी झाले होते. नाट्यदिंडीत पालखी, रथ, घोडे, बग्गी इत्यादीमुळे फारच शोभा आली होती. सोलापुरातील जवळजवळ ५० शाळा व महाविद्यालयानी यात वेगवेगळ्या कला सादर करत आपला सहभाग नोंदविला. चित्ररथ, ढोल-ताशा,लेझीम, टाळ मृदंगासह दहा हजार विद्यार्थी व शिक्षक या नाट्यदिंडीत सहभागी झाले होते. संमेलनात ३४ समित्या स्थापित झाल्या या समित्यांमधून ६५० रंगकर्मी आणि शिक्षकांनी आपलं बहुमूल्य योगदान दिले. ज्येष्ठ दिग्दर्शक व संमेलनाध्यक्ष डॉ. जब्बार पटेल यांच्या हस्ते सोलापुरातील अनेक ज्येष्ठ कलावंतांचा यावेळी सत्कार करण्यात आला. संमेलन म्हटल्यानंतर त्या ठिकाणी अनेक अडचणी उभ्या राहतात परंतु या सर्वांवर मात करीत, कार्याध्यक्ष प्रकाश यलगुलवार सर आणि प्रमुख कार्यवाह विजय दादा साळुंके यांनी संमेलन यशस्वी केलं, त्यांना स्वागताध्यक्ष पालकमंत्री नामदार चंद्रकांत दादा पाटील आणि प्रमुख मार्गदर्शक प्रा. शिवाजीराव सावंत यांनी खंबीर पाठिंबा दिला . सोलापूर जिल्ह्यातीलअनेक दानशूर व्यक्तींचा या संमेलनास आर्थिक हातभार लागला. संमेलनादरम्यान २१ ते २८ जानेवारी सलग आठ दिवस दोन्ही वेळचे भोजन, चहा व अल्पोपहाराची चोख व्यवस्था प्रा. शिवाजीराव सावंत यांनी स्वखर्चाने केली. असे हे, न भूतो न भविष्यती नाटयसंमेलन सोलापूरच्या सांस्कृतिक इतिहासातील एक सोनेरी पान ठरले.

- जयप्रकाश कुलकर्णी, सोलापूर

# अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे
# शतक महोत्सवी विभागीय नाट्य संमेलन, सोलापूर

## क्षणचित्रे



नाट्यदिंडी शुभारंभ प्रसंगी स्वागताध्यक्ष
मा.ना.चंद्रकांतदादा पाटील, नाट्यपरिषद अध्यक्ष प्रशांत दामले,
उद्योगपती दत्ताअण्णा सुरवसे व अन्य मान्यवर



नाट्यदिंडीत सहभागी स्वागताध्यक्ष
मा.ना. चंद्रकांतदादा पाटील व परिषदेचे
अध्यक्ष प्रशांत दामले



स्वागतध्यक्ष मा.ना.चंद्रकांतदादा पाटील समवेत
अभिनेते प्रशांत दामले,मोहन जोशी व
मागदर्शक प्रा. शिवाजीराव सावंत



नाट्यदिंडीत सहभागी अभिनेत्री रिंकू राजगुरु,
अभिनेते किशोर महाबोले व अन्य मान्यवर



नाट्यदिंडीत सहभागी यक्षगान (कर्नाटक) कलावंत



शोभायात्रेत नंदिध्वजासह पारंपारिक पोषाखात शालेय विद्यार्थी

# अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे
# शतक महोत्सवी विभागीय नाट्य संमेलन, सोलापूर

## क्षणचित्रे



नाट्यदिंडीत सहभागी विद्यार्थीनींचे झांज पथक



नाट्यदिंडीत सहभागी, पारंपारिक वेशभूषेत अश्वारुढ विद्यार्थी



नाट्यदिंडीत सहभागी सिनेअभिनेत्री सविता मालपेकर समंलेन पदाधिकारी अविनाश महागावकर, कृष्णा हिरेमठ



नाट्य दिंडीत सहभागी सिनेकलावंत



नाट्य परिषेदचे अध्यक्ष अभिनेते प्रशांत दामले यांचे स्वागत



नाट्यदिंडीत पौराणीक वेशभूषेत स्थानिक कलावंत

# अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे
# शतक महोत्सवी विभागीय नाट्य संमेलन, सोलापूर
## क्षणचित्रे



चित्रकला महाविद्यालयाचे माजी प्राचार्य देवरकोंडा, शिल्प-चित्र प्रदर्शनाचे उद्घाटन करताना, सोबत मा.ना.श्री.चंद्रकांतदादा पाटील, श्री. दत्ता अण्णा सुरवसे, प्रा. बी.पी. रोंगे
प्रमुख कार्यवाह विजय साळुंके, नरेंद्र काटीकर सर, समन्वयक मोहन डांगरे



संमेलन उद्घाटन प्रसंगी मा.ना.श्री. चंद्रकांतदादा पाटील, प्रा. शिवाजीराव सावंत, प्रा. बी. पी. रोंगे
श्री. प्रकाश यलगुलवार (मा. आमदार), श्री. दत्ताअण्णा सुरवसे, शिवाजी शिंदे, विजय साळुंके,



संमेलन उद्घाटन प्रसंगी मनोगत व्यक्त करताना
मा.ना.श्री.चंद्रकांतदादा पाटील



संमेलन कार्यक्रमास पोलीस आयुक्त राजेंद्र माने व महापालिका आयुक्त शितल तेली-उगले व अन्य मान्यवर



संमेलन उद्घाटन प्रसंगी मनोगत व्यक्त करताना
प्रा. शिवाजीराव सावंत



संमेलन उद्घाटनप्रसंगी रसिक प्रेक्षक कलावंत

# अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे
# शतक महोत्सवी विभागीय नाट्य संमेलन, सोलापूर

## क्षणचित्रे



संमेलन उद्घाटन प्रसंगी स्थानिक कलावंताचे सादरीकरण



संमेलन उद्घाटन प्रसंगी स्थानिक कलावंताचे सादरीकरण



संमेलन उद्घाटन प्रसंगी स्थानिक कलावंताचे सादरीकरण



संमेलन उद्घाटन प्रसंगी स्थानिक कलावंताचे सादरीकरण



संमेलनात सिंहगड पब्लीक स्कुल
पंढरपूरच्या १५० विद्यार्थ्यांनी तबला वादन केले



मा.ना. चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते उद्योगपती दत्ताअण्णा सुरवसे यांचा सत्कार, समवेत परिषदेचे उपाध्यक्ष श्री.भाऊसाहेब भोईर व संमेलनाचे प्रमुख कार्यवाह श्री.विजय साळुंके

## अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे
## शतक महोत्सवी विभागीय नाट्य संमेलन, सोलापूर
## क्षणचित्रे



प्रा. शिवाजीराव सावंत यांचा, मा.ना.श्री. चंद्रकांतदादा पाटील यांचे हस्ते सत्कार, प्रसंगी संमेलन अध्यक्ष डॉ. श्री. जब्बार पटेल सिने अभिनेत्री निलमताई शिर्के व सहकोषाध्यक्ष श्री. अविनाश महागावकर



संमेलन हस्तांतर सोहळा प्रसंगी उपस्थित मान्यवर डावीकडून श्री. प्रशांत बडवे, श्री. दिलीप कोरके, श्री. अविनाश महागावकर, डॉ. सुहासिनी शहा, अभिनेत्री निलम शिर्के, प्रा. दिपा क्षिरसागर, श्री. प्रकाश यलगुलवार (माजी आमदार), प्रा.श्री. लक्ष्मीकांत दामा (उपकुलगुरु) , प्रा.श्री. शिवाजीराव सावंत, अभिनेते श्री. किशोर महाबोले, समन्वयक श्री. मोहन डांगरे, दयानंद चंदनवाले, ना.श्री. चंद्रकांतदादा पाटील, डॉ.श्री. जब्बार पटेल, श्री. विजय साळुंके

# अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे शतक महोत्सवी विभागीय नाट्य संमेलन, सोलापूर

## क्षणचित्रे




संमेलनात कार्यक्रमास बहुसंख्येने उपस्थित रसिक प्रेक्षक




संमेलनात व्यवसायीक नाटक '' मर्डरवाले कुलकर्णी'' सादर करताना एका प्रसंगात सिने नाट्य कलावंत वैभव मांगले, भार्गवी चिरमुलेसह अन्य कलाकार



संमेलनाध्यक्ष डॉ. जब्बार पटेल यांचा सत्कार करताना नामदार चंद्रकांत दादा पाटील व अन्य मान्यवर

# अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे
# शतक महोत्सवी विभागीय नाट्य संमेलन, सोलापूर
## क्षणचित्रे



संमेलन उद्घाटन प्रसंगी स्थानिक कलावंतांचे सादरीकरण



संमेलन उद्घाटन प्रसंगी स्थानिक कलावंतांचे सादरीकरण



संमेलनात सिंहगड पब्लिक स्कुल पंढरपूरच्या १५० विद्यार्थ्यांनी तबला वादन केले



संमेलन उद्घाटन प्रसंगी स्थानिक कलावंतांचे सादरीकरण



संमेलन उद्घाटन प्रसंगी स्थानिक कलावंतांचे सादरीकरण

## अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे
## शतक महोत्सवी विभागीय नाट्य संमेलन, सोलापूर
### क्षणचित्रे



विभागीय नाट्यसंमेलन, पंढरपूर


विभागीय नाट्यसंमेलन, पंढरपूर


विभागीय नाट्यसंमेलन, पंढरपूर


विभागीय नाट्यसंमेलन, पंढरपूर


विभागीय नाट्यसंमेलन, पंढरपूर


विभागीय नाट्यसंमेलन, पंढरपूर

## अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे
## शतक महोत्सवी विभागीय नाट्य संमेलन, सोलापूर

### क्षणचित्रे



विभागीय नाट्यसंमेलन, अकलूज



विभागीय नाट्यसंमेलन, अकलूज



विभागीय नाट्यसंमेलन, अकलूज



विभागीय नाट्यसंमेलन, अकलूज



विभागीय नाट्यसंमेलन, अकलूज

# अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे
# शतक महोत्सवी विभागीय नाट्य संमेलन, सोलापूर

## क्षणचित्रे



विभागीय नाट्यसंमेलन, मंगळवेढा


विभागीय नाट्यसंमेलन,मंगळवेढा



विभागीय नाट्यसंमेलन, मंगळवेढा



विभागीय नाट्यसंमेलन, मंगळवेढा


विभागीय नाट्यसंमेलन, मंगळवेढा


विभागीय नाट्यसंमेलन, मंगळवेढा

## अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे
## शतक महोत्सवी विभागीय नाट्य संमेलन, सोलापूर

### क्षणचित्रे



विभागीय नाट्यसंमेलन, सांगोला



विभागीय नाट्चसंमेलन, सांगोला



विभागीय नाट्यसंमेलन, सांगोला



विभागीय नाट्यसंमेलन, सांगोला



विभागीय नाट्यसंमेलन, सांगोला



विभागीय नाट्यसंमेलन, सांगोला

## अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे
## शतक महोत्सवी विभागीय नाट्य संमेलन, सोलापूर

### क्षणचित्रे



'अलबत्या गलबत्या' या व्यवसायीक बालनाट्यातील कलावंताचा सत्कार करताना प्रा. शिवाजीराव सावंत



नाट्यदिंडीत सहभागी श्री.मल्लिकार्जुन कावळे, श्री.नरेंद्र गंभिरे, श्री.जयप्रकाश कुलकर्णी, ॲड.आर. एस. पाटील, श्री. आनंद मुस्तारे










पूर्वरंग

# शतकोत्सवी नाट्यसंमेलन अकलूज

– औंदुबर भिसे

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मुंबईच्या शतकोत्सवी नाट्यसंमेलनानिमित्त अकलूज शाखेच्यावतीने दि.१४ जानेवारी ते दि.२६ जानेवारी २०२४ दरम्यान आयोजित केलेल्या नाट्य व सांस्कृतिक महोत्सवाचा अकलूजच्या रसिक प्रेक्षकांनी मनमुराद आनंद लुटला.दि.१४ जानेवारी ते दि.२० जानेवारी २०२४ दरम्यान वीकेंड ड्रामा स्कूल फॉर ऑलचे प्रा.संजय हळदीकर यांच्या अभिनय कार्यशाळेचे विजयसिंह मोहिते-पाटील क्रीडा संकुल, अकलूज येथे आयोजन करण्यात आले होते. याचे उद्घाटन अकलूज शाखेच्या कार्याध्यक्ष सौ.शितलदेवी धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. प्रा.हळदीकर यांच्या अभिनय कार्यशाळेत वय वर्षे ७ ते वय वर्षे १७ वर्षापर्यंतच्या सुमारे ७८ बालकांनी प्रवेश घेतला होता. विविध खेळ व प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून प्रा.हळदीकर यांनी प्रशिक्षण दिले.दि.२० जानेवारी रोजी या कार्यशाळेचा समारोप करण्यात आला. यावेळी प्रशिक्षणार्थींनी ७ दिवसात शिकलेल्या अनेक कलांचे सादरीकरण केले. यावेळी कु.राजकुंवर मोहिते-पाटील, सिनेअभिनेते अजय तपकिरे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. प्रशिक्षणार्थींना सहभाग प्रमाणपत्राने सन्मानीत करण्यात आले.दि.२४ जानेवारी रोजीचा दिवस अकलूज परिसरातील कलाकारांनी गाजविला. यामध्ये बालनाट्य, एकांकिका, एकपात्री, पखवाज जुलबंदी, नाट्यपद व नाट्यप्रवेशाचे सादरीकरण करण्यात आले. प्रथम ह.भ.प. सूळ महाराज यांच्या वारकरी शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांनी पखवाज वादनाने कार्यक्रमाची सुरूवात केली. पखवाजावरील थाप आणि टाळ्यांचा कडकडाट यामध्ये झालेली सुरूवात उकळी एकांकिकेच्या '...आन् चहा' पर्यंत तशीच होती. मधुरा झांबरे, प्रयागराज शेलार व श्री.माऊली शेलार यांचे नाट्यपद, शिवरत्न सेमी इंग्लिश मिडीयम स्कूल, रंगसंगती ग्रुप, शंकरराव मोहिते-पाटील इंग्लिश स्कूल, नृत्यरंगम व शिवरत्न सीबीएसई स्कूलचे बालनाट्य, श्री.प्रेमसागर पुंज, कु.ज्ञानेश्वरी कांबळे यांचे एकपात्री तर डॉ.धाईंजे यांची गप्पा व शंकरराव मोहिते महाविद्यालयाची उकळी या एकांकिकांनी आपले सादरीकरण केले. उकळी एकांकिकेला प्रेक्षकांनी अक्षरशः डोक्यावर घेतले. हा कार्यक्रम स.म.शंकरराव मोहिते-पाटील स्मृतीभवन येथे आयोजीत करण्यात आला होता. यावेळी स्मृतिभवन प्रेक्षकांनी खचाखच भरले होते.या आठवड्यातील दुसरा कार्यक्रम म्हणजे दि.२५ जानेवारी २०२४ रोजी संगीत, नृत्य व विनोदांचा सदाबहार कार्यक्रम सेलिब्रीटींसह 'जल्लोष मराठी.'कार्यक्रमाची सुरूवात गणेश वंदनाने झाली. प्रेक्षकांमधून झालेली एन्ट्री खरोखरच अंगावर काटा आणणारी ठरली. गणपती बाप्पा मोरयांनी स्मृतीभवनचा बादशाही रंगमंगच दणाणून गेला. अनेक हिंदी, मराठी गितांबरोबरच विनोदांनी प्रेक्षकांना ३ तास जागेवरच खिळवून ठेवले. दि.२६ जानेवारी रोजी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले व वर्षा उसगांवर अभिनीत सारखं काहीतरी होतय या दोन अंकी सहज व सोप्या भाषेतील नाटकाने प्रेक्षकांना मनमुराद हसविले.कधी लोटपोट हसवून तर कधी अश्रूंच्या वाटे नात्यातल्या गोडव्याची मजेशीर नोकझोक या नाटकमध्ये दाखविण्यात आली. कार्यक्रमास माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, स.म.शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते-पाटील, आ.रणजितसिंह मोहिते-पाटील, सौ.सत्यप्रभादेवी मोहिते-पाटील, सौ.शितलदेवी मोहिते-पाटील यांच्यासह रसिक प्रेक्षकांची उपस्थित होती.

■■

## अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद मुंबई
## शतक महोत्सवी विभागीय नाट्य संमेलन सोलापूर – २०२४

| अ.क्र. | समितीचे नांव | पदाधिकाऱ्याचे नांव | पदनाम |
|---|---|---|---|
| १ | स्वागत समिती | सुनिल गुरव | प्रमुख |
| | | मंदार काळे | निमंत्रक |
| | | हिरालाल धुळम | निमंत्रक |
| २ | निमंत्रण समिती | अरुण मेहता | प्रमुख |
| | | प्रशांत बाबर | निमंत्रक |
| | | संजय सावंत | निमंत्रक |
| ३ | निवास व्यवस्था समिती | अनुजा मोडक | प्रमुख |
| | | वैशाली गुंड | निमंत्रक |
| | | शशिभुषण यलगुलवार | निमंत्रक |
| ४ | भोजन समिती | अमोल धाबळे | प्रमुख |
| | | नागनाथ पाटील | निमंत्रक |
| | | आशुतोष नाटकर | निमंत्रक |
| ५ | संपादकीय मंडळ (संमेलन स्मरणिका) | शोभा बोल्ली | संपादक |
| | | शिरीष देखणे | उपसंपादक |
| | | जयप्रकाश कुलकर्णी | उपसंपादक |
| ६ | रंगमंच सजावट समिती (नॉर्थकोट प्रशाला) | दीपक देशपांडे | प्रमुख |
| | | सय्यद इक्बाल | निमंत्रक |
| | | रविकिरण पोरे | निमंत्रक |
| ७ | रंगमंच सजावट समिती (हुतात्मा स्मृती मंदिर) | गुरु वठारे | प्रमुख |
| | | अभिजीत भडंगे | निमंत्रक |
| | | हरीप्रसाद देवकर | सदस्य |
| ८ | प्रसिद्धी समिती (प्रिंट मिडिया) | अश्विनी तडवळकर | प्रमुख |
| | | रविंद्र देशमुख | निमंत्रक |
| | | पद्माकर कुलकर्णी | सदस्य |
| ९ | बैठक व्यवस्था समिती (नॉर्थकोट – रंगमंच) | जोतिबा काटे | प्रमुख |
| | | राजा बागवान | निमंत्रक |
| | | नरेंद्र गंभिरे | निमंत्रक |
| | बैठक व्यवस्था समिती (स्मृती मंदिर – प्रेक्षागृह) | रविंद्र नाशिककर | प्रमुख |
| | | प्रा. नरसिंग आसादे | निमंत्रक |
| | | प्रा. शुभदा देशपांडे | निमंत्रक |

| | | | |
|---|---|---|---|
| १० | बैठक व्यवस्था समिती (स्मृती मंदिर - रंगमंच) | गोवर्धन कमटम | प्रमुख |
| | | रवि मोहोळकर | निमंत्रक |
| | | सारिका अग्निहोत्री | निमंत्रक |
| | बैठक व्यवस्था समिती (स्मृती मंदिर - प्रेक्षागृह) | संजीव अपराध | प्रमुख |
| | | विजय उदगिरी | निमंत्रक |
| | | जितेश कुलकर्णी | निमंत्रक |
| ११ | मंडप स्टेज साऊंड लाईट समिती (नॉर्थकोट प्रशाला) | शशिकांत पाटील | प्रमुख |
| | | किरण लोंढे | निमंत्रक |
| | | उमेश बटाणे | निमंत्रक |
| | साऊंड लाईट समिती (हुतात्मा स्मृती मंदिर) | जॉन फुलारी | प्रमुख |
| | | देवदत्त सिद्धम | निमंत्रक |
| | | गणेशसिंग मरोड | निमंत्रक |
| १२ | निवेदक व कार्यक्रम पत्रिका समिती (नॉर्थकोट प्रशाला) | मंजुषा गाडगीळ | प्रमुख |
| | | अनुजा मोडक | निमंत्रक |
| | | अपर्णा गव्हाणे | निमंत्रक |
| | निवेदक व कार्यक्रम पत्रिका समिती (हुतात्मा स्मृती मंदिर) | वसुंधरा शर्मा | प्रमुख |
| | | सुहास मार्डीकर | निमंत्रक |
| | | ममता बोल्ली | निमंत्रक |
| १३ | छपाई व प्रकाशन समिती | संदिप जाधव | प्रमुख |
| | | उन्मेष शहाणे | निमंत्रक |
| | | वसंत येमूल | निमंत्रक |
| १४ | शुटिंग / फोटोग्राफी / एल.ई.डी. स्क्रीन समिती | प्रशांत शिंगे | प्रमुख |
| | | किरण लोंढे | निमंत्रक |
| | | शिवप्रसाद चिक्का | सदस्य |
| १५ | वैद्यकीय समिती | डॉ. रविराज गायकवाड | प्रमुख |
| | | डॉ. शरद शिर्के | निमंत्रक |
| | | डॉ.चंद्रकांत कुलकर्णी | निमंत्रक |
| १६ | पाणीपुरवठा व स्वच्छता समिती | विजय बादगुडे | प्रमुख |
| | | राजू रंगम | निमंत्रक |
| १७ | समन्वय समिती (प्रशासन व शासन) | चेतन नरोटे | प्रमुख |
| | | नरेंद्र काळे (अध्यक्ष-भाजपा शहर) | निमंत्रक |
| | | विनोद भोसले | निमंत्रक |

| | | | |
|---|---|---|---|
| १८ | निधी संकलन समिती | गुरुराज यल्लटी | प्रमुख |
| | | प्रशांत बाबर | निमंत्रक |
| | | सुमित फुलमामडी | निमंत्रक |
| १९ | वाहन व्यवस्था व पार्किंग समिती | गफुर बागवान | प्रमुख |
| | | सुरेश बोंगे | निमंत्रक |
| | | टीपू सुल्तान बागवान | निमंत्रक |
| २० | कार्यक्रम व रंगमंच व्यवस्था समिती (नॉर्थकोट प्रशाला) | शिवाजी उपरे | प्रमुख |
| | | डॉ. रजनी दळवी | निमंत्रक |
| | | राजेश जाधव | सदस्य |
| २१ | कार्यक्रम व रंगमंच व्यवस्था समिती (हुतात्मा स्मृती मंदिर) | आनंद खरबस | प्रमुख |
| | | अमोल देशमुख | निमंत्रक |
| | | वैशाली शहापूरे | सदस्य |
| २२ | कार्यालयीन कामकाज समिती | जयप्रकाश कुलकर्णी | प्रमुख |
| | | सुभाष माने | निमंत्रक |
| | | प्रशांत शिंगे | निमंत्रक |
| २३ | सुरक्षा व्यवस्था समिती | दत्तात्रय जगताप | प्रमुख |
| | | प्रा. नरसिंह आसादे | निमंत्रक |
| | | सुरेश बटगेरी | निमंत्रक |
| २४ | प्रदर्शन व स्टॉल समिती | संतोष ऐदाळे | प्रमुख |
| | | अनिल जोशी | निमंत्रक |
| | | सुशांत कुलकर्णी | निमंत्रक |
| २५ | नाट्य दिंडी (शालेय) | अनिल पाटील | प्रमुख |
| | | भगवान मुंढे | निमंत्रक |
| | नाट्य दिंडी (महाविद्यालयीन) | प्रा. हनुमंत मते | प्रमुख |
| २६ | विधी समिती | ॲड. बसवराज सलगर | प्रमुख |
| | | ॲड. सुजित बापू कदम | निमंत्रक |
| | | ॲड. श्रीकृष्ण कालेकर | निमंत्रक |
| २७ | सल्लागार समिती | धैर्यशिल मोहिते पाटील, शशिकांत लावणीस, शितलादेवी मोहिते पाटील, लक्ष्मण उपरे, विद्या काळे, दत्तात्रय श्रीराम, मल्लिकार्जुन कावळे, राजा राजेशचंद्र आझम शेख, डॉ. शरद शिर्के, रविंद्र काशीद, सतिश सावंत | |

| | | | |
|---|---|---|---|
| २८ | स्वागत कक्ष व नोंदणी समिती | शांता येळंबकर | प्रमुख |
| | | अनिल जोशी | निमंत्रक |
| | | अमृता गोसावी | निमंत्रक |
| २९ | सोशल व डिजीटल मिडिया | इलियास सिद्दीकी | प्रमुख |
| | | संतोष उदगिरी | निमंत्रक |
| | | प्रशांत शिंगे | निमंत्रक |
| ३० | "नाट्यरंग" चित्रस्पर्धा समिती | विठ्ठल मोरे | प्रमुख |
| | | देवेंद्र निंबर्गीकर | निमंत्रक |
| | | प्रविण रणदिवे | निमंत्रक |
| ३१ | विद्युत पुरवठा समिती | विजय बादगुडे | प्रमुख |
| | | अनिल जोशी | निमंत्रक |
| | | दिपक यलगुलवार | निमंत्रक |
| ३२ | सत्कार समिती | कृष्णा हिरेमठ | प्रमुख |
| | | नाना काळे | निमंत्रक |
| | | मोहन दाते | निमंत्रक |
| ३३ | शहर सुशोभिकरण समिती | आनंद मुस्तारे | प्रमुख |
| | | प्रशांत बाबर | निमंत्रक |
| | | नागनाथ पाटील | निमंत्रक |
| ३४ | स्थानिक कार्यक्रम समिती | महेश निकंबे | प्रमुख |
| | | मिलिंद पटवर्धन | निमंत्रक |
| | | किरण फडके | निमंत्रक |

# ब्रह्मदेवदादा माने सहकारी बँक लि.,सोलापूर.

नोंदणीकृत कार्यालय : ११३-अ, सिध्देश्वर पेठ, जि. प. समोर, सोलापूर-४१३००१.

**मुख्य कार्यालय** : जी प्लॉट, प्लॉट नं.९७, श्री सिध्देश्वर मार्केट यार्ड, रविवार पेठ, सोलापूर-४१३००५. फोन : ०२१७-२७४४९३०, २७४३२७२, ८६६९९२११०४, ८६६९९२११०५

Email : bmsb.support@bmsbank.in Website : www.bmsbank.in

## ✻ ठेवीवरील आकर्षक व्याजदर ✻

| | |
|---|---|
| ✻ बचत खाते | २.७०% |
| ✻ ३० ते ९० दिवस | ४.००% |
| ✻ ९१ ते १८० दिवस | ५.००% |
| ✻ १८१ ते ३६४ दिवस | ६.००% |
| ✻ १ वर्ष | ७.००% |
| ✻ १३ महिने | ७.५०% |
| ✻ १३ महिने एक दिवस ते त्यापुढील कालावधीकरीता | ७.००% |
| ✻ दामदुप्पट ठेव योजना - सामान्य ठेवीदारांकरीता | १२० महिने |
| ज्येष्ठ नागरीकांकरीता (०.५० प्रतिशत जादा व्याजदर) | ११३ महिने |
| ✻ स्नेह कन्या लक्षाधीस योजना दरमहा रु. १०००/- | ७९ महिने |

सदर ठेव योजना फक्त १५ वर्षे पर्यंतच्या वयाचे मुलींकरीता मर्यादित आहे.

✻ कॅश सर्टिफिकेट योजना (२४ महिने व त्यापुढील कालावधीकरीता) वर नमुदप्रमाणे व्याजदर

✻ ज्येष्ठ नागरीकांस वर नमूद सर्व ठेवप्रकाराकरीता ०.५० प्रतीशत जादा व्याजदर

✻ एक रकमी रु.१५.०० लक्ष व त्यावरील ठेवरकमेकरीता (Bulk Deposit) वर नमूद सर्व ठेवप्रकाराकरीता ०.५० प्रतीशत जादा व्याजदर

**✻ बँकेची खास वैशिष्ठ्ये :-**
- कोअर बँकींग प्रणाली (C.B.S.)
- ATM / SMS बँकींग सेवा
- एन ए सी एच
- डी बी टी एल सुविधा
- सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय
- RTGS / NEFT ची सुविधा
- QR Code सुविधा
- सी टी एस क्लीअरींग
- Debit Card द्वारे देशांतर्गत POS / E-COM Online व्यवहाराची सुविधा
- सर्व प्रकारचे शासकीय कर देयक (Tax Payment) व मुद्रांक शुल्क (Stamp Duty Payment) जमा करण्याची सुविधा

**मोबाईल बँकींग अंतर्गत IMPS व UPI Payment सुविधा**

ब्रह्मदेवदादा माने बँक सर्व UPI प्लॅटफॉर्मवर !






# 9% व्याजदर सोने तारण कर्जावर

✻ प्रती व्यक्तीस रु. ४ लाख कर्ज मर्यादा

✻ मुदतीअंती मुद्दल + व्याज भरणा

✻ नियम व अटी लागू.

ठेवी विमा आणि पत हमी निगम अधिनियम १९६१ अंतर्गत रु. ५,००,०००/- रक्कमे पर्यंतची ठेव विमा संरक्षित (Insurance Covered) आहे.

अधिक माहितीसाठी प्रधान कार्यालय अथवा आमच्या नजीकच्या शाखेत संपर्क साधावा.


SVERI
स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग,
पंढरपूर (ऑटोनॉमस)
मा. चंद्रकांत (दादा) पाटील
(उच्च व तंत्रशिक्षण मंत्री)
डॉ. बी. पी. रोंगे (सर)
(संस्थापक-सचिव, प्राचार्य)
तुमचे करिअर, स्वेरीची जबाबदारी !!!
उत्कृष्ट निकालाची परंपरा
शै.व. २०२२-२३: F.Y. चे ११ विद्यार्थी विद्यापीठाच्या पहिल्या १० रँक मध्ये
उत्कृष्ट प्लेसमेंट
सर्वाधिक वार्षिक पॅकेज: ₹४१.५ लाख
उत्कृष्ट संशोधन
संयुक्त संशोधन निधी सुमारे ₹४४.४२ कोटी
उत्कृष्ट इन्फ्रास्ट्रक्चर
२७ एकरात सर्व सोईसुविधा युक्त सुसज्ज कॅम्पस
उत्कृष्ट मानांकने
NAAC A+: जिल्ह्यामध्ये सर्वाधिक स्कोअर, पु.अ.हो.सोलापूर विद्यापीठाकडून A++*
*Academic and Administrative Audit
कॉलेज कोड: EN 6220
संपर्क: 8929100614
ACCREDITED WITH GRADE A+ NAAC
3.46/4.00 CGPA
NATIONAL BOARD OF ACCREDITATION NBA ACCREDITED ALL APPLIED UG PROGRAMS
nirf
BAND of 151-300
AUTONOMOUS
A++ Grade
A++ Grade by P. A. H. Solapur University
(Academic and Administrative Audit)
SVERI 25
25 Years of Excellence
वेबसाईट: admissions.sveri.ac.in
स्वेरी कॅम्पसला अवश्य भेट द्या!
शतक महोत्सवी अ.भा. मराठी नाट्य संमेलनास येणाऱ्या सर्व मान्यवरांचे, कलाकारांचे व नाट्यरसिकांचे हार्दिक स्वागत!